संपादकीय

इंग्रजीत लिहिणारे भारतीय लेखक

बरेच भारतीय लेखक आता इंग्रजीमध्ये लिहू लागले आहेत आणि त्यांची दखल इंग्लंड-अमेरिकेत घेतली जाऊ लागली आहे. सलमान रश्दी, भारती मुखर्जी, अमिताब घोष, उपमन्यू चॅटर्जी, रोहिंतांग मिस्त्री, विक्रम सेठ, अरुंधती राय, शशी देशपांडे, झंपा लाहिरी, अनिता देसाई इ. इ. परंतु अजूनही एक विशिष्ट वर्ग असा आहे की जो भारतीयांच्या इंग्रजीची 'हिंग्लिश' अशी तो कुचेष्टेने संभावना करतो.

भारतीय लेखकांचे इंग्लिश हे आज इंग्लंड-अमेरिकेत बोलल्या जाणाऱ्या आणि प्रचारात असणाऱ्या इंग्रजीपेक्षा वेगळे आहे, ते गेल्या शतकातल्या व्हिक्टोरियन इंग्लिशच्या वळणाचे आहे आणि गुलामीच्या खाणाखुणा (रिस्पेक्टेड सर, युवर ओबेडियंट सर्व्हंट, आय बेग टू ॲप्लाय) जपणारे आहे असा आक्षेप घेतला जातो.

आपल्याकडे पूर्वी पाचवीपासून इंग्रजी हा विषय असे; आणि विद्यापीठात तर इंग्रजी हेच माध्यम असे. आजही विद्यापीठात भाषा व काही विषय वगळता विज्ञान, गणित व अन्य सर्व विषय हे इंग्रजीतच शिकवले जातात. म्हणजे किमान दहा वर्षे इंग्रजीचा अभ्यास करूनही जर विद्यार्थ्यांना शुद्ध व नेमका आशय व्यक्त करणारे इंग्रजी लिहिता येत नसेल तर आपण तरुणांची प्रचंड उर्जा वाया घालवत आहोत असे म्हणावे लागते. आता तर पहिलीपासून इंग्रजीचा अभ्यास सुरू केला गेला आहे. म्हणजे मुलांना मातृभाषा धड येणार नाही, आणि इंग्रजीही कितपत समजेल हे अजून कळायचे आहे. मातृभाषेवरची पकड वाढते, त्याप्रमाणे शब्दसंपत्ती वाढते. आपल्या मनातील विचार व भावना यांचे नेमके प्रकटीकरण जमते... परंतु मातृभाषा नीट कळण्याआधीच इतर भाषा, त्यांचे वेगळे व्याकरण, वेगळी लिपी, भिन्न उच्चारपद्धती हे सर्व ओझे बालमनावर लादून आपण नेमके काय साध्य करू पाहत आहोत अशी शंका आल्याशिवाय राहत नाही.

इंग्रजांनी दीडशे वर्षे भारतावर राज्य केले, परंतु इंग्रजीच्या रूपाने भारताला कायमचे गुलाम करून ठेवले. ते निघून गेले पण इंग्रजीचे भूत आपल्या मानगुटीवर ठेवून गेले. आपण सारे नाइलाज म्हणून इंग्लिश शिकतो. इंग्लिशमध्ये लिहितो. पण आपण लिहितोय ते बरोबर आहे की नाही याबद्दल सतत मनात साशंक असतो. आपण लिहिलेले बरोबर व अचूक आहे असा आत्मविश्वास आपल्याला क्वचितच असतो.

'ॲन इलस्ट्रेटेड हिस्टरी ऑफ इंडियन लिटरेचर इन इंग्लिश' हे नवे संपादित पुस्तक नुकतेच 'परमनन्ट ब्लॅक' या प्रकाशनसंस्थेने प्रसिद्ध केले आहे. त्यात एकूण २४ लेख असून ते सर्वच अभ्यासपूर्ण आहेत. त्यातील अनेक लेखांमध्येही अशाच प्रकारची इंग्रजी लेखनाबद्दलची मनोमन वाटणारी धास्ती व अपराधभावना भारतीय लेखकांमध्ये सातत्याने जाणवत आली आहे असे नमूद केले गेले आहे. इंग्लिशमध्ये लिहिणे हे आपल्या कर्मात लिहिले आहे, लिहित राहावे; मग त्याला लोक बरेवाईट काहीही म्हणोत, असा स्वत:च स्वत:शी निर्धार करून हे लेखन होत आले आहे. चांगल्या कॉलेज-विद्यापीठात शिक्षण झालेले असेल, परदेशात राहण्याची संधी मिळालेली असेल तर इंग्रजी लेखन हेच फलदायी ठरते. प्रादेशिक भाषांमधील लेखनाला प्रतिष्ठा व पैसा मिळत नाही, इंग्लिश लेखनाला त्यामानाने प्रसिद्धी व मान्यता खूप मिळते असाही अनुभव असल्याने सध्या सुशिक्षित भारतीय लेखक हे प्रादेशिक भाषांऐवजी इंग्रजीत लिहिण्याला प्राधान्य देऊ लागले आहेत. भारतातील इंग्लिश वृत्तपत्रांची संख्याही वाढत आहे; त्यामुळे इंग्लिशमध्ये सदरे व लेख लिहिणाऱ्यांनाही चांगली मागणी आहे. खुशवंत सिंग, शोभा डे, कुलदीप नायर, इंदर मलहोत्रा यासारखे स्तंभलेखक हे सिंडिकेटेड कॉलमद्वारे लाखो रुपये मिळवतात. इंग्लिश वृत्तपत्रे व नियतकालिके प्रादेशिक भाषांतील वृत्तपत्रांपेक्षा मानधनही भरघोस देतात; परंतु त्यातल्या त्यात माहितीपूर्ण व सर्वांगीण, अद्ययावत मतप्रदर्शनाचीही अपेक्षा धरतात. मराठीत लिहिताना ढिसाळपणा चालतो. इंग्रजीत लिहिताना चुकीची आकडेवारी व माहिती दिली तर कान उपटणारे वाचक सज्जच असतात.

इंग्रजीत पुस्तके लिहिण्यास भारतीय लेखकांनी खरे तर एकोणिसाव्या शतकातच आरंभ केला.

१९०१ साली 'लव्ह अँड लाइफ बिहाइंड दि पर्दाह' हे पुस्तक एका महिलेने लिहिले. कॉर्नेलिया सोराबजी या तरुणीने ऑक्सफर्डची शिष्यवृत्ती मिळवून, तेथून कायद्याची पदवी घेतली. परंतु १८९० मध्ये ती हिंदुस्थानात परतली तेव्हा तिला न्यायालयात वकील म्हणून उभे राहण्याची परवानगी नाकारण्यात आली. तेव्हा तिने आपल्या वकिली ज्ञानाचा उपयोग करण्याचा वेगळा मार्ग शोधून काढला. तिने स्वत: एक कायदेशीर सल्ला केंद्र काढले आणि आपल्याकडे सल्ला घेण्यासाठी आलेल्या स्त्रियांचे प्रश्न लघुकथांच्या रूपात मांडण्यास आरंभ केला.

'ॲन इलस्ट्रेटेड हिस्टरी' मध्ये रवींद्रनाथ टागोर, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, वगैरे अनेक लेखकांवरील अभ्यासपूर्ण लेख आहेत. सुनील खिलतानी यांनी 'गांधी अँड नेहरू - दि युझेस ऑफ इंग्लिश' हा लेख लिहिला आहे. या दोघांनी इंग्लिश भाषेचा शस्त्र म्हणून वापर केला. गुलामगिरीला आव्हान देण्यासाठी आणि स्वातंत्र्यप्राप्तीसाठी इंग्लिशमध्येच लिहिणे गरजेचे आहे हे जाणून त्यांनी तसा प्रयत्न केला. गांधींना तर आरंभी इंग्रजी बोलणाऱ्या व लिहिणाऱ्या गोटात प्रवेश मिळणेही अवघड झाले होते. पॅराडाइज लॉस्ट या मिल्टनच्या महाकाव्याच्या दोनशे ओळी पाठ करण्याची 'शिक्षा' त्यांना देण्यात आली. गांधींना त्या काव्याचे पाठांतर करताना फार यातना झाल्या. परंतु पुढे मात्र त्या पाठ केलेल्या ओळी कोणत्याही प्रसंगी आपले विचार व्यक्त करण्यासाठी उपयुक्त ठरू लागल्या. त्या योग्य संदर्भात सहज आठवू लागल्या. गांधीजींनी नंतर इंग्रजी लेखनावर प्रभुत्व मिळवले. त्यांचे इंग्रजी बिब्लिकल म्हणजे बायबलसारखे सोपे पण आशयघन मानले जाते. महात्मा गांधींच्या माय एक्स्परिमेंटस वुइथ ट्रुथ या आत्मचरित्रामुळे त्यांची कीर्ती देशोदेशी पोचली. या पुस्तकाच्या आजवर एक कोटी प्रती खपल्या आहेत.

रवींद्रनाथ टागोर यांना नोबेल पुरस्कार १९१३ साली मिळाला. त्यांनी स्वत:च गीतांजलीचा इंग्रजी अनुवाद केला. त्यात त्यांना इंग्लिश कवी डब्ल्यू बी येटस् यांची मदत झाली. पण रवीन्द्रांना इंग्रजी नीट येत नव्हते असे त्यांच्याबद्दल नेहमी बोलले जाई. इझरा पाउंड या लेखकाने त्याबद्दल जाहीर नाराजी प्रकट केली होती. रवीन्द्रांचे इंग्रजी लेखन हे

नोबेल पुरस्कार विजेत्या लेखकाला शोभेल असे नाही असे त्याने म्हटले. 'सेंटिमेंटल रबिश' म्हणून त्यांच्या काव्याची संभावना केली गेली. 'टागोरांना इंग्लिश येत नाही. एकाही भारतीयाला इंग्लिश येत नाही. बालपणी आत्मसात केलेली आणि आपल्या विचारांची असलेली भाषा सोडून इतर भाषेत कोणालाही शैलीदार लेखन करता येत नाही' असे येटसनेच पुढे रवींद्रांच्या संदर्भात म्हटले होते. शाळेत इंग्रजी हा रवींद्रांचा अगदी नावडता विषय होता. इंग्लिशचा धसकाच त्यांनी घेतलेला होता... त्यामुळे रवीन्द्रांनी पुढे इंग्रजीतच आपल्या लेखनाचे अनुवाद स्वत:च करणे ही बाब काहीशी चमत्कारिक ठरते.

परंतु आता ही परिस्थिती बदलत आहे असे मानायला जागा आहे. सलमान रश्दीला तर इंग्लिश भाषा नव्या ढंगाने लिहिण्याचे श्रेय दिले जाते. अरुंधती रॉय इंग्रजी भाषा हवी तशी वाकवू शकते. विक्रम सेठ पद्यात्मक कादंबरी सफाईदारपणे लिहू शकतो. इंग्रजी ही आता पूर्वीसारखी 'स्टँडर्ड' भाषा राहिलेली नाही. देशोदेशी तिचे स्वरूप पालटते आहे. प्रत्येक देशात त्या त्या स्थानिक भाषेच्या संकराने इंग्रजीचे नवनवे रूप समोर येत आहे. भारतात हिंदी आणि इंग्लिश यांचे मिश्रण होऊन हिंग्लिशचा अवतार झाला आहे; आणि येथील अनेक वृत्तपत्रे आणि नियतकालिके हिंग्लिशचा वापर सराईतपणे करीत आहेत. त्यामुळे मागच्या पिढीतल्या लोकांना इंग्रजीत लिहिताना आपले इंग्रजी अचूक आहे की नाही असा जो न्यूनगंडयुक्त प्रश्न पडे आणि अपराधभावनेचे सावट जाणवे, तसे आजच्या लेखकांना ते जाणवण्याचे कारण उरलेले नाही. भाषा ही कम्युनिकेशनसाठी वापरली जाते. संवादासाठी वापरली जाते. तो संवाद साधला की झाले ही आजची धारणा आहे.

इंग्रजीत लिहिण्याचा भारतीय लेखकांना त्यामुळेच आता अधिक आत्मविश्वास वाटतो आहे.

नवसहस्त्रकाच्या पहिल्या वर्षातच या आत्मविश्वासाचे खणखणीत उद्‌गार निघत आहेत, ही आशादायक गोष्ट आहे. इंग्लिश भाषा भारतातून जाणार नाही, ती उलट जास्तच पसरत राहणार आहे, तेव्हा इंग्रजीत होणारे लेखन लिहिणे गरजेचे आहे हे जाणून त्यांनी तसा प्रयत्न केला प्रकाशनही वाढतच राहणार आहे.

संपादक



नाते सौहार्दाचे, साहित्याचे

एक साहित्यिक म्हणून, कलावंत म्हणून आपल्या जीवनात काही व्यक्ती काळाच्या कुठल्यातरी टप्प्यावर येतात आणि आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक बनून जातात. अशा जवळच्या व्यक्तींमुळे आपल्या जीवनातला एक वेगळा आशय लाभतो, नात्यांचा एक नवा अर्थ गवसतो. अशा जवळच्या व्यक्तींबद्दल वाटणारे आकर्षक व आपुलेपण प्रकट करणे हे तसे अवघडच !

परंतु आमच्या काही लेखकांनी तसा प्रयत्न केला आहे खरा !

'पुलं'चे आनंद यादव यांना पत्र

६, आशीर्वाद
२६२,डॉ. ॲनी बेझंट रोड
वरळी, मुंबई १८
दि. २३/११/१९६१

चि. आनंद यादव यास अनेक आशीर्वाद,

तुझे पत्र येऊन बरेच दिवस झाले. आम्ही गेले काही दिवस सारखे प्रवासातच आहो. दर शनिवार, रविवार बाहरेगावी कार्यक्रम लागलेले आहेत. अमदाबाद झाले - आता बडोदा, मग नागपूर, सोलापूर अशी दौडदौड चालू आहे. जानेवारीत आम्ही सिंगापूरच्या दिशेला जात आहो. तीनचार महिने भारताबाहेर असणार.

तुझे लिखाण आता साहित्यक्षेत्रातील नामवंतांची सम मिळवू लागले हे पाहून अतिशय आनंद झाला. माझ्यासारख्या सामान्याचे अंत:करण केव्हाच हलले होते परंतु पंडितांच्या पगड्या हलल्या नव्हत्या. याही हलल्या हे उत्तम झाले. अत:करणात कुठेतरी घर करून राहते ते उत्तम साहित्य अशी माझी साधी व्याख्या आहे. तुझ्या त्या कविता अजूनही एखाद्याक्षणी तरंगत वर येतात. असले लिखाण सदैव हातून घडतेच असे नाही.

एकच धोक्याची सूचना देतो -

नवीनांच्यात अंतर्भात व्हावा अशा जाणिवेने एक ओळ देखील लिहू नकोस. तुझ्या पिंडातून सहज निघेल ते लिही. शेवटी त्या 'अंतस्थाचे समाधान' हे खरे ! त्याला स्मरून लिहिलेस तर तुझ्या जातीचा रसिक मिळाल्याखेरीज राहणार नाही. भवभूतीचा 'समानधर्मा' तो हाच. परंतु समानधर्म्याला उपेक्षून मात्र काहीही लिहू नये.

तू शैक्षणिक वातावरणात आहेस. त्याचा भरपूर लाभ घे. खूप वाच ! वाचन 'खूप' होतच नसते. विशेषत: इंग्रजी वाङ्मय. केवळ आधुनिक नव्हे. क्लासिक्स वाचलीच पाहिजेत. मांडी मोडून वाचली पाहिजेत. टॉलस्टॉय, डोस्टोवस्की यासारख्यांची जंगले हिंडून आले पाहिजे.

अत्याधुनिक काव्य माझ्या मनाचा ठाव घेत नाही.

'परि स्मरते आणिक करते व्याकुळ केव्हा.
त्या माजघरातील मंद दिव्याची वात'

यासारखी काव्याची ही हुरहुर आहे. बी, तांबे, अनिल बोरकर,

कुसुमाग्रज आजही मला हुरहुर लावतात. दोष माझा असेल पण अतिनवकवींचा आणि माझा धागा जुळत नाही. दिवसेंदिवस जुन्या कवींच्या संग्रहांवरच मला संतुष्ट राहावे लागेल असे वाटू लागले आहे. प्रतिमांचा सोस खुळ्यासारखा वाढला आहे. गद्यात आणि पद्यात रचनेतला निखळपणा जाऊन ठायीठायी दुर्बोधतेचे अडसर उभे आहेत. त्यांत सोने किती आणि हीण किती ते कळणे अवघड झाले आहे. कथा ह्या प्रतिमांच्या कंथा झाल्या आहेत. काव्याची गती धर्माहून गहन होत चालली आहे. अनेक कविता तर काव्यविभाजनात न छापता कूट विभागात घालाव्या असे वाटू लागले आहे.

साहित्य ज्यावेळी असे अत्यंत आत्मकेंद्रित होऊन आकुंचनात समाधान मानू लागते. त्यावेळी श्रेष्ठ धारिष्ट्य बाळगून लिहावे लागते. कारण साहित्यिक गौरवाची पीठे तयार होतात. त्या त्या पीठाच्या मान्यतेकडे लक्ष जाते आणि घोटवीन लाळ ब्रह्मज्ञान्याहाती मुक्ता आत्मस्थिती सांडवीन, ही ईर्षा जाऊन त्या त्या (बऱ्याच वेळा बोगस) ज्ञानियांच्या शाबासकीवर संतुष्ट होण्याची धडपड सुरू होते. स्वत:च्या साहित्याचे प्रवाह लोक जीवनात न पाठवता ह्या पीठाध्यक्षांच्या डोक्यावर धार धरण्याकडे प्रवृत्ती वाढते. जगातल्या साऱ्या श्रेष्ठ लेखकांनी वरपांगी सामान्य दिसणाऱ्या रचनेतून असामान्यत्वाची बीजे दडवली. आज वरपांगी असामान्यत्वाची झूल घातलेली सामान्य लेखने मला दिसताहेत. तेवढा धोका सांभाळ ! अनुभूतीची क्षितिजे साहित्यिकांच्या मेळाव्यातच आणून लहान करू नकोस. पंढरीत आहेस. वारीच्या वारकऱ्यांना भेट. बडव्यांची मने शोधून पहा. चंद्रभागेवरच्या कोळ्यांना भेट. तुझी स्फूर्तिस्थाने ती आहेत. त्यांना विसरू नकोस. एरवी साहित्यिकाने साहित्यिकासाठी लिहिलेले साहित्य लिहिशील. सावधान.

मी लहान पत्रे लिहितो म्हणून रागावतोस. घे. आज मोठे पत्र लिहिले. सुनीताचे आशीर्वाद. हे पत्र माझे व सुनीताचे असे दोघांचेही आहे असे समजून वाचणे. रागावू नकोस, असा सुनीताचा निरोप.

भाई

डॉ. आनंद यादव



तरुण साहित्यिकांना लाख मोलाचे वाटेल असे पु. ल. देशपांडे यांचे पत्र

भाईंचे (पु. ल. देशपांडे यांचे)हे पत्र मला चाळीस वर्षांपूर्वी पंढरपुरास मी प्राध्यापक असताना आलं होतं. माझ्या स्मरणाप्रमाणं भाईंनी त्यावेळी नुकतीच नोकरी सोडली होती. नुकतीच त्यांनी 'बटाट्याची चाळ', 'असा मी असामी' एकपात्री प्रयोग करण्यास प्रारंभ केला होता. त्या काळात त्यांची व्यक्तिचित्रे निरनिराळ्या नियतकालिकांच्या अंकांतून गाजत होती. त्यांच्यावर प्रसिद्धीचे प्रखर झोत पडू लागले होते.

याच काळात नवसाहित्यसमीक्षक त्यांच्यावर टीकाही करू लागले होते. हा काळ नवसाहित्याच्या भरभराटीचा होता. नवसाहित्याला अग्रक्रम देणारे 'सत्यकथा' मासिक आणि मौज-पॉप्युलर ही प्रकाशने अत्युच्च शिखरांवर आरूढ झाली होती. 'प्रयोगशीलता' हा शब्द साहित्यक्षेत्रात पर्वणीचा झाला होता. पुणे-ठाणे-मुंबई या पट्ट्यात साहित्यविषयक मासिकांची गर्दी झाली होती. नवसाहित्यिकांचे मोहोळ या प्रदेशात ओथंबले होते. उभ्या महाराष्ट्रातील साहित्याचा वाचकवर्ग आणि समीक्षक वर्ग अशा प्रकारच्या साहित्याला आणि साहित्यिकांना डोक्यावर घेत होता.

नवसाहित्यिकांच्या अगोदरची मराठी साहित्यिकांची ज्येष्ठ पिढी ही प्रस्थापित झालेल्या नवसाहित्यिक समीक्षकांना तर कालबाह्यच वाटत होती, पण नव्या उमेदवार, तरुण, उमेदीच्या बच्चा साहित्यिकांना ती तशी वाटत होती. त्यांना आकर्षण होते

ते नवसाहित्यिकांचे आणि त्यांच्या प्रसिद्ध होणाऱ्या नवसाहित्याचे. 'सत्यकथा' हे त्यांचे दैवत होते. या मासिकातून प्रसिद्ध होणारे साहित्य हेच त्यांना प्रमाण, पूर्णपणे विकसित झालेले, खरे, कलापूर्ण साहित्य वाटत होते. आपले साहित्य 'सत्यकथेतून' प्रसिद्ध व्हावे यासाठी ते सत्यकथा अथपासून इतिपर्यंत वाचत होते, अभ्यासत होते. त्या साहित्याचे सहीसही अनुकरण करून ते 'सत्यकथेकडे' प्रसिद्धीसाठी पाठवीत होते. त्यांची एखादी कविता, एखादे जरी टिपण प्रसिद्ध झाले तरी त्यांना धन्यधन्य वाटत होते.

पु. ल. देशपांडे हे प्रस्थापित नवसाहित्यिकांच्या अगोदरच्या पिढीचे मानले जात. मी 'बच्चा' साहित्यिकांच्या उगवत्या पिढीत जमा होणारा तरुण होतो. त्यावेळी माझे वय वर्षे पंचवीस होते. १९६१ च्या जूनमध्ये मी मराठीचा प्राध्यापक म्हणून पंढरपूर येथील कॉलेजात रुजू झालो होतो. प्राध्यापकाच्या नोकरीचे माझे हे पहिलेच वर्ष. त्याच वर्षीच्या नोव्हेंबर महिन्यात भाईंचे हे पत्र मला पंढरपुरात आले होते.

भाईंनी 'हिरवे जग' या माझ्या ग्रामीण कवितासंग्रहातील कविता प्रथम १९५५ मध्ये वाचली होती. या कवितेवर जे पूर्वसुरींचे संस्कार झालेले होते ते सर्व कवी भाईंच्या पिढीचे होते. त्यांच्याच कविता पाठ्यपुस्तकांतून प्रामुख्याने येत असत. ते कवी १९५५ पर्यंत मला माहीत होते. त्यामुळे माझ्यावर फक्त त्यांचेच संस्कार मी एस. एस. सी. होईपर्यंत माझ्यावर होणे स्वाभाविक होते, व तशा प्रकारची कविताच मी लिहिणे तोपर्यंतच्या काळात स्वाभाविकही होते आणि भाईंना माझी ती अस्सल ग्रामीण कविता आवडणेही स्वाभाविक होते. त्यांना ती खूप हृद्य आणि प्रांजळ वाटत होती.



डॉ. आनंद यादव

पण १९५५ ते १९६१ या कॉलेजमधल्या माझ्या शिक्षण काळात नवकवितेचे, नवकथेचे, नव समीक्षेचे भरपूर संस्कार माझ्यावर झाले. त्या संस्कारक्षम विद्यार्थीदशेत मलाही तशाच प्रकारचे साहित्य लिहावे, असे वाटू लागले. म्हणून मी ग्रामीण कथा आणि कविता लिहू लागलो. १९६१च्या 'सत्यकथे'च्या आणि 'मौजे'च्या दिवाळी अंकांत माझ्या कथा आणि कविता एकदम प्रसिद्ध झाल्या. मला ही प्रथमच प्रसिद्धी मिळाली होती.

भाईंनी माझ्या ह्या नव्या वळणाच्या कथा आणि कविता प्रथमच सत्यकथा-मौजेतून वाचल्या. त्यांना त्या काहीशा अनपेक्षित होत्या. माझ्या लेखनप्रवृत्तीत पडलेला फरक त्यांच्या ध्यानात आला असावा. या पार्श्वभूमीवर त्यांनी मला वरील पत्र लिहिले.

भाईंच्यावर माझी नितान्त श्रद्धा होती. त्यांच्या या पत्राचा माझ्यावर सखोल परिणाम झाला. नंतरच्या काळात मी सत्यकथा-मौजमधून भरपूर लेखन केलं. तरी माझं साहित्य साधं, सरळ, सोपं होतं. मन:पूर्वक लिहिण्याची सवय मी सातत्यानं जाणीवपूर्वक जोपासली. माझ्या या साहित्याचा प्रवाह लोकजीवनाच्या दिशेने वाहता ठेवला. पुढे त्यासाठी ग्रामीण साहित्याची चळवळही आरंभिली.

आज चाळीस वर्षानंतर हे पत्र अनपेक्षितपणे पुन्हा वाचनात आलं आणि मला कळलं की हे पत्र जरी भाईंनी मला उद्देशून लिहिलं असलं तरी साहित्यक्षेत्रात नव्याने पदार्पण करणाऱ्या प्रत्येक तरुण साहित्यिकाच्या आणि तरुण साहित्यिक पिढीच्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहे; जणू त्यांच्यासाठी कायमचा मार्गदर्शक ठरणारा शिलालेख आहे.

तरुण पिढीचं प्रतीक असलेल्या त्यावेळच्या मला आत्मीयतेने लिहिलेल्या या पत्रात उत्कट जिव्हाळा भरलेला जाणवतो. स्वत:कडे नम्रता घेऊन कळकळीने लिहिलेल्या या पत्रात तरुण साहित्यिकासाठी योगायोगाने मला दहा सूत्रे सापडली.

१) **'अंत:करणात कुठेतरी घर करून राहते ते उत्तम साहित्य.'** अशी त्यांनी ललित साहित्याची व्याख्या केली आहे. तरुण साहित्यिक पुष्कळ वेळा कल्पनाविलासात रमतात. अलंकार, प्रतिमा, ललित्याचे चमकदार नखरे करतात. टाळ्यांच्या कविता लिहितात. हे खरे साहित्य नसते, याचे भान या व्याख्येने येते.

२) **'नवीनांच्यांत अंतर्भाव व्हावा अशा जाणिवेने एक ओळ देखील लिहू नकोस.'** अशी धोक्याची सूचना ते देतात. तरुण लेखकाला नेहमी असे वाटत असते की आपल्या भोवताली जी काही लोकप्रिय होणारी साहित्याची निर्मिती चालू आहे, तसेच साहित्य आपण लिहावे आणि साहित्यिकवृंदात सामील व्हावे. त्यामुळे त्यांच्यासारखेच आपण प्रसिद्धीच्या लाटेवर आरूढ होऊ, असे त्यांना वाटते. पण ती स्वत:चीच स्वत:ने केलेली फसवणूक आहे, असे भाई सांगतात.

३) **म्हणूनच ते पुढे म्हणतात की, 'तुझ्या पिंडातून सहज निघेल ते लिही. शेवटी त्या 'अंतस्थाचे समाधान' हे खरे !'**

पहिल्या सूत्रात त्यांनी रसिक वाचकाच्या दृष्टीने साहित्याची व्याख्या केली आहे. त्याच्या अंत:करणात वाचनोत्तर काळात 'घर' करून राहते ते साहित्य, असे सुचविले आहे. तर या तिसऱ्या सूत्रात निर्मात्या लेखकाच्या दृष्टीने खरे साहित्य कोणते, याविषयी ते लिहितात. वाचकाच्या समाधानासाठी धडधड करणारे साहित्य लिहिण्यापेक्षा लेखकाच्या स्वत:च्या सखोल मनाचे, स्वत:च्या पिंड धर्मांचे म्हणजे 'अंतस्थाचे', 'सखोल मी' चे समाधान असे सुचविले आहे. पुढे ते आणखी सुचवितात की अशा साहित्याने एखाद्या वेळेस सर्व रसिक वाचकांचे समाधान होणार नाही; म्हणून अस्वस्थ होण्याचे काहीच कारण नाही. कोणीतरी, केव्हातरी, कुठेतरी आपल्या जातीचे भेटतात आणि ते निश्चितपणे दाद देतात. त्यालाच भवभूती या महाकवीने 'समानधर्मा' असे म्हटले आहे. म्हणून स्वत:च्या अनुभवांना प्रमाण मानून लिहावे. स्वत:ची प्रतारणा करून काही लिहू नये, असे ललित लेखकाला उद्देशून ते सांगतात. जणू ते लेखकाच्या दृष्टीने त्याच्या साहित्याची व्याख्या सांगत आहेत, असे वाटते.

४) **'खूप वाच ! वाचन 'खूप' होतच नसते...क्लासिक्स वाचलीच पाहिजेत. टॉलस्टॉय, डोस्टोवस्की यासारख्यांची जंगले हिंडून आले पाहिजे.'** असे ते पत्रात म्हणतात.

नवोदित साहित्यिकाने भरपूर वाचन केलेच पाहिजे, असा त्यांचा आग्रह आहे. त्यातल्या त्यात 'क्लासिक्स' वाचलीच पाहिजेत. ज्या श्रेष्ठ साहित्यिकांनी जीवनाचे प्रचंड आणि विस्तृत अनुभव मांडले आहेत, ज्या अनुभवांना अनंत परिमाणे लाभलेली आहेत, असे साहित्य वाचलेच पाहिजे, असे ते मानतात... ललित लेखकाला प्रसिद्धी मिळाली की त्याला इतरांचे चांगले साहित्यही वाचण्याची गरज वाटत नाही. असे लेखक दोन अंगांनी धोक्यात येतात.

(अ) त्यांचा अनुभवसंचय लवकर संपतो आणि लौकरच ते मृतप्राय ठरतात. (ब) त्यांनी इतरांचे अनेक अंगांनी विकसित होणारे साहित्य वाचले नाही तर त्यांचे स्वत:चे साहित्य एकदेशीय आणि नंतर नंतर खूप खूप ओळखीचे वाटते. असे ओळखीचे वाटणारे साहित्य वाचकाला 'नवे' काही देत नाही. त्यामुळे तो लेखक स्वत: खुरटला जातो आणि इतरांच्या दृष्टीने गौण स्थानी जातो. हा धोका भाईंनी जाणून खूप खूप वाचन (लेखकाने) केले पाहिजे, असा आग्रह धरतात.

५) नंतरच्या परिच्छेदात त्यांनी त्यावेळच्या नवकवितेच्या आणि नवकथेसह नव गद्यसाहित्याच्याही मर्यादा सांगितल्या आहेत. या साहित्यावर अनुभवांचा अवाजवी प्रभाव पडल्याने हे साहित्य कसे कृत्रिम आणि विपर्यस्त झाले आहे, हे त्यांनी दाखवून दिले आहे. 'प्रतिमांचा सोस खुळ्यासारखा वाढला आहे... ठायी ठायी दुर्बोधतेचे अडसर उभे आहेत. त्यात सोने किती आणि हीण किती, ते कळणे अवघड झाले आहे... कथा ह्या प्रतिमांच्या कथा झाल्या आहेत.... काव्याची गती धर्माहून गहन झाली आहे.... अनेक कविता काव्यविभागात न छापता कूट विभागात घालाव्या....' अशा विधानांतून त्यांनी मूळ साहित्य प्रवृत्तींचा कसा विपर्यास झाला आहे, हेच दाखवून दिले आहे.. नव्या उमेदीचे तरुण होतकरू साहित्यिक हे आपल्या लगतच्या वडिलधाऱ्या साहित्यिकांच्या साहित्याचे स्वाभाविकपणे अनुकरण करतात. त्यांच्यासारखेच आपणही व्हावे, अशी त्यांची इच्छा असते. म्हणून त्या वेळच्या (१९६० च्या आसपासच्या कलावादी साहित्याच्या सुवर्णकाळात) नव्या येणाऱ्या पिढीने अंधळे अनुकरण करू नये, डोळसपणे, अभ्यस्तपणे, चौकस बुद्धीने सारासार लक्षात घेऊन, 'सोने' कोणते 'हीण' कोणते ते ओळखून साहित्य निर्मिती आणि साहित्यवाचन करावे, असे त्यांना सुचवायचे आहे.

६) त्याच बरोबर अशा नवकाव्यापेक्षा मराठीतील बी, तांबे, अनिल, बोरकर, कुसुमाग्रज या अभिजात कवींच्या काव्याचे वाचन करावे, अशीही शिफारस त्यांनी केलेली आहे. ती अतिशय सूचकतेने, नम्रपणे केली आहे.

७) साहित्यक्षेत्रातच जर पडझडीचा काळ असेल, बहुसंख्याकांचीच जर दिशाभूल झालेली असेल, तर त्या बहुसंख्याकांचे, अनुकरण करून त्यांच्या नेत्यांची किंवा अग्रणींची मान्यता किंवा शाबासकी मिळविण्यापेक्षा स्वत: साहस करून, मनाशी हिंमत बांधून स्वत:ची वाट स्वत:च स्वतंत्रपणे चोखाळली पाहिजे; मग समकालीनांची मान्यता नाही मिळाली तरी चालेल. असे 'श्रेष्ठ धारिष्ट' आपल्याजवळ असले तरच नवा साहित्यिक नव्या दिशेने जाईल व पर्यायाने साहित्यक्षेत्रालाच नवी दिशा दाखवू शकेल. अशी 'ईर्षा' तरुण साहित्यिकाजवळ असावीच लागते. - असे त्यांनी त्या नंतरच्या परिच्छेदात सुचवले आहे.

८) असे 'श्रेष्ठ धारिष्ट' जर मुळातच असेल तरच तो लेखक खऱ्या अर्थाने श्रेष्ठ साहित्यिक होऊ शकतो. त्याच्या श्रेष्ठत्वाची खूण त्याच्या साहित्यातच दिसून येते. त्या खुणेविषयी ते सहजपणे लिहितात की, **''जगातल्या साऱ्या श्रेष्ठ लेखकांनी वरपांगी सामान्य दिसणाऱ्या रचनेतून असामान्यत्वाची बीजे दडवली.''**

यातून त्यांना असं स्पष्ट सुचवावयाचे आहे की वर वर सोप्या, सहज लिहिलेल्या रचना ज्या वाटतात त्यांच्या अंतरंगातील ध्वनित आशय श्रेष्ठ दर्जाचा असतो. आणि साहित्यात तोच महत्त्वाचा असतो. उलट 'वरपांगी असामान्यत्वाची झूल घातलेली सामान्य लेखने'च विद्यमान साहित्य निर्मितीत जास्त असतात.

तेवढा धोका तरुण साहित्यिकाने सांभाळला पाहिजे तेवढा धोका असलेली धूळ त्याला कळली पाहिजे.

९) तरुण साहित्यिकांनी तथाकथित विद्वान समीक्षकांना आवडेल किंवा अग्रणी साहित्यिकांच्या पगड्या डुलतील अशा बेताने साहित्यनिर्मिती करण्यात धन्यता मानू नये. या बाबतीत तरुण साहित्यिकाने 'सावधान' असले पाहिजे.

१०) तरुण साहित्यिकाने कोणत्याही अर्थाने आपल्या अनुभवाचे क्षेत्र 'संकुचित' करू नये. केवळ पांढरपेशा, शहरी राहणीतल्या मध्यम वर्गातीलच अनुभव घेऊन त्या वर्गापुरतीच साहित्यिनिर्मिती मर्यादित ठेवू नये. किंवा केवळ दलित, केवळ ग्रामीण, केवळ ऐतिहासिक, केवळ पौराणिक इत्यादी स्वरूपाच्याही मर्यादा घालून घेऊ नयेत. त्याने समाजात जो बहुसंख्येने असलेला जनसामान्यांचा स्तर असतो त्याच्याशी समरस झाले पाहिजे. जनसामान्यांना समजून घेतले पाहिजे. त्यातून अनुभवाची शिदोरी संपन्न होऊ शकेल. आणि त्यांना कळेल, उमगेल असेच साहित्य निर्माण केले पाहिजे. निदान आपण ज्या समाजस्तरातून आलो त्या समाजस्तरात सातत्याने वावरून अनुभव घेतले पाहिजेत व त्यांचे अंतरंग विस्तृत केले पाहिजे. समाजाला विसरून केवळ समीक्षकांसाठी किंवा संकुचित क्षेत्रासाठी जो लेखक साहित्यनिर्मिती करतो, त्याचे स्वत:चे साहित्यिक अस्तित्वच धोक्यात येते. हाही सावधानतेचा इशारा त्यांनी शेवटी दिला आहे.

-ही दहा सूत्रे आजच्याही तरुण, उमेदीच्या साहित्यिक पिढीला मार्गदर्शक आणि उपयुक्त ठरतील, असे वाटल्याने तरी विस्ताराने मी मांडली आहेत. त्यांतील मथितार्थ उलगडून दाखविण्याचाही काहीसा प्रयत्न केला आहे. काही ठिकाणी आजचे संदर्भ देऊनही ही सूत्रे विशद केली आहेत. त्यामुळे त्यांचे कालनिरपेक्ष, स्थायी स्वरूप लक्षात येईल, अशी अपेक्षा आहे.

डॉ. आनंद यादव यांची लोकप्रिय पुस्तके

आत्मचरित्र

झोंबी	२२५/-
नांगरणी	१५०/-
घरभिंती	२५०/-
काचवेल	२२०/-

कादंबरी

माऊली	६०/-
कलेचे कातडे	२००/-

कथासंग्रह

घरजावई	१००/-
शेवटची लढाई	९०/-
आदिताल	६०/-
भूमिकन्या	९०/-
झाडवाटा	९०/-

बाल-कुमार साहित्य

सैनिक हो,तुमच्यासाठी...	२०/-

वैचारिक / ललितगद्य

स्पर्शकमळे	१००/-
पाणभवरे	१२५/-
मातीखालची माती	४०/-
ग्राम संस्कृती	१२५/-

द. ता. भोसले



माझ्या आयुष्यातील एक भाग्ययोग : बापूसाहेब झपके

माणसाचं आयुष्य हे एखाद्या नदीसारखे असतं. अंगठ्याएवढ्या धारेतून तिचा जन्म झालेला असतो. या छोट्याशा नदीला तिच्या वाटचालीत अवतीभवतीचे अनेक ओढे-नाले येऊन भेटतात. त्या जलधारेला पृष्ट करतात. रुंदावतात. तिच्या या संपन्न आणि समृद्ध जीवनाला प्रत्येक ओढ्यानं दिलेलं योगदान मोलाचं असतं. या योगदानाचं पाथेय घेऊनच ती वैशिष्ट्यपूर्ण बनलेली असते. संपन्न बनलेली असते. माणसाच्या आयुष्याचंही तसंच आहे. त्याच्या जीवनप्रवासात अनेक माणसं त्याला भेटत असतात. त्याच्या जीवनाशी एकरूप होतात. काही घरातली असतात. काही बाहेरची असतात. काही नात्यांची असतात. काहींनी नाते निर्माण केलेले असते. काही थोडा काळ साथ सोबत करतात; तर काही दीर्घकाळ सावलीसारखी आपणास बिलगलेली असतात. काहींचा सहवास फुलासारखा क्षणकाळ घमघमतो, तर काही नवनिर्मितीची स्वप्ने बाळगणाऱ्या फळांच्या गाभ्यात विसावलेल्या बियासारखी आत आत मुरलेली असतात. त्यामुळे माणसाचं आयुष्य जितकं त्याचं स्वत:चं असतं, तितकंच किंबहुना थोडंसं अधिकच या आपल्या आयुष्यात मुरलेल्या माणसांनी दिलेल्या दानातून सिद्ध झालेलं असतं. आपलं स्वत:चं आणि त्यांचं याचं इतकं मनोमीलन झालेलं असतं की, शेवटी शेवटी ते सारं 'आपलंच' बनून जातं. आपलंच नाव घेऊन समाजात मिरवत असतं.

आपल्या आयुष्याच्या प्रवाहात आपणाला अनेक छोटीमोठी माणसेच आपल्या जीवनावर प्रभाव पाडत असतात. आपल्या जीवनाला वेगळे वळण देण्यास कारणीभूत ठरतात. ओल्या मातीत पडलेले बी जसे अंकुरते, तसे ओलं मन, संवेदनशील वय अन् संस्कारशील काळात भेटलेली माणसंच तळहातावर देवाचा प्रसाद ठेवावा तसं, आपल्या आयुष्याला काहीतरी देऊन जातात. काही जाणीवपूर्वक देऊन जातात. काही अजाणता जीवनाचा गंध मागे ठेवून जातात. त्यामुळे आपण आपोआप मोहरून जात असतो. नंतरच्या वयात तेवढा त्यांचा प्रभाव पडत नाही. कारण आपलं व्यक्तिमत्त्वही तेव्हा ताठर, निबर होऊन स्वीकारशील वृत्ती हरवून बसलेलं असतं. वाळून कोळ झालेल्या एखाद्या फांदीवर पाण्याची संततधार धरली तरी जशी त्याला पालवी म्हणून फुटत नाही, तशी प्रौढवयात, उतरणीला लागलेल्या आयुष्यात कोणी पूर्णपुरुष कृष्ण होऊन आयुष्यात आला तरी संस्कारांची पालवी फुटत नाही. यात त्या व्यक्तीचा दोष नसतो, त्या वाळलेल्या फांदीचा दोष असतो. साचेबंद जीवनरहाटीत सापडलेल्या त्या आयुष्याचा दोष असतो.

माझ्याही आयुष्यात माझ्या भाग्यानं खूप माणसं आली. खूप मोठी माणसं आली. नानाविध क्षेत्रांतील माणसं आली. जीवनाला कलंकित करणारी जी क्षेत्रे आहेत, त्यातला माणसू माझ्या आयुष्यात कधी डोकावून गेला नाही, हे देखील माझे भाग्यच म्हणावे लागेल. समाजातला प्रत्येक माणूस दुसऱ्या माणसाच्या जीवनात क्षणकाल उतरला तरी थोडा का होईना प्रभाव पाडून जातच असतो. हा प्रभाव कधी भला असतो, कधी बुरा असतो. पण यावेळी त्या माणसाच्या ठायी घेण्यासारखा जो गुण असतो, तो आपणाला घेता आला पाहिजे. त्याने जगण्यासाठी जी पाऊलवाट स्वीकारलेली असते, त्या वाटेवरून आपणाला चार पावले



द. ता. भोसले

टाकता आली पाहिजेत. तरच आपलं पोकळ नि अपूर्ण असणारं आयुष्य समृद्ध होऊन जातं. भरभरून वाहू लागतं.

पन्नास वर्षांपूर्वी ऑगस्टच्या चार तारखेला एका पडक्या धर्मशाळेत नव्याने सुरू झालेल्या 'सांगोला विद्यामंदिर'मध्ये आठवीला प्रवेश मिळावा म्हणून मी ऑफिसच्या पायरीवर टेकलो. खांद्यावर गंजलेली जुनाट ट्रंक होती. डोक्यावर मध्यभागी फाटलेली गांधी टोपी आणि धुळीने माखलेले अनवाणी पाय; अंगात चुरगळून गेलेले मळके कपडे होते.

जाडजूड आणि उंच एका व्यक्तीनं आपल्या मिलिटरी शब्दांत सुनावलं, ''आमची शाळा मार्चपासून सुरू झालेली असल्याने अभ्यासक्रम खूप पुढे गेलेला आहे. आता नव्याने प्रवेश घेऊन काही उपयोग व्हायचानाही. नापास होशील. नव्यानं निघालेल्या आमच्या शाळेच्या निकालाला तुझ्या नापासाचा बट्टा लागायला नको. दुसरी एखादी शाळा बघून प्रवेश घे.''

आधीच एका शाळेत प्रवेश घ्यायला आणि ती बंद पडायला गाठ पडलेली. आठ दिवसच त्या शाळेची घंटा वाजली आणि नवव्या दिवशी तिची मृत्यूघंटा खणखणलेली.

त्यामुळे हे उत्तर ऐकताच मी मुसमुसून रडायला सुरवात केली. हुंदके अनावर झाले. मनात नाना विचाराचं वादळ उठले.'' आता पुढे

काय करावे ? कुठे जावे ? जवळपास हायस्कूल नव्हते. जे होते तेथे शिकणे उत्तम गरिबीमुळे अन् निराधार असल्याने जाणे शक्य नव्हते.''

मी नुसता मुसमुसत होतो. ते नुसते माझ्याकडे पाहात होते.

तेवढ्यात एक खादी कपड्यातले मध्यम उंचीचे चष्मा घातलेले गृहस्थ आले. ते वर्गावरून आले असावेत. आमच्या जवळ थांबले. शेजारी उभ्या असलेल्या रखमाजी शिपायाकडे त्यांनी चौकशी केली. ''ये ऑफिसमध्ये. बघू तुझ्या ॲडमिशनचे काहीतरी.'' असं त्यांनी म्हणताच मी रडायचा थांबलो.

आत गेल्यावर त्यांनी माझ्याकडून अभ्यासाविषयीच्या अनेक गोष्टी वदवून घेतल्या अन् मला रीतसर प्रवेश दिला. तरीही ''मी नापास झालो तर त्याचा दोष शाळेवर ठेवणार नाही. तो दोष मी स्वीकारीन'' असे त्या धिप्पाड प्रकृतीच्या शिक्षकाने माझ्याकडून लिहून घेतलेच.

नंतर मला समजले की, मला प्रवेश देणारे हेच ते बापूसाहेब झपके. तेच शाळेचे संस्थापक होते. तेच मुख्याध्यापक होते. तेच शिक्षक होते. तेच बेवारस असलेल्या विषयांचे बदली शिक्षक होते. आणि तेच तालुका आणि जिल्ह्याचे राजकीय पुढारीपण होते. समाजजीवनात नानाविध भूमिका पार पाडणारे ते एक बहुविध व्यक्तित्व होते. शहरातील आणि तालुक्यातील ते एक वंदनीय व्यक्तिमत्त्व होते. या आदर्श आणि समृद्ध व्यक्तिमत्त्वाच्या सहवासात मला दीर्घकाल वाहता आले. त्यांच्या घरात राहता आले. अगदी जवळून त्यांना अंतर्बाह्य न्याहाळता आले. त्यामुळे त्यांच्या जीवनाचा खोल ठसा, कुठलाही उपदेश सरळधोपट भाषेतून करता, माझ्या जीवनावर उमटला.

बापूसाहेब झपके हे सच्चे गांधीवादी होते आणि म. गांधीचे परिपूर्ण अनुयायी होते. सत्याविना आचरण, नीतीविना राजकारण आणि कष्टाविना धनसंचय अशी जी सात पापे म. गांधींनी सार्वजनिक जीवनामध्ये सांगितली, त्यांचे तंतोतंत आचरण कसलाही गाजावाजा न करता एक व्रत म्हणून बापूसाहेबांनी आयुष्यभर केले. प्रतिष्ठा व स्वार्थ यासाठी त्यांनी खादीचा अंगीकार केला नव्हता. हाताला काम, मुखाला घास व स्वयंपूर्णतेचा ध्यास यासाठी एक मार्ग म्हणून म. गांधीजींनी खादीचा स्वीकार केला होता. बापूसाहेबांनीही याच हेतूने अगदी कॉलेज जीवनापासून खादीचा स्वीकार केलेला होता. सामाजिक प्रतिष्ठा व आर्थिक स्वार्थ याचे एक साधन म्हणून त्यांनी खादी वापरली नाही.

कॉलेजमध्ये असतानाच त्यांनी स्वातंत्र्यआंदोलनात उडी घेतली. कारावास भोगला. अनंत हाल सोसले. तुरुंगात असताना त्यांना अनेक थोरामोठ्या राजकीय नेत्यांचा सहवास लाभला. त्यामुळे गांधीवादाचा गाभा असलेली सत्य, सदाचार, अपरिग्रह, नीतिमत्ता, सेवा, करुणा आणि गरिबांविषयीचा अपार कळवळा या मूल्यांची उपासना त्यांनी आयुष्यभर केली. घरात सधनता असतानाही; घरात ते एकुलते एक पुत्र असतानाही, यशस्वी वकील, आदर्श नगराध्यक्ष आणि थोर राजकीय नेते अशा भूमिका बजावत असतानाही त्यांनी श्रमाची प्रतिष्ठा जोपासली. कोणतेही कष्टाचे काम त्यांनी कमीपणाचे मानले नाही. मी त्यांच्याच घरात वावरत असल्याने त्यांच्या या धर्मपूजेचा माझ्या मनावर खोल परिणाम झाला. ते आपले कपडे स्वत:च्या हातांनी धुवायचे. त्याला साबणाचा स्पर्श अनेकदा नसायचा. आंघोळ गार पाण्याने असायची. आपली पादत्राणे आपण स्वच्छ करणे, आपली सायकल स्वत:च नीट पुसणे, आपली कामे आपण करणे, घरातली कामे स्वत:च करून टाकणे, शहरामध्ये कामगाराबरोबर झाडू घेऊन स्वत: रस्ता झाडणे, आडावरून पाणी शेंदून घेणे, शाळेचे पटांगण स्वच्छ करणे यासारखी कामे एक कर्तव्य म्हणून, एक पूजा म्हणून त्यांनी पार पाडलेली

आहेत. ''मनापासून केलेले कार्य हीच परमेश्वराची पूजा होय'' असे एक इंग्रजी वचन आहे. त्याचे अनुकरण बापूसाहेबांनी आयुष्यभर केले.

याविषयीच्या सांगण्यासारख्या अनेक आठवणी असल्या तरी नमुना म्हणून एक आठवण नमूद करतो.

दोन वर्ग बसतील एवढ्या आकाराच्या पडक्या धर्मशाळेत शाळेची सुरवात झाली. दरवर्षी एकेक वर्ग वाढायचा. जागा अपुरी पडायची, मग यावर बापूसाहेबांनी एक गांधीवादी मार्ग शोधला तो म्हणजे स्वावलंबनाचा. या धर्मशाळेच्या तिन्ही बाजूंना वर्गासाठी खोल्या बांधायला घेतल्या. बापूसाहेबांनी पुढाकार घेतला आणि काही शिक्षक व आम्ही मुलांनी बांधकामाला प्रारंभ केला. माती आणणे, ती चाळून घेणे, पाणी आणणे, चिखल बनवणे, त्यापासून विटा तयार करणे, त्या विटा सुकविणे आणि मग भिंती उभ्या करणे या साऱ्या कामात बापूसाहेबांनी आमच्याबरोबर काम केले. सुताराच्या हाताखाली एक मजूर म्हणून त्यांनी सुट्टीचे दिवस खर्ची घातले. मग जमीन तयार करण्यापासून तो खोल्यांना रंग देण्यापर्यंतची कामेही त्यांनी केली. रंग देताना त्यांच्या पांढऱ्या केसामध्ये शिंतोडे उडायचे. आम्हाकडून रंगांची नासाडी व्हायची. पण रागाचा एखादा शब्दही त्यांनी उच्चारला नाही.

एक शिक्षक म्हणूनही त्यांच्या जीवनाचा फार मोठा ठसा आमच्या जीवनावर उमटला. त्यांना मुळात कसलेही व्यसन नव्हते. अगदी चहाचे सुद्धा. त्यांचे अध्यापनही अतिशय प्रभावी असायचे. प्रारंभीच्या काळात तर काही विषयांना शिक्षकच मिळायचे नाहीत. मग त्याला वारसदार बापूसाहेब. त्यांनी मुख्याध्यापक असताना देखील एकही तास बुडविला नाही. सोलापूरला काही काम निघाले वा कोर्टात एखादी तारीख निघाली तरच ते आपले तास मागे-पुढे करायचे. पण सहसा बुडवायचे नाहीत. एखाद्या शाखेचे प्रमुखपद आल्यावर सेवानिवृत्त होईपर्यंत एकही तास, एकाही वर्गावर, एकही दिवस न घेणाऱ्या 'आदर्श' शाखाप्रमुखांची आजकाल रेलचेल आहे. बापूसाहेब याला अपवाद होते. सुरवातीच्या काळात तर आर्थिक चणचण, काटकसर आणि शिक्षकवांनवा असल्याने त्यांनी आम्हाला संस्कृत पासून तो इतिहास-भूगोलापर्यंत अनेक विषय शिकविले. शिवाय प्रत्येक विषयाचे अध्यापन विलक्षण असायचे. मुलांमध्ये मिसळून, त्यांच्याकडून उत्तरे काढून घेत, त्यांच्या पातळीवर येत आणि त्या विषयाची मुलांना गोडी लावत लावत ते आपले शिकवणे प्रभावी करीत.

त्यापेक्षाही चारित्र्य आणि संस्कार या बाबतीत या शाळेचा आणि बापूसाहेबांचा हात कोणी धरणार नाही. सुमारे वीस वर्षे ते मुख्याध्यापक होते. संस्थेला त्यांच्या पगारापोटी अगदी नाही म्हटले तरी वीस लाख रुपये द्यावे लागले असते. पण बापूसाहेबांनी दरमहा केवळ एक रुपया एवढा पगार घेतला. शिवाय स्वत:चेच काही पैसे घातले. आजकाल कमी श्रमात नि कमी वेळात श्रीमंत व्हायचे असेल तर शिक्षणसंस्था काढणे हा एक राजमान्य मार्ग झालेला आहे. इमारतींचे बांधकाम, फर्निचर खरेदी, शालेय साहित्य खरेदी, परीक्षा फी आणि दरवर्षी शिक्षक काढणे व भरती करणे यासारख्या 'धंद्या' त इतर कोणत्याही धंद्याइतकी 'कमाई' होते हे आजकाल पाहतो. बापूसाहेबांनी अशी कमाई केली नाही. असला पापी विचार त्यांच्या मनात आला नाही. एखादे अशील खोटी केस घेऊन त्यांच्याकडे आले तर ''तुझी ही केस मी चालवणार नाही तू गुन्हा केलाय हे साफ दिसतंय. त्यापेक्षा तू इतराकडे जा''. असं म्हणून त्यांनी पायाशी ठेवलेल्या नोटांचे ढीग नाकारल्याचे मी पाहिले आहे. सत्याची चाड, असत्याविषयी चीड, वैरभावनेचा लोप, साधेपणाचा आग्रह, अपरिग्रहाचे व्रत, समतेचे आचरण, सेवेविषयी ममत्व, तत्त्वनिष्ठ भूमिका,

अनाचार, अत्याचार, स्वार्थ, मोह, भ्रष्टाचार, लैंगिक आकर्षण, शोषण, उच्चनीच भाव, विद्या, कुल, धनसंपदेचा गर्व याविषयी वाटणारा तिरस्कार यामुळे चारित्र्य कमालीचे तेजस्वी आणि प्रभावी झाले होते. ते सरळ उपदेश कधीच करीत नसत. ते सारेकाही कृतीतून बोलत ओठावर शांती आणि पोटामध्ये आसक्ती असे आचरण त्यांना कधी जमले नाही. त्यामुहेच श्रेष्ठ शिक्षक जेवढे पुस्तकांतून शिकवितो; त्यापेक्षा अधिक तो आचरणातून -कृतीतून- शिकवत असतो; हे जे वचन आहे; त्याचे उदाहरण म्हणजे बापूसाहेब होय.

संस्कार करण्याची ताकद व त्यासाठी शैक्षणिक उपक्रमांची हौस या दोन गोष्टी त्यांच्या ठायी एकवटल्या होत्या. जीवन संपन्न, समृद्ध नि उन्नत करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या साऱ्या साऱ्या संस्कारांविषयी त्यांना प्रगाढ प्रेम होते. यूक केली तरी त्यांनी कधी हातात छडी घेतली नाही. आपला विद्यार्थी उत्तम नागरिक व्हावा यासाठी त्यांनी 'जनरल नॉलेज' या नावाचा एक स्वतंत्र पेपरच त्यांनी पन्नास पूर्वी सुरू केला होता. त्यात पास झालेच पाहिजे असा त्यांचा आग्रह असायचा.

दर शनिवारी ते साऱ्या मुलांना पटांगणात बसवून जागतिक घडामोडींची व भारतातील राजकीय व सामाजिक गोष्टींची सुबोध भाषेत ओळख करून द्यायचे. विनोबा भावे, पं.नेहरू, दादा धर्माधिकारी यांना पाहण्यासाठी व त्यांचे विचार ऐकण्यासाठी सहली काढल्या. दर महिन्याला नामवंत व अभ्यासू वक्ते बोलावून त्यांची ते व्याख्याने करायचे. तीन मार्चला म्हणजे शाळेच्या वर्धापनदिनी सारी शाळा मुलांना चालवायला द्यायचे. मॉक पार्लमेंटचा कार्यक्रम घे. वर्गावर्गांतील भांडणे मिटविण्यासाठी सामुदायिक तीळगूळाचा कार्यक्रम कर, मुलांत मिसळून मुलांना नाटक बसविण्यास प्रोत्साहन दे, गरीब विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी वर्गावर्गातून मदतीची पथके तयार करावयाची व ती मदत कुणाला द्यायची याचा अधिकार मुलांना पदे , वक्तृत्त्व, पाठांतर, हस्ताक्षर यांच्या वर्षातून दोन वेळा स्पर्धा घे. कब्बडी, व्हॉलिबॉल सारख्या खेळात आमच्या बरोबर एक खेळाडू म्हणून सहभाग घे. एखाद्या उनाड पोरानं मुलीची छेडछाड केली तर त्याला शिक्षा न करता स्वत:च शिक्षा करून घे, असे अनेक उपक्रम त्यांनी सातत्याने राबविले. त्यामुळे आम्हा आठवीतल्या मुलांना रायचूर कोठे आहे नि रायपूर कोठे आहे; हे सहजपणे सांगता यायचे. सांगोला नगरपालिकेचे ते नगराध्यक्ष होते. जिल्हा कॉंग्रेसचे नेते होते, होमगार्डचे ते प्रमुख होते, वकील संघटनेचे ते अध्यक्ष होते, ग्रामोद्योग संघटनेचे ते प्रमुख सदस्य होते. आणखीही बऱ्याच समित्यांवर ते विविध नात्यांनी सक्रीय होते; पण या साऱ्या पदांचा नि अधिकारांचा वापर करून त्यांनी शाळेसाठी स्वार्थी व्यवहार केला नाही. कोणत्या पदाचा गैरवापर केला नाही. आपल्या प्रपंचासाठी पाच पैशाची कमाई केली नाही. एखादे दुचाकी वा चारचाकी वाहन खरेदी केले नाही. पन्नास वर्षांपूर्वी त्यांच्याकडे घंटी सोडून सारे पार्ट वाजणारी जी एक ऐतिहासिक सायकल होती; तिच्यावर स्वार होऊनच सारी धावपळ केली.

म्हणून जगण्याचे साफल्य कशात आहे ? जीवन श्रीमंत कशामुळे होते ? माणसाचं जीवन कोणत्या गोष्टीमुळे आदरणीय बनते. जीवनात कर्तृत्व करायचे असेल तर कोणती मूल्ये स्वीकारावीत ? दु:ख, दैन्य, दारिद्र्य, पोरकेपण, शोषण यांना कसे सामोरे जावयास हवे यांचे खोल संस्कार त्यांच्यापासून आम्हा विद्यार्थ्यांना मिळाले. ते म्हणायचे; '' जे दु:खाने दु:खी होत नाहीत, ते दु:खालाच दु:खी करतात''.

दु:खाचे सुखात रूपांतर करण्याचा मंत्र माझ्याप्रमाणे शेकडो मुलांनी त्यांच्यापासून घेतलेला आहे.....घेतलेला होता!

कांचन काशिनाथ घाणेकर



मनस्वी कलावंत यशवंत (गच्च) दत्त

सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात 'मेहता मराठी ग्रंथ जगतच्या' दिवाळी अंकासाठी लेखन सहकार्य करण्याचा खलिता येऊन धडकला. संपादकांनी त्या पत्रात लेखासाठी जो विषय कळविला होता तो दुहेरी होता. त्यात एक उत्तरार्धही होता. संपादक त्यात म्हणतात, काही चमत्कृतिपूर्ण अथवा तऱ्हेवाईक व्यक्तीही तुम्हाला भेटल्या असतील. त्यांच्याविषयी ही तुम्हाला लिहायला आवडेल असे वाटते. तरी तो विषय निवडला तरी चालेल.

वीज चमकावी तसे एक नाव नजरेसमोर चमकून गेले. 'यशवंत दत्त'. वर लिहिलेल्या विषयात चपखल बसणारे. येत्या ११ नोव्हेंबर २००२ रोजी यशवंतना जाऊन पाच वर्षे पूर्ण होतील. खरं तर ते गेले त्याचवेळी लिहावंसं वाटत होतं. पण वर्तमानपत्रांनी ज्या घाईने लिहून पाहिजे होते, तो वेग साधणे मला शक्य नव्हते. पण यशवंताबद्दल लिहायला पाहिजे होते ही रुखरुख आजही अस्वस्थ करीत होती. यशवंताबद्दल लिहायचे (कधीतरी) या हेतूने त्यांच्याबद्दल लिहून आलेल्या मजकुरांची कात्रणं मी अजून जपून ठेवली होती. आणि हा योग 'मराठी ग्रंथजगत' मुळे अचानक जुळून आला. शिवाय ग्रंथजगत सारख्या साहित्यविषयक मासिकामध्ये मी यशवंतबद्दल लिहावे या योगायोगाचेही आश्चर्य वाटले.

कारण यशवंतची मराठी साहित्याची जाण, वाचन, पाठांतर विलक्षण होते. त्यादृष्टीने ही या लेखासाठी मराठी ग्रंथ जगत अगदी योग्य होते.

तसे यशवंत माझ्या बरोबरीचे. दोन वर्षांनी मोठे होते. ७ नोव्हेंबर १९४५ ही त्यांची जन्मतारीख. त्यांच्या निधनाच्या चारच दिवस आधी त्यांनी आपला बावन्नावा वाढदिवस साजरा केला असावा. मला यशवंतवर इतक्या तीव्रतेने लिहावं असं वाटत होतं म्हणजे माझी त्यांची मैत्री होती असा समज होण्याची शक्यता आहे. आमच्यात मैत्री नव्हती. स्नेह होता. आमच्या महिनोन् महिने गाठीभेटी होत नव्हत्या. पण आमच्या स्नेहभावनेतील स्निग्धता मात्र कधी कमी झाली नाही. यशवंत परिचितांमध्ये व नाट्यचित्रपट व्यवसायात 'बॉबी' किंवा 'बाबा' या नावाने प्रसिद्ध होते. मी मात्र सुरवातीपासूनच त्यांना यशवंतच म्हणायची. कारण मला ते नाव खूप आवडायचे. माझ्या लहानपणापासून मी पाहिलेल्या बाबांच्या (चित्रतपस्वी भालजी पेंढारकर) ऐतिहासिक चित्रपटात एका तरी पात्राचे नाव यशवंत असायचेच. दुसरे कारण म्हणजे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आदरणीय यशवंतराव चव्हाण हे ही होते. यशवंत माझी ओळख झाल्या क्षणापासून मला 'कांचनबाई' म्हणायचे. अग कांचन, अहो कांचन किंवा कांचनताई या संबोधनांशी परिचित असणारी मी, यशवंतांचे मला कांचनबाई असे संबोधणे खूप मजेशीर वाटायचे. हा माणूस काहीतरी वेगळा, काहीसा चमत्कारिक आहे हे त्यावेळेपासूनच जाणवायला लागलं होते. आणि त्याची प्रचिती खुद्द यशवंत, त्यांचे निकटवर्तीय. व्यावसायिक यांच्यामार्फत येत गेली.

यशवंत दत्त हे नाव ही तसे गंगाजमनी. त्यातील यशवंत हे खास मऱ्हाटमोळी नाव. यशवंत शहाण्णवकुळी मराठा घराण्यातील

कांचन घाणेकर

होते. त्यांचे वडील इंदूरचे होते. तर दत्त हे बंगाली आडनावासारखे भासायचे. त्याचा खुलासा एकदा यशवंतनीच केला होता. त्यांचे वडील मा. छोटू हे प्रभात फिल्म कंपनीतील एक गुणी कलाकार होते. त्यांचे खरे नाव दत्तात्रय महाडिक पण ते आपल्या मा.छोटू या नावानेच अधिक प्रसिद्ध होते. वडीलांच्या दत्तात्रय नावातील दत्त यशवंतनी आपल्या नावामागे जोडले. हे नाव घेण्याचे आणखी एक कारण म्हणजे त्यांना असलेले बंगाली साहित्यसंस्कृतीचे प्रेम. पुण्यात असताना (मुंबईला येण्याआधी) बऱ्याचदा यशवंत बंगालीबाबूच्या वेषात वावरायचे, म्हणे. बंगाली पायघोळ धोतर, झब्बा आणि त्यावर ओढलेली मोठी शाल असा त्यांचा बाबुमोशाय टाईप जामनिमा असायचा. यशवंतचे मित्र लोकप्रिय संवादक सुधीर गाडगीळ 'सामना' (१२ नोव्हेंबर.१९९७) मधील आपल्या लेखात म्हणतात, बॉबीचं बंगाली रुपडं तरी आम्ही पाहायचेच पण कधी कधी तर तो कव्वाली पेश करायला निघालेल्या कव्वालसारखी सिल्कची भडक लुंगी आणि कुर्ता घालून सायकल हाणत जाताना दिसायचा. त्याचा पेहराव पाहून आम्हाला जबर हसू फुटायचे. पण त्याचा आत्मविश्वास जबर होता. तो मैदानावर

फूटबॉलपटू म्हणून ही गाजत होता. बॉबी तल्यारखानांची नक्कल तर तो हुबेहुब कराचा. त्यामुळे ही त्याला बॉबी म्हटले जाई.

.....कपड्याप्रमाणेच त्याला माईकचीही फार आवड होती. तो त्याचा वीकपॉईन्ट होता. खरं तर सोसच म्हणालं पाहिजे. खर्जातल्या आवाजापासून ग्रामीण ढंगापर्यंत विविध आवाज माईक दिसताक्षणी काढण्याची त्याची हौस फिटायची नाही. त्यामुळे फिलीप्सची नोकरी करता करता माईकशी खेळणं आणि तोंडाला रंग लावणं सुरूं होतं. गाण्यात रमणं हा ही त्याला शौक होता. त्यामुळे ऑर्केस्ट्राचे निवेदनही करायचा, असेही सुधीर गाडगीळ सांगतात. मा. छोटूंच्या अभिनयाचं रक्त यशवंतांच्या धमन्यातून वाहात होतं. त्यांच्या जन्मदात्री वत्सलाबाई याही अभिनेत्री होत्या. त्यामुळे न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिकत असल्यापासून त्यांना सिनेमा व सिनेमावाले यांच्याबद्दल जिव्हाळा होता. महाराष्ट्र राज्य कलोपासकच्या 'अडीच घर वजीराला' मध्ये ते रंगमंचावर आले. कलोपासकच्या राजा नातू यांनी त्यांच्यावर सुरवातीचे संस्कार केले असले तरी ते दत्ता भटांना आपले गुरू मानीत. दत्ता भटांनीच त्यांना मुंबईत आणले. पुण्यात असताना हौशी रंगभूमीवरून राज्य नाट्य स्पर्धेत यशवंतनी अनेकदा अभिनयासाठी बक्षीसं मिळवली होती. बक्षीस म्हणून मिळणारे हे सोन्याचे बिल्ले यशवंतनी एकदा आपल्या सँडलवर लावून घेतल्याचे स्वत:च सांगितले होते. त्यांचा हा विक्षिप्तपणा ऐकून मला तर काय बोलावे तेच सुचेना.

मुंबईत नाट्यमंदार या व्यावसायिक नाट्यसंस्थेच्या 'चांदणे शिंपीत जा' या नाटकात यशवंतनां आम्ही प्रथम पाहिले. त्यांचा स्वाभाविक अभिनय, त्यांचा रंगमंचावरील सहज वावर, त्यांची संवाद म्हणण्याची शैली, आम्हाला खूपच आवडली. माझी आई (अभिनेत्री सुलोचना) तर यशवंतच्या अभिनयाने विशेष प्रभावित झाली होती. हा मुलगा चित्रपटात आला पाहिजे असं ती सारखं म्हणायची. आणि तशी संधीही चालून आली. निर्माते दिग्दर्शक दत्ता माने मामे-भाचे हा चित्रपट तयार करणार होते. यातील मोठ्या बहिणीची मध्यवर्ती भूमिका माझी आई करणार होती. त्या चित्रपटातील तिच्या भावाच्या भूमिकेसाठी विक्रम गोखले आणि मुलाच्या भूमिकेसाठी यशवंत यांचे नाव तिने दत्ता माने यांना सुचविले. त्यांनीही ती नावे मान्य केली. कारण दत्ता माने या दोघांच्याही वडीलांना प्रभात काळापासून ओळखत होते. सुलोचनादिदींनी मला रुपेरी पडदा दाखविला असे कृतज्ञतेने यशवंत नेहमी सांगत.

या चित्रपटाचे रीतसर शूटिंग कोल्हापूरला सुरू झाले. विक्रमचा माझा आधीपासून परिचय होता. यशवंतना मात्र प्रत्यक्ष प्रथमच भेटत होते. त्यावेळी प्रकृतीने ते तसे किरकोळच होते. त्यांना चष्माही त्यावेळेपासून असावा. त्यावेळी यशवंतबद्दल एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, ती म्हणजे त्यांचा जबर आत्मविश्वास. त्यांचा शॉट नसेल त्यावेळी यशवंत 'नटसम्राट'मधील ती प्रसिद्ध स्वगतं साभिनय म्हणून दाखवीत. स्वरलावण्याचे निरनिराळे चढउतारही त्यात असत. आणि त्यावेळेपासून अगदी ठासून सांगत, की कधी तरी नटसम्राट मधील अप्पासाहेब बेलवलकरांची भूमिका ते करणारच. मला खूप आश्चर्य वाटे. कारण डॉ. श्रीराम लागूंशिवाय नटसम्राटची मी कल्पनाच करू शकत नव्हते. डॉ.लागूंचा नटसम्राट तमाम नाट्यरसिकांनी अक्षरश: डोक्यावर घेतला होता. आणि इकडे यशवंत आपल्या महत्त्वाकांक्षेवर अगदी ठाम होते. त्यावेळीच जाणवायचे हे काही वेगळेच रसायन आहे. एकीकडे नटसम्राट करण्याची भाषा करणारे

यशवंत, त्यावेळी हेही सांगायचे की, ते जर या व्यवसायात यशस्वी झाले नाहीत तर अंडी विकतील पण दुसरं काही करणार नाहीत. दोन टोकाचे स्वभाव यशवंतमध्ये जाणवायचे. अर्थात् अंडी विकण्याची वेळ त्यांच्यावर कधीच आली नाही. आणि लोकमान्यता मिळवणारा नटसम्राटही त्यांनी उभा केला.

यशवंतनी बालनट म्हणूनही माझ्या आईबरोबर 'निरुपमा व परीराणी' या चित्रपटात काम केले होते. विक्रम गोखले त्यात होते. दोघांनी तिला त्याची आठवण करून दिली. मराठी चित्रपटाचे ३-४ महिने चालणारे शूटिंग म्हणजे एक कौटुंबिक मेळावाच असायचा. माझ्या आईला त्यावेळी विणकामाचा फार नाद होता. स्वत: स्वेटर्स. मफलर्स विणून बरोबरच्या सहकलावंतांनां भेट द्यायची. तिला खूप आवड होती. त्यासाठी ती कधी दिल्लीला गेली किंवा कुणी जाणार असेल तर खूपशी लोकर मागवून घ्यायची. बऱ्याचदा ती एका रंगाची असायची. या चित्रपटाच्या शूटिंग दरम्यान तिने विक्रम व यशवंत दोघांसाठी ही स्वेटर विणले. आणि त्यांना शेवटच्या दिवशी दिले. मात्र हे दोन्ही स्वेटर्स एकाच रंगाचे होते. माझ्या आईने त्यांना स्वेटर आवडला का म्हणून विचारल्यावर यशवंत मात्र लहान मुलासारखे कुरकुरले, आता आम्ही दोघांनी हे स्वेटर्स एकावेळी घातले की, आम्ही दोघं युनिफॉर्म घालून शाळेला चाललोय असे सगळे लोक समजणार. ते ऐकल्यावर माझ्या आईला तर हसू आवरेना.

या चित्रपटानंतर यशवंतचे मुंबईला आमच्याकडे अधून मधून येणे सुरू झाले. माझा मामेभाऊ दिलीपशी त्यांची मैत्री ही जुळली. गंमत म्हणजे दोघांच्या चेहऱ्यात खूप साम्य होतं. अगदी चष्म्यापासून उंचीपर्यंत. बऱ्याचदा लोकं दिलीपला यशवंत समजायचे. 'करावं तसं भरावं' या चित्रपटाच्या प्रिमियरला यशवंत आले नव्हते. तर काही प्रेक्षकांनी दिलीपला यशवंत समजून सही घेण्यासाठी घेराव घातला. नाटकाच्या दौऱ्यामुळे यशवंतना एका ऐतिहासिक चित्रपटातील घोड्यावरील पासिंग शॉटस्साठी येता येत नव्हते. तर त्यांनी दिग्दर्शकाला दिलीपचे शॉटस् घ्यायला सुचविले होते. अगदी जुळे भाऊ वाटावे असं त्यांच्यामध्ये साम्य होतं.

यशवंतबद्दल बाहेर काहीही प्रवाद असले तरी ते आमच्या घरी आल्यावर अथवा बाहेर कुठे भेटल्यावर त्या त्यावेळी त्यांनी सभ्यतेच्या मर्यादा कधी ओलांडल्या नाहीत. यशवंतांचे घरी येणे म्हणजे काव्य-साहित्य-विनोद-नकला यांची मेजवानी असायची. त्यांचे आवडते लेखक जी.ए.कुलकर्णी यांच्या कथांचा त्यांचा अभ्यास ऐकला की, स्तिमित व्हायला व्हायचे. त्यांचे अफाट वाचन, त्यांची तीव्र स्मरणशक्ती, त्यांचे कविता म्हणून दाखविणे, त्यांनी स्वत: केलेल्या कविता यामुळे मला तर ते भाषा विषयाचे द्विपदवीधर आहेत असं वाटायचे. किमान पदवीधर तर असतीलच अशी अटकळ होती. पण ते गेल्यानंतर त्यांची माहिती वाचली (दै.सामना) तर त्यांचे शिक्षण फक्त आठवीपर्यंत झाल्याचे समजले. मला तर हा प्रचंड धक्काच होता. विद्वत्ता डिग्रीवर अवलंबून नसते हेच खरं.

यशवंत आमच्या घरी आले की, कधीही सोफ्यावर बसत नसत. सोफ्याचा उपयोग पाठ टेकायला करायचे. बसायचे मात्र खाली गालिच्यावर, ऐसपैस मांडी घालून. घरातल्या मुलांच्या बरोबर एकदा ते असेच गप्पा मारत बसले होते. मी कशासाठी तरी हॉलमध्ये आले होते. माझे केस सुटे होते. ते बघत यशवंत तिरसटून म्हणाले, ''कांचनबाई, ते केस बांधा बघू. मला बघवत नाहीत''. माझ्या केसांचं नेहमी कौतुक ऐकणाऱ्या मला हा प्रकार नवा होता. आणि लांब केस तर पुरुष काय स्त्रियांनां

ही आवडतात. काय विक्षिप्त माणूस हा अशा अर्थाने मी कपाळाला आठ्या घालतच यशवंतकडे पाहिले. तोवर ते परत नॉर्मल झाल्यासारखे वाटत होते. ''सॉरी कांचनबाई, तुमचे लांब केस बघून जुन्या जखमेची खपली निघाली''. असे म्हणत यशवंतनी त्यांच्या पहिल्या असफल प्रेमाची दास्तान सांगितली. पुण्यातील एका सुसंस्कृत - श्रीमंत घरातील अभिनयसंपन्न तरुणीवर त्यांचे प्रेम जडले. तिचाही यशवंतवर जीव जडला. या तरुणीचेच केस खूप लांब होते. या प्रेमाची अखेर मात्र विवाहवेदीवर झाली नाही. कारण होतं तेच कथा-कादंबरी-नाटक-सिनेमा यात नेहमी भेटणारं श्रीमंत-गरीबीतील खोल दरीचं. मुलीच्या वडिलांना यशवंतची कमकुवत आर्थिक परिस्थिती, त्यांचे अजून व्यवसायात स्थिर नसणे सगळेच खटकले. आणि त्यांनी या विवाहाला कडाडून विरोध केला. त्या तरुणीने वडिलांच्या इच्छेसमोर सपशेल माघार घेतली. यशवंत पुढील आयुष्यातही कायम दुखावलेले राहिले.

दुसरा एक प्रसंग तर आमच्यासमोरच घडला. एका देखण्या अभिनेत्रीवर यशवंतनी पुन्हा एकदा जीव लावला. गोष्टी साखरपुड्यापर्यंत पोहचल्या. त्याआधी यशवंतच्या आई माझ्या आईकडे त्या अभिनेत्रीची चौकशी करण्यासाठी, तिचा स्वभाव जाणून घेण्यासाठी आल्या होत्या. तसं पाहिलं तर प्रत्येक आईला आपल्या मुलाचं कौतुक असतं. पण आमच्या या चित्रपटसृष्टीत मी दोन अशा आई पाहिल्यात की, ज्यांना आपल्या मुलासारखं मूल अवघ्या जगात नसेल असं वाटायचं. त्या दोघी म्हणजे ज्येष्ठ अभिनेत्री रत्नमालाबाई आणि दुसऱ्या यशवंतच्या आई वत्सलाबाई. त्या परत परत माझ्या आईला विचारीत होत्या, ''बाई, मुलगी खरंच चांगली आहे ना ? माझा मुलगा फार साधाभोळा आहे हो. कुणी ही त्याला फसवतात. त्याला आईच्या मायेने सांभाळणारी मुलगी पाहिजे.'' नेहमी बोटांच्या चिमटीत आपल्या नाकाचा शेंडा पकडीत, हात झटकणारे, एका बोटाने नाकावरून घसरलेला चष्मा वर ढकलीत नाकपुड्या फुगवीत तोंडाचा चंबू करीत दुसऱ्यांच्या फिरक्या ताणणारे यशवंत त्या दिवशी आईच्या कौतुकाने नुसते न्हाऊन निघत होते. त्यांच्या आई त्यांच्या डोक्यावरून, गालावरून हात फिरवीत आपल्या लेकाचे गुणगान करीत होत्या. त्यामुळे आम्ही प्रथमच यशवंतना लाजून चूर होताना पाहात होतो. डोळे मिचकावीत यशवंत आपली प्रतिक्रिया व्यक्त करत होते. त्या दिवशी लहान मुलासारखे यशवंत आईच्या पदराखाली लपायचे तेवढे राहिले होते. सगळाच प्रकार मजेशीर होता. पण दुसऱ्याच दिवशी या आनंदावर विरजण पडलं. त्या अभिनेत्रीच्या मावशीच्या पतिदेवांनी यशवंत अजून व्यवसायात स्थिर झालेले नाहीत या कारणाने हे लग्न मोडून टाकले.

यशवंत गृहस्थाश्रमात स्थिरावत नसले तरी चित्रपटसृष्टीत त्यांनी आपले बस्तान बसवायला सुरवात केली होती. रंगभूमीवर तर बऱ्यापैकी जम बसलेला होताच. यशवंत दत्त या नावाला वजन प्राप्त होत होते. मात्र हिंदी चित्रपटसृष्टीशी त्यांची जवळीक निर्माण होत नव्हती. चंद्रलेखासारख्या दर्जेदार नाट्यसंस्थेत यशवंतचे आगमन झाले होते. मोहन वाघ दर्जेदार धाडसी आणि मातब्बर निर्माते यशवंतसाठी अनेक उत्तमोत्तम नाटकं ते रंगभूमीवर आणत होते. त्यांच्या कलागुणांना भरपूर वाव देत होते. नाटक आणि सिनेमा या दोन्ही माध्यमात अभिनय सहजतेने पेलणारे जे काही थोडे मराठी कलावंत आहेत त्यामध्ये यशवंतचा क्रम बराच वरचा लागावा. यशवंत सुरवातीला या दोन्ही क्षेत्राकडे ज्या दोन कलावंतांच्यामुळे आकर्षिले गेले त्यातील एक होते दिलीपकुमार. हा तर

यशवंतचा वीकपॉईन्ट. 'देवदासची'इतक्या वेळा पारायणं झाली होती की, त्यातील दिलीपसाबच्या पहिल्या वाक्यापासून शेवटच्या वाक्यापर्यंत दिलीपसाबच्या ढंगात सर्व संवाद ते म्हणून दाखवीत. रंगभूमीवर येण्यासाठी ज्यावेळी यशवंत धडपडत होते त्यावेळी डॉ. काशिनाथ घाणेकर या नावाची आतिषबाजी रंगभूमीवर डोळे दिपवून टाकीत होती. महाराष्ट्राची तरुण पिढी या करिष्म्याने दिपल्यासारखी झाली होती. त्यामध्ये यशवंतही होते. त्यांच्या दर्शनाला प्रथम टाळी पडते आणि नंतर ते साकारत असलेल्या कॅरेक्टरला टाळी पडते असे दोनच कलावंत आहेत. एक डॉ. घाणेकर आणि दुसरे बबन प्रभु असं यशवंतचं मत होतं. संभाजी करावा तर डॉक्टरांनीच. येरागबाळ्याचे ते काम नोव्हे; असे यशवंत कौतुकाने म्हणत.

यशवंतबरोबर माझा सूर जमण्यासाठी सर्वात मोठे कारण हे असावे. कारण दिलीपकुमार आणि डॉक्टर हे माझे ही त्यावेळी वीकपॉईन्ट होते. डॉक्टर तर माझ्यासाठी नुसतेच आवडते कलाकार नव्हते तर त्याहूनही अधिक होते. त्यामुळे डॉक्टरांविषयी जे कुणी चांगले उद्‌गार काढतात, त्यांच्याविषयी मला आस्था वाटायची. डॉक्टर व मी यांच्याविरुद्ध पेटलेल्या संघर्षकाळात यशवंतच्या या प्रतिक्रिया 'ओयासिस'सारख्या वाटायच्या. यशवंतना हे सर्व माहित असूनही, ते माझ्याशी मोकळेपणाने बोलू शकत होते, तरी त्यांनी एकदाही मला डॉक्टरांविषयी छेडले नाही. आपल्या फटकळ कॉमेंटस् ऐकवल्या नाहीत. कलंदर स्वभाव आणि रोखठोक बोलणे यामुळे यशवंतनी नेहमीच प्रवाद निर्माण केले. या कलंदर वृत्तीमुळेच चित्रपट व नाट्यक्षेत्रात त्यांच्या अनेक वैविध्यपूर्ण भूमिका गाजून ही शेवटपर्यंत त्यांची कारकीर्द निश्चित आकार आणि दिशा नसलेलीच राहिली.

राजदत्तांसारख्या एखाद्याच दिग्दर्शकाशी यशवंताचे सूर जुळायचे. कारण एखाद्या चित्रपटातील ज्या ज्या प्रश्नांची उत्तरे त्यांना पाहिजे असायची ती न कंटाळता राजदत्त द्यायचे. योग्य असतील त्या यशवंतच्या सूचनाही स्विकारायचे. पटले तर सीनही बदलायचे. पण ज्या दिग्दर्शकांशी त्यांचे जमायचे नाही, ते यशवंतच्या चर्चा करण्याला कंटाळायचे. त्यांच्या सूचनांना उद्धटपणा समजायचे. त्यांना टाळायचे. याची परिणती हातून अनेक चांगल्या भूमिका निसटण्यात व्हायची. सुधीर गाडगीळांसारखी मित्रमंडळी अस्वस्थ होऊन ''जोपर्यंत माझ्या भूमिकेशी, संकल्पनेशी,दृष्याशी मी व दिग्दर्शक ट्यूनअप होत नाही, तोवर मी त्याला आडवेतिडवे प्रश्न विचारणारच. दिग्दर्शकापेक्षा भूमिकेचा मी अधिक विचार केला असेल तर मी काही सूचना करणारच.''

याचा अनुभव एकदा आम्हीही घेतला.

माझी आई व यशवंत एका मराठी चित्रपटात काम करीत होते. त्या चित्रपटातील रटाळ आणि अनावश्यक संवाद कमी करावेत असे माझ्या आईने दिग्दर्शकाला सुचविले. नव्यानेच दिग्दर्शनाला उभ्या राहिलेल्या त्या महाशयांनी ते सर्व संवाद कसे आवश्यक आहेत ते लांबलचक भाषण देत परत परत माझ्या आईला पटविले. शेवटी दिग्दर्शकाचा शब्द म्हणजे अंतिम मानणाऱ्या पिढीतील माझ्या आईने संवाद पाठ करायला सुरवात केली. ही गोष्ट यशवंतच्या कानावर गेली मात्र यशवंत त्वरेने तिथे आले. तिच्या व स्वत:च्या संवादात योग्य ती काटछाट करून ते आटोपशीर केले. शिवाय 'दिदींच्या सहनशीलतेचा फार फायदा घेऊ नका. तुमच्या आधी निदान चार तपं त्यांनी चित्रपटसृष्टीत काढली आहेत याचा तरी विसर पडू देऊ नका' असे त्या दिग्दर्शकाला सुनवायलाही कमी केले नाही. अर्थात चित्रपट फार सुरळीतपणे पूर्ण झाला नाही हे सांगायला नकोच.

अशातच एकदा बातमी आली की, यशवंत लग्नाच्या बोहल्यावर चढले. वधू होती पुण्याच्या वसंतराव साळुंखे यांची कन्या वैजयंती. सिनेसाप्ताहिकातून लग्नाचे फोटो झळकले. खास कोल्हापूर फेट्यातील यशवंत भलतेच रुबाबदार दिसत होते. काही कारणामुळे लग्नासाठी आम्ही पुण्याला जाऊ शकलो नाही. त्यामुळे माझ्या आईला नमस्कार करण्यासाठी यशवंतच पत्नीला घेऊन आमच्या घरी आले. रीतसर आहेर-जेवणखाण वगैरे पार पडले. दोघेही दिवसभर आमच्या घरी होते. वैजू पटकन् आमच्यात मिसळून गेली. पण यशवंतना काही सांगायचं झालं की, लहान मुलं कानाशी लागतात तशी वैजू यशवंतच्या कानात तोंड खुपसायची. ते बघून आम्हाला खूप गंमत वाटात होती. विशेष म्हणजे तीही यशवंतना 'बाबा' अशीच हाक मारीत होती. या सर्वांची आम्हा सर्वांना मजा वाटते आहे हे यशवंतना आमच्या चेहऱ्यावरून कळले असावे. घरातून बाहेर पडताना डोळे मिचकावीत ते आम्हाला म्हणाले, '' मी आणि ही रस्त्यावरून जातो, त्यावेळी लोकं मामा-भाची जाताहेत असं समजतात''. सुधीर गाडगीळ म्हणतात, त्याप्रमाणे मात्र वैजूने अखेरपर्यंत यशवंतना त्यांच्या सर्व छटांसह सांभाळलं. कधी त्यांच्या पाठीमागेही त्यांच्याबद्दल रडगाणं नसायचं.

यशवंतच्या स्वभावाचा आणखी एक कंगोरा म्हणजे कुठलीही भीडभाड न ठेवता त्या व्यक्तीच्या तोंडावर तिरकस बोलणं. एखाद्याला छळायचं ठरवलं की ते त्याच्या किंवा तिच्या पाठी अक्षरशः हात धुवून लागत. शब्दशरसंधानाची एकही संधी सोडत नसत. त्यांचा एका अभिनेत्रीवर काय राग होता न कळे, तिचे नुसते नाव काढले तरी उसळून ते म्हणत, ''ती बाई कायम तापलेली असते हो, बाईच्या अंगात नेहमीच २-३ डिग्री ताप असतो. ही अजून जिवंत कशी ?'' या अभिनेत्रीला अधूनमधून बेशुद्ध पडायची सवय होती. त्यामुळे बऱ्याचदा शूटिंगचाही खोळंबा व्हायचा. या प्रकाराला वैतागलेल्या यशवंतनी तिला वठणीवर आणण्यासाठी एक अशिष्ट मार्ग योजला. पण ती मात्रा इतकी लागू पडली की, यशवंत नसतानाही परत कधी ती अभिनेत्री बेशुद्ध पडली नाही. इतका तिने त्यांचा धसका घेतला.

स्त्रियांतील या बेगडी. नाटकी वृत्तीचा यशवंतना काय राग होता कुणास ठाऊक ! किती ही ज्येष्ठ श्रेष्ठ अभिनेत्री असली तरी तिचा नखरा तिथल्या तिथे ते उतरवीत.

एकदा एका चित्रपटाच्या शूटिंगच्या वेळी त्यांच्या आईच्या भूमिकेत असणाऱ्या एका ज्येष्ठ अभिनेत्रींना वाटले की, यशवंत त्यांच्या नऊवारीतील सौंदर्याकडे टक लावून पाहताहेत. त्यांनी अधिकच मुरकत यशवंतना विचारलं ''काय कशी दिसते मी अजून?'' यशवंतनी चेहरा कोरा करकरीत ठेवीत सांगितले, ''तुम्ही आहात होय ? मला वाटलं आपल्या चित्रपटाचे लेखकच नऊवारी लुगडं नेसून आलेत की काय ? म्हणून निरखून बघत होतो.''

यशवंत नवागत असतानाही असले ताशेरे ओढायला कमी करायचे नाहीत. एकदा यशवंत स्टुडिओच्या आवारात थंड वाऱ्याला बसले होते. त्या चित्रपटाची नायिका असलेली ती बडी अभिनेत्री त्यांच्या समोरून जाता जाता विचारती झाली, ''कशी दिसते मी?'' यशवंतनी शांतपणे सांगितले, ''दिवाळीतील षटकोनी कंदील वाऱ्याने हिंदकळताना दिसतो तशा आता तुम्ही चालत जाताना वाटलात.'' त्या अभिनेत्रीने परत कधीही यशवंतना आपल्याबरोबर नायक म्हणून घेऊ दिले नाही.

एक खट्याळ मूल यशवंतमध्ये कायम बागडत असायचं आणि ते असा काही उपद्व्याप करायचं की, गंभीर राहणं कठीण व्हायचं.

एकदा एका चित्रपटाचा क्लायमॅक्स चित्रित होत होता. एका मोठ्या कुटुंबातील सर्व पात्रे खोलीबाहेर उभी असतात. आणि चित्रपटाच्या खलनायकाने खाष्ट सासूचे काम करणाऱ्या अभिनंत्रीला त्या खोलीत बंद केलेले असते व एक सापही आत सोडलेला असतो. आतून ती खाष्ट सासू घाबरून ओरडत असते. आणि बाहेरून तिची मुले-सुना, ''आई तुला काही झाले नाही ना?'' असे विचारीत असतात. या वाक्यानंतर यशवंतनी बंपर टाकला,''त्या सापाला काही झालं का बघा रे.'' आणि जो हशा उसळला तो बराच वेळ थांबेना. खोलीत बंद असलेल्या ज्येष्ठ अभिनेत्री बाहेर काय चाललयं हे न कळल्यामुळे वैतागल्या त्या वेगळ्याच !

यशवंतबरोबर नायिका म्हणून काम केलेली एक अभिनेत्री त्यांच्या या वात्रटपणावर जाम वैतागलेली होती. ती एकदा आमच्या घरी आलेली असताना यशवंतचा विषय निघाला. त्यावर ती उसळून म्हणाली,''यशवंत दत्त कसला ? यशवंत गच्च आहे तो !'' तिचा तो आविर्भाव आणि तिने यशवंतचे नव्याने केलेले बारसे यामुळे आमची हसता पुरेवाट झाली. मला तर यशवंतचे हे नवे नाव खूप अनोखे वाटले. त्यानंतर बऱ्याचदा आम्ही घरात त्यांचा उल्लेख त्याच नावाने करत असू.

नंतर नंतर यशवंतचे आमच्या घरी येणे कमी होत गेले. कधी नाटकाच्या थिएटरमध्ये तर कधी एखाद्या समारंभात भेट होई तितकीच. एकदा मात्र भर दुपारी उन्हाच्या वेळी यशवंत दारात उभे ठाकले. खादीचा झब्बा-पायजमा, खांद्याला शबनम बॅग आणि दोन्ही हातात धरलेले एक भले मोठे मोराचे पीस. हा काय प्रकार असावा म्हणून गोंधळलेली मी यशवंतना आत या म्हणायचेही विसरले. दारातच उभे राहून यशवंतनी ते मोराचे पीस माझ्या हातात दिले. आणि म्हणाले,''हे मी चिमूसाठी (माझी भाची इरावती) राजस्थानहून घेऊन आलोय. ती शाळेतून आली की तिला द्या.'' इतकं बोलून ते घाईघाईने निघून ही गेले. चिमूने मोठ्या कौतुकाने यशवंतमामाची ही भेट बरेच दिवस जपून ठेवली होती. मी मात्र हे एवढे मोठे मोरपीस न वाकवता, न मोडता राजस्थानहून यशवंतनी कसं आणलं असेल याच विचारात गढून गेले. यावेळी यशवंत आमच्या घराजवळ रवींद्र नाट्यमंदिरमध्ये राहायचे. परंतु इतक्या जवळ असूनही यशवंत क्वचितच घरी आले असतील. याच दरम्यान यशवंतशी मैत्री असलेला माझा मामेभाऊ दिलीप अकाली गेला. पण यशवंत दुखवटा व्यक्त करायलाही घराकडे फिरकले नाहीत. घरातील बऱ्याच जणांनी त्याबद्दल नाराजी व्यक्त केली होती. काही महिन्यांनी यशवंतची एका कार्यक्रमात भेट झाली. माझ्या आईने यशवंतना विचारले की, दिलीप गेल्याचे त्यांना समजले आहे का ? यशवंत म्हणाले, ''दिदी, मुद्दामच आलो नाही. माझ्या व दिलीपमधील साम्याचा तुम्हाला आणखी त्रास झाला असता. एकच सांगतो, गेला तो यशवंत, आता आहे तो दिलीप समजा.'' यशवंतने सांगितलेले ऐकून माझ्या आईचे डोळे परत एकदा अश्रूंनी डबडबले.

१९९५ साली डॉ. काशिनाथ घाणेकर प्रतिष्ठानतर्फे उत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार यशवंतना द्यायचा ठरला. प्रतिष्ठानची एक विश्वस्त या नात्याने हा निर्णय सांगण्यासाठी व पुरस्कार स्वीकारणार का हे विचारण्यासाठी आईने यशवंतनां फोन केला. ''यशवंत एक काम होतं'', माझ्या आईने प्रस्तावना केली. त्यावर यशवंत लागलीच उत्तरले ,''दिदी हुकूम''. माझ्या आईला मग काही औपचारिक बोलावंच लागलं नाही. यशवंतच्या गुणवत्तेच्या मानाने त्यांच्या वाट्याला पुरस्कार तसे कमीच आले. त्यातही ते महाराष्ट्र शासन, फिल्मफेअर

अशासारख्या मातब्बर पारितोषिकांचे मानकरी ठरले होते. एकेकाळी ते ज्यांचे चाहते होते त्या डॉ.काशिनाथ घाणेकरांच्या नावाचा पुरस्कार मिळाल्याने यशवंत खूपच खुषीत होते. त्यांना समारंभाचे रीतसर निमंत्रण द्यायला त्यांच्या मालाडच्या घरी चारूकाका (चारुदत्त सरपोतदार), मी व माझी मुलगी रश्मी गेलो होतो. यशवंत परत परत म्हणत होते, मी घरचा आहे. हे औपचारिक निमंत्रण द्यायला तुम्ही मंडळी इतक्या लांब कशाला आलात? फोनवर स्थळ आणि वेळ सांगितली असती तरी मी पोहचलो असतो. चारुकाका यशवंतच्या खांद्यावर थोपटत म्हणाले, ''अरे, हा तुझा मान आहे. सारं रीतीप्रमाणे व्हायला पाहिजे. एरवी तू आमचा 'बाब्याच'आहेस''. चारुकाकांच्या खास पुणेरी कौतुकाने यशवंत खूष झालेले दिसले.

यशवंतचा फ्लॅट बघून तर मी आश्चर्यचकित झाले होते. थोडक्यात ते यशवंतसारखंच 'अजायबघर' होते. वरच्या मजल्यावर असणारा हा दोन बेडरूमचा प्रशस्त फ्लॅट हवेशीर आणि भरपूर उजेड असणारा होता. पण गृहिणीचा हात न फिरल्यामुळे एकूण सगळा अवतारच होता. एका बेडरूममध्ये तर जुने पुराणे सामान भरून त्याची स्टोअर रूम केली होती. त्या अडगळीतच फ्रीज उभा होता. हॉल आणि दुसऱ्या बेडरूमची मधली भिंत काढून बेडरूमच्या जागेत एक गोल सिमेंटचा कट्टा बांधलेला होता. तो कट्टा बैठकीसारखा सजवला होता. त्याच्या शेजारीच फक्त फांद्या असलेला निष्पर्ण झाडासारखा एक स्टँड उभा होता. त्यावर काही फोटो फ्रेम्स अडकवलेल्या आठवतात. हॉलच्या भागात पेंटिंग स्टँड उभा होता. रंगाचे सामान, ब्रशेस लाकडी बोर्ड अस्ताव्यस्त पडले होते. त्यातच एक चटई पसरली होती. आणि त्यावर उशी होती. यशवंतनी त्या कट्ट्यावरच सोफ्यावर बसवावं तसं आम्हाला बसवलं. हे सर्व चमत्कारिक वाटतं आहे हे माझ्या चेहऱ्यावरचे भाव ओळखून यशवंतनी खुलासा करायला सुरवात केली.

त्या गोल कट्ट्याकडे निर्देश करीत यशवंत म्हणाले, हे माझं स्टेट, स्टोरी डिस्कशनची बैठक, काव्यशास्त्र मैफल जमविण्याची जागा आहे. थोडक्यात हा माझा हॉल आहे.'' आणि जमिनीवरील चटईकडे बोट करीत यशवंत म्हणाले, '' ही माझी बेडरूम.'' यशवंतच्या घराची ही सजावट बघून आम्ही तर सर्दच झालो होतो. आम्हाला आणखी थंड करण्यासाठी यशवंत कोल्ड्रींक आणि खाण्याच्या प्लेटस् घेऊन आले. ''हे कोण करतं?'' त्या रंगकामाच्या साहित्याकडे पाहात मी विचारले. यशवंत मोठ्या उत्साहाने आपल्या या नव्या छंदाबद्दल (स्फूर्तीबद्दल) माहिती द्यायला लागले. कुणाकडे शिकताय का असं विचारल्यावर यशवंत म्हणाले, **''छे छे, हे सर्व माझं स्वत:च क्रिएशन आहे. पूर्वी मला कविता व्हायच्या. आता चित्रं होतात.''** असं म्हणून स्वत:च्या मल्लीनाथीवर स्वत:च हसले. आपल्या ह्या नव्या कौशल्याचे पुरावे दाखविण्यासाठी स्वत: रंगवलेल्या चित्रांचे बाडच काढले. आतापर्यंत शांतपणे बसलेल्या रश्मीने उत्सुकतेने ते सर्व पहायला सुरवात केली. कारण तीही नुकतीच चित्रं काढायला, रंगवायला शिकत होती. काही वेळाने तर मी व चारुकाका बाजूलाच राहिलो. रश्मी आणि यशवंत यांच्या मध्येच संवाद सुरू झाला. तिच्या ज्ञानावर खूष होत त्यांनी तिला हवी ती चित्रं त्यातून घ्यायला परवानगी दिली. यशवंतमामाच्या या प्रेझंटने तर रश्मी खूपच खूष झाली. कारण प्रथमच तिला इतकं महत्त्व कुणीतरी दिलं होतं. तिचं मत विचारलं होतं. तिच्याशी चर्चा केली होती. एरवी लोकांची येता जाता खिल्ली उडविणाऱ्या

यशवंतांच्याकडे लहान मुलांशी संवाद साधण्याची कला होती. त्यांच्याशी वागण्याचा एक हळुवारपणा होता मला हे प्रथमच जाणवले.

यशवंतचा निरोप घेऊन निघताना ब्लॉकच्या मुख्य दरवाजाच्या पाठीकडे लक्ष गेले. तिथे प्रख्यात दिग्दर्शक अभिनेते राजा परांजपे यांचा फोटो चिकटवलेला होता. मला वाटतं एखाद्या मासिकातील कापून चिकटवला असावा. तो फोटो तिथे का चिकटवला असेल या विचारात असतानाच यशवंतनी खुलासा केला,''घराबाहेर जाताना किंवा बाहेरून परत आल्यावर या फोटोतील पायांवर डोकं टेकवतो.''यशवंतच्या घरात देवघर, देवाची तसबीर असं काहीच नजरेला पडलं नाही. पण एक फार मोठा कलावंत त्याच्या दृष्टीने पूजनीय होता. यशवंत नास्तिक की आस्तिक होते कल्पना नाही. पण ज्यावेळी त्यांना मुलगा झाला त्यावेळी ते कळवण्यासाठी त्यांनी फोन केला होता. त्यावेळी मात्र ते म्हणाले होते की कोल्हापूरजवळच्या कागल गावच्या गैबीसाहेबांच्या दर्ग्यात त्यांनी नवस केला होता. त्यामुळे मुलाचे नाव गहिनीनाथ ठेवणार होते. त्यांच्या मुलाचा जन्म शिवजयंतीचा होता. त्याविषयी सांगताना यशवंत म्हणाले, ''जरासं निरखून पाहिले की, माझ्या मुलाच्या गालावर कल्ले आणि दाढीसारखी लव दिसते.'' मला तर वाटलं होतं हा अजब शोध लावणारे यशवंत बहुतेक मुलाचं नाव शिवाजी ठेवायलाही कमी करणार नाहीत. पण प्रत्यक्षात मुलाचं नाव 'अक्षय' ठेवलं गेलं. आता ही पसंती वैजूची की यशवंतची ते मात्र कळलं नाही.

यशवंतना डॉक्टरांच्या नावे पुरस्कार देण्याचा समारंभ खूप रंगला. अगदी नाटक रंगावं तसा. प्रख्यात लेखक-नाटककार शं.ना.नवरे यांच्या हस्ते पुरस्कार देण्याचा समारंभ आटोपल्यानंतर यशवंतची प्रकट मुलाखत ठेवली होती. प्रसिद्ध संवादक सुधीर गाडगीळ मुलाखत घेणार होते. दोघे पुण्याचे, त्यामुळे एकमेकावर कुरघोडी करण्यात, शाब्दिक चिमटे घेण्यात, तिरकस बोलण्यात कुणीच हार जात नव्हते. अर्थात नुसतीच गंमत नव्हती. यशवंतने भूमिकांचा अभ्यास, त्यांचे मनन, चिंतन यावरही भाष्य केले. यशवंतची मुद्देसूद, विचारपूर्वक केलेली विधाने ऐकून थक्क झालेल्या ज्येष्ठ अभिनेत्री उषाकिरण माझ्या आईला म्हणाल्या, ''अहो सुलोचनाबाई, आजची ही मुलं भूमिकांचा किती विचार करतात नाही?'' त्या दिवशी यशवंतनी मला देण्यासाठी स्वत: रंगवलेले रंगभूमीचे दृश्य चितारणारे पेंटिंग आणले होते. मला स्टेजवर बोलावून सन्मानपूर्वक ते माझ्या हाती दिले. आम्ही निमंत्रणाला गेलो होतो, त्यावेळी त्यांनी समारंभात काही विशेष करावं अशी माझी अपेक्षा आहे का असं विचारलं होतं. त्यावर मी यशवंतना म्हटलं होतं, डॉक्टरांनी व मी त्यांचं 'वादळ माणसाळतयं'हे नाटक पाहिलं होतं. नाटक आणि यशवंतचा अभिनय दोन्ही खूप भावलं होतं. विशेष करून नाटकाच्या शेवटी यशवंत मुक्तछंदातील जी कविता म्हणायचे ती डॉक्टरना खूप आवडायची. ती जर त्यांनी यावेळी म्हटली तर डॉक्टरना बरं वाटेल. यशवंतनी ही आठवण सांगत परत एकदा साभिनय ते काव्य मोठ्या झोकात सादर केलं.

त्यानंतर मात्र यशवंतांच्या नव्या नाटकांच्या व चित्रपटांच्या घोषणांबरोबरच त्यांच्या आजारपणाच्या, मोटार अपघाताच्या बातम्या ही येत राहायच्या.

त्यांच्या मृत्यूपूर्वी दोन एक महिने आधी यशवंतनी त्यांच्या 'लाखमोलाचे शब्द' या एकपात्री कार्यक्रमाच्या शुभारंभाच्या प्रयोगाला बोलावण्यासाठी माझ्या आईला फोन केला होता. त्या दिवशी जाणे शक्य नव्हते. त्यामुळे माझ्या आईने शिवाजी मंदिरच्या प्रयोगाला नक्की

येते असं त्यांना सांगितलं होतं.

पण त्यानंतर विश्वास न बसणारी बातमीच समजली ती यशवंतच्या कायमच्या एक्झीटची. यशवंतच्या एकपात्री प्रयोगाला जाण्याऐवजी, यशवंतचे अंत्यदर्शन घ्यायला आम्ही शिवाजी मंदिरवर पोहचलो. यशवंतना पाहिलं आणि वाटलं की एक वादळ शांत झोपलंय. यशवंतना न्यायला वैजू पुण्याहून आली होती. यशवंतची कार्बन कॉपी वाटावी असं दिसणारा अक्षय तिच्या बरोबर होता. अकाली प्रौढ झाल्यासारखा वाटत होता. माझ्या आईला पाहताच वैजू तिच्या कुशीत शिरली. आपले अनावर हुंदके तिच्या खांद्यावर रिते करीत होती. मी व वैजू मूकपणे हातात हात घट्ट धरून बळ एकवटत होतो. पण ते डोळ्यांवाटे पाझरून जात होते. नंतर पणशीकर वहिनी मला म्हणाल्या, ''यशवंत व वैजूशी तुमचं इतकं होतं कल्पनाच नव्हती.''

यशवंत मृत्यूसमयी मालाडच्या ब्लॉकमध्ये एकटेच होते म्हणजे. ज्यावेळी मुख्य दार उघडून मंडळी आत गेली. त्यावेळी दारामागच्या 'त्या' फोटोखालीच यशवंत चिरविश्रांती घेताना दिसले.

नाट्य-चित्रपटक्षेत्रातील वादळी व्यक्तिमत्त्वांची सनसनाटी ओळख करून देणारी पुस्तके

नाथ हा माझा
कांचन घाणेकर

२५०रु.
पोस्टेज : २५रु.



रेशीमगाठी
कांचन घाणेकर

१००रु.
पोस्टेज : २०रु.



सिलेक्टिव्ह मेमरी
अनु. अपर्णा वेलणकर

३३० रु.
पोस्टेज : २५रु.



टाईमपास
अनु. सुप्रिया वकील

२५०रु.
पोस्टेज : २५रु.

सभासद व्हा आणि २५% सवलत मिळवा!

सुमेध वडावाला (रिसबूड)



सर्वोत्तमाचा ध्यास घेतलेले दातृत्वशील अण्णा साठे

-

उपेन्द्र पुरुषोत्तम ऊर्फ अण्णा साठे हे माझ्या आईचे मामा असले , तरी अनेक परिचितांना ते माझे मामा वाटतात. मीही ती समजूत कायम ठेवलेली आहे. त्यांची ती ओळखच अधिक लोभसवाणी आहे.

''म'कार महेश' अशी प्रशंसा केल्या जाणाऱ्या बीजाक्षराला आधिक्याचा काना देऊन त्याच्या पुनरावृत्तीतून सिद्ध झालेल्या 'मामा' या शब्दात 'शिव' अनुस्यूत आहे. हे पावित्र्य रुद्ररूपाचं नाही. भोळेपणाचं आणि दानशूरपणाचं द्योतक असणारं आहे. भोळेपणा म्हणजे बुद्धिदौर्बल्य नाही. आकलनक्षीणताही नाही. क्षमाशील वृत्तीचा, स्वीकृतभावाचा तो मोहक आविष्कार आहे. आणि दानशूरपणा हा तर कृतिपूर्णतेच्या यशाचा परमोच्च बिंदू. कृतिपूर्णतेतून, उद्यमशीलतेतून बरंच काही अर्जित करावं, स्वत: सुसंपन्न व्हावे, ही तर दानशूरपणाची पूर्वअट आहे. त्यानंतरच दानशूरपणाची ऐट करणं शक्य व्हावं.

ती ऐटही पुण्यसंचयाच्या स्वार्थाने, लोकेषणेच्या मिषाने केलेली नसेल तर सोन्याला सुगंध !

'सर्वोत्तमाचा ध्यास', 'दानशूरता' आणि '.....कळवळ्याची जाती' या सद्‌गुणांसाठी जगाला भावणाऱ्या अण्णांजवळ सद्‌विचारांचं, सद्‌वर्तनाचं

आणि संपत्तिधनाचं अक्षय सोनं आहे. आणि या सोन्याला तो सुगंधही आहे. निरपेक्षता ही कृत्रिमपणे बाणवलेली नाही, ती त्यांची अंगभूत वृत्ती आहे. कदाचित, ती परंपरेने आणि संस्कारांनीही आली असेल.

मुळातलं, कोकणातल्या खेड तालुक्यातल्या सुसेरी या खेड्यातलं अेक दरिद्री कुटुंब. दारिद्र्य ही साठे घराण्याची परंपरा. ती खंडीत करायचा सीताराम पुरुषोत्तम ऊर्फ भाऊ साठ्यांनी जणू विडा उचलला. मणभर भावंडांपैकीचा हा सख्खा भाऊ अण्णांपेक्षा वीस वर्षांनी मोठा. त्याचं पहिलं लग्न झालं, तेव्हा अण्णा दोन महिन्यांचे होते. १९२४ चा काळ. त्याकाळची माणसं एक आठवण सांगतात. आपले हात कामात गुंतले असल्याने अण्णांची ही नवविवाहित भावजय स्वत:च्या सासुबाईंना अर्थात अण्णांच्या आईला सांगायची, सासूबाई, जरा पाळण्याकडे बघा. भावजी रडतायत. हगणंमुतणं केलं असेल त्यांनी पाळण्यात!

दारिद्र्य तर 'अन्नान्न दशे'च्या रूपाचं. भात असेल तर ताकामिठाची मारामार. त्याचे चटके अनुभवलेल्या अण्णानी सहाव्या वर्षी सुसेरी सोडलं. फायनल पास झालेले भाऊ त्यावेळी मुंबईस्थित झाले होते. त्यांच्या आश्रयाला येऊन राहिले. 'तहहयात मास्तरकी करत बसायचं नाही' असा निश्चय केल्याने उण्यापुऱ्या दोन वर्षांच्या मास्तरकीनंतर नोकरीला रामराम ठोकलेल्या भाऊनी विलेपार्ल्यात दुकान टाकलं. अस्सल मंदीचा तो काळ - त्याने 'टाकलं' हा शब्द त्या किराणामालाच्या दुकानाच्या बाबतीत सार्थ ठरला. दुकानाला तोटा आला आणि पहिल्या वर्षातच दुकानाच्या दोघा भागीदारांनी गुंतवलेलं भागभांडवल काढून घेतलं. मृत्यूपंथावरच्या 'विजय स्टोअर्स' चा भार भाऊंच्या खांद्यावर आला. त्यात भर प्रापंचिक अडचणींची. अनेक बहिणींची लग्नं. त्यांची 'माहेरची' बाळंतपणं. स्वत:च्या पहिल्या बायकोचा मृत्यू. हे सगळं कमी की काय म्हणून भाऊंच्या - अण्णांच्या वडिलांच्या डोळ्यात फुलं पडली. पण ऑपरेशनला पैसे नव्हते म्हणून डोळे गेले. या साऱ्यांतून भाऊनी आपलं 'विजय स्टोअर्स' नेटाने चालवलं. आणि आपल्याबरोबरीने अण्णानेही दुकानात रस घ्यावा या हेतूने तसे संस्कार अण्णांवर केले. शाळेत जाणाऱ्या अण्णांच्या अंगी 'व्यावसायिकता'जोपासली जावी म्हणून संस्कार केले. कष्टांची सवय हवी आणि ते करताना लाज वाटू नये म्हणून अकरा वर्षांच्या अण्णांना ते मुंबईला पाठवत. दहा दहा शेरांची लोण्याची टोपली खांद्यावरून वाहून आणायला लावत. कोळशांच्या वखारीत पाठवून कोळसाखरेदीची व्यवस्था लावून यायला लावत.

पाचसहा वर्षांनंतर 'विजय स्टोअर्स' फायद्यात चालू लागलं. भाऊनी दुसरं लग्न केलं. आणि आपल्या अर्जितातून पहिलं दान गायीचं केलं. दानशूरपणाची खूण म्हणून नाही. तर कृतज्ञता म्हणून गायीचं दान केलं. सुसेरीच्या दिवसांत ज्या शेजाऱ्याने त्यांच्या घरातलं शिळंपाकं - आंबटढाण ताक का असो पण ते आपल्याला दिलं होतं, आपलं पोट तगवले होतं, त्यांच्या घरात दूधदही भरघोस आणि नित्य असावं म्हणून चांगल्या विणाची उत्तम दुधाची महाग किंमतीची गाय खरेदी करून त्या घरात सन्मानाने पाठवली.

पुढे परिस्थिती आणखी स्थिरावल्यावर कोकणातली कित्येक गरजू मुलं भाऊंनी आपल्याकडे आणली. शिक्षणासाठी ठेवून घेतली. अण्णांच्या वयाची मुलं. त्यांना, 'वारकरी'म्हणून 'आश्रिता' ची वागणूक न देता 'विद्यार्थी' म्हणून त्यांचा सन्मान जपून ठेवून घेतली. पैकीच्या

एका विद्यार्थ्याला कुमारवयातले अण्णा लागट काही बोलले. त्यांच्या आश्रितपणावरून बोलले. भाऊनी त्याची कुणकुण लागली. त्याच दिवशी भाऊंनी अण्णांसाठी घराचं दार बंद केलं. म्हणाले,

'जवळ पैसा नसतो म्हणून माणसाना असं राहावं लागतं. हे तुझ्या लक्षात आलं नाही. पैसा मिळवणं सोपं नाही. मिळवायला किती कष्ट पडतात हे तुला कळलं पाहिजे. तू अेक आणा कमवून आण. मगच तुला घराचं दार उघडलं जाईल.'

सत्तर वर्षांपूर्वीचा तो काळ. तेव्हा विलेपार्ल्यात शेती केली जायची. घरं भाड्याने मिळायची. घरामागच्या जागेत माणसं हौसेने भाज्या-फुलं लावायची. आणांच्या भाड्याच्या घरामागेही पालेभाजीचे वाफे होते. त्यांतली भाजी खुडून अण्णांनी जुड्या बांधल्या. त्या विकण्यासाठी मार्केटभर फिरत राहिले. तिन्हीसांजा झाल्या, आणि भाऊ विरघळले. एका माणसाकडे पैसे देऊन त्याला गिऱ्हाईक म्हणून पाठवलं. उरलेल्याजुड्या विकत घ्यायला लावल्या. आणि अण्णांचं घरात प्रेमाने स्वागत केलं.

अशा शिस्तीची अण्णांनी मनात कटुता घेतली नाही. हे सगळं आपल्या भल्यासाठी आहे, अशी अटकळ जणू त्यांच्या मनात अव्यक्तपणे वास करून होती. शाळा-शिक्षण जेवढं महत्त्वाचं तेवढं दुकानात काम करणंही महत्त्वाचं ही मनाची धारणा झाली होती. मॅट्रिकला चांगले मार्क होते. 'कॉमर्स' ही फॅकल्टी नव्यानेच सुरू झाली होती, तिथे त्यानी प्रवेश घेतला होता. पहिलं वर्षही उत्तम प्रकारे पास झाले होते. पण ते इंटरला असताना भाऊंच्या दुसऱ्या बायकोला क्षय झाला. क्षय 'दुर्धर रोग' असण्याचा तो काळ उपचारांसाठी आणि 'कोरडी हवा' मिळावी म्हणून भाऊ बायकोला घेऊन तळेगावला जाऊन राहिले. आणि कॉलेज सोडून अण्णांना पूर्ण वेळ दुकानदारी स्वीकारावी लागली.

त्यानंतरचा चारपाच वर्षांचा काळ म्हणजे अण्णा साठे नावाच्या एका अस्सल व्यापाऱ्याने दुकानाच्या केलेल्या आदर्श भरणपोषणाचा काळ ठरला. अन्यथा; शेकड्यांनी असणाऱ्या किराणादुकानांपैकी एका दुकानाला 'विलेपार्ल्याची , नव्हे मुंबईची शान'म्हटलं जावं; असं अतिरंजित वाटावं असं भाग्य त्याच्या भाळी आलं नसतं.

'डिपार्टमेन्टल स्टोअर' किंवा 'भांडार' नावाच्या राक्षसी दुकानांचा उदय झालेला नव्हता त्या काळात डाळीकडधान्यं, धान्य-मसाले विकणाऱ्या 'वाण्याचे दुकान' म्हटलं की बा.सी.मर्ढेकरांचा 'गणपत वाणी'आठवावा. त्याबरोबर; '....चावायाचा नुसतिच काही, म्हणायचा अन् मनाशीच की या जागेवर बांधिन माडी' त्याचं विधानही आठवावं. त्यानंतरच्या काळात व्यापारउदीम तेजीत आले आणि मर्ढेकरांचं विधान कवितेत शोभिवंतपणे जिवंत राहिलं. वास्तवात अनेक ठिकाणी त्याला मृत्यू स्वीकारावा लागला. पण त्यापूर्वीच; स्वत:च्या कष्टांवर, नव्या संकल्पनांच्या बळावर अण्णांनी ते विधान खोटं ठरवलं. 'विजय स्टोअर्स' ज्या भाड्याच्या जागेत होतं, ती जागा- अख्खी इमारतच अण्णांनी विकत घेतली. तिची पुनर्बांधणी करून आणखी एक मजला वर उठवला. 'माडी' बांधली.

ऐश्वर्य हे काही केवळ दैवगतीचं गुलाम नाही. अखंड कष्टांवर, प्रयत्नांवर आकृष्ट होणारं ते विलासदर्शक, विकासदर्शक भाग्यलक्षण आहे. 'माडी' बांधणाऱ्या अण्णांना केवळ कष्टांचा ध्यास नव्हता, तर 'सर्वोत्तमा'चा ध्यास होता. 'प्रोफेशनल' हा शब्द प्रचारात येण्यापूर्वीच ते 'प्रोफेशनल' होते.

वाणी अनेक असतात. पण; 'विजय स्टोअर्स'मधे मिळणाऱ्या साबुदाण्यात

'कच'नसेल, कडधान्यात 'चाड' नसेल, रव्यात 'अळी' नसेल, गुळाला किंचितसाही 'खारटपणा' नसेल, तांदुळात 'खडा - भातकण' नसेल, धण्यांत व जिऱ्यांत 'काडी' नसेल, लसणीत 'पोची पाकळी' नसेल, नारळाची वाटी 'वाकडीतिकडी' नसेल, 'वेलचीदाण्यात' नुसती साखर नसेल; अशी तजवीज करायचा त्यानी चंग बांधला. मुळात; घाऊक बाजारात पायपीट करून सर्वोत्तम उंची माल खरेदी करायचा आणि तोही निवडून टिपून , चाळून पाखडून गिऱ्हाईकाला द्यायचा त्यांनी निश्चय केला. इथे मिळणाऱ्या प्रत्येक वस्तूची, पदार्थाची 'अल्टिमेट' क्वॉलिटी देताना अण्णांना दोन वर्ष 'ना नफा' तत्त्वावर काढावी लागली. 'विजय स्टोअर्स'मधून आणलेली वस्तू पातेल्यात थेट ओईरता येते' असा गृहिणींच्या मनात विश्वास निर्माण झाला. सवय लागली. पुढच्या काळात,'विजय स्टोअर्स' म्हणजे महागडं दुकान' अशी ख्याती झाली; पण 'विजय स्टोअर्स म्हणजे 'फक्त गुणवत्ताच' अशी जोडही कायम राहिली.

येणारा काळ हा 'इन्स्टन्ट जमाना'असेल हे अण्णांनी १९५० च्या सुमारास ओळखलं. दुकानात त्यांनी चटण्या, मसाले, पिठं, भाजण्या, मसाला सुपारी, पापड आणि श्रीखंड, चिवडे, लाडू, पुरणपोळ्या, बर्फ्या असे तयार पदार्थही ठेवायला सुरुवात केली. हे सगळं 'उपरं' विकलं नाही. 'विजय स्टोअर्स' च्या एकूण संस्थानात 'भटारखाना' हे जणू वेगळं खातं उघडलं. अळुवडीचे उंडे, बटाटेवडे, समोसे, कचोरी, बाकरवडी अशा नाना पदार्थांची काळानुरूप त्यात भर पडत गेली. आपल्या 'प्रमाणात'आणि देखरेखीखाली तयार होणाऱ्या वस्तू उत्कृष्ट दर्जाच्या असतीलच; पण ज्याला 'पर्याय' नाही अशा गोष्टी बाहेरून आणून विकण्यातच गिऱ्हाईकाचं हित आहे ही 'लवचिकता'ही त्यानी जपली. शहरातल्या निर्भेळ दुधाचा चक्का कितीही चांगल्या प्रकारे बनवला; तरी शहरातला चारा, पाणी यांचा परिणाम म्हशींच्या आहारविहारावर होतो, दुधावर होतो, हे लक्षात घेऊन त्यानी थेट कोल्हापूर गाठलं. तिथल्या चक्क्याच्या व्यापाऱ्यांची चक्का बनवण्याची रीत 'न्यारी' होती. लहानलहान मडक्यांतून दूध तापवून त्यातच दही करायचं. आणि लहान लहान 'मोटळ्या' बांधून ते दही 'ठेचायचं'. अशा रीतीने केलेल्या चक्क्याचा खमंगपणा मुंबईच्या निर्भेळ दुधाच्या चक्क्याला येत नाही, हे ओळखून त्यानी मुंबईच्या गिऱ्हाईकाला वर्षानुवर्षं कोल्हापूरचा चक्का पुरवला. 'मांडे' आता ज्ञानदेवांच्या गोष्टीपुरते उरले. पण आपल्या गिऱ्हाईकाला साजुक तुपातले मांडे देता यावेत म्हणून अण्णांनी बेळगावशी संधान बांधलं. 'विजय स्टोअर्स' ची आंबावडी रंग-रस-गंधाने सर्वश्रेष्ठ हवी म्हणून कोकणातल्या शुद्ध हापूसच्या रसाचा त्यांनी दरवर्षी नव्याने वेध घेतला.

अशा 'सर्वोत्तमा'ची पन्नाशी पाहायला भाऊ जिवंत नव्हते. अण्णांचा संसारही तेव्हा सदतीस वर्षांचा झाला होता. पत्नी कमला हिची दुकानाला साथ होती. मुलांचं मार्गी लागलं होतं. हे सारं जणू भाऊंनी केव्हाच 'ॲन्टिसिपेट' केलं होतं. ते खुशाल म्हणायचे,

'मी दुकानाचं रोप लावलं. अण्णाने त्याचा कल्पवृक्ष केला.'

ते खरंही होतं. भाऊंना समाजकार्याची आवड होती. अडुसष्ट वर्षांच्या त्यांच्या आयुष्यात तब्बल तेवीस वर्षं अण्णांनी त्यांना सन्मानाने 'व्यवसायमुक्त' ठेवलं. दुकानाचा 'वन् मॅन शो' यशस्वीपणे सादर केला. किराणामालाच्या दुकानात पस्तीसावर कामगार असावेत, ते गुण्यागोविंदाने नांदावेत; ही गोष्ट आजही दुर्मिळ

आहे. काही अपवाद वगळले, तर प्रमुख वृत्तपत्रांत किराण दुकानाच्या मोठ्या जाहिराती नियमितपणे दिसणं ही गोष्टही दुर्मिळ आहे. मुंबईच्या, मराठी व इंग्रजीतल्या मुख्य वृत्तपत्रांत 'विजय स्टोअर्स' ची जाहिरात आली नाही, असा सण अण्णांच्या कारकीर्दीत आला नाही.

मिळणारं यश हे स्पर्धेच्या वाटेवरून जातं; याची अण्णांनी खूणगाठ बांधलेली होती. 'सहकारी' तत्त्वावर चालवल्या जाणाऱ्या (तसा दावा करणाऱ्या) 'भांडारां'ची ग्राहकाला भुरळ पडू लागली. विलेपार्ल्यात असं भव्य भांडार सुरू झालं, हे अण्णांनी संकट मानलं नाही. 'आव्हान' मानलं. मुंबईभर अनेक शाखा असणाऱ्या या भांडाराची प्रत्येक वस्तूची खरेदी मोठ्या प्रमाणातली असल्याने त्यांच्या विक्रीची असलेली कमी किंमत हे अण्णांनी 'आव्हान' मानलं. उपाय शोधला. साबण, चॉकोलेट्स,बिस्किटं अशा 'ब्रान्डेड' मालावर कंपन्या - व्यापाऱ्यांना 'डिस्काऊन्ट' देतात. आणि त्याच्या 'रेन्ज' ठरलेल्या असतात. 'सर्वाधिक रेन्ज' ची खरेदी 'मॅक्झिमम डिस्काऊन्ट' देणारी असते. अण्णांनी, अशा 'ब्रान्डेड' वस्तूंची 'सर्वाधिक रेन्ज'ची खरेदी केली. आणि मिळालेल्या सर्व 'डिस्काऊन्ट' गिऱ्हाईकाला पोचवला. या 'ब्रान्डेड' मालाच्या किंमतीच्या आकर्षक पाट्या दुकानात तशाच बाहेर लावल्या. त्या किंमती 'प्रिन्टेड एम्.आर.पी.' पेक्षा बऱ्याच कमी होत्याच; पण 'भांडारा'तल्या किंमतींपेक्षाही त्या कमी होत्या. चटण्या, भाजण्या, चिवडे, लाडू, बर्फ्या, धान्य या वस्तूंच्या किमती 'विजय स्टोअर्स' मधे इतरांपेक्षा जास्त असणं हे 'क्वॉलिटी ग्राऊन्ड' वर ग्राहकाने मान्य केलं होतं. पण साबण पावडरी, सोपकेक्स, बिस्किटं यांची 'विजय स्टोअर्स' मध्ये झालेली स्वस्ताई ही 'भांडार' वाल्यांना पेचात टाकणारी, गोत्यात आणणारी ठरली. या स्वस्ताईचं आश्चर्य - त्याची चर्चा ही त्या काळात जणू 'टॉक ऑफ दि (कस्टमर्स) टाऊन' झाली होती. ही चर्चा जो समाज करतो आहे, आपला गौरव करतो आहे, आपल्यावर प्रेम करतो आहे; त्या समाजाचे आपण देणेकरी आहोत, ही भावना अण्णांनी सक्रियपणे जोपासली. कुणाचं शिक्षण असो, कुणाचं आजारपण असो, कुणाचं लग्न असो, कुणाची घरखरेदी असो; अण्णांनी 'अडलेल्या' चे हात पाहिले, त्याचा चेहेरा पाहिला नाही. पैशांची मदत करताना फक्त 'सत्याचं' पाहिली. 'देण्याचा' गवगवा केला नाही. गवगवा केला तो इतरांच्या गुणांचा, कर्तृत्वाचा. जे आपण आदर्श म्हणून नोंदले, अपले, ते त्यानी जगाला आनंदाने सांगितले. ज्या ज्या तेजांची दर्शनं त्याना झाली, 'विजय स्टोअर्स' ने घडवून दिली, त्यांबद्दल ते आत्मसंतोषाने बोलत आले.

कोण कोण ग्राहक असावेत 'विजय स्टोअर्स' चे ?

सीमा-रमेश देव, विजय तेंडुलकर, मधु मंगेश कर्णिक, रमेश मंत्री आणि कित्येक क्षेत्रांतल्या दिग्गजांचे कुटुंबीय. पु.ल.देशपांडे तर 'घरचे' म्हणावे असा वर्षानुवर्षांचा 'ग्राहकसंबंध'. 'विजय स्टोअर्स' ला लागून 'जवाहर बुक डेपो'. तिथली वार्षिक 'पुस्तक जत्रा' प्रसिद्ध आहे. तिथे हजेरी लावणारी अनेक माणसं - नामवंत 'विजय स्टोअर्स'ला भेट द्यायला यावीत हा जणू रिवाजाचा भाग होऊन गेला आहे. मुंबईत राहात असताना शांता शेळके यांनी दुकानाचा थाट अनेकदा पाहिला होता. त्या म्हणाल्या होत्या, 'अनेक विषयांवर नि अनेक दृश्यांनुसार मी आजवर कविता - गीतं केली आहेत. तुमच्या दुकानावरही मला कविता करायची आहे.'

पु. ल. देशपांडे अण्णांचे शाळासोबती. त्यांच कोण कौतुक अण्णांना ! त्यांच्या लेखी पु. ल. म्हणजे विनोदाचा बादशहा, आणि 'दात्यां'चा सम्राट. 'देण्या'तला तोच आदर्श अण्णांनी ठेवल्यावर, तसं वर्तनही केल्यावर दुकानातल्या कामगारांना 'देताना' त्यांचा हात आखडता कसा होईल? कामगार ही तर दुकानाची शान. कागदोपत्री न दाखवलेले मालक. अण्णा त्यांना कायद्यानुसार पगार,भत्ते, बोनस, प्रॉव्हिडन्ट फन्ड, अन्य सोयी सवलती देतच होते. पण कायद्याबाहेरही बरंच काही देत होते. पण कुणीतरी 'माथं भडकवणारा' मिळाला. १९८६ मधे कामगारांनी 'युनियन' केली. थेट कोर्टात गेले. बेहिशोबी मागणीपत्रं सादर केली. मानसिक अस्वास्थ्य, प्रापंचिक अडचणी आणि वयाने गाठलेली पास्ष्टी यांचा परिणाम अण्णांच्या तब्येतीवर झाला. दुकान बंद करायचा कठोर निर्णय त्यांनी घेतला. एका सोमवारी दुकानाचं 'शटर' वर गेलं नाही. 'अपरिहार्य कारणास्तव हे दुकान बंद झालं आहे' असा बोर्ड त्याच्या भाळी लिहिला गेला. माणसं यायची, जायची. ज्या दुकानाने आपल्या घराच्या तीन पीढ्या पाहिल्या आहेत, त्या दुकानाचा मृत्यू पाहाणं हे पार्लेकर ग्राहकाला असह्य झालं. बायका रस्त्यावर उभ्या राहून डोळे पुसू लागल्या.

दुसऱ्या दिवशी - 'विजय स्टोअर्स' बंद झाल्याची बातमी छापली गेली नाही, असं वृत्तपत्र नव्हतं. अनेक वृत्तपत्रांनी तर संपादकीय टिप्पणी केली होती. पु. ल. देशपांड्यांनी अण्णांना स्वत: पत्र लिहिलं. 'घरातलं माणूस गेल्याचं दु:ख झालं' असा दु:खार्त सूर त्यानी त्यात लावला होता.

काही महिन्यांच्या खंडानंतर अण्णांच्या मुलाने दुकान उघडलं. पण अण्णा तिथे गेले नाहीत. त्यांनी 'समाजजीवन' स्वीकारलं. त्याचा 'श्रीगणेशा' फार पूर्वीच झाला होता. आता ते पूर्णवेळाचं होऊन गेलं. एवढ्या वर्षांत कुठे 'जाणं येणं' जमलं नव्हतं, त्याचीही भरपाई होऊ लागली. पुण्याला गेल्यावर पुलंची भेट चुकली नाही. एकदा म्हणाले होते,

''रवीन्द्रनाथांनी समाजाला जसं बरंच काही 'दिलं', तसा मराठीत तूच एकमेव असशील. मुळात, मराठीत लेखनावर अेवढा पैसा मिळवणारे लेखक किती ? आणि आपल्या कमाईचा मोठा हिस्सा समाजाला देणारे किती ? मराठीत दुसरं नाव मला माहीत नाही.''

पु. ल. त्यावेळी गप्प राहिले होते. पण नंतरच्या भेटीत, तो विषय निघाला नसूनही म्हणाले होते, ''नाहीत कसे? ब. मो. पुरंदरे आहेत. त्यानी बरंच दिलं आहे समाजाला !'

पु. लंच्या ''आदरेखून मेन्शन करणं'' याचं श्रेयं त्याला देणं-त्यासाठी अस्वस्थ राहाणं या गुणांचा 'गवगवा' नंतरचे अनेक दिवस अण्णा; परिचितांत करत राहिले होते.

दातृत्वाचा पु.ल. असा आदर्श असले, तरी त्याचा आरंभ थेट भाऊंपासून सुरू झाला होता. सख्ख्या-मावस वगैरे धरून आठदहा बहिणी होत्या. त्यांचे संसार, त्यांच्या मुलांचं पोटापाण्याला लागणं, त्यांची लग्न होणं अशा जबाबदाऱ्या जणू भाऊंच्या होत्या. भाऊंनी तिसरं लग्न केलं होतं. तिच्या माहेरचाही मोठा गोतावळा होता. अण्णांच्या मुलांचा त्यांनी स्वत:च्या मुलाप्रमाणे वाढवलं - जपलं होतं. दुकानाच्या जीवावर पार्ल्यात आणखी एक बंगला विकत घेता आला असला, तरी दोन्ही भावांची - संसारांची राहणी साधी होती. अण्णांच्या मुलाला - त्याच्या तरुणपणात स्वत:ची गाडी विकत घ्यायची होती. भाऊंनी खूप विचार केला. परवानगी देताना म्हटले

'आपल्या एकूण साऱ्या गोतावळ्यात आपल्याकडून आर्थिक मदतीची आता कुणालाही गरज उरलेली नाही. सगळ्यांचं व्यवस्थित चाललं आहे. आता आपल्याला गाडी घ्यायला हरकत नाही' 'हे विश्वचि माझे घर' अशी मनोधारणा ठेवली. अंधांची संस्था असो, अनाथाश्रम असो, बालककेंद्र असो, सामाजिक संस्था असो वा समाजहिताचा उपक्रम असो; त्यानी दिलेल्या देणग्यांची रक्कम अनेक लाखांत जाईल. 'कार्यकर्ता' या संज्ञेबद्दल आणि व्यक्तीबद्दल त्याना विशेष आत्मीयता आहे. गोपळराव आगरकरांनी कष्टात दिवस काढले होते, हे त्यांच्या मनात होते. विचारधन देणाऱ्या या पत्रकाराची आठवण समाजाला राहावी म्हणून अण्णांनी पुरेशी रक्कम 'लोकमान्य सेवा संघा' कडे सुपूर्द केली. त्या व्याजातून दरवर्षी दहा हजार रुपयांचा पुरस्कार सामाजिक कार्यकर्त्याला दिला जावा अशी तजवीज केली. त्या योजनेतून विद्या बाळ, गिरीश प्रभुणे, भीमराव गस्ती अशा कार्यविपुल कार्यकर्त्यांचा, 'गोपाळरावां'च्या नावाने गौरव केला गेला. स्वत:च्या नावाचा उल्लेखही या योजनेत कटाक्षाने टाळायला लावला.

ज्या समाजाचा उतराई व्हायचा त्यांनी शक्यतो प्रयत्न केला, त्या समाजानेही त्यांच्याविषयी कृतज्ञता दाखवली. 'पार्ले टिळक विद्यालय' असोसिएशन'चं अध्यक्षपद त्यांच्याकडं चालून आलं. 'म्युझिक सर्कल'चं उपाध्यक्षपद त्यांना बहाल केलं गेलं. मुंबईलाच नव्हे तर महाराष्ट्राला गौरवस्थान असणाऱ्या 'लोकमान्य सेवा संघा'चं विश्वस्तपद त्यांना दिलं गेलं. अशी कित्येक पदं सांभाळताना त्यांनी स्वत:ला 'शोभेचं' होऊ दिलं नाही. घटनासंमत आणि संस्था अपेक्षित कामं ते उत्साहाने करत राहिले. या 'समाजजीवना'चीही त्यांनी पंचविशी ओलांडली त्यावेळी सन २००१ मधे 'पार्लेभूषण' पुरस्कार देऊन त्याना गौरवण्यात आलं. वृत्तपत्रांचे संपादक, गृहराज्यमंत्री अशांनी भाषणांत स्तुती केली.

अण्णांच्या लेखी हा 'रिवाजा' चा भाग होता. ते मनाने त्या रात्रीही 'स्थिरचित्त' होते. 'अंथरुणाला पाठ टेकताच झोप' या त्यांच्या शांत मनाच्या द्योतक असणाऱ्या सवयीनुसार 'पार्लेभूषण' शांतपणे झोपले होते.

दुसऱ्या दिवशी घरात काम करणारा गडी वेळेवर आला नाही म्हणून हाती झारी घेतली. टेरेसवर गेले. शेकडो गुलाबांच्या कुंड्या त्यानी वर्षानुवर्षं जोपासल्या आहेत. आंबा, फणस, डाळिंब, केळी अशी झाडं कुंड्यांत लावली आहेत. राहात्या घराचं नाव 'सहजीवन' आहे; त्याच्या मस्तकी 'हिरवाई' सळसळत राहावी ही केलेली योजना हा त्यांच्या हौसेचा भाग आहे. पाणी घालायला झारी घेऊन वर गेल्यावर पिंपातून झारी ओढताना ती वाहताना किती कष्ट पडतात हे या 'पार्लेभूषण'ने अनुभवलं. आणि दुसऱ्या दिवशी तज्ज्ञांना बोलवून टेरेसवर 'पंपसिस्टीम' आणि 'स्प्रिंकलर्स' बसवून घेतले. जी क्रिया आपल्याला कष्टदायक वाटते, तिचे कष्ट गड्यालाही पडता कामा नयेत असा 'कळवळा' त्यांच्या पोटात आहे. गड्याचं कुटुंब हे त्यांच्या स्वत:च्या कुटुंबाचं 'एक्स्टेन्शन' आहे. त्याला मुंबईत 'स्वत:चं घर' घेऊन देणारा हा मालक 'कळवळ्या'च्या जातीचा आहे.

आता गात्रं थकू लागली असली, तरी प्रवृत्ती तीच आणि 'अथक' अवस्थेतली आहे. नियमित योगासनं करणाऱ्या, आहारविहारांची बंधनं पाळणाऱ्या अण्णांकडे पायांनी अलीकडेच स्वत:ची नाराजी व्यक्त केली. 'पाऊल टेकणं' अशक्य झालं. अनेक मानसन्मांनानी आणि त्याहूनही मोलाच्या अशा आत्मसंतोषाने भुषविले जाऊनही त्यांचे पाय नेहमीच 'जमिनीवर टेकलेले राहिले ' होते; म्हणूनच जणू काही निसर्गाने

अशी चेष्टा केली होती. डॉक्टरांनी 'सायटिका' चं निदान केलं. हॉस्पिटलायझेशन अटळ झालं. तिथून ट्रीटमेन्ट घेऊन ते घरी आले. फिजिओथेरपीस्ट,ॲक्युप्रेशरिस्ट, मसाजिस्ट यांच्या उपचारांबरोबर आयुर्वेद, होमिओपाथी अशा साऱ्याच पद्धतींना त्यांनी साकडं घातलं. दिवसदिवस जडून राहाण्याची शिक्षा होती, पण चेहेऱ्यावर एवढा उत्साह आणि हास्य होतं की पाहणाऱ्याला वाटावं या माणसाची वेदनेशी तोंडओळखही झालेली नाही.

हे दृश्य खरंच 'पाहण्या'सारखं होतं.

मी त्यांना पाहायला गेलो, तेव्हा आडवे पडून ते फाईल वाचत होते. मला म्हणाले, 'बस! हे तूही वाच !'

कुणा अनोळखी मुलाचा तो 'बायोडाटा' होता. बारावी पास झालेल्या, क्रीडाक्षेत्रात कर्तृत्व गाजवलेल्या, मध्यमवर्गीय कुटुंबातल्या मुलाला भारतात फारशा प्रचलित नसलेल्या 'क्रीडावैद्यका'तली 'एम् .डी.' पदवी मिळवण्यासाठी रशियाला जायचं होतं. कित्येक लाखांचा खर्च होता. कुटुंबाच्या तो आवाक्याबाहेरचा होता.

मी दुसऱ्या दिवशी गेलो तेव्हा अण्णा कुणाकुणाला फोन करत होते. स्वत:च्या कामासाठी आस्थेने फोन करत होते. मुलाला त्यानी पंचवीस हजार दिलेच होते. पण आणखी धनिकांनी या मुलाला सहाय्य करावं म्हणून ते स्वत:चा 'शब्द टाकत' होते. हे काम त्यांच स्वत:चं होतं.

आणखी काही दिवसांनी मी अण्णांकडे गेलो तर ते घरात चालू लागले होते. मला बरं वाटलं. तसं मी म्हणालोही. तर म्हणाले, ''घरातच काय; या तिसऱ्या मजल्यावरून खाली उतरून आज मी रिक्षानेही फिरून आलो.''

मला वाटलं; चेष्टा करणारा निसर्ग आता 'सुनावला' आहे.या माणसाचे पाय जमिनीला टेकलेलेच राहाणारे आहेत, ही त्याने स्वत:ची समजूत काढली आहे. मदतीच्या नव्या क्षितिजाचा शोध घ्यायला तत्पर असणाऱ्या अण्णांचं - तेच ते आयुष्य पुन्हा नव्याने सुरू झालं आहे.

सुमेध वडावाला (रिसबूड)
सी ४५ 'अमरदीपमहल'
हॉटेल समर हार्वेस्ट समोर.
नंदा पातकर रस्ता. विलेपार्ले (पूर्व)
मुंबई ४०० ०५७.

काही खास व्यक्तिदर्शने...



प्रवाहातील पक्षी
निलू गव्हाणकर
७५ रु.
पोस्टेज : २०रु.

टोकियोच्या नभांगणातील चमकत्या तारका
अनु. सुधा नरवणे
१८० रु. पोस्टेज : २०रु.



मोरावळा
शिवाजी सावंत
६० रु.
पोस्टेज : २०रु.

चंद्रकांत बांदिवडेकर



अविरत काव्यसाधनेत रमलेले मंगेश पाडगावकर

मराठी आणि हिंदी मोजक्याच लेखकांशी माझी मैत्री आहे. मात्र ज्यांच्याविषयी मला कमालीचं प्रेम वाटतं अशा लेखकांत मी मंगेश पाडगावकर यांचा समावेश करतो. आता पाडगावकरांना माझ्याबद्दल काय वाटतं ते मला नक्की सांगता येणार नाही. कारण त्यांचा मित्रपरिवार मोठा. परिचितांचं विश्व त्याहूनही केवढं तरी प्रचंड. माझ्या आणि पाडगांवकरांच्या तशा भेटीगाठी फार कमी होतात. मला असं वाटतं की मैत्री, प्रेम, आदर यासाठी फार वर्षांच्या स्नेहाचं ओळखीचं सम प्रमाणांत त्रैराशिक मांडण फार कठीण. माझ्या बाजूनं मला आदराला वा भक्तीला लोकांचं वाङ्मय पुरेसं असतं. प्रेमाला काही मोजक्या प्रसंगातल्या गाठीभेटी पुरेशा असतात. एखाद्या माणसाबद्दल काहीशी कायम स्वरूपाची आत्मीयता वाटायला त्याचं वागणं, बोलणं, इतरांशी व्यवहार करणं, साहित्येतर जगाविषयीची त्याची दृष्टी एवढं पुरतं.

वर्षाच्या गणिताच्या दृष्टीनं मंगेश पाडगावकरांची माझी ओळख खूप जुनी. १९६० नंतर एस. आय. ई. एस. कॉलेजमध्ये श्री. पु. भागवतांच्या समवेत काम करण्याची संधी मला मिळाली. तेव्हा एकदा भागवतांच्या घरी मंगेश पाडगावकर याना मी अगदी जवळून, बैठकीत पाहिलं. त्यांच्या कवितांनी आधीच भारावून गेलो होतो. त्यांच्या उत्कट प्रेम कवितांतील घटना, प्रसंग

यांचे काव्यात्म, निर्देश, त्यातील सुखमय, दु:खमय अनुभवातील विलक्षण आर्तता, मराठी भाषेच्या, तथाकथित कठोरपणाला हृद्पार करून केलेला भाषेचा सहज, मुलायम आविष्कार आणि गीतात्मकता आणि काव्यगर्भता यांची अतिशय संवादी काव्यात्म प्रभावाचं केंद्रीकरण या आणि अशा कितीतरी वैशिष्ट्यांनी आमची मन भारावून गेलेली होती. त्या वेळी प्रेम हा विषय ही आम्हाला पवित्र, मूल्यवान वाटत होता. त्यांच्या निसर्गप्रीतीच्या कवितांनीही मला संमोहित केलं होतं. विशेषत: पाऊस, वृक्ष, पर्वत, ऊन यांचे वेगवेगळे मुडस् (शेवटी ते कवितेचे कवीचे असतात हे मान्य) पकडण्याचं कौशल्य आगळी दृक्प्रत्ययी प्रतिमासृष्टी यामुळेही या कवीची मौलिकता जाणवली होती. त्यावेळी त्यांच्या कवितेचा केंद्रीय भाव सौंदर्यानं भारला जाण्याचा होता. मला आठवतं कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या सहलीला गेल्यावर एका गोड गळ्याच्या मुलीनं पाडगावकरांची गाजलेली कविता म्हटली. मी आग्रह करून ती तिच्याकडून अेनक वेळा गाऊन घेतलेली होती. यात मूळ गीताच्या स्मृत्यानंदाचा भाग अधिक असायचा. काव्यातील भावनेला अधिक उठाव आणणारी शब्दक्रीडा, अर्थाचे गहन निर्देश करणारी प्रतीकात्मकता या त्यांच्या वैशिष्ट्यांमुळे मी प्रभावित झालो होतो. मात्र पाडगावकर श्री. पु. भागवतांच्या घरी भेटले तेव्हा आमच्या दृष्टीने ते यशस्वी कवी आहेत तरी तिथे भागवतांचे काहीसे वाचाळ, थट्टेखोर, मधूनच विनोद करणारे दोस्त म्हणूनच भेटले. त्यांच्या वागण्याबोलण्यात कवितेचं प्रेम विलक्षण उत्कट असलं तरी यत्किंचितही 'कवी' असण्याचा 'अहं' जाणवला नाही. कधी वाटायचं 'कवी'चा सदरा ते भागवतांकडे बाहेर काढून येत असतील; पण पुढे अनेक ठिकाणी भेटल्यावर खात्री झाली की तो त्यांचा प्रसंगोपात स्वभाव नव्हता. मूळ स्वभावच होता.

पाडगावकर गप्पा मारताना एक दिलखुलास, विनोदाचं अंग असणारे थट्टा करणारे आणि प्रसंगी तथाकथित राजकीय पुढाऱ्यांच्या ढोंगावर स्वार्थावर चिडून प्रतिक्रिया व्यक्त करणारे गृहस्थ असले तरी मूलत: काव्यसमर्पित विलक्षण परिश्रमी आणि गंभीर वृत्तीचे लेखक आहेत. त्यांना समकालीन वा नवोदित लेखकांच्या कविता आवडल्या की ते तारीफ करायला संकोच करणारे गृहस्थ नाहीत. मला आठवतं. त्यावेळी विलास सारंग याची एक कविता सत्यकथेत आली होती. पाडगावकरांनी तिचं खूप कौतुक केलं. ते जन्मजात काव्यप्रतिभा लाभलेले कवी आहेत, पण स्फूर्तीच्या प्रेरणेवर वा नैसर्गिक प्रतिभेच्या ऊर्जेवर अवलंबून राहणारे कवी नाहीत. त्यांनी इंग्रजी, हिंदी, मराठी कविता अभ्यासाच्या तऱ्हेने वाचलेली आहे. त्यांनी आपलं स्वत:चं काव्यक्षितिज सतत विलसत ठेवलं आहे. त्यांनी समकालीन परिस्थितीच्या भीषणतेवर, तथाकथित उच्चपदस्थांच्या छद्मवृत्तीवर तर प्रखर विडंबनात्मक आसूड ओढलेले आहेतच पण लहान मुलांसाठीही त्यांवेळी त्यांच्या मनोधर्माशी साजेल, आवडीनिवडीला रुचेल, त्यांना पुन: पुन: वाचावीशी वाटेल अशी विपुल कविता लिहिली. त्यांनी एक पुस्तक माझ्या चौथीतल्या नातवाला भेट म्हणून दिलं होतं. काही दिवसांनी त्याला जेव्हा कळलं की मी पाडगावकरांना भेटायला जाणार आहे तेव्हा त्यानं उत्स्फूर्तपणानं मला सांगितलं, ''पाडगावकर काकांना सांगा. मला त्यांच्या कविता खूप आवडल्या. आणखीही अशाच कविता आमच्यासाठी लिहा.'' यातला पहिला भाग मी त्यांना सांगितला. दुसरा सांगितला नाही. कारण त्यांच्याकडून आणखी संग्रह भेट म्हणून मला घ्यायचे नव्हते.

पाडगावकर 'आकाशवाणी'वर होते. मुंबई

आकाशवाणीवरचं माझं पहिलं पाच मिनिटाचं भाषण पाडगावकरांच्या निमंत्रणामुळं झालं. नंतर सिलसिला चालू राहिला, पण या भाषणाची रेडिओसाठी टेप करताना पाडगावकरांनी मला खूपच शिकवलं. आता या भाषणाचं शीर्षक आठवत नाही. पण पाडगावकरांचे काचेबाहेरचे हातवारे, खुणा या सर्व आठवतात.

पाडगावकरांना त्यांच्या कवितातून आम्ही एक अतिशय संवेदनशील, हळुवार मनाचा माणूस म्हणून ओळखत होतो. अर्थात कधी त्यांच्यातला सात्त्विक राग राजकीय ढोंगावर हल्ले करताना उफाळून यायचा. पण ते किती परिश्रम करणारे कवी आहेत. याचा प्रत्यय त्यांनी मीरेच्या पदांचा केलेला अनुवाद वाचताना मला आला. नंतर त्यांचे दोन आणखी अनुवाद आले. त्यांनी कबीर आणि सूरदास यांच्या निवडक कवितेचा अनुवाद केला. या अनुवादाच्या भूमिका वाचल्या हिंदी अभ्यासकानेही चकित व्हावे इतके वाचन त्यानी त्यासंबंधी केलेलं आहे. त्यांच्या शेक्सपिअरच्या 'द टेंपेस्ट' चा अनुवाद 'वादळ' या नावानं केलेला वाचला आणि जाणवलं की यापेक्षा अधिक चांगला अनुवाद होणं शक्य नाही. कलाकृती समजून घेण्यासाठी पाडगांवकर त्या विषयीचे महत्त्वाचे ग्रंथ वाचतात, अनुवाद विषयाचा चौफेर अभ्यासतात आणि अतिशय सूक्ष्म अर्थच्छटा आणि कलावंताच्या मूळ वृत्ती-प्रवृत्ती ध्यानात घेऊन ते अनुवाद करतात. वादळ वाचल्यावर मी त्यांना एक कार्ड लिहिलं. ते शनिवारी त्यांना मिळालं. रविवारी सकाळी त्यांनी पुण्याला फोन करून आपला आनंद ज्या भाषेत कळवला तो ऐकल्यावर मलाही खूप आनंद झाला. खरं तर डायरी वगैरे मी कधी लिहीत नाही. पण उत्कट समाधानातून पाडगावकरांनी आपला अभिप्राय व्यक्त केला. त्या दिवशी मी पहिल्यांदा डायरीचं एक पान लिहून माझा आनंद डायरीत व्यक्त केला. पाडगावकरांचा फोन हा माझ्या आनंदाचा एक ठेवाच असतो. एकदा प्रथम मला दुसऱ्याचाच आवाज वाटला. ते म्हणाले, ''अहो बांदिवडेकर, महाराष्ट्रात दोन सम्राट आहेत. एक हिंदूहृदय सम्राट बाळ ठाकरे, दुसरे हिंदी हृदय सम्राट बांदिवडेकर.'' मग मात्र खात्री झाली हे पाडगावकरच. मग थट्टामस्करी. त्यातूनही जाणवायचं ते एका प्रतिभावंतांची थट्टामस्करी म्हणजे काही संस्मरणीय प्रसंगच. एकदा त्याना मी माझा पुण्याचा पत्ता फोनवर सांगितला. त्यात होतं - पंचवटी, पाषाण, पुणे. ते एकदम उद्गारले, ''बांदिवडेकर या पत्त्यात.... चं नाव कसं ?'' म्हणजे त्यांचे मित्र पाषाण ! आम्ही दोघेही भरभरून हसलो. त्यामुळे पाडगावकरांचा फोन म्हणजे आनंद लहरींचा अनुभव.

पाडगावकरांचे परममित्र विंदा करंदीकर. सुमारे चाळीस वर्षे एकत्र काव्यवाचनाचा कार्यक्रम केलेला. एकमेकाला अरेतुरे म्हणणारे, एकमेकांची थट्टामस्करी करणारे, कवितेतही एकमेकावर विनोद करणारे. पाडगावकर आजारातून उठल्यावर त्यांच्यावर खूप बंधने आली - गप्पागोष्टींवर नियंत्रण, हसण्यावर नियंत्रण, जिने चढण्याउतरण्यावर बंधनं. अतिशय काटेकोरपणे दिवस कंठावे लागत. पाडगावकरांच्या स्वभावाला हे जुळण्यासारखं नव्हतं. त्यात विंदा करंदीकरांचा वाढदिवस आला. अनेक वर्षांच्या त्यांच्या वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ देऊन भेटण्याच्या कार्यक्रमाला पहिल्यांदा खंड पडला. पाडगावकरांमधील मित्र आणि खट्याळ पोरगा जागा झाला. संध्याकाळच्या सुमारास त्यांना रहावेना. मनात विचार आला दोघांची वयं तशी झालेली. वय आजारीपण हे सारं आहेच. काहीही कधीही होऊ शकतं. त्यांनी कुणालाही पत्ता लागू न

देता अक्षरश: चोरपावलांनी घरातून पळ काढला. कार होती पण त्यात पकडले जाण्याचा धोका होता. त्यांनी टॅक्सी घेतली आणि सरळ साहित्यसहवास गाठले. पाच मजले चढून विंदांच्या दरवाजाबाहेर घंटी वाजवली. विंदांनी दार उघडलं आणि अवाक् झाले ! ऑपरेशन झाल्यावर सर्व बंधनं असताना हा माणूस पाच मजले चढून वर येतो - वाढदिवसाच्या दिवशी अभिनंदन करण्यासाठी ! ते जवळ जवळ ओरडणार, तोच मंगेशजी म्हणाले, ''हे बघ, दमानेच. आधी पाणी पाज. चहा पाज. नंतर बोलायचं आहेच- बोल हवा तेवढा !'' हा प्रसंग मला कळला. दोघांनाही मी बऱ्यापैकी ओळखतो. त्यांचे चेहरे (विशेषत: विंदांचा) कसे झाले असतील, विंदा कसे उभे असतील, नंतर त्यांनी किती वेळ आश्चर्याच्या अनुभवात घालवला असेल, त्यांच्या मनात मित्राबद्दलचं प्रेम आणि त्यांच्या वागण्याबद्दलचा राग यांचा संमिश्र भावना कशा हेलकावल्या असतील, काही क्षण ते कसे अबोल झाले असतील, दोघांची मनं कशी भरून आली असतील यांच एक चित्रच माझ्यासमोर उभं राहिलं. मात्र हे अंतरीचं घट्ट आपलेपण त्या दोघांनाही एकमेकांवर ओरडताना, थट्टा करताना, बैठकीत एकमेकांची टोपी उडवताना आड येत नाही. प्रत्यक्षात आणि कवितेतही एकमेकांची टर उडवताना गैरसमज होईल अशी भीती वाटत नाही. पाडगावकर विंदा करंदीकरांबद्दल त्यांच्या अनुपस्थितीत बोलतात तो एक साहित्यिक रूपप्रकार म्हणूनही रूढ झाला. विलक्षण आदर आणि प्रेम पोटी पण वक्तव्य, विडंबन, नक्कल यांच्या सृजनशील क्रीडेनं भरदार आणि धारदार झालेली वाक्-गंगा बाहेर !

पाडगावकरांना आर्थिक आघाडीवर संघर्ष करावा लागला, काही कटु अनुभवही आले. त्यांनी मनातला राग शब्दात काढलाही. पण कधी त्यांच्या स्वभावात कायमचा विखार आला नाही. याचे एक महत्त्वाचं कारण म्हणजे त्यांच्या अन्तर्मनात असलेलं काव्याचं जबरदस्त आकर्षण. स्वत:च्या काव्यासंबंधीची प्रीती तर होतीच पण इतरांच्या व्यक्तित्वाचा केंद्रबिंदू. याचं खरं कारण असं की एकूण जगण्याच्या धडपडीतला, जीवनाच्या, उद्देश्याचा, वा सार्थकतेचा पाडगावकरांचा मुख्य आधार काव्यच. मला वाटतं, एके काळी अध्यात्ममार्गाकडे वळून हिमालयाकडून पुन: सागरांकडे, पावसाकडे, हिरव्यागार सृष्टीकडे, प्रेमाकडे, जीवन जगण्याच्या धडपडीकडे त्यांना खेचून आणलं असेल तर या काव्यानंच.

अशा माणसाशी विवाह करून त्यांच्याशी संसार करणं आणि भौतिक अन्य सुखांची अपेक्षा करणंही काहीसं निरर्थक. पाडगावकर वहिनीनी फार सुरेख पुस्तक लिहिलं. 'कुणासाठी कुणीतरी'. त्यातील वहिनींना भोगाव्या लागलेल्या दु:खाची कहाणी वाचताना गलबलून जायला होतं. हे खरंच, काही ठिकाणी त्यांनी पाडगावकरांच्या एकलकोंडेपणाचे वा आत्मकेंद्रिततेचे काही प्रसंग दिले आहेत. त्यांच्या खरेपणाबद्दल माझ्या मनात शंका नाही. आणि ते सर्व वाचताना कधी पाडगावकरांचा रागही आला हे मी नोंदवतो. त्यात एक प्रसंग असा आहे की एकदा मुलगा तापाने खूपच आजारी असताना त्यांनी 'मला ऑफिसमध्ये जाणं भाग आहे - तूच काय ते कर' असं सांगितलं आणि ते ऑफिसमध्ये गेले. मी विचार करू लागलो. काव्यातला हा कोमल हृदयाचा,हळवा, सौंदर्यप्रेमी माणूस असा का वागला ? (इथे मी साहित्यिक व्यक्तित्व आणि जीवनातलं व्यक्तित्व यांतील अंतरासंबंधीचा मुद्दा बाजूला ठेवतो). मग मला उलगडा झाला. पाडगावकरांची एका कॉलेजमधल्या नोकरीसंबधी फार मोठी

फसवणूक झाली होती. त्यानंतर पाडगावकरांनी खूप सोसलं होतं- आर्थिक मिळकतीचं साधन अचानक नाहीसं झाल्यावर या स्वाभिमानी माणसाला विलक्षण 'फ्रस्ट्रेशन' आलं असावं. त्यातून नोकरीसंबंधीची धास्ती त्यांच्या मनात निर्माण झाली असावी. माझ्यापुरता मी वरील घटनेचा उलगडा केला तो असा आणि मलाच एक समाधान वाटलं.

वहिनीनी दुसरा प्रसंग कथन केला आहे. एकदा जेवायला बसले तेव्हा त्यांना आवडणारा पदार्थ (बहुधा तळलेला मासा किंवा माशाची आमटी असावी) या सारस्वताला ताटात दिसला नाही. या गृहस्थाचा तोल गेला आणि त्यानं ताट फेकून दिलं. या प्रसंगानेही मी काहीसा चक्रावून गेलो. त्याचाही विचार करताना मला जाणवलं की इतर चौघांकडून आपण ज्या संयमाच्या, सहनशीलतेच्या इ. अपेक्षा करतो त्या उत्कटता हाच ज्याच्या काव्याचा बीज गुण आहे अशा कवींकडून करू नयेत. अशा कवीचं मन मधाभोवती मधमाशीसारखं असतं. यात व्यत्यय आला की मधमाशी चावणारच. पण हे स्पष्टीकरण माझ्यापुरतं ठीक असलं तरी त्यामुळे वहिनींनी जे भोगलं त्याचं निराकरण कसं होणार ? आणि एखादी गोष्ट स्वाभाविक आहे, माणसाच्या प्रकृतीशी मेळ खाणारी आहे म्हणून ती योग्य असते असं नाही, तेव्हा माझ्यापुरत्या या स्पष्टीकरणानं वहिनींना जे भोगावं लागलं त्याचं दु:ख वा त्याची तीव्रता कमी होत नाही. पण माझ्यापुरतं मी असं म्हणतो की या मोठ्या कवीचे काही स्वभावधर्म न आवडणारे असले तरी ते सहन केले पाहिजेत. अर्थात वहिनींनी ते सतत सहन केलं आहे - म्हणून मी त्यांच्यासमोर नतमस्तक आहे. आमच्या मित्राला त्यांनी संभाळलं. हे मराठीवरचेही त्यांचे उपकार आहेत.

खरं तर ही प्रतिभाशाली विशेषत: कवी मंडळी काहीशी 'तुनअमिजाज़' असतात. त्यांची अन्तर्मनाची समाधी करत भंग पावेल आणि ते त्याक्षणी एखाद्या ॲनॉमेल माणसासारखं कसं वागतील ते सांगता यायचं नाही. कधी वाटतं की अशा माणसांबद्दल त्यांच्या जवळच्या माणसांनी हाताचे न राखून लिहिलं तर एक विक्षिप्तांची दुनिया समाजापुढे उभी राहील. मात्र जाता जाता असंही नोंदवावसं वाटतं. पाडगावकरांनी हे सर्व लिहू दिलं हा पुन: त्यांचा मोठेपणाच आहे. मात्र पाडगावकर वहिनींचं पुस्तक वाचताना वाटतं ते हे की मुलीचे बाप जावई म्हणून एखाद्या कवीला स्वीकारताना पुन: पुन: विचार करतील आणि लग्नापूर्वी हे पुस्तक मुलीला वाचायला देतील. कधी कधी असंही वाटतं की पाडगावकर स्वत: कधी यासंबंधी लिहितील ? मला वाटतं आमचे हे वरिष्ठ आदरणीय मित्र लिहिणार नाहीत. मग अनुमानं काहीही काढावीत - पत्नीला उदार अंत:करणातून क्षमा, आपल्या मोठेपणावर काहीही परिणाम होणार नाहीही खात्री, पश्चात्तापातून आलेला मनाचा उदारपणा, घरोघर त्याच चुली असण्याची आंतरिक जाणीव इ. इ.

कधी कधी असं वाटतं की यच्चयावत सर्व कवींच्या (अर्थात मोठ्या कवीच्या) पत्नींनी अशी पुस्तकं लिहिली तर कन्यादान करणाऱ्या पित्यांवर उपकार होतील, काही मुलीही स्वत:ला सावरतील. अर्थात यातून नको ते सामाजिक मानसिक प्रश्नही उभे राहतील. म्हणजे हे कवी निर्माण करतील. शेवटी अशा वहिन्यांना 'तेथे कर माझे जुळती' म्हणून मोकळं व्हावं.

पाडगावकरांना स्वत:च्या नाजूक तब्येतीविषयी बोलणं किंवा विचारपूस करणं फारसं आवडत नाही. फार फार वर्षांपूर्वी त्यांच्या डोळ्यांचा काही प्रॉब्लेम निर्माण झाला होता. आम्ही काही मंडळी भागवतांकडेच जमलो होतो. आमच्यापैकी कुणीतरी म्हटलं, ''पाडगावकर

चष्मा लागला तर तो सतत वापरा बरं - केवळ वाचण्यासाठी काढणं बरोबर नाही'' त्याला सुचवायचं होतं ते हे की तुम्ही तरुण आणि सुंदर दिसत राहावं म्हणून चष्मा वापरण्याचं टाळता. (आता डोळ्यांचा संदर्भ आलाच आहे. मला वाटतं मी ज्या कविसंमेलनात दाढीवाल्या पाडगावकरांना ऐन उमेदीत प्रथम पाहिलं, तेव्हा त्यांच्या विलक्षण पाणीदार, चमकदार डोळ्यांचाच प्रभाव मला जाणवला. त्यांची दाढी त्यावेळी महाराष्ट्रात कुतुहलाचा आणि चर्चेचा विषय होती. तितकं दाढी चर्चेचं भाग्य नंतर कुणाही कवीला लाभलं नाही. नोबेल पुरस्कार मिळवणाऱ्या रवींद्रनाथांच्या दाढीचा प्रभाव या कवीला ही तरुणपणात पडला असावा काय ? की त्यांची दाढी त्यांच्या हिमालय भ्रमंतीच्या आध्यात्मिक अनुभवातून वाढली ? पण मी मात्र त्यांच्या तेजस्वी डोळ्यांनी काहीसा प्रभावित झालो होतो. विंदांचे डोळे आणि पाडगावकरांचे डोळे हा एक वेगळा चर्चेचा मुद्दा होईल. अजोड) त्यावेळी पाडगावकर काहीसे चिडून उद्‌गारले - हा विषय बंद. मला खूपच उपदेश मिळाले आहेत. एकूणच आपल्या तब्येतीविषयी काहीही बोलण्याचं पाडगावकर टाळतात हे खरं. एकदा मी आणि आमचे मित्र डॉ. रामजी तिवारी पाडगावकरांना घेऊन हिंदी प्राध्यापकांच्या वार्षिक संमेलनात गेलो. तिथं पाडगावकरांचा प्रयत्न केला गेला. पाडगावकरानी छोटंसं भाषण केलं आणि कविता वाचल्या. नेहमीप्रमाणं त्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केलं. त्याना मुंबईला आम्हीच सोडून आलो. तिथं प्राध्यापकांनी छोटीशी बिदागी त्यांना दिली. पाडगावकर संकोचले. मी त्यांना बिदागी घ्या म्हणून विनवलं. (बिदागी छोटी होती म्हणून संकोचाचा भाग नव्हता हे आवर्जून लिहिलं पाहिजे.) ते म्हणाले, ''बांदिवडेकर, त्यांनी कारनं आणलं, पोचवायला आले. माझा सन्मान त्यांनी केला आता बिदागी कशी घेऊ ?'' (हा सन्मान हिंदी प्राध्यापक संघटनेनं त्यांनी केलेल्या हिंदी-मराठी --संबंधामुळे होता.) मी त्यांना सांगितलं, ''सन्मान केला ते तुम्ही मराठी-हिंदी कवींना आणलंत म्हणून आणि तुम्ही मोठे कवी म्हणून विदागी देताहेत ती तुम्ही ५/६ सुंदर कविता पेश केल्याबद्दल. मन:पूर्वक. त्यांचा अनमान करू नका. सन्मानाप्रीत्यर्थ तुम्ही छान भाषण केलं आहे'' त्यांना ते पटलं. त्यांनी संकोचानं मानधन स्वीकारलं. परतीच्या प्रवासात आम्ही ३/४ वेळा तरी पाणी प्यालो. पाडगावकरांनी फक्त एकदा चहाच घेतला. त्यावेळी मी नुकताच वॉटर थेरेपीचा चाहता बनलो होतो. मी त्यांना आश्चर्यानं विचारलं. ''हे काय, तुम्ही पाणी पीत नाही ?'' ते काहीशा अरुचिकर विषय टाळण्याच्या मूडमध्ये म्हणाले, ''नाही. मी पाणी घेत नाही.'' तो विषय तिथंच सोडून दिला. नंतर कारण लक्षात आलं. एकूण पाडगावकरांना तब्येतीबद्दलची कुरकूर, तक्रार आवडत नाही हे पक्कं लक्षात आलं.

मी स्वत: होऊन पाडगावकरांकडे क्वचितच जाईन. याचं कारण एकच. या माणसाच्या कार्यरततेच्या समाधीतून मला खेचायचं नाही. मात्र त्याच्याशी बोलणं, त्यांना भेटणं, त्यांच्या सान्निध्यात काही वेळ घालवणं हा माझा आत्मिक आनंदाचा भाग असेल. त्यांचा फोन येणे ही एक पर्वणीच.

चंद्रकांत बांदिवडेकर
सी/२ ब्लॉक ७,स्टेट बँक
नगर,पंचवटी,पाषाण, पुणे ८

प्रेम म्हणजे प्रेम
म्हणजे प्रेमच असतं
तुमचं आणि आमचं
अगदी सेम असतं!

डॉ. राजेंद्र प्रभुणे

अध्यात्ममार्गी कुशल स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. फडणीस

आपल्या जीवनात येणाऱ्या सर्वच व्यक्ती, घटना आणि अनुभव इतकेच नव्हे तर दुसऱ्यांचे अनुभव किंवा इतरत्र घडणाऱ्या घटनाही आपल्यावर कमी-अधिक आणि बरा-वाईट प्रभाव पाडतच असतात. त्यातून आपण घडत असतो. पण ज्यांच्यामुळे आपलं आयुष्य घडलं ते आईवडिल व नातेवाईक किंवा ज्यांच्यामुळे आपल्या आयुष्याला दिशा किंवा कलाटणी मिळाली असे गुरू, मित्र व इतर व्यक्ती यांचा आपल्यावरचा प्रभावफार मोठा होता असं म्हणता येईल.

कुणाच्या प्रभावाखाली जाण्याचा किंवा भारून जाण्याचा माझा स्वभाव नाही. तरीही असा मोठा प्रभाव माझ्यावर डॉ. एच. एन. फडणीसांचा पडला.

मी डॉक्टर होण्याचं ठरवलं. हा अगदीच अपघात नसला तरी तात्कालिक निर्णयाचा तो परिणाम होता असं आता वाटतं. डॉक्टर झाल्यावर मी स्त्रीरोगतज्ज्ञ झालो हा मात्र अपघात म्हणता येईल. म्हणजे तो विषय आवडत नव्हता असं नव्हे. पण इतर विषयांपेक्षा यात जास्त मार्क मिळाले आणि त्यावेळच्या ॲडमिशनच्या नियमांनुसार मला या विषयात पुढे अभ्यास करण्याची संधी मिळाली हे त्याचे कारण होते.

एम. बी. बी. एस्. ला असताना पहिली प्रसूती मी पाहिली तेव्हा त्या दैवी घटनेच्या दर्शनानं मी अक्षरश: थरारून गेलो होतो व माझ्या डोळ्यांत पाणी आलं होतं. नंतर स्त्रीरोगतज्ज्ञ होताना या दैवी घटनेला नुसतं साक्षी नव्हे तर हातभार लावण्यात आपलं आयुष्य जाणार या कल्पनेनं मी भारून गेलो होतो. पुढे या बाबतीत भ्रमनिरास झाला. त्यावेळच्या आमच्या शिक्षकांनी तो केला. एका दैवी घटनेची त्यांनी एक कंटाळवाणी व त्रासदायक घटना करून टाकली. प्रसूत होणाऱ्या बायका आपल्या पूर्वजन्माच्या वैरिणी असून या जन्मातही त्या आपल्याला अहोरात्र छळत आहेत आणि चरितार्थासाठी किंवा खूप पैसे मिळवण्यासाठी हा छळ सहन करणं भाग आहे असं ते एकूण वातावरण होतं. त्यात उत्कृष्ट आणि जाण असलेले डॉक्टर-शिक्षक नव्हते असं नाही. पण अभावानेच, आणि दुर्दैवानं ते माझ्या वाट्याला आले नाहीत. असो. त्या संस्कारक्षम पण चांगल्या वाईटाची परिपूर्ण जाण नसण्याच्या वयातही हे चांगलं नाही असे वाटत असे. असं आपण करायचं नाही, हा आपला स्वभाव नाही, चांगला स्त्रीरोगतज्ज्ञ किंवा

मुळात चांगला डॉक्टर बनण्याच्या आपल्या संकल्पनेत हे बसत नाही असंही वाटत असे.

पण मग चांगलं आणि त्याहीपुढे आदर्श काय ? ते मला डॉ. एच. एस. फडणीसांकडून शिकायला मिळालं.

खाजगी प्रॅक्टिस सुरू करून वाट पाहताना व धडपडताना त्यांच्या 'श्री क्लिनिक' मध्ये त्यांचा साहाय्यक म्हणून काम करण्याची मला संधी मिळाली.

त्यांना प्रत्यक्ष भेटेपर्यंत त्यांच्याबद्दल माहिती कमी व गैरसमज फार होते. ते खूप हुशार व यशस्वी डॉक्टर आहेत, पण आता आचार्य रजनीशांचे शिष्य म्हणून भगवी कफनी घालून वावरतात, मधे प्रॅक्टिस सोडून आश्रमातच राहत असत, वगैरे त्यांच्या कन्सल्टिंगमधेही डॉ. एच्. एन्. फडणीस उर्फ स्वामी अजित सरस्वती असं लिहिलेलं होतं.

पहिल्या दिवशी नवीन पेशंटची हिस्टरी लिहून, नाडी, रक्तदाब वगैरे तपासून वाट बघत बसलो. कन्सल्टिंग रूम व तपासणीखोली यांच्यामधील दार उघडलं व मी त्यांना प्रथम पाहिलं. कफनी वगैरे नाही, भगव्या, 'मरून' रंगाकडे झुकणाऱ्या कापडाची सैल पँट व गुरुकुडता असा वेष. उंच, रुबाबदार, अर्धवट पांढरी दाढी, चष्मा. एकदम पाहिल्यावर सिनेमातील फॅशनेबल गरू वाटले असते. पण चष्म्यामागचे डोळे आणि चेहेऱ्यावरचा प्रसन्न, आश्वासक भाव हे ज्ञानी आणि तत्त्वज्ञ माणसाचे होते.

नाडी, रक्तदाबापासून पेशंटची संपूर्ण तपासणी त्यांनी स्वत: केली आणि मग ग्लोव्हज् घालून पुढील स्त्रीरोगसंबंधित तपासण्या केल्या व ते गेले. नंतर पेशंटबरोबर मी कन्सल्टिंग रूममध्ये गेलो.

आपल्या बारीक सुवाच्य अक्षरात, विशिष्ट लकबीने पेन धरून, अगदी शांतपणे व विचारपूर्वक ते नोट्स लिहीत होते. पेशंट व बाहेरच्या दारातून आत आलेल्या पेशंटच्या नातेवाईकांना त्यांनी बसण्याची खूण केली. नोट्स लिहून झाल्यावर सर्व बारकाव्यांनिशी त्यांनी प्रिस्क्रिप्शन लिहिलं. मग पेन बंद करून, खुर्चीवर मागे ताठ बसून, बोटं जुळवून त्यांनी बोलायला सुरुवात केली. स्वच्छ, साध्या, सोप्या मराठीत; किंचित हसऱ्या चेहऱ्याने व आश्वासक आवाजात त्यांनी पेशंटला काय झाले आहे व आता काय करायला पाहिजे ते सांगितलं. इतकेच नाही तर पेशंट व नातेवाईकांच्या शंकांना त्यांनी उत्तरंही दिली.

पेशंट गेल्यावर ते माझ्याकडे वळले. त्यांनी वर्षानुवर्षे केसपेपर कसे ठेवले आहेत, त्यावर जास्तीतजास्त व अचूक माहिती कशी लिहायची, केसपेपर का ठेवायचा वगैरे त्यांनी मला थोडक्यात सांगितलं. मग ते म्हणाले, 'आपण स्त्रीरोग तज्ज्ञ असलो तरी पेशंट ही संपूर्ण व्यक्ती असते. तेव्हा सर्व सिस्टीम्सची तपासणी करून मगच स्त्रियांच्या अवयवांच्या तपासणीकडे वळलं पाहिजं. इतर सिस्टीम्समधे ढोबळ दोष आढळल्यास त्या विशिष्ट तज्ज्ञाकडे आपण पेशंटला पाठवू ते वेगळे. पण आपण संपूर्ण तपासणीचे कष्ट घेतले नाहीत असे होता कामा नये.'

शिकताना आम्ही हे पहिल्यापासून शिकलेलोच होतो. पण प्रत्येक विषयातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या जमान्यात हे करण्याची जरूरच काय असं काहीजण समजत असत. आज तर सर्वच जण समजतात. आणि इतक्या मोठ्या डॉक्टरने पेशंटशी बोलताना, समजावून सांगताना इतकंच नव्हे तर शंकासमाधान करतानाही मी प्रथमच पाहात होतो. पेशंटशी बोलणं दूरच; पण आज मोठ्या हॉस्पिटलमधे काही विशेष तज्ज्ञ डॉक्टरांनी येऊन अति-विशेष शस्त्रक्रिया करून निघून जाताना पेशंटचा चेहरा तरी

पाहिलेला असतो का नाही शंकाच आहे. त्या पहिल्याच दिवशी मी खूप शिकलो.

सरांची एकूणच कामाची पद्धत शिस्तबद्ध होती आणि ही शिस्त प्रत्येकजण सुरुवातीपासून पाळेल हे ते पाहात असत. ही शिस्त, निदान मलातरी, त्रासदायक व जाचक कधीच वाटली नाही. कारण शिस्तीमागेही निश्चित विचार होता. एखादी गोष्ट का करायची आणि तशीच का करायची याचे निश्चित कारण होते. अगदी किरकोळ शस्त्रक्रिया म्हणजे प्रसूतिनंतरचे टाके घालण्यापासून मोठ्या शस्त्रक्रियेपर्यंत सर्व ठरल्याप्रमाणे शिस्तीत होई. पण ते बदलालाही अनुकूल असत. पण त्या बदलाची उपयुक्तता पटवून द्यावी लागे. जास्तीतजास्त उपयुक्त व आदर्श पद्धतींच्या शोधासाठी तेही नेहमी प्रयोगशील असत. पण, केवळ मला वाटतं म्हणून असं करायचं, असं तेही करत नसत आणि इतरांनाही करू देत नसत.

अर्थात हे सगळं सरांच्याबद्दल आहे तितकंच बाई (सरांच्या पत्नी) व राधाताई (सरांची बहिण) यांच्याबद्दलही आहे. शस्त्रक्रियेसाठी ट्रॉली लावण्यापासून शस्त्रक्रियेला मदतनीस म्हणून काम करण्यातील बारकाव्यांपर्यंत मी त्यांच्याकडून शिकलो. शस्त्रक्रिया करताना सर्वांमधे, जणू एकाच व्यक्तीचे भाग असल्याप्रमाणे संपूर्ण सामंजस्य आणि सुसूत्रीकरण आवश्यक असते. त्यामध्ये, तिथं आणि त्यावेळी संपूर्णपणे असण्याची आणि एकमेकांच्या मनातलं जाणण्याची कला आवश्यक असते. बाईंना व राधाताईंना ती उत्तम साधली होती आणि त्यांच्याकडून ती शिकायचा मी प्रयत्न केला.

त्यामुळे सरांच्या ऑपरेशन थिएटरमधील वातावरण वेगळंच असे आणि सरांनी तिथं प्रवेश करताच ते आणखीनच भारलं जाई. त्यांच्याबरोबर शस्त्रक्रिया करताना म्हणूनच एक प्रकारचे दडपण असे, त्याचबरोबर एखादी अत्युकृष्ट कलाकृती कलावंत घडवत असताना आपण त्याला साक्षी असण्याचा अलौकिक आनंदही त्यात असे.

अत्यंत काटेकोर आणि सुनियोजित पद्धतीने सर शस्त्रक्रिया करत. त्यात घाई, गडबड-गोंधळ, शंका, अनिश्चितता काही नसे. इमर्जन्सी सिझेरियनसारखी शस्त्रक्रियाही ते तितक्याच शांतपणे करत. या गतीने शस्त्रक्रियेला दीडतास तरी लागणार असे बघताना वाटे. प्रत्यक्षात पाऊण तासात शस्त्रक्रिया संपलेली असे. शिवाय सर्व गोष्टींची पूर्ण खात्री करूनच ते शस्त्रक्रिया संपवत.

त्यामुळे व मनाच्या तात्विक, आध्यात्मिक बैठकीमुळे असेल, ते नेहमीच संपूर्ण निर्धास्त, शांत, प्रसन्न आणि 'स्वस्थ' (स्वास्थ्य व आरोग्यपूर्ण आणि स्वत:मध्ये स्थित या दोन्ही अर्थांनी) असत. आणि म्हणूनही कदाचित त्यांचे पेशंटही त्यांच्यावर सर्व सोपवून निर्धास्त होत असणार. दुसऱ्याशी तात्काळ सुसंवाद साधून त्यांच्यात विश्वास निर्माण करण्याची किमया त्यांना साधली होती. त्यामागे, **त्यांच्या बाह्य व्यक्तिमत्त्वाबरोबरच त्यांचे आंतरिक सामर्थ्य, मनुष्य स्वभावाचे ज्ञान, त्याच्या गरजांचे भान व परिस्थितीचे यथार्थ आकलन करण्याची क्षमता या गोष्टी होत्या हे मला हळूहळू समजत गेले.**

माझ्या पत्नीच्या प्रसूतीच्या वेळी शेवटच्या काही कळांच्या क्षणी तिला असह्य झालं असता ते तिथं आले. पत्नीचा हात हातात घेऊन ते म्हणाले, 'घाबरू नकोस, सर्व ठीक आहे. खोल श्वास घे. अंग सैल सोड.' ती एकदम रिलॅक्स झाली व त्यांनी पुढे दिलेल्या सूचना पाळून एकदोन कळांतच प्रसूत झाली.

ती मला नेहमी सांगत असते, 'माझा धीर सुटत चालला असताना त्यांचा आवाज आला.

त्यात असा काही भाव होता की मला एकदम विश्वास वाटला व धीर आला.'

त्याच दिवशी रात्री, मी हॉस्पिटलमध्ये आईजवळच झोपणार म्हणून माझा मोठा मुलगा हटूनच बसला. मी त्याला रागावत होतो आणि तो रडत होता. इतक्यात रात्रीच्या राऊंडला सर आले. 'इतके दिवस तो आईजवळ झोपत आला. आज एकदमच त्याला समज यावी अशी अपेक्षा तुम्ही कशी करता ?' असं त्यांनी आम्हाला समजावलं. मग त्याच्या पाठीवर हात ठेवून ते म्हणाले, 'तू इथंच झोप. मी तुझ्या बाबाला सांगितलंस. पण आईजवळ छोटं बाळ आहे. तर तू या शेजारच्या कॉटवर आजीजवळ झोप.' मुलाची लगेच समजूत पटली. अशा गोष्टींत खूप धीर धरायला शिकायला पाहिजे असे आम्हांला सांगून ते गेले.

त्या आधी व नंतरही सरांच्या दैवी स्पर्शाबद्दल, आश्वासक बोलण्याबद्दल व मुख्यत: इंट्युशनबद्दल मी ऐकत आलो होतो. विशेषत: प्रसूतींच्या काही प्रसंगी, सुरळीत चाललेली प्रक्रिया एकदम धोकादायक वळण घेई व जिवाशी खेळ सुरू होई अशा वेळी सर शांतपणे तपासत व एकदोनच महत्त्वाच्या व स्पष्ट सूचना देऊन निघून जात. मग त्यांनी सांगितल्याप्रमाणे तितक्या वेळात, त्या स्त्रीची सुखरूप सुटका होणार हे ठरलेलेच असे. आपण फक्त सूचनांचे तंतोतंत पालन करायचे. इतकं सगळं सोपं होऊन जाई.

अशा काही डॉक्टरांच्या असामान्य कौशल्याबद्दल, अचूक रोगनिदानाबद्दल, दैवी स्पर्शाबद्दल व इंट्यूशनवर मी सतत विचार करत आलो आहे. व त्यातला अंश तरी आपल्यात यावा असा प्रयत्न करत आलो आहे. एकदा मी सरांनाही याबद्दल विचारलं. त्यावर नेहमीप्रमाणे स्मित करून, 'डोळस अनुभव... अनुभवसिद्ध ज्ञान....' असं काहीसं ते म्हणाले. त्याचा अर्थ आता हळूहळू कळतो आहे. माहिती खूपजण जमा करतात, काहीजण खूप अभ्यासूही असतात पण ज्ञानी एखादाच होतो. अभ्यास, अनुभव व चिंतनातून ज्ञानी होण्याच्या कुवतीत दैवीपणा आहे.

त्यांच्या कन्सल्टिंग रूमच्या समोरच्या भिंतभर पुस्तकांचे कपाट होते. त्यात स्त्रीरोग-प्रसूतीच्या पुस्तकांबरोबरच आचार्य रजनीश, जे कृष्णमूर्ती, हिंदू, ताओ, झेन तत्त्वज्ञान व इतरही अनेक विषयांवरचे ग्रंथ होते. त्याचप्रमाणे अगदी वरच्या मजल्यावर एकच खोली होती. त्या खोलीच्या सर्वच भिंती पुस्तकांनी भरल्या होत्या व मध्यभागी भारतीय बैठक. मी एकदाच त्या खोलीत गेलो होतो. तिथं बाजूला पुस्तके मांडून काही लेखन करत असताना मी त्यांना पाहिलं. एखाद्या ज्ञानी, तपस्वी ऋषीसारखे ते मला तेव्हा वाटले. ते दृश्य मी कधी विसरू शकत नाही.

ते स्वत: स्वयंभू असताना आचार्य रजनीशांचे शिष्य कसे झाले हे मला समजलं नाही. आचार्य रजनीशांचं कोणतं पुस्तक मी वाचू, असं विचारल्यावर, 'कोणतंही वाच. सर्व सारखीच आहेत,' असं ते म्हणाले. प्रत्यक्षात त्यांनी मला जे. कृष्णमूर्तींचं 'अवेकनिंग' किंवा अशा काही नावाचं छोटं पुस्तक दिलं. त्यावर चर्चा करण्याची माझी योग्यता नव्हतीच. तरी मी त्यांना काही शंका विचारल्याच. मागे मी लिहिलेली कादंबरी मी त्यांना दिली होती. त्यातील 'माझ्यातून मोकळा होऊन, खाली पडलेल्या माझ्याकडं पाहात मी काही विचार करतो आहे,' अशा स्वरूपाच्या प्रसंगाची आठवण करून देऊन त्यांनी विचारलं, 'असा अनुभव तुला खरोखर आला आहे का ?' मी म्हणालो, 'आला असावा. म्हणून मी तसं लिहिलं असलं पाहिजे' त्यावर ते म्हणाले,

'हा आध्यात्मिक स्वरूपाचा अनुभव म्हणता येईल. आपण असं काहीसं अलिप्त होऊन, आपण स्वत: आणि भोवतालचं विश्व यांचा सम्युक अनुभव घेतला पाहिजे. मला ज्ञानी किंवा साधकाची जागृतावस्था किंवा अवेअरनेस म्हणता येईल.' वगैरे

उत्कृष्ट आणि तज्ज्ञ डॉक्टरसंबंधी बोलताना एकदा ते म्हणाले, **'अचूक रोगनिदान करणं आणि वेळच्यावेळी योग्य निर्णय घेणं हे तज्ज्ञाचं काम आहे.** उदाहरणार्थ सिझेरियनची जरूर आहे का नाही हे योग्य वेळी कळणं व त्याप्रमाणे निर्णय घेणं हे तज्ज्ञाचं काम आहे. प्रत्यक्ष सिझेरियनची शस्त्रक्रिया ही कारागिरी आहे. आपण घेतलेला निर्णय शेवटी त्या स्त्रीच्या संपूर्ण भावी आयुष्यावर परिणाम करणार असतो हे तज्ज्ञानं विसरता कामा नये.' आज असे कारागीर असंख्य दिसतात. पण त्यांच्या मताप्रमाणे किती जणांना खरोखर 'तज्ज्ञ डॉक्टर' म्हणता येईल शंकाच आहे.

माझी पत्नी एक प्रकारच्या कॅन्सरने गंभीर आजारी होती. नक्की निदानाबद्दल एकमत नव्हते, केमोथेरपीच्या साईडइफेक्टसने ती हैराण झाली होती आणि काय करावे हे मला समजेनासे झाले होते, तेव्हा मी सरांशी बोललो. अनेक तपासण्यांचा निष्कर्षांच्या व अनेक डॉक्टरांच्या मतांच्या गुंत्यातून त्यांनी मला योग्य मार्ग दाखवला. माझ्या मनातील शंका सरून मी त्यांनी दाखवलेला मार्ग अनुसरला. हे, कृष्णाने थांबावलेल्या अर्जुनाला मार्गदर्शन केले, तसे मला वाटले. आजच्या सर्व बदललेल्या परिस्थितीत डॉक्टर व पेशंटच्या बदललेल्या नातेसंबंधात, नवीन कायद्यांच्या बंधनात आणि काही वेळा व्यावहारिक पातळीवर त्यांचे हे विचार कालबाह्य वाटण्याचीच जास्त शक्यता आहे. पण पेशंटच्या बदललेल्या नातेसंबंधात, नवीन कायद्यांच्या बंधनात आणि काही वेळा व्यवहारिक पातळीवर त्यांचे हे विचार कालबाह्य वाटण्याचीच जास्त शक्यता आहे. पण पेशंट तर आजही पेशंटच असतो. एक संपूर्ण व्यक्ती असतो. त्याला काही त्रास होत असतो. त्रासाइतकाच काळजी व शंकांनीही तो ग्रासलेला असतो. म्हणून तो डॉक्टरकडे येतो आणि डॉक्टर आपल्याला त्रासातून व काळजीतून मुक्त करेल अशा अपेक्षेनं व विश्वासानं तो येतो. ही वस्तुस्थिती तर कधी कालबाह्य होणार नाही. आणि म्हणून डॉ. फडणीस सरांसारखे मार्गदर्शन करणारे, सहृदय आणि ज्ञानी डॉक्टरच उत्तम आणि 'तज्ज्ञ' डॉक्टर समजले जातील यात शंका नाही.

नवे पुस्तक....



जीवनातील आव्हानांना यशस्वीपणे तोंड देण्यासाठी मनाला नियंत्रित, प्रशिक्षित कसं करावं, याचं शास्त्रशुद्ध मार्गदर्शन.

मनावर विजय

एकनाथ ईश्वरन् अनु. : **वैशाली जोशी**

किंमत :१२५रु. पोस्टेज : २०रु.

जरी एकच पणती मिणमिणती....
मातेच्या मायेनं पदराची पाखर घालून
दक्ष गृहिणी दीपावलीतल्या
लक्ष लक्ष दीपाचं रक्षण करते
आणि आपलं घर प्रकाशमान ठेवते.
या अशाच दक्षतेने आणि मायेनं
आपली जिव्हाळ्याची बँक
आपल्या ठेवींचे रक्षण करते.
श्रमिकांच्या हिताच रक्षण
व्रत भावनेने करणारी
सहकारातील अग्रेसर बँक... !

इचलकरंजी जनता सहकारी बँक लि. इचलकरंजी

प्रभाकर पेंढारकर

चांगल्याकरिता सुधारणा असा आग्रह धरणाऱ्या 'कैझान' व्यवस्थापन पद्धतीचे जपानी प्रवर्तक मसाकी ईमाई

काही मोजक्याच व्यक्ती आपल्या मनावर खोलवर ठसा उमटवतात. तो नेमका कशामुळं - प्रभावी व्यक्तिमत्त्व, रुबाबदार शरीरयष्टी, दिपवणारी बुद्धिमत्ता की त्यामागील आणखीन काही ? नेमकं उत्तर काही सापडत नाही. त्यापैकी कोणतंही वैशिष्ट्य दिसत नसता हे मसाकी इमाई माझ्यावर एवढा परिणाम कसा करून गेले हे मला कोडं आहे. मुंबईच्या इंडियन मर्चंट चेंबरचा हॉल गच्च भरलेला होता. महाराष्ट्रातल्या अनेक यशस्वी संस्थांचे प्रमुख इथं आलेले. त्यांच्या सर्वांच्या चेहऱ्यावर कुतूहल, व्याख्यान ऐकण्याची उत्सुकता.

बरोबर चार वाजता मसाकी इमाई हॉलमध्ये आले. उंची फारतर पाच फूट चार इंच. डोळे अर्धे मिटल्यासारखे, सडपातळ देहयष्टी. नजरेत भरावं असं ह्या व्यक्तिमत्त्वात काही नव्हतं. पण हे गृहस्थ टोयडा जपान, जनरल मोटार्स, अमेरिका, सीमेन्स् जर्मनी अशा जागतिक कीर्तीच्या संस्थांचे सल्लागार. 'कैझान- की टू जपानीज कॉम्पेटेटिव्ह सक्सेस' ह्या लक्षावधी प्रती खपलेल्या अत्यंत यशस्वी पुस्तकाचे लेखक आणि आता चार दिवसांच्या दौऱ्यावर ताजमहाल हॉटेलने बोलावलेले खास तज्ज्ञ.

ओळख करून देण्याचा उपचार संपल्यावर इमाई बोलायला उठले. सर्वांच्याकडे एकवेळ नजर टाकून ते म्हणाले, 'इथं निर्मितीच्या क्षेत्रात आहेत त्यांनी कृपया हात वर करावेत.'

म्हणजे हा तर शाळेचा वर्गच ! बोलणंही शिक्षकानं बोलावं तसं सरळ, सोपं. काहीजणांनी हात वर केले.

मग इमाईंचा दुसरा प्रश्न : 'आता सेवेच्या क्षेत्रात काम करणाऱ्यांनी हात वर करावेत.'

मघापेक्षा जरा कमी हात वर झाले. इमाई सहजतेने म्हणाले, 'ह्या दोन्ही क्षेत्रातल्या माणसांना उपयोगी पडेल अशी एक गोष्ट तुमची परवानगी असेल तर मी तुम्हाल सांगतो. एकदा एक अमेरिकन उद्योगपती जॉन आणि जपानचे यामाहाटा आफ्रिकेच्या जंगलात शिकारीला गेले. त्यांनी आपली जीप एका जागी उभी केली आणि दोघे हाती बंदूका घेऊन बाहेर पडले. ससे, हरणे इसं काही मारता मारता त्यांची काडतुसं संपली, आणि त्यांच्या लक्षात आलं की एक भला मोठा सिंह त्यांच्या रोखानं येतो आहे. दोघांनी पळायला सुरुवात केली. पळता पळता जपानी गृहस्थ थांबले आणि हॅवरसॅकमधून बूट काढून ते घालू लागले.

जॉन थक्कच झाले. ते म्हणाले, 'अरे, हे तू काय करतो आहेस ?'

'हे जपानमधल्या कंपनीने बनवलेले सर्वोत्तम बूट आहेत.'

'पण तू हे करण्यात वेळ घालवलास तर आपल्या जीपपर्यंत कसा पोहोचणार ?'

'जीपपर्यंत कशाला पोहोचायला हवं ? मला तुझ्यापुढं दोन पावलं राहता आलं तर तेवढं पुरे आहे.'

मसाकी इमाई दोन तीन सेकंद थांबले, मग सावकाश म्हणाले, 'ह्या प्रचंड स्पर्धेच्या जगात तुम्ही तुमच्या स्पर्धकापेक्षा दोन पावलं पुढं राहणं हेच महत्त्वाचं आहे. त्याकरिता दोन मार्ग. एक उत्तम गुणवत्ता, दुसरा कमीत कमी निर्मिती खर्च.' 'बेटर क्वॉलिटी लेस कॉस्ट' हा नव्या जगाचा मंत्र आहे.

हे करण्यासाठी नवी मशिनरी, नवे तंत्रज्ञान किंवा अधिक मनुष्यबळ हे तुमचं उत्तर असेल तर ते चूक ते चूक आहे. आहे त्या साधन सामुग्रीचा आणि माणसांचा उत्तम उपयोग हे खरं उत्तर आहे.

त्यानंतर मसाकी इमाई चाळीस एक मिनिटं बोलत होते आणि खरोखरच शाळेतल्या मुलासारखे हे यशस्वी कंपन्यांचे प्रमुख भारून जाऊन ऐकत होते.

ह्या मसाकी इमाईंना मी गेले चार दिवस पाहतो आहे. त्यांना उंची नाही, भाषा ओघवती नाही, भारदस्त व्यक्तिमत्त्व नाही. पण ते बोलायला लागले की असे भारून टाकतात, पण हे केवळ बोलणे नाही. लोकांच्याकडून काम करवून घ्यायला स्वत: पुढं होऊन काम करण्याची धडाडी हवी, नवीन काही करून दाखविण्याची कल्पकता हवी.

मसाकी इमाईंना ताज हॉटेलनं चार दिवसासाठी जपानहून बोलावलं. प्रत्येक दिवसाचे एक लाख रुपये, ताजमध्ये राहण्याची सोय आणि बहुतेक जपानहून येण्याजाण्याचा खर्च. ते येण्यापूर्वी ताज अधिकाऱ्यांच्या प्रतिक्रिया मी निरखत होतो. ''गेली पंधरा.... वीस वर्षे आम्ही हे काम करतो आहोत... आज मुंबईतल्या दुसऱ्या कोणत्याही हॉटेलपेक्षा इथं ग्राहकांची गर्दी... ती इथली सेवा सर्वोत्तम आहे म्हणूनच ना ? मग हे आम्हाला नवीन काय शिकवणार ?... त्यांचा प्रांत टोयाटो मोटार्स, सोनी आणि सिमेन्स ह्या औद्योगिक निर्मितीच्या क्षेत्रातला... हॉटेलचा ह्यांना काय अनुभव ? ''

अशा अपरिचित, काहीशा विरोधी वातावरणात परदेशातून यायचं, तेही फक्त चार दिवसांसाठी, बोलविणाऱ्यांच्या अपेक्षा मोठ्या. त्या पूर्ण करण्याकरिता नवी मशिनरी आणायची नाही, नवीन माणसं भरणी करायची नाहीत ह्या अटी आपण अगोदरच स्वीकारलेल्या. मग हे गृहस्थ काय करणार ? मला मोठं कुतूहल ! त्यांच्यावर एक फिल्म करण्यासाठी ते आल्यापासून मी सतत त्याच्याबरोबर. त्यांच्या कर्तृत्वाबद्दल मी ऐकत होतो. पण प्रत्यक्षात माणूस कसा असेल ह्याची काहीच कल्पना नव्हती. ताजच्या एका हॉटेलमध्ये त्यांचं 'वर्कशॉप' आयोजित केलेलं होतं. त्याकरिता ताजच्या प्रत्येक विभागाच्या दोन अधिकाऱ्यांची निवड केली होती आणि अकाऊंटस् खात्याचे एक वरिष्ठ अधिकारी त्यांच्याबरोबर ठेवले होते. हे सर्व वाट पहात असताना मी मसाकी इमाईंना त्यांच्या खोलीत भेटलो.

''तुम्ही माझ्यावर फिल्म करत आहात, छान ! पण मी हा असा. मेकअप करून मला तुम्ही सुंदर आणि जरा अधिकच उंच करू शकाल का ?''

''मी आज शर्टच घातला आहे. तुम्ही सांगाल तर मी कोट घालेन. एरवी इथं जरा गरमच होतंय, नाही का ?''

इतक्या साधेपणानं आमच्या एक काम करण्याची सुरुवात.

एरवी फिल्मकरिता अनेक मोठ्या व्यक्तींना मी जवळून पाहिलं आहे. आपल्या मोठेपणाचं ओझं संभाळताना ती अवघडून गेलेली असतात. मसाकी इमाई मी सुचवलेला कोट घालून सहजतेने माझ्याबरोबर बाहेर पडले.

वर्कशॉपमध्ये त्यांचा पहिला शब्द ''नमस्कार'' आणि त्यांनी भारतीय पद्धतीनं नमस्कार केला. मग ते इंग्रजीत म्हणाले, ''तुम्ही जे काम गेले काही वर्ष करत आहात ते तुम्हाला माझ्यापेक्षा अधिक चांगले माहित आहे हे मी जाणतो. मग मी तुम्हाला त्यात नवीन काय शिकवणार ? काही थोडे जपानी शब्द सांगणार, आणि तुमच्याकडून मीच बरेच काही शिकणार.''

''आता आपण सुरुवात करू. बसून कोणते काम नीट करता येत नाही म्हणून मी उभा आहे. आपण इथं 'वर्कशॉप'साठी जमलो आहोत. मला इथं 'वर्क' दिसत नाही, आणि 'शॉपही' दिसत नाही. जेथे प्रत्यक्ष काम चालत त्या जागेला जपानी भाषेत गेम्बा म्हणतात. आपण आजचा विषय आहे गेम्बा कैझान. **गेम्बा ही कामाची जागा. कै म्हणजे बदल, सुधारणा. झान म्हणजे चांगल्याकरिता. कामाच्या जागेची, पद्धतीची सतत सुधारणा.** ती ह्या हॉलमध्ये बसून चहा घेता घेता आपल्याला करता येणार नाही. तेव्हा आपण येथून निघू या. कामाच्या जागी जाऊ !'

औपचारिक उद्घाटन, विषयीची प्रस्तावना सर्व काही मोजून पाच मिनिटांत संपलं. आम्ही सगळे ताजच्या पहिल्या मजल्यावर आलो. खाद्यपदार्थ तयार करणाऱ्या विभागात आमच्याबरोबर जनरल मॅनेजर, वरिष्ठ अधिकारी. त्यांना पाहून वेटर्स आणि तेथले सर्वजण चकित झाले. आत गेल्यावर बाजूला दोन मोठी सिंक/ वॉश बेसिन होती. त्यामध्ये बऱ्याच कपबशा धुवायच्या पडलेल्या होत्या. मसाकी इमाईंनी मला बाजूला बोलावलं आणि ते म्हणाले, 'मी आता कोट काढला तर चालेल का ? तुझ्या कंटीन्यूइटीमध्ये काही अडचण येणार नाही ना ?'

त्यांनी कोट काढून ठेवला आणि भराभर कपबशा धुवायला सुरुवात केली.

तेथले वेटर्स एकदम पुढं झाले आणि म्हणाले, 'हे काय ?'

'काय झालं ? मी कपबशा धुतो आहे.'

पुढं आलेल्या त्या विभागाच्या प्रमुखाला त्यांनी विचारलं, 'मला सांगा. याला काय म्हणतात ?'

'सिंक... !'

'मग हे भांडी धुण्यासाठी आहे ना ? ती ठेवण्यासाठी वेगळ्या रॅक्स् इथं आहेत ना ! अशा धुण्याची वाट पाहात कपबशा सिंकमध्ये पडून राहिल्या नाहीत तर तुमच्या खात्यात ज्या कपबशा आहेत त्यांच्या निम्म्यावर काम चालेल, नाही का ?'

आणि आमच्याबरोबर असलेल्या जनरल मॅनेजरकडं वळून ते म्हणाले, 'हे परत घडू नये म्हणून मी एक सुचवू शकतो काय ? येथल्या निदान शंभर कपबशा काढून त्या जेथे अधिक कपबशांची गरज आहे अशा ताजच्या वेगळ्या शाखेकडे पाठवून द्या. आणि हे काम उद्या नाही, आज आत्ताच व्हायला हवं. त्यामुळं अशी सामुग्री निरुपयोगी पडून राहणार नाही. आणि त्यापेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे ग्राहकानं चहा मागितला तर तो दहा मिनिटाऐवजी सात मिनिटांत त्याच्यापर्यंत पोहोचेल.'

आम्ही पहिल्या मजल्यावरच्या एकेक खोल्या पाहात निघालो.

पहिल्याच खोलीत लॉंड्रीतून आलेले कपडे हँगरवर लावून ठेवलेले होते. हे येथल्या कर्मचाऱ्यांचे कपडे. खोलीच्या एका बाजूला मळलेले कपडे नोंद करून लॉंड्रीला देण्याचे काम चाललेले होते.

आता या खोलीत मसाकी इमाई काय

सुधारणा सांगतात ह्याकडे साऱ्यांचे लक्ष लागलेले होते.

इमाईंनी खोलीतून एक चक्कर मारली, ते खिडकीजवळ उभे राहिले आणि म्हणाले, 'येथून समुद्र आणि गेट वे सुरेख दिसतो. ते पहायला परदेशच्या प्रवाशांना आवडेल. लॉंड्रीच्या कामात असलेल्यांना ते पहायला सवड कुठली ?' आणि मग ते जनरल मॅनेजरना म्हणाले,

''ह्या लॉंड्रीच्या मागच्या बाजूला, तळघरात किंवा अन्य कोठे जागा देता येणार नाही का ? ती खोली आजच शोधून काढा आणि ही लॉंड्री तेथे हलवा. प्रवासी इथं राहिले तर रोजचे उत्पन्न आठ हजार, महिन्याचे २ लाख ४० हजार आपण बुडवतो आहोत. ते थांबले पाहिजे - आत्तापासूनच !''

आणि मग सगळ्याकडे वळून ते म्हणाले, 'जपानी भाषेत एक शब्द आहे. मुदा. मुदा म्हणजे विलंब, कोणतीही गोष्ट वाया घालवणं. वेळेचा, साधनांचा योग्य उपयोग न करणं. हा मुदा आपण टाळू या !'

पुढचे चार दिवस असेच गेले.

पाहुणा आला की त्याला नोंद करण्यासाठी काऊंटरवर किती वेळ थांबावं लागतं, ती पाच मिनिटं चार मिनिटं होतील का ? त्यानं चहा आणि टोस्ट मागवला तर तो पंधरा मिनिटांऐवजी दहा मिनिटात त्याच्या खोलीत पोहोचतील का ? अशी क्षणांची, श्रमांची, पैशांची बचत ! हाती घेतलेलं काम पूर्ण झाल्यावाचून तेथून हालायचं नाही हा नियम.

शेवटच्या दिवशी संध्याकाळी एका हॉटेलमध्ये सर्वजण एकत्र आले. मसाकी ईमाई म्हणाले, ''गेले चार दिवस मी बोलतोच आहे. जपानी भाषेत निरोप घेताना म्हणतात -सायोनारा. ते म्हणण्यापूर्वी ह्या वर्कशॉपबद्दल तुमचं काय मत आहे ते मला ऐकायचं आहे.''

हे जपानचे गृहस्थ आम्हाला काय शिकवणार म्हणणाऱ्यांनी हे वर्कशॉप अत्यंत उपयोगी असल्याचे सांगितले. शेवटी अकाऊंटस् अधिकारी म्हणाले, ''प्रथम माझ्या मनात अनेक शंका होत्या. आता त्या दूर झाल्या. मसाकी इमाईंनी सांगितलेल्या सुधारणा आपण केल्या तर दर वर्षाला आपले साठ लाख रुपये वाचतील. म्हणून एका अर्थी आपले उत्पन्न तेवढे वाढेल !''

विमानतळावर जाताना मोटारीत इमाईंनी मला विचारलं, ''तुझी फिल्म कशी झाली ? माझ्यासारख्या माणसाला हिरो करण्याचा मोठा धोका तू पत्करला आहेस म्हणून विचारतो.''

मी म्हणालो, ''तुम्ही चार दिवसात जे बोललात, केलंत ते सर्व मी चित्रित केलं आहे. पण एका गोष्टीचं गूढ काही मला उलगडलं नाही. ते मला सांगाल का ?''

''जरूर !''

''तुम्हाला हे सर्व सुचतं कसं ?''

मसाकी इमाईंनी स्मित केलं. ते म्हणाले, **''ते माझं रहस्य आहे. पण तुला मी सांगतो. मी जेथे कामाला जातो, तेथल्या माणसाबद्दल, त्या जागेबद्दल, त्या कामाबद्दल मला आत्मीयता वाटते. ते घडलं की मला तुमच्या भाषेत 'दिव्य दृष्टी' म्हणतात ती प्राप्त होते. मग सिंकमध्ये पडलेल्या कपबशा धुवायला काय फार मोठ्या बुद्धीची गरज असते ?'**

फक्त चार दिवसांचा सहवास, परत भेटीची शक्यता नाही. तरीही मसाकी इमाई माझ्यावर न विसरता येण्याजोगा परिणाम करून गेले.

प्रभाकर पेंढारकर
२ फुलराणी, साहित्य सहवास,
कलानगर, बांद्रा (पू.)
मुंबई ४०० ०५१
फोन नं. ६५९१३४०९

उत्कर्ष प्रकाशन

उत्कर्ष प्रकाशनची २००२ मधील नवीन पुस्तके

पुस्तक	लेखक	किंमत (रुपये)
ताजतवानं	सुधीर गाडगीळ	१७५
मुद्रा	सुधीर गाडगीळ	१५०
गुंतवणूक करण्यापूर्वी	उज्जवल मराठे	१२०
उत्साहपूर्व	संपादित : सविता भावे	२५०
श्रीरामायण	गो. नी. दाण्डेकर	१५०
महाभारत	गो. नी. दाण्डेकर	२००
भावार्थ ज्ञानेश्वरी	गो. नी. दाण्डेकर	२००
भक्तिमार्गदीप	गो. नी. दाण्डेकर	५०
कुलदैवत, कुळाचार, कुलपुरुष	मंजुळ, अहिरराव	१२५
खजुराहो	प्र. रा. अहिरराव	२००
पंखाएवढे आकाश	डॉ. सुरेश भामरे	१५०
हॉटेल	अनुवाद : अशोक पाध्ये	२५०
अणु रेणु या थोकडा	अनिल दीक्षित	५०
साधकाचा आंतरिक विकास	उषा दातार	१००
जग सुंदर करण्याचा ध्यास	विश्वास वसेकर	६०
योग्यांच्या आत्मकथा	डॉ. रा. का. बर्वे	७५
देवाघरचा पाऊस	रवींद्र पिंगे	१२५

पुस्तकांच्या ऑर्डरसाठी मनिऑर्डर / डी. डी. पाठवा.
पुस्तके आमच्या खर्चाने पाठवू.

उत्कर्ष प्रकाशन उत्कर्ष बुक सर्व्हिस
डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४. फोन-५५३७९५८

डॉ. सुवर्णा दिवेकर

हिंदी मराठी चित्रपटातली अफलातून आखाड सासू

'सबकुछ सीखा हमने
ना सीखी होशियारी,
सच है दुनियावालो
की हम है अनाडी,

'अनाडी' मधले मुकेशचे सूर कानावर आले, की मला आठवण होते मिसेस डिसाची, म्हणजे ललिता पवारांची.

जंगली मधली शम्मीकपूरची करारी आई, रामशास्त्रीमधली आनंदी, प्रोफेसरमधली उतारवयातली प्रेमजोगन, आणि अनेक हिंदी मराठी चित्रपटातील खाष्ट आखाडसासू म्हणजे ललिता पवार. एक अर्धवट मिटलेला बेरकी डोळा आणि सर्वसामान्य रूपसंपदा असलेली ही कलावती शिक्षणानं खरोखरच अनाडी होती. पण अभिनयक्षेत्रात मात्र यशाची शिखरं गाठणारी होती. योगायोगाने त्यांची भेट झाली, आणि एक अफलातून, काहीशी विक्षिप्त, बरीचशी प्रेमळ व्यक्ती मला भेटली.

काळाची आरी साधारणपणे सातआठ वर्षे मागे फिरवू. ललिता पवार आता पुण्यातच औंध या उपनगरात रहायला आल्या आहेत. एवढी बातमी कानावर आली.

माधुरी दीक्षितनं पुण्यात फ्लॅट बुक केला आहे एवढं समजलं तरी अनेक जण शोध मोहिमेवर लागले. ललिताबाईबद्दल असं घडणं शक्य नव्हतं. उतारवयात सोय म्हणून अनेक कलावंत पुण्यात स्थायिक झाले, त्यातल्याच एक एवढीच भावना माझ्यासह सर्वांची होती. ही 'आखाडसासू' कलारंजनसदृश पुरवण्यांतून, फिल्मी मासिकांतून भेटली होती. पण ही कलावती घरगुती रूपात, व्यक्तिरूपात कशी आहे ? ती या व्यवसायात इतक्या जुन्या काळात आली, ती अर्थात पैशांच्या गरजेपोटी हे उघड होतं. पण ही वेळ का आली ? अशी उत्सुकता वाटली.

...मी 'माहेर' मासिकात अनेक वर्ष लेखन करते. ललिताबाईची मुलाखत मिळाली तर माहेर मध्ये यावी, म्हणजे अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचेल हा हेतू होता. माहेरच्या मंगला गोडबोले यांना मी यासंबंधी बोलले. त्या म्हणाल्या, ''मी गेले काही वर्ष माहेरसाठी ललिताबाईची मुलाखत मिळवण्याच्या प्रयत्नात आहे. पण त्या दाद देत नाहीत. मी आत्मचरित्र लिहिणार आहे. तेव्हा माझं जीवन कळेलच. असं म्हणतात. पण मुलाखत मिळाली तर पहा, दिवाळी अंकासाठी तर उत्तमच.'' मी नंतर मग त्या खरंच आत्मचरित्र लिहिताहेत का ? याची बाहेरून चौकशी केली. पण सगळाच आनंद होता ! (बाई, साफ निरक्षर होत्या हे भेटीत समजले.)

इतक्यात अकस्मात एक योग आला. 'ललिता पवार यांना व्ही.शांताराम पुरस्कार' ही हेडलाईन वाचनात आली डिरेक्टरी उघडली, सानेवाडी औंधचा नंबर लगेच मिळाला. म्हणून नंबर फिरवला, स्वत: ललिताबाईच फोनवर (तोच चित्रपटातला आवाज) होत्या. मी माझी ओळख सांगितली. त्यावर त्या म्हणाल्या ''तू पेपरवाली नाहीस ना?'' '' नाही, मी तुमची अगदी घरगुती मुलाखत घेणार आहे. 'माहेर' मासिकासाठी.'' ''मला काय ते मासिकबिसिक कळत नै. पण तू ये.'' ''केव्हा येऊ मग ?'' ''लगेच निघ. मी आहे घरीच. हे बघ, सानेवाडीच्या रिक्षा स्टँडपर्यंत आलीस, की कुणालाही विचार ललिता पवार कुठे राहतात म्हणून, कोणीही सांगेल.'' आवाजात अभिमान आणि यशाचा आनंद होता. मी कोपऱ्यावरून एक छान ग्रीटिंग विकत घेतले आणि आईस्क्रीमचा पॅक.

... सानेवाडी रिक्षा स्टँडवर विचारले तर खरंच रिक्षावाल्याने त्यांचे घर दाखवले. पण रिक्षावाल्यांची आपापसातली नेत्रपल्लवी माझ्या नजरेतून सुटली नाही. एक रिक्षावाला म्हणाला, ''फार कटकटी बाई आहे. पैशापैशावरून हुज्जत घालत बसते. आज काय ते बक्षीस मिळालंय ना त्या सासूला. मजा आहे. लाखभराचं बक्षीस आहे. पण कटकट कमी नाही होणार.'' तेवढ्यात मला माझ्या मैत्रिणीने सांगितलेली हकिगत आठवली. ती सानेवाडीतच राहते, ''आमचा वाणी एकच आहे. साध्या किलोभर तांदुळावरून हुज्जत घालतात. कित्येक वस्तू परत करतात. दुकानदाराशी भांडतात. एक जुनाट गाऊन आणि स्लिपर घालून येतात. त्या दिसल्या तरी दुकानदार वैतागतो '' मला फिल्मफेअरमध्ये वाचलेली गोष्ट स्मरली. ''चित्रपटसृष्टीत सर्वात उत्तम साड्यांचे कलेक्शन ललिता पवार आणि राखी यांचे आहे'' - कालाय तस्मै नम: ।

मी पुढे निघाले. तळमजल्यावर एका बाजूला फ्लॅट होता. मी माझी ओळख सांगितली आणि चक्क वाकून नमस्कार केला. ग्रीटिंग - आईस्क्रीम पॅक हातात ठेवला. गहिवरल्या सुरात माझ्या डोक्यावरून हात फिरवून म्हणाल्या ''शाणी आहे बाई माझी, छान वळण आहे तुला. पण तुझं हे भेटकार्ड तूच दाखव वाचून. मला कुठं वाचता येतंय ? आईस्क्रीम आवडतं मला. मी जेवल्यावर खाते.''

मला आश्चर्य वाटलं. इतक्या भूमिका केलेली बाई, निरक्षर ? मग ती स्क्रिप्ट कशी वाचते ? भूमिकेची तयारी? मुलाखती ? मी हा प्रश्न विचारलाच, ''हे बघ, ते हल्लीचं भूमिकेची तयारी वगैरे आम्हाला काही कळत नाही. आम्ही काही शाळा शिकलो नाही, आमचं काम वेठबिगारासारखं. मुकादमानं म्हटलं, ही इमारत बांध, गेलो त्या कामावर वेठबिगार

म्हणून, उद्या दुसरं बांधकाम म्हणजे सिनेमा निघाला. दुसरं काम मिळालं की तिथं.'' इतक्या सहजवारी अभिनयक्षेत्र घेऊनही बाईनी प्रत्येक चित्रपटात अतिशय समरसून अभिनय केलाय हे आश्चर्य आहे.

ललिताबाईचं घरही एखाद्या मध्यमवर्गीय घरासारखं अतिशय टापटिप होतं. कुठंही भपका नव्हता. तशी कलात्मक अभिरुची नव्हती, इंटिरिअर केलेलं कृत्रिम सुरेख असंही ते घर नव्हतं, टीपॉयवर अर्धवट भरलेले दोनतीन मद्याचे बुधले होते. न विसळता ठेवलेले ग्लासेस होते. खरकट्या बशाही होत्या. बाईंचं लक्ष माझ्याकडे गेलं आणि मला थोडं ऑकवर्ड वाटलं आहे. हे लक्षात येऊन त्या पटकन (सावरून घेत) म्हणाल्या, ''अगं, काल ना इथे शूटिंग होतं, त्यातलंच हे सारं आहे.'' पण माझ्या लक्षात सारं आलं होतं. तिथेच एक मध्यमवयीन गृहस्थ फक्त लुंगी नेसून (नो टॉप) वांबारलेल्या चेहऱ्यानं बसले होते. ते उठून बेडरूममध्ये गेले.

''माझे मिस्टर आहेत. आमच्या लग्नाला पन्नास वर्ष झाली. पण मी मंगळसूत्र घालत नाही. माझा नाही विश्वास '' असं त्या म्हणाल्या. पण वय-वर्ष-काळ यांचा कुठलाही ताळेबंद जुळणारा नव्हता, आणि हे द्वैराशिक सुटणारं नव्हतं. काही दिवसांपूर्वीच मी त्यांचा नातू चित्रपट प्रवेश करणार असल्याचं वाचलं होतं. हे सगळं पाहिल्यावर त्यांची माहेर (सासर ?) ची पार्श्वभूमी विचारणं सोपं नव्हतं. पण त्या म्हणाल्या, ''घरची फार गरिबी, शिक्षण नाही, म्हणून सिनेमात गेले. त्यावेळी आतासारखा पैसा नव्हता की मान नव्हता. 'नटी' म्हटल्यावर भाड्याचं घर सुद्धा नाही मिळायचं. शूटिंगच्या वेळीही काही जामानिमा नसायचा. तुला सांगते, प्रभातच्या डोंगरावर (फिल्म इन्स्टिट्यूटच्या मागची टेकडी असावी त्यांच्या मनात) आम्हीच सगळं सामान घेऊन चढायचो. अगदी स्टोव्ह, भारीचं पीठ, मसाले, कांदे पिशवीत भरून वर न्यायचो. शूटिंग संपलं की आम्ही बायकाच स्टोव्ह पेटवून स्वैपाक करायचो. जेवलो की पुन्हा शूटिंग. शांताराम बापू सुद्धा आमच्यात बसून जेवत.''

एवढं सलग बोलणं झालं, तेवढ्यात काहीतरी आठवण झाल्यासारखं करून त्या बेडरूममध्ये गेल्या. '' थांब, मी येते, बस.'' असं काहीही बोलणं नाही. एक पिशवी आणि पर्स घेऊन आल्या. आणि मी वाण्याकडे जाऊन येते म्हणून तरातरा निघाल्या. मला बसावं की निघावं, काही कळेना. आतल्या खोलीतली उपस्थितीही अस्वस्थ करीत होती. मी अंगणात जाऊन उभी. एवढ्यात त्या परतल्या, पिशवी रिकामीच..

परत मी नेटानं मुलाखत पुढं सरकवायची म्हणून हॉलमध्ये...नेट लावून प्रश्न केला. ''तुमच्या आवडत्या भूमिका कोणत्या ? आणि दिग्दर्शक ?'' त्यावर त्या त्यांचं स्पेशल हास्य करून म्हणाल्या, ''खाष्ट सासूच्या सगळ्या. माझा इतका हातखंडा झाला, की मला काही त्रासच नाही व्हायचा. दिग्दर्शक म्हणशील तर शांतारामबापू. आज बापूंचाच पुरस्कार मला मिळालाय. लाखभर रुपये म्हणजे खूपच नाही का ? आम्ही बापूंच्या सिनेमात काम करायचो. किती कमी पैसे द्यायचे ते !''

त्या भूतकाळात शिरल्या. मला एका गोष्टीचं खूप आश्चर्य वाटत राहिलं, की आजच पुरस्काराची बातमी जाहीर झाली आहे. तरी एकही फोन कसा वाजत नाही ? वार्ताहरांचा, अभिनंदनाचा, चाहत्यांचा, पण वस्तुस्थिती तीच होती खरी. पण आता त्यांचा सलग बोलण्याचा मूड आला. ''मी खूप पैसा मिळवला. पण मला लिहिता नाही येत. वाचता नाही येत. लोकांवर विश्वास टाकत गेले. फसवलं मला अनेकांनी, आयुष्यभर कामं करीत राहिले. पण पैसे नाही राखता आले, लोणावळ्याजवळ एक जमीन घेतली, तीही गेली. खरंच माणसाला शिक्षण हवंच हवं. आजच्या मुली किती हुशार आहेत ! सिनेमातला पैसा नीट राखतात. धोरणानं राहतात.''

पुन्हा माझ्यापुढे अनेक प्रश्न. त्यांच्या कुटुंबातले कोणी नव्हते का मदतीला ? का त्यांना कुटुंबच नाही ? स्नेही सोबतीही कोणी नाहीत ? पैसे संपत आले,तर हा फ्लॅट कुठून घेतला ? बरं, फसगत झाली, त्याचं कारण 'शिक्षणाचा अभाव' हे जरी म्हटलं, तरी माणूस अनुभवातून काहीतरी शिकतोच. शिवाय इतकी वर्ष चंदेरी दुनियेत वावरल्यावर माणसाची थोडीतरी पारख व्हावी की नाही ?अनेक प्रश्न मनात येत राहिले.

ललिताबाईंच्यातली गृहिणी एवढ्यात पुढे आली. ''तू काय घेशील? चहा करू ?'' (नोकर कसा नाही ?) त्या पटकन उठल्या . त्या वयातही हालचाली चपळ होत्या. वार्धक्यानं शरीर झुकलं होतं. पण मनात उमेद होती. त्यांनी पटकन उत्तम चहा केला. बिस्किटं बशीत भरली. तेवढ्यात दूध सांडलं होतं. तर ओटा चकचकीत पुसून काढला. आणि मगच मला चहा दिला. स्वत: घेतलाच नाही, ''मला सर्व नीटनेटकं लागतं बघ. मी सगळी कामं स्वत:च करते. मोलाची माणसं उरकाउरकी करतात. मला नाही पटत. माझ्याकडे एकही कामवाली टिकत नाही. एकजात हरामी.'' (शिवी?)

पुढे मुलाखतीचा ओघ प्रयत्नाने शांतारामबापूंकडे वळवला. तो विषय निघाल्यावर त्या भरभरून बोलतील असे वाटलं. तशा त्या बोलायलाही लागल्या . जयश्रीबाई, संध्याबाईंची आठवण काढली. समकालीन अभिनेत्री - अभिनेत्यांपैकी कोण आवडतं ? याला मात्र 'माधुरी दीक्षित' असं विसंगत उत्तर दिलं. संभाषणाची गाडी निदान अभिनयक्षेत्रावर तरी पोहोचली. इतक्यात त्यांनी विचारलं ''तू पोळ्या कशावर भाजतेस ?'' ''निर्लेपच्या तव्यावर.'' ''तुळशीबागेत मिळतो का तो ? येशील का सोबत ?'' मग त्या तुळशीबागेवरच भरभरून बोलायला लागल्या, ''एकदा मी तिथल्या दुकानात गेले होते. काय झकास आहे तुळशीबाग. मला तिथं सगळ्यांनी वळखलं बरं का. (भाषा थोडी ग्रामीण होती) मी एका दुकानात ग्लासं घेतली. तर दुकानदारानं पैसेच नाही घेतलेन. लोकं फार प्रेम करतात ग ऽ कलाकारांवर.''

मी त्यांना 'अंक पाठवीन' सांगितलं. तर त्या म्हणाल्या, ''मॅट्रिक पास आहेस ना ? (हो!) मग हुशारच आहेस. छानच लिहिशील तू. हल्ली अगदी सरसकट सगळ्याजणी मॅट्रिक होतात. चांगलं चाललंय सगळं. माझ्या काळी असं हवं होतं.'' यांची उच्चशिक्षणाची कल्पना मॅट्रिकवरच थांबली होती. अनाडीपणाची खंत मात्र वारंवार जाणवत होती. ''मग शूटिंग साठी प्रवास कसा करता, वाचायला येत नाही तर ?''त्यावर त्या मोकळ्या हसल्या ''नटीपणाचा फायदा होतो बघ. मी स्टेशनवर गेले की, लोकं ओळखतात मला. कुणीतरी पुढे होतं. मला डबा दाखवतं. अनेकदा चेकरही डब्यापर्यंत येतात. आताच मी उद्या हैद्राबादला शूटिंगला जाणार आहे. शेवटपर्यंत काम करायचं. काम करताना मरण येणं भाग्याचं.''

त्यांच्यातली कर्मयोगिनी आणि जिद्दी स्त्री सदैव टवटवीत असल्याचं मात्र जाणवत होतं. त्यांना झालेला कर्करोग त्यांनाही माहीत होता. पण त्या रोगाला घाबरल्या नव्हत्या (की त्यांना त्याचं भयंकरपण जाणवत नव्हतं ?) बोलताना त्यांनी रामायण सिरीयलमध्ये केलेल्या मंथरेच्या भूमिकेबद्दल सांगितलं. ''मला मंथरा वेगळी

रंगवायची होती. रामायणानं फार अन्याय केलाय मंथरेवर.'' पुढे त्या मंथरेबद्दल इतकं वेगळं, सुसूत्र, छान बोलल्या की, त्यांच्या विचारकुवतीमुळे मी थक्क झाले. कुठेतरी ही स्त्री हुशार, विचारी असलीच पाहिजे, फक्त त्या विचारांना शिक्षणाची झळाळी नव्हती. ही स्त्री अभिनेत्री म्हणून का यशस्वी झाली असावी ? याचे सूत्र उलगडत होते.

मी मासिकासाठी फोटोंची मागणी केली तर त्यांनी मोठा ड्रॉवर उघडला. अनेक सुटे सुटे फोटो 'रंगीत' काळे पांढरे. मी चार फोटो निवडले. त्याच ड्रॉवरमध्ये 'पद्मश्री' चे मानपत्रही होते. (बाईना त्याचे महत्त्व समजलेच नाही?). मला म्हणाल्या, ''हवं तर ते सर्टिफिकेटही मासिकवाल्यांना दाखवायला ने.'' मी म्हटलं, ''नको. त्यांना माहीत आहे तुम्ही 'पद्मश्री' आहात हे. मोठी अभिनेत्री आहात हे. म्हणूनच तर तुमची मुलाखत .''

''मोठेपणाबिण काही नाही. सगळी बाबांची (साई) कृपा. मी आता पिंपरीच्या बाबांच्या मठात चालली आहे. निघालेच मी.'' (मग मला कशाला वेळ दिली ? तरी बरं, बरंच काम झाल होतं.) त्या न सांगताच आत गेल्या. दहाच मिनिटात अतिशय उत्तम पद्धतीने 'तयार'होऊन आल्या. ''माझ्याकडं लोकं नटी म्हणून पाहणार तिथं. गबाळं जाऊन नाही भागणार.'' मला म्हणाल्या, ''तू कुठे राहतेस ? विद्यापीठापर्यंत सोडू का ? गाडी आहे आपली.'' तोवर ते गृहस्थ तयार होऊन आले. मी 'नको' म्हटल्यावर त्या एकदम म्हणाल्या, ''अगं, मी तुला सकाळीच बोलावलं. स्वैपाक करून आलीस? मुलं असतील ना घरात ? माझ्याकडं चपात्या आणि भाजी आहे केलेली. नेतेस का?''

त्यांचं सच्चेपण जाणवलं, तशीच एक गोष्ट जाणवली. ही बाई खरंच फसवली गेली असणार. कारण अद्यापपर्यंत त्यांनी माझे, मासिकाचे नावही विचारले नव्हते. ओळखपत्र तर दूरच. माणसांवर भोळा विश्वास टाकणारी ती अनाडी मिसेस डिसाच होती. खऱ्या आयुष्यातली.

- डॉ. सुवर्णा दिवेकर
८२८ सुखद,भांडारकर रोड,डेक्कन
जिमखाना,पुणे - ४११ ००४.

T BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादीत पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा!

या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!

टी बुक क्लब ११ची नोंदणी चालू!

क्लबचे सभासद व्हा आणि क्लबची पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा!

सभासद फी ५०रु.

टी बुक क्लब ११ मधून प्रकाशित होणारी पुस्तके

१.	द पेलिकन ब्रीफ	जॉन ग्रिशम	अनु. रवींद्र गुर्जर
२.	द गोल्डन गेट	ॲलिस्टर मॅक्लीन	अनु. अशोक पाध्ये
३.	एक्झोडस्	लिऑन युरिस	अनु. बाळ भागवत
४.	सेव्हींग फेथ	डेव्हिड बेल्डासी	अनु. माधव कर्वे
५.	टाईमलाईन	मायकेल क्रायटन	अनु. प्रमोद जोगळेकर
६.	फर्स्ट टू डाय	जेम्स पॅटरसन	अनु. रवींद्र गुर्जर

डॉ. अनुराधा औरंगाबादकर

सरस्वतीचे संस्कार करणारे अनंत अंतरकर

स्वप्नं माणसाच्या डोळ्यात तरळत असतात. स्वप्नं माणसाच्या मनात उमलत असतात.

स्वप्नांची फुलं फुलायची शक्ती माणसाच्या, अंत:करणातल्या आंतरिक उर्मीत असते. स्वभावातल्या जिद्दीत असते. सर्वस्व झोकून काम करण्याच्या वृत्तीत असते. कष्ट उपसण्याची मानसिक तयारी जेवढी मोठी तेवढी स्वप्नांची फुलण्याची शक्ती मोठी असते. मात्र स्वप्नांची फुलं सत्यात अवतरण्यासाठी एवढ्याच गोष्टी पुरेशा नसतात. त्यासाठी हवी असते भविष्यात डोकावून बघता येणारी एक द्रष्टी नजर ! आत्मविश्वासाच्या नजरेत ही नजर मिसळून ज्याला वाटचाल करता येते, त्याच्या स्वप्नांना यशाची फुलं लागतात.

अशी यशाची फुलं माझ्या वडिलांनी - अण्णांनी - अनंत अंतरकर ह्यांनी - वेचली. ही फुलं उमलताना अनेकांनी पाहिली. काहींनी अण्णांच्या ह्या भाग्यवेलीचं कौतुक केलं; त्यांच्याकडे पाहून अण्णा मंदसे हसले. काहींनी द्वेषाचे फुत्कार टाकले, त्यांच्याकडेही पाहून अण्णा असेच मंदसे हसले. अशा जळणाऱ्या नजरांकडे जळजळीत नजरेनं बघण्याचा उर्मटपणा अण्णांनी कधीच केला नाही. आत्मविश्वासातून विकासाकडे वाटचाल करणाऱ्या अण्णांनी अशा दृष्टीच्या लोकांना कधी अपमानितही केलं नाही. एखाद्या माणसावर, दुसरी माणसं जळतात, तेव्हा तो यशस्वी झाल्याचं त्यांनी मनातून मान्यच केलेलं असतं ना ?

अण्णांचं स्वप्न होतं संपादक होण्याचं !

वयाच्या अवघ्या तेराव्या चौदाव्या वर्षी बघितलेलं !

आज अण्णा असते तर त्यांचं वय नव्वद वर्षाचं असतं ! म्हणजे अण्णांनी संपादक होण्याचं स्वप्न पाहिलं तो काळ शहात्तर वर्षांपूर्वीचा होता. देवरूख, चिपळूण अशासारख्या कोकणातल्या, त्याकाळी शिक्षणाच्या फारशा सुविधा नसलेल्या भागात, मराठी शाळेत शिकणाऱ्या अण्णांनी 'विद्या विकास' नावाचं हस्तलिखित काढून ह्या स्वप्नाचा एक डोळा उघडला होता. लहानपणी खाऊसाठी मिळालेल्या पैशातून खेळातला छोटासा प्रेस त्यांनी विकत घेतल्याची आठवण त्यांचे वडील बंधू नेहमी सांगायचे. स्वत: चित्र काढून अंकाच मुखपृष्ठ सजवण्याचा छंद त्यांना त्या वयात लागला होता. एका शिक्षकाच्या पोटी जन्माला आलेल्या अण्णांवर भाषाप्रेमाचे संस्कार त्यांच्या वडिलांनी केले होते. संस्कृत, मराठी काव्य ह्याच बरोबर इंग्रजी

वाचनाची गोडी त्यांना वडिलांनी लावली होती.

मॅट्रिकची परीक्षा द्यायला मुंबईत आलेल्या अण्णांनी पहिली नोकरी धरली ती 'सत्यकथे'च्या कचेरीत ! पांडोबा भागवत संपादक असलेल्या 'सत्यकथे'च्या त्या काळात, १९३६-३७ साली अण्णांनी 'सत्यकथे'ला सुजाण साहित्याचा पहिला स्पर्श दिला, असं आजही श्री.पु.भागवत मनापासून सांगतात. नवीन लेखकांना लिहींत करणं, जुन्या लेखकांना लिहायला लावणं, नवीन साहित्यिक प्रयोग करणं हे सारं 'सत्यकथे'साठी सुरू असतानाच अण्णांचा दुसरा डोळा स्वत:चं मासिक काढण्याचं स्वप्न बघत होता. मात्र हे स्वप्न बघणं हे त्यांच्या स्वप्नाळू वृत्तीचं प्रतीक नव्हतं, तर ते त्यांच्या महत्त्वाकांक्षेचं, त्यांच्या ध्येयाचं प्रतीक होतं. 'मी मासिकं काढू शकतो' हा आत्मविश्वास त्या स्वप्नात भरलेला होता. स्वप्न म्हणजे कल्पनांचा इंद्रधनुषी खेळ ! पण ह्या खेळात अंण्णांनी सत्याचे, वास्तवाचे, प्रतिभेचे, अभिरूचीचे, कलात्मकतेचे, सौंदर्याचे आणि मनोरंजनाचे असे सात रंग भरले. सातरंगांचं हे इंद्रधनुष्य अण्णांनी हाती घ्यायचं ठरवलं तेव्हा व्यवहाराची आर्थिक बाजू त्यांनी तितक्याच डोळसपणे बघितली. पैशाशिवाय स्वप्नांचे रंग शाश्वत रूप घेऊन येणार नाहीत हे ओळखून त्यांनी पैशाची जमवाजमव सुरू केली. त्यासाठी 'सत्यकथे'च्या संपादकीय कामकाजाबरोबर ते 'मौज' ह्या साप्ताहिकाचं आणि 'प्रभात' ह्या दैनिकाचं काम बघू लागले. 'प्रभात' दैनिकाच्या कामासाठी ते सतत रात्रपाही करायचे. 'मौज' साप्ताहिकासाठी ते लेखन करायचे आणि 'सत्यकथे' त नवीन नवीन प्रयोग करून बघायचे. विनोदी मुखपृष्ठाचा प्रयोग अण्णांनी १९३७ साली चित्रकार दलाल ह्यांच्या सहकार्याने करून पाहिला होता.

ह्याचवेळी अनंत काणेकर ह्यांच्या 'आशा' ह्या साप्ताहिकासाठीही ते संपादन सहकार्य करीत होते. आकाशवाणीसाठी लेखन करीत होते.

घरात अगदी जरुरीपुरते पैसे देऊन, मोजके पैसे शिल्लक टाकून अण्णांनी पैशाची जमवाजमव सुरू केली होती.

आणि ह्याच काळात माझा जन्म झाला होता.

अनंत अंतरकरांच्या घरात पहिला पाळणा मुलीचा हलला.

संपादक होण्याची स्वप्नं बघणाऱ्या अण्णांनी ह्या आपल्या पहिल्या लेकीला काव्यालंकारांनी नटवलं. लहान बाळाच्या अंगावर असतात, तसले मनगट्या, वाळे, बिंदल्या अशा प्रकारचे दागिने अण्णांनी घातले नाहीत. त्यांनी कविता केल्या. मुलीचं नाव ठेवलं, 'शैलजा' ! ह्याच नावाचा आधार घेत त्यांनी 'शैलाचा आबा' ह्या टोपणनावानं कविता प्रसिद्ध केल्या.

जन्मत:च मला अण्णांनी सरस्वतीचे दागिने घातले. गोरेगावकर चाळीतल्या अंधाऱ्या घरात मी वाढत होते. माझ्या पाठीवर एक भाऊ जन्माला आला. तो अतिशय अशक्त होता. डॉक्टर्स उपचार करण्यासाठी अण्णांकडे पैसे नव्हते. माझ्या आईच्या डोळ्यातलं पाणी सागरासारखं वाहात होतं. ते पाहून अण्णांनी मालक भागवतांकडे काही पैसे मागितले. त्या काळात नोकराकडे नोकर म्हणून बघण्याची दृष्टी होती. कामगारांचं कल्याण हा हक्क किंवा हे धोरण अस्तित्त्वात नव्हतं. भागवतांनी अण्णांना अतिशय अपमानित शब्दात सांगितलं, - ''मुलगा आजारी आहे एवढंच ना ? हा गेला, तर दुसरा होईल !''

त्या दिवशी अण्णा घरी आले तेव्हा त्यांचे डोळे गुंजेसारखे लाल झाले होते, ही आठवण आजही आईच्या मनात ताजी आहे.

ह्या लाल डोळ्यांनीच अण्णांनी आपली मासिकं काढण्याचा निश्चय पक्का केला. आर्थिक

भागीदारी करण्याचं चित्रकार रघुवीर मुळगावकर ह्यांनी अखेरच्या क्षणी नाकारलं, तेव्हा माझ्या आईनं अंगावरचा एकेक दागिना उतरवून अण्णांच्या हातात ठेवला.

स्वप्नं सत्यात येताना अशी कठोर बनून अवतरतात.

अण्णांनी मला साहित्याची गोडी फार लहान वयात लावली. त्यांनी मला कविता शिकवल्या, गोष्टी सांगितल्या.

आजही मला ते दिवस आठवतात, आणि अण्णांनी मला किती जाणीवपूर्वक वाढवलं ह्याचं अतिशय कौतुक वाटतं. आमच्या घरात दुसरा भाऊ जन्माला आला, तेव्हा पाळण्यातल्या त्याला झोके द्यायला मला अण्णांनी शिकवलं. झोके देता देता कविता म्हणायला शिकवली. भावपूर्ण आवाजात 'बघू आई कुठे माझा नवीन भाऊ' ही कविता ते मला शिकवायचे. ह्या कवितेतली, - 'नाकावर दिला काय म्हशीनं पाय' - ही ओळ आली मी अण्णांना घट्ट बिलगून विचारायची - 'आपल्या गोऱ्या गोऱ्या बाळाला म्हशीनं मारलं ?' अण्णा हसायचे

ही अशी माझी पहिली साहित्यिक शिकवणी सुरू झाली होती. त्याकाळी दारोदारी नंदीबैल यायचे. अण्णांनी मला 'आला बघ नंदीबैल आई जाऊ दे ' - ही कविता शिकवली होती. हा नंदीबैल, त्याच्या अंगावर घातलेली झूल, शिंगांना लावलेले गोंडे हे सारं मला अण्णांनी बैलाच्या जवळ नेऊन दाखवलं होतं. 'सूर्य गेला मावळून, काऊ चिऊ भूर बाई, काऊ चिऊ भूर'- ही कविता अण्णांनी मला कितीदा तरी म्हणून दाखवली होती.

अण्णांनी जवळ बसवून मला कधी, 'शुभं करोती', 'रामरक्षा' असं काही शिकवल्याचं आठवत नाही. कोणतेही धार्मिक संस्कार माझ्यावर केल्याचं माझ्या स्मृतीजाळात नाही पण माझी साहित्याशी सतत जवळीक मात्र अण्णांनी सातत्यानं ठेवली.

अण्णा गोष्टी सांगायचे. त्या गोष्टीही कधी रामायण महाभारतातल्या नसायच्या. आपण वाईट वागलं, तर दुसराही वाईटच वागतो, म्हणून आपण चांगलंच वागावं असा संस्कार करणाऱ्या असायच्या. शिंपी आणि हत्ती , कोल्हा आणि करकोचा, बिरबल आणि बादशहा, ह्यांच्या गोष्टी अण्णा सांगायचे. मी शाळेत जाण्याइतकी मोठी झाले, त्या वयात ऐकलेल्या ह्या कविता, ह्या गोष्टी मी माझ्या मुलीला सांगितल्या. इतकी वर्षे त्या माझ्या आठवणीत आहेत. अण्णा गोष्टीतूनही मला लिहावं कसं, बोलावं कसं, वाचावं कसं हे शिकवत असत. शुद्धलेखनावर अण्णांचा विलक्षण कटाक्ष होता. शुद्धलेखनाचं महत्त्व सांगणाऱ्या गोष्टी त्यांनी मला सांगितल्या होत्या. त्यातली एक गोष्ट माझ्या मनावर खोलवर ठसली ! एका राजाच्या पदरी असलेला प्रधान दुष्ट वृत्तीचा असतो. राजा त्याच्या मुलीचं म्हणजे राजकन्येचं लग्न दुसऱ्या राजाच्या पुत्राशी ठरवतो. तेव्हा प्रधान संतापतो. त्याला त्याच्या पुत्राशी राजकन्येचं लग्न व्हावं असं वाटत असतं. संतापलेला प्रधान एक कारस्थान रचतो. ह्या राजकन्येचं नाव विषया असं असतं. प्रधान एक चिठ्ठी लिहितो. त्यात तो दुष्टपणाचा कळस गाठतो. ज्याच्याशी विषयाचं लग्न ठरलेलं आहे, त्याला विष घालावं अशी आज्ञा त्या चिठ्ठीत त्याला लिहायची असते. तेव्हा तो लिहिताना, - 'विषयाला द्यावे' - असे लिहितो. चिठ्ठी वाचणाऱ्याला वाटतं, विषय राजकन्या ह्याला द्यावी, म्हणून तो तिला त्या राजपुत्राकडे घेऊन जातो. 'विष याला द्यावे' असं लिहायच्या ऐवजी 'विषयाला द्यावे' असं लिहिल्यानं प्रधानाचं कारस्थान फसतं, अशा आशयाची ही गोष्ट होती. शुद्ध लेखनाचं महत्त्व अण्णांनी मला लहान वयात माझ्यावर ठसवलं होतं.

ज्या वयात मुली सागरगोटे खेळायच्या, पेटी वाजवायला शिकायच्या, भरतकाम शिकायच्या त्या वयात अण्णांनी माझ्या हातात पुस्तकाचे गठ्ठे ठेवले होते. शेजारच्या मुलींचे मेहेंदीनं रंगलेले हात पाहून मी मेहेंदी लावायला लागले की अण्णा मला रागवायचे. आठ-दहा वर्षांची मी ! मला ते म्हणायचे, ''हात सुंदर दिसायला मेहेंदी, दागिने कशाला हवेत ? हातून चांगलं काही तरी कर म्हणजे ते सुंदर दिसतील.''

आणि मग ते साने गुरुजींच्या 'गोड गोष्टी' माझ्या हातात द्यायचे. शेजारच्या मुलींना दागिने ठेवायला छोटी पेटी असायची, त्या वयात मला पुस्तकं ठेवायला भलीमोठी पेटी होती. पुस्तकांची पेटी हा माझा खजिना होता. माझ्यासाठी अण्णांनी 'शालापत्रक', 'आनंद' ही मासिकं वर्गणी भरून सुरू केली होती.

अण्णांनी मला एक नवीन खेळ शिकवला होता. आमच्या घराशेजारच्या पिठाच्या गिरणीत कालिदास नावाचा एक गृहस्थ बसलेला असायचा. स्थूल देहयष्टीचा, ओबडधोबड चेहऱ्याचा, शाळीग्रामसारखा काळ्या वर्णाचा हा कालिदास पांढरा कुडता आणि पांढरी टोपी घालायचा. ह्याचया हातात सतत पुस्तकं असल्याचं मी गिरणीत दळण टाकायला गेले की बघायची. ही गोष्ट मी अण्णांना सांगितली होती. तेव्हा कालिदास हा रद्दीवाला आहे हे अण्णांनी मला सांगितलं होतं. त्याचवेळी मॅजेस्टिक सिनेमाच्या दारात, फुटपाथभर पुस्तकं पसरून, ती, एका विशिष्ट आवाजात ओरडून विकणारा एक तरुण मुलगाही मी बघितला होता. हा पुस्तकं विकतो असं अण्णांनी सांगितलं होतं.

ह्या माझ्या बघण्यातून अण्णांनी मला एक खेळ शिकवला होता. हा खेळ मी माझ्या दोन धाकट्या भावंडांबरोबर घरातल्या घरात खेळू शकत होते. घराबाहेर मला फारशा मैत्रिणी नव्हत्या; म्हणजे शेजार पाजारच्या मुली मला त्यांच्यात खेळायला घेतच नव्हत्या. त्या मुली रंगानं गोऱ्यागोऱ्यापान, लांब केसांचा शेपटा घालणाऱ्या होत्या. मी रंगानं काळी, लुकडी होते. शिवाय माझे केस बॉबकट केल्यासारखे अगदी छोटेसे होते. ह्या माझ्या रूपामुळे मी त्यांच्यात 'काळं बदक' होते. त्या मला त्यांच्या खेळात घेत नसत.

मी रूपानं सुमार असले तरी राजहंसासारख्या पक्ष्यासारखे दिसणारे, गोरेपान, उंच नि सुंदर दिसणारे माझे अण्णा मला फार आवडायचे. मी एकटी पडतेय हे ओळखून ते मला वाचायला बसवायचे, गोष्टी सांगायचे. त्यांनी मला 'लायब्ररी लायब्ररी' खेळायचा खेळ शिकवला. पुस्तकांची पेटी उघडायची. त्यातली पुस्तकं चादरीवर पसरायची आणि त्या मॅजेस्टिक सिनेमाजवळच्या मुलासारखी मोठमोठ्या आवाजात, ओरडून विकायची हा माझा उद्योग भावांबरोबर चालायचा. अण्णांनी हा खेळ थोडा उंचावर नेऊन बसवला. त्याला दर्जा दिला. ब्राह्मणसभेत त्यावेळी पुस्तकांची लायब्ररी होती. ती मला अण्णांनी दाखवली. शेजारी गोखरकर लायब्ररी होती. ती मला दाखवली आणि अशी लायब्ररी चालवण्याचा खेळ त्यांनी मला शिकवला. भिंतीला धरून पुस्तकं उभी करायची. त्यांची वहीत नोंद करायची. ती वाचायला दिलेल्याचं नाव लिहायचं असा काहीसा तो खेळ मला कंटाळवाणा वाटायचा. माझे दोन भाऊ वाचक म्हणून लायब्ररीत यायचे. हे आमचं खेळणं असायचं. धाकट्या आनंदचा जीव ह्या खेळात अतिशय रमायचा. मी त्या लायब्ररीयन करून टाकायची आणि मी पुस्तकं वाचत बसणारी वाचक व्हायची. आनंद वहीत पुस्तकांची नावं मोठ्या अक्षरात लिहायचा. वाचक म्हणून शेजारच्या मुलांची नावं लिहायचा. मोठा भाऊ

अशोक दारावर उभा राहायचा आणि मॅजेस्टिक सिनेमाच्या दारावरच्या पठाणाच्या आवाजात, - 'रांगेत या, रांगेत, क्यू में क्यू मे' असं ओरडायचा आईलाही तो ह्या खेळात ओढायचा. तिला 'क्यू, मे, क्यू मे' करत आपली भूमिका चोख बजावायचा. आमचा हा खेळ बघून अण्णांचा ऊर भरून यायचा.

ह्या खेळापेक्षा अण्णांबरोबर पुस्तकांच्या दुकानात फिरायला जाणं मला मनापासून आवडायचं. धोतर नेसलेले अण्णा, अंगातल्या इस्त्रीच्या पांढऱ्या रंगाच्या शर्टवर कोट चढवायचे. चष्मा लावायचे आणि माझा हात धरून मला पुस्तकांच्या दुकानात घेऊन जायचे. 'लाखाणी बुक डेपो', 'बॉम्बे बुक डेपो', 'रामकृष्ण बुक डेपो' ही गिरगावातली पुस्तकांची दुकानं म्हणजे अण्णांसाठी अलिबाबाची गुहाच असायची. एकेका पुस्कावरून त्यांचा हात फिरायला लागला म्हणजे त्यांची नजर, समोर जणू हिरे ठेवलेले आहेत आणि ते आपण बघत आहोत, अशा तऱ्हेनं चमकायची. ती चमकणारी नजर मी बघत असायची.

अण्णा हळूच माझ्या हातावर 'बेबी सरोजा'सारखं साने गुरुजींचं पुस्तक ठेवायचे, तेव्हा माझीही नजर अशीच चमकायची.

आजही माझ्या नजरेला पुस्तकं पडतात, तेव्हा ती अशीच चमचमते ! अण्णांनी केलेला पुस्तकवाचनाचा संस्कार हा दवबिंदूच्या थेंबासारखा विरघळून जाणारा नव्हता. हृदयाचया कोंदणात बसवलेला हा रत्नजडित संस्कार विचाराच्या पेटीत घट्ट बसवला आहे !

डॉ. अनुराधा औरंगाबादकर

स्पर्धा निकाल

जुलै २००२

साहित्य क्षेत्रातील नुकत्याच अस्तंगत झालेल्या दोन दिग्गज विदुषी
दुर्गा भागवत आणि शांता शेळके यांची पुस्तके खालीलप्रमाणे

ऋतुचक्र, कदंब, पैस, पूर्वसंध्या, गोंदण, धूळपाटी, गोधडी, इत्यर्थ, सुवर्णमुद्रा, आंधळी, व्यासपर्व, मेघदूत, डूब, रूपरंग, भावमुद्रा, स्वप्नतरंग, लहानी, वर्षा, पूर्वा, निळादिवा

यशस्वी स्पर्धक

सौ. नंदिनी हंबर्डे - ६ सोनलदर्शन सोसा. गोशाला रोड, मुलुंड पश्चिम, मुंबई - ४०० ०८०
प्रा. क्रांती गोसावी - (मराठी विभाग) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, औंध, पुणे ४११ ००७

यशस्वी स्पर्धकांचे हार्दिक अभिनंदन

शब्दकोडे ऑगस्ट २००२

निकाल

झोंबी, स्वामी, झुंज, झेप, आठवणींचा मोहर, फॅक्टरी गेट, युगंधर, कारगिलनामा, वडवानल, आमार मेयेबेला, गटुळं, द्वंद्व, तहान, काजळमाया, छंद, नवरात्र, दर्पन, सर्जा, नटसम्राट,

या स्पर्धेत एकही स्पर्धक यशस्वी ठरू शकला नाही.

भा. द. खेर

टोकियोच्या विमानतळावर मला भेटलेला एक पार्लेकर

२० सप्टेंबर, १९७६.

सकाळच्या प्रहरी टोकिओचा विमानतळ सूयप्रकाशात न्हाऊन निघत होता. सर्वत्र आनंदीआनंद पसरलेला दिसत होता. 'हिरोशिमा' या कादंबरीचं काम संपवून मी मायदेशी जायला निघालो होतो. सारं काम यशासांग पार पडल्याच्या आनंदात मी प्रवाश्यांच्या रांगेत बसलो होतो.

एवढ्यात एक पुकारा कानी आला, ''अहो पुणेकर, मी पार्लेकर. तुम्हांला नमस्कार करतो.''

मी चमकून आवाजाच्या दिशेनं बघितलं.

एक उंचीपुरी व्यक्ती मला लांबूनच खुणावत होती. म्हणत होती, ''हा मी आलोच. तुम्ही पुणेकर...मी मुंबईकर ! आपण दोघेही मायदेशी जायला निघालो आहोत एकाच विमानानं !''

यावर मी काही बोलणार एवढ्यात मी अजब व्यक्ती माझ्या समोर येऊन उभीही राहिली होती.

हसतमुख मुद्रा ! मुद्रेवर मिष्किल भाव !

माझ्या शेजारी स्थानापन्न झाल्यावर मी त्या गृहस्थाला विचारलं, ''मी पुणेकर आहे हे तुम्ही कसं काय ओळखलंत ?''

''हे काय विचारणं झालं ? अहो, तुम्ही हिरोशिमाला भेट देण्यासाठी जपानचे स्टेट गेस्ट म्हणून इथे आला आहात ही माहिती इथल्या वर्तमानपत्रांनी तुमच्या फोटोसह छापली आहे. मग मी तुम्हांला ओळखणार नाही असं कसं होईल ?''

मी त्यांचं बोलणं थांबवून त्यांना विचारलं, 'बरं, आपण इथे कशासाठी आला होता ते सांगा की!'

'ते काही मोठं ऐकण्यासारखं नाही !'

''आपण पार्ल्याला काय करता ? कुठे राहता ?''

''अहो, तिथल्या लाखो लोकात मी कुठेतरी राहतो. काहीतरी करतो. मी जर कुणी मोठा असतो तर तुमच्याप्रमाणे जपानी वर्तमानपत्रात माझे फोटो छापले नसते का ?''

हा माणूस ताकास सूर लावून देत नाही ही गोष्ट लक्षात आल्यावर मी गप्प बसलो.

काही वेळानं काही विचार करून माझ्या मनात खुटखटणारा प्रश्न मी त्यांना विचारल,

''भारतात जाताना आपल्याबरोबर काय काय नेता येतं ? मी काल आपल्या वकिलातीत जाऊन चौकशी केली. तिथे एक पंजाबी अधिकारी पाय पसरून बसले होते.''

''आरामखुर्चीत बसले असतील.''

मी मान हलवली.

तो गृहस्थ म्हणाला, ''आराम हराम आहे हा पंडित नेहरूंचा संदेश आपल्या भारतीय वकिलातीपर्यंत कधीच पोचलेला नाही. बरं ... काय म्हणाले ते अधिकारी ?''

''म्हणाले की, वाटेल त्या किंमतीचा माल घेऊन जा ! बेशक ! ''

मान हलवून पार्लेकर मनसोक्त हसले. हसता हसता त्याच्या नेत्रातून पाण्याचे थेंब गळले. मग खिशातून हातरुमाल काढून त्यांनी आपले नेत्र टिपले आणि हसूनच म्हणाले, ''आपल्या वकिलातीमधील अधिकाऱ्यानं तसं सांगितलं नसतं तरच नवल ! पण मी तुम्हाला खरी माहिती देतो.''

मग गंभीर मुद्रा करून पार्लेकर म्हणाले, ''आपल्या देशात सध्या आणीबाणी आहे. तेव्हा फक्त पाचशे रुपये किमतीच्या मालापर्यंतच आपल्याला बरोबर नेता येतो.''

मी गंभीर होऊन म्हटलं ,''एवढ्याच किंमतीचा ऐवज नेता येतो ? बापरे !''

''का हो बिचकलात ? तुमच्याजवळ पाच हजार रुपये किमतीचा ऐवज आहे ?''

मी हलक्या आवाजात सांगू लागलो, ''मी जपानच्या रेडिओवर भाषण केलं.''

''माहित आहे मला !''

'त्या भाषणाबद्दल त्यांनी मला सुरेख कॅलक्युलेटर' दिला. त्या भेटवस्तूचीच किंमत साडेसातशे रुपये आहे.'

'म्हणजे पाचशेपेक्षा अडीचशे रुपये जास्त ! नाही नेता येणार ती, भेटवस्तू ! आपल्या सांताक्रूझ विमानतळावर मी जप्त करतील !'

''एवढंच ना ? शिक्षा नाही ना करणार ?''

'आहे, ही शिक्षा काय कमी आहे एखाद्या स्टेट गेस्टला? केवढा कमीपणा आहे? त्यापेक्षा ती शिक्षा समुद्रात बुडवून टाका... म्हणजे तो कॅल्क्युलेटर !''

मी चिंतातुर बनलो.

मग त्या पार्लेकरानं मला आणखी डिवचण्याच्या हेतूनं विचारलं, ''बरोबर काही रक्कम आहे का?''

मी प्रांजळपणानं सांगितलं, ''अमेरिकन डॉलर्स आहेत.''

''किती?''

'असतील आठ - दहा हजार रुपये किमतीचे !'

'वा! चांगलीच कमाई केलीत की स्टेट गेस्ट म्हणून !'

मी सांगितलं, ''मला त्यांनी किरकोळ खर्चासाठी येन दिले होते. त्यातले बरेच येन उरले. शेवटच्या दिवशी जपान फौण्डेशनचे प्रमुख सुझुकी यांना मी ते सारे येन परत करायला लागलो तेव्हा त्यांनी माझ्याकडे कौतुकानं बघितलं आणि असून म्हटलं की, तुमच्यासारखे सरळ, साधे गृहस्थ मी प्रथमच बघतो आहे. कित्येक पाहुणे आणखी पैसे मागून घेतात.पण तुम्ही आम्हाला उरलेले पैसे परत करायला निघाला आहात ! कमाल आहे !''

मी सुझुकींना शंका विचारली, 'तुमचे येन घेऊन मी काय करू ? त्यावर ते म्हणाले की, आम्ही तुम्हाला त्याच्या बदलात अमेरिकन डॉलर्स देऊ. मग तर झालं ! त्यांनी पुन्हा हसून माझं कौतुक केलं!'

पार्लेकर गंभीर पणाचा आव आणून म्हणाले, ''त्यांचं कौतुक तुमच्या अंगाशी येणार आहे त्याचं काय ?''

''म्हणजे ?''

''अहो, एवढी रक्कम नाही नेता येणार !''

''मग आता काय करायचं ?''

'अहो, आमच्या सारख्याला ते डॉलर्स द्यायचे. ठरलेल्या दरापेक्षा कुणीही तुम्हांला दुप्पट रुपये देईल. तुमचा चांगला फायदा होईल.'

'पैशाच्या लोभापायी मी आयुष्यात असे व्यवहार कधी केलेले नाहीत. करणार नाही.'

'मग पाण्यात जाऊ देत हे डॉलर्स !'

'चालेल !'

मी अतिशय अस्वस्थ झालो. मी काही तो कॅलक्युलेटर किंवा हे डॉलर्स चोरलेले नव्हते. मला कसलाच लोभ नव्हता. कायदेशीर मार्गानं जे व्हायचं असेल ते होईल, असं म्हणून मी देवाचं नाव घेत गप्प बसलो.

माझं सारं काम उरकून मी परत मायदेशी आनंदानं निघालो होतो. माझा तो सारा आनंद पार मावळून गेला. कारण पैसा ! आवश्यकतेपेक्षा अधिक पैशानं मला आयुष्यात कधीच आनंद दिलेला नाही ! अत्यंत अस्वस्थ अवस्थेत तो प्रवास पार पडला. कलकत्त्याच्या डमडम विमान तळावर रात्रीचं जेवणही घेतलं नाही. खिशात पैशाची ऊब होती. पण त्या धनाचे चटके बसत होते. ते धन नव्हतं तर ती धग होती.

मुंबईला सांताक्रूझ विमानतळावर तपासणीसाठी रांगेत उभा राहिलो. उरात धडधड होत होती. माझ्या आधीचा क्रमांक होता एका कच्छी वृद्धेचा ! तिची कसून तपासणी चालली असताना माझ्या उरातील धडधड वाढत होती. नंतर माझा क्रमांक आला.

पालेंकर अवचित तिथे आले आणि त्या केरळीयन तपासणी अधिकाऱ्याला म्हणाले , ''हे स्टेट गेस्ट म्हणून जपानला गेले होते. तेव्हा त्यांच्यावर मेहरनजर असावी !''

तो तपासणी अधिकारी त्यांच्याकडे बघत काहीशा नाराजीच्या स्वरात म्हणाला, ''तुम्ही बसता का माझ्या खुर्चीवर लालासाहेब !''

त्या दोघांची चांगली पहेचान दिसली पण हार्दिकता दिसली नाही.

दोन मिनिटात माझी तपासणी झाली आणि मी शिरसलामत बाहेर पडलो.

बाहेर पडताना मी त्या तपासणी अधिकाऱ्याला म्हणालो, ''माझ्याजवळ काही डॉलर्स आहेत. मला त्यांचे रुपये हवेत !''

त्या अधिकाऱ्यानं बाजूच्या बँकेकडे बोट दाखवलं.,

मी बँक ऑफ इंडियाच्या काउंटरजवळ जाऊन उभा राहिलो तेव्हा तिथला अधिकारी डुलक्या घेत होता. पहाटेचे सव्वातीन वाजले होते.

मी टक टक करून त्याला उठवलं तेव्हा त्यानं फक्त प्रश्नार्थक मुद्रा केली. मी त्याला माझं काम सांगितलं तेव्हा तो काहीसा चमकून म्हणाला, ''डॉलर्स मोडायचे आहेत. एका डॉलरचा साडेआठ रुपये एवढाच भाव आहे.''

मी खिशातून डॉलर्स काढले आणि त्याच्यापुढे ठेवले.

त्यानं हिशेब करून माझ्यासमोर रुपयांची बंडलं ठेवली आणि म्हटलं, ''मोजून घ्या.''

एवढे रुपये मी आयुष्यात कधी मोजले नव्हते. मी रुपयांची बंडलं तशीच जोधपुरी कोटाच्या खिशात कोंबली आणि जायला निघालो.

वाटेत पालेंकर उभे होतेच. मला बघून म्हणाले, ''अहो स्टेट गेस्ट, मी तुम्हाला दुप्पट रुपये दिले असते. पैशाचा व्यवहार तुम्हांला नीट करता आला नाही !''

''लालाजी, तो आजवर कधीच करता आला नाही. पुढेही येणार नाही !'

'केसरी' कार्यालयातही सर्वांनी तोच आहेर मला दिला. तो आहेर मी शांतपणानं स्वीकारला.

त्या दिवशी मी स्टेशनवरून सरळ टॅक्सी

करून आनंदनगरात आलो. खिसे भरून पैसे होते. आयुष्यभर पैशाचीच काळजी केली होती. निदान त्या दिवशी ती काळजी मिटत होती.

घरी आल्यावर माझा मुलगा राजेंद्र मला म्हणाला, ''बाबा, माझी सायकल कंडम झाली आहे. मला नवी सायकल हवी !''

आम्ही त्याच दिवशी 'कानुगो सायकल मार्ट' मधे गेलो आणि त्याला हवी ती 'हीरो' सायकल साडेतीनशे रुपयांना खरेदी केली.

मी नेहमीच्या पद्धतीप्रमाणे बसनं घरी आलो. राजेन्द्र सायकल वरून घरी आला.

आमच्या आनंदाला पारावार नव्हता. दुप्पट येणाऱ्या रुपयांचा मोह मात्र मला कधी वाटला नाही.

भा. द. खेर
आनंदनगर, सिंहगड मार्ग
पुणे - ४११ ०५१.

नवी स्पर्धा

उत्तरे पाठवण्याची मुदत १५ डिसेंबर २००२

खालील वाक्ये या अंकातील लेखांमधील आहेत. त्या लेखांची नावे कळवा व बक्षीस मिळवा. बरोबर उत्तर पाठवणाऱ्यांपैकी लॉट टाकून पहिल्या तीन स्पर्धकांना प्रत्येकी शंभर रुपयांची पुस्तके बक्षीस म्हणून पाठवण्यात येतील.

१ दोन मोठ्या व्यक्तींमधले मोठे कोण असा संभ्रम मला पडला.
२ लेखकांची स्वत:ची अनुभूती आणि आसपासच्या परिसरात अनुभवकथन म्हणजे साहित्य होय.
३ जगातल्या साऱ्या श्रेष्ठ लेखकांनी वरपांगी सामान्य दिसणाऱ्या असामान्यत्वाची बीजे दडवली.
४ मिळणारं यश हे स्पर्धेच्या वाटेवरून जातं
५ ते धन नव्हतं तर ती धग होती.
६ समाजात जो बहुसंख्येने असलेला जनसामान्यांचा स्तर असतो. त्याच्याशी समरस झाले पाहिजे.
७ दक्ष गृहिणी दीपावलीतल्या लक्ष लक्ष दीपाच रक्षण करते.
८ ओठावर शांती आणि पोटामध्ये आसक्ती असे आचरण त्यांना कधी जमले नाही.
९ आमचं काम वेठबिगारासारखं मुकादमात म्हटलं ही इमारत बांध गेलो त्या कामावर.
१० स्वप्न सत्यात येताना कठोर बनून अवतरतात.
११मिकी या चित्रपटाची पटकथा त्याने लिहिली.
१२ स्वत: स्वयंभू असताना आचार्य रजनीशांचे शिष्य कसे झाले हे मला समजलं नाही...
१३ विज्ञान या शब्दाला पोलिस अधिकारी बिचकतात.
१४ निसर्गाचे भाव ते जसे टिपत तसाच माणसांच्या सुखदु:खाचा ठाव घेत.
१५ विज्ञान या शब्दाला पोलिस अधिकाशी बिचकतात.

बक्षीस जिंकण्यासाठी मेहता मराठी ग्रंथ जगतचे सभासद असणे आवश्यक.

आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथ जगत,** १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०.

डॉ सुनीती अशोक देशपांडे

नाना तऱ्हा, नाना कळा...

हाताची पाचही बोटं सारखी नसतात, असं म्हणतात. कुणी म्हणतात , की कुटुंबामध्ये डावं-उजवं असायचंच. 'उडदामाजी काळं-गोरं असणारच' हे तर आपल्याला माहीतच आहे. हे एकसारखं नसणं, डावं-उजवं असणं किंवा काळं-गोरं असणं याचा अर्थ पाचांत किंवा चारांत कुणी एक इतरांपेक्षा वेगळा असणं. हा 'वेगळा' इतरांसारखाच प्रकृतीनं बरा असूनही त्याच्या ठायी काही नवी तऱ्हा, काही विचित्र, विक्षिप्त किंवा तऱ्हेवाईक अशा संज्ञा मिळतात.

हाताची सारी बोटं सारखी नसतात, हे खरं - आणि नसावीतही. एक तर हात सुंदर न दिसता फावड्यासारखा दिसेल. कारण वैविध्य, वैचित्र्य याशिवाय कोणतीही निर्मिती, कोणतीही कलाकृती सुंदर, रंजक वाटत नाही. शिवाय, मुलाला भरविण्यासाठी हातात चमचा धरणारी बोटं, चित्रात रंग भरताना कुंचला हातात धरणारी बोटं, आजारी माणसाला बरं करण्यासाठी शस्त्रक्रियेची साधनं 'पकडी'त धरणारी हातांची बोटं - ही सारी लहानमोठ्या मापाचीच असावी लागतात. कदाचित् सृष्टिनियंत्याची तशी योजनाच असेल.

एखाद्या नकारात्मक स्वभाव वैशिष्ट्याचा अगर गुणधर्माचा अतिरेक झाला, की त्याला विक्षिप्तपणा म्हणत असावेत.

पिंडे पिंडे मतिर्भिन्नः, कुण्डे कुण्डे नवं जलः ॥

असं म्हणतात, ते किती योग्य आहे ! घटाघटाचं रूपही वेगळं आणि त्यातील पाणीही निराळं. पण संपूर्णपणे विक्षिप्त, पूर्णतया विचित्र अशी माणसं नसावीत. प्रत्येक माणसामध्ये थोड्याफार प्रमाणात असं 'वैचित्र्य' आढळतंच आढळतं.

आजवरच्या वाटचालीत, नेहमीपेक्षा थोड्याशा 'वेगळ्या वाटेनं' जाताना वेगवेगळ्या प्रसंगांत तऱ्हेतऱ्हेचे अनुभव आले. त्यांची ही थोडीशी 'जगावेगळी वाटणारी' शिदोरी.

ज्या संस्थेत आम्ही शिकत होतो, त्या संस्थेतील एक उच्च पदाधिकारी 'विक्षिप्त' म्हणून चक्रम लोकांनीही नावाजलेले. सततचे आकर्षण - छोट्या-मोठ्या आहाराचे. त्यापूर्वी चेहऱ्यावर असे काही चमत्कारिक भाव, की कुठून या माणसाकडे यायची वेळ आली, असे आपल्याला वाटावे. एखाद्या अर्जावर सही घेण्यासाठी जायचे, तर त्यांच्या खाण्याचे वेळापत्रक ठाऊक असायला हवे. पस्तीसवेळा सहीसाठी नाकारलेला अर्ज असावा. छत्तीसाव्या वेळी त्यांच्या जेवणानंतर घेऊन जा. सही तर करतीलच, पण त्यापूर्वी बसायला जागा देऊन, ''तुम्ही कोण ? कुठले ?'' - एवढी चौकशीही आस्थेनं करतील.

'विक्षिप्त' माणसांत जरूर नोंद करावी, असा माझा पेपरवाला आहे. अनुवादित रशियन कथा मराठी वृत्तपत्रांत छापून येण्यास सुरुवात झाली, तेव्हा एक दिवस मुद्दाम थांबवून मी त्याला समजावून सांगितले, की इथून पुढे (कथांचा क्रम दीर्घकालीन होता) दर रविवारी ----- या पेपरच्या दहा प्रती हव्यात. पाच प्रती स्वतःसाठी व राहिलेल्या पाच - मुंबई व मॉस्को येथील ऑफिसेससाठी. प्रथमतः पेपरवाल्याला अशी सूचना दिली, तेव्हा काही वेळाने तो आपल्या मालकाना घेऊन भेटायला आला. 'नक्की काय प्रकार आहे?' हे पाहण्यासाठी. त्यानंतर त्या दोघांचे काय बोलणे झाले, ते माहीत नाही. पण त्या पुढच्या रविवारी व नंतरही त्याने मला 'वेगवेगळे दहा पेपर्स' आणून दिले व तसाच रतीब चालू ठेवला. मी त्वरेनं त्याचं दुकान हुडकून काढलं व पेपर पूर्णपणे बंद केला. दुसऱ्या दोन पेपरवाल्यांनी असे दहा-दहा पेपर्स टाकण्यास नकार दिला. कारण माहीत नाही. कदाचित, एव्हाना 'बऱ्यापेकी विक्षिप्त' म्हणून माझीच प्रसिद्धी झालेली असावी. ठरवलं इथून पुढं प्रत्येक वेळेस पेपर आणण्यासाठी स्वतःच जायचं. कितीही त्रास झाला तरी व जेवढ्या एका कामासाठी रविवारी बाहेर पडावं लागलं, तरीही. एका रविवारी फक्त वर्तमानपत्रासाठी बाहेर पडले.

पेपरस्टॉल,

'' 'महाराष्ट्र टाइम्स द्या.''

त्वरित प्रश्न उभा.

''किती ?''

आता काय उत्तर देणार ?

सांस्कृतिक कार्यक्रम. आमच्या अभ्यासक्रमाचाच एक अविभाज्य भाग. या कार्यक्रमाच्या असंख्य रंगीत तालमी. या कार्यक्रमांचा उद्देश - बहुरंगी करमणुकीचा. ती नक्की कोणाची होते, हा मुद्दा निराळा. पण शिक्षकाच्या डोळ्यांपुढे रोज रंगीत तारे दिसतात, हे मात्र नक्की. भेटणं म्हणजे चहा-पिणं आलं आणि ओघानंच खाणं ही. त्याबाबतीत विद्यार्थीवर्गाचा उत्साह शिक्षकाच्या उत्साहाइतकाच जबरदस्त असतो. प्रत्येकजण एक-एक पदार्थ वाटून घेतो आणि ठरल्याप्रमाणे त्या दिवशी घेऊन येतो. अशा वेळेस जबाबदार आणि वक्तशीर विद्यार्थ्यांवरच अशी कामे सोपवावी लागतात. कारण काही महाभाग असे आहेत, की ते हमखास उशीरा तरी येतील किंवा काही पूर्वसूचना न देता गैरहजर तरी राहतील. त्यामुळे अशा माणसांना फक्त पाहुणे म्हणून बोलावणे - हेच योग्य असतं. तरीही एका रंगीत तालमीच्या वेळेस एका विद्यार्थ्यावर कोणतीही मदार न टाकता त्याला आम्ही सांगितलं : ''तुम्ही सात वाजता या. जमेल ते आणा. न जमल्यास फक्त स्वतःला आणा, पण या. कारण तुमचे नाटकातील काम छोटेसे असले, तरी महत्त्वाचे आहे.'' पण त्याने स्वतः फारच हट्ट धरला, म्हणून त्याला कोणतीही चटणी आणायला सांगितले.

तालमीनंतर चहापान सुरू झाले. बशा-चमचे मांडले गेले. काही तरी कमी आहे, हे जाणवत होते, पण भुकेपुढे व थकव्यापुढे ते दुय्यम ठरले. अखेर पावणेनऊ वाजले. आम्ही परत जाण्यासाठी दरवाजा बंद करणार, एवढ्यात हा मुलगा टोमॅटो - सॉसची बाटली घेऊन हजर. काय करावे ? रागवावे की स्वतः रडावे! काहीही न करावे, हेच उत्तम, आम्हा सर्वांची नजरानजर झाली. मागे फिरलो. खास

त्याच्यासाठी खाणे मागवले. तो तृप्त झाल्यावर त्याच्याच चेहऱ्यावरील प्रश्न अस्वस्थ करू लागला.

''माझं काय चुकलं?''

आमचंच चुकलं होतं. हे माहीत असूनही दुसऱ्या वेळेस नाईलाजानं याच विद्यार्थ्यावर 'कोळ्याचा पोषाख' आणण्याची जबाबदारी सोपवली. कारण त्याच्या घराजवळच तसा पोषाख मिळण्याची सोय होती. नाटक स्पर्धेत आम्ही भाग घेतला होता.

नाटक संपलं. आम्ही जो कोळ्याचा पोषाख ऐनवेळेस तयार केला, तो घालून नाटक पार पाडले. बक्षीसही मिळाले. परत जाताना आम्हाला हा विद्यार्थी बस-स्टॉपवर भेटला. आम्हाला सामोरा. काहीही न बोलता त्याने आपण आणलेल्या कोळ्याच्या पोषाखाचे पुडके पुढे केले.....

याउलट, वेळेचे फार बंधन स्वत: पाळणाऱ्या व इतरांना जराही समजून न घेणाऱ्या एका शिक्षकाची आमची गाठ पडली. बऱ्याच भारतीय माणसांना वेळेची किंमत नसते, असं म्हणतात. मान्य. पण कधीकधी हा उशीर हेतुपुरस्सर नसतो. कधी वाहतूक, पाऊस यांमुळेही उशीर होऊ शकतो. पण हे या शिक्षकांना कधी पटायचं नाही. तास सुरू होण्यापूर्वी १५ मिनिटे खोलीत येऊन बसतील. चार वाजता तासाची वेळ ठरलेली असली, तर फक्त चार वाजून दहा मिनिटे होईपर्यंतच वाट पहातील. त्यानंतर लगेच खोलीला कुलूप घालून शिक्षक घरची वाट पकडायचे.

एकदा त्यांनी आपल्या घरी एका भारतीय कुटुंबाला भोजनाचे निमंत्रण दिले. त्या कुटुंबात एक लहान मूल होते. म्हणून त्यांना येण्यास केवळ पाच मिनिटे वेळ झाला. येऊन पोचतात, तोपर्यंत हे 'यजमान शिक्षक' घराला कुलूप लावून मुलाबाळांसकट बागेत फिरायला निघून गेलेले होते.

बोलताना नेमके बोलावे. शब्द मोजके निवडावेत. उदा. ''जवळच आहे. अगदी चार पावलांवर आहे किंवा दोन मिनिटांच्याच अंतरावर आहे'' असे चुकूनही म्हणू नये, नाहीतर चुकून एखाद्या 'चुकीची दुरुस्ती' करण्याचा जाचक छंद असलेल्या माणसाशी गाठ पडली तर ?

माझी अशा एका प्राध्यापकाशी गाठ पडली. 'ठकाठका' म्हणा हवं तर, कारण आमचे विभाग भिन्न असूनही बऱ्याच जणांकडून त्यांच्याविषयी खूप कथा ऐकल्यानंतर मी स्वत: त्यांच्या विक्षिप्तपणाचा अनुभव घेतला. कुणी त्यांची विद्यार्थिनी आली. ''आपण कोण ?''

''मी--- आपली जुनी विद्यार्थिनी.''

''जुनी नाही, माजी म्हणा. वस्तू जुनी होते, माणूस नाही.'' त्यांच्या केबिनमध्ये आम्ही बसलो असतातच कुणी म्हणालं,

''छे, छे. काल पावसामुळे सगळा दिवस वाया...''

तेवढ्यात ''सगळा दिवस नाही. निम्मा सुद्धा नाही. कारण पाऊस संध्याकाळी उशीरा पडला'' - हा चुका-दुरुस्तीचा 'सक्तीचा पाऊस' त्या व्यक्तीला सहन करावा लागला.''

मला नवल वाटले. माणूस, तोही एवढा वयस्क, जराही न थकता सतत अशा दुरुस्त्या सुचवत राहतो, अं ? मीही वरचेवर त्यांच्या तासांसाठी जाऊ लागले. केवळ उत्सुकतेपोटी.

* दिलेले काम कुणी वेळेत पूर्ण करू शकले नाही, त्याची शहानिशा एक दिवस चालली होती.

''सर, या वेळेस माफ करा. मी काल लिहिण्यासाठी बसलो होतोच. पण पाहुण्यांमुळे व्यत्यय आला.''

''व्यत्यय? पाहुण्यांमुळे ? तो कसा काय ?''

''सर, आयत्यावेळी पाहुणे येऊन बसले.''

''येऊन बसले? आले म्हणा. ते येण्यापूर्वी, तुम्ही दार उघडून त्यांना आत घेण्यापूर्वी ते येऊन कसे बसतील ?''

* एक दिवस त्यांच्या तासाला रशियन - इंग्रजी भाषांतर चालू होते.

''मला हा पोषाख परत करायचा आहे, कारण पाणी लागताच सगळ्या कपड्याचा रंग.....

''मूळ प्रत नीट तपासून बघा. सगळ्या कपड्याचा रंग की कपड्याचा सगळा रंग गेला...''

याच प्राध्यापकांनी ''भाषांतर कसे असावे व कसे नसावे ?'' याविषयी एक अप्रतिम परिसंवाद घडवून आणला. त्यानंतर 'आभाराचे गोड काम' करण्यासाठी एक सहकारी उभे राहिले. चेहऱ्यावर धास्ती होतीच, न जागो, कुठे चूक हुडकतील, काही नेम नाही या माणसाचा.

''आज प्रा---- यांच्यामुळेच हा कार्यक्रम...

''यांच्यामुळे' नाही--- यांनी मदत केल्यामुळेच- म्हणा. कारण 'यांच्यामुळे' नंतर नकारात्मक शब्द व अर्थ अभिप्रेत असतो.

''अरे देवा ! काय हा दुरुस्तीचा हव्यास ! अशा माणसाशी कधी न बोललेलंच बरं !''

एक स्नेही होते. तेही परदेशी पाहुणे. भारतातील एका विख्यात कंपनीने करार करून 'सल्लागार' म्हणून बोलवले होते. 'दुभाषी' या नात्याने त्यांची प्रथम ओळख झाली. हळूहळू आमचे सर्व विद्यार्थीही त्यांच्या माहितीचे झाले. आम्ही सणासमारंभासाठी एकत्र येत असू. सर्व मिळून भेटवस्तूंची देवाणघेवाणही करत असू. हळूहळू माझ्या ध्यानात आले, की प्रत्येक वेळेस ती-ती वस्तू आम्ही कोणत्या दुकानातून आणली, याची चौकशी हे गृहस्थ न चुकता करत असत . वाटलं, यांना अशाच आणखी वस्तू आपले कुटुंबीय, मित्र यांच्यासाठी खरेदी करायच्या असतील. आमचे दुकानही एक ठराविकच होते.म्हणून आम्ही सरळ मनाने दुकानाचे, ठावठिकाणाही सांगून टाकला. एकदा तो दुकानदार आम्हाला भेटला. त्यानं जी माहिती दिली, ती ऐकून आम्ही थक्क झालो. हे परदेशी गृहस्थ आम्ही दिलेली प्रत्येक वस्तू त्या दुकानात नेऊन परत करत असत, व त्याऐवजी दुसरी वस्तू घेत असत. इथपर्यंत ठीक आहे. पण पुन:पुन: दुकानात जाऊन पूर्वी परत केलेल्या वस्तू पुन: नव्यानं खरेदी करत असत...

तेव्हा अशा या नाना तऱ्हा आणि नाना परी. लक्ष देऊन विचार केला, तर गंभीर बाब आणि दुर्लक्ष केल्यास केवळ करमणूक. स्वाभाविकतेच्या मर्यादा ओलांडून त्यापलीकडचा अनुभव आल्यास त्याची नकळत नोंद होतेच.

नेहमी प्रश्न असा पडतो, की आपण असे जगावेगळे आहोत, विक्षिप्त आहोत, आपल्या योग्य चालण्याबोलण्याची ग्वाही कुणी देऊ शकत नाही, हे या माणसांना समजत असतं का ? उत्तर देणं कठीण आहे.

पण आपण आपल्या प्रतिक्रियेतून, वागण्यातून, आपली त्याच्याकडे पाहण्याची 'नजर' वेगळी अथवा उपहासाची आहे, हे त्याला जाणवून देता कामा नये. अशा माणसांच्या वागणुकीचा आपल्यावर होणे महत्त्वाचे आहे का ? नाही. तसे झाले, तर आपण मनाने कमकुवत आहोत, असे समजावे. अशा अनुभवांतून आपण काय शिकतो, ते महत्त्वाचे. अति सर्वत्र वर्जयेत. कोणत्याही उक्तीत व कृतीत मर्यादा पाळणे जरुरीचे आहे. म्हणजे प्रत्येक कुण्डातील 'जल' नवे जरी असले, तरी ते सर्वांना पथ्यकर आणि हितकर ठरेल.

डॉ. सुनीती अशोक देशपांडे
कल्चरल सेंटर ऑफ रशिया,
मुंबई

स्टार योजना

दीपावली म्हणजे दीपपूजा. प्रकाशपूजा. प्रकाश असतो अंत:करणातील उदात्ततेचा, ज्ञानाचा. या सणाच्या निमित्ताने भ्रष्टाचार, दुराचार, दुष्प्रवृत्ती, अज्ञानाचा अंध:कार दूर करून राष्ट्राभिमान, तेज व ज्ञानाचा प्रकाश उजळून निघावा. या प्रकाशपूजेसाठी आवश्यकता आहे ज्ञानयज्ञाची! ज्ञानयज्ञासाठी हव्यात पुस्तकरूपी समिधा! यासाठी आम्ही नेहमीच सज्ज आहोत. या दीपावलीनिमित्त ज्ञान वाढवणारी वेगवेगळ्या विषयांवरील पुस्तके खास आपल्यासाठी भरपूर सवलतीत उपलब्ध.

आपण स्वत: पुस्तके घ्या, मित्रांना भेट द्या आणि आपला आनंद द्विगुणित करा.

खास दीपावलीनिमित्त एक आकर्षक योजना- स्टार योजना

सिल्व्हर स्टार गट - या योजनेत कमीत कमी ५०० रुपयांची खरेदी करणाऱ्या ग्राहकाला २०० रूपयांची पुस्तके मोफत !

गोल्डन स्टार गट - १००० रुपयांची खरेदी करणाऱ्या ग्राहकाला ४५० रूपयांची पुस्तके मोफत !

डायमंड स्टार गट - २००० रूपयांची खरेदी करणाऱ्या ग्राहकाला १००० रूपयांची पुस्तके मोफत !

मुदत फक्त ३१ जानेवारी २००३ पर्यंत

मोफत पुस्तके फक्त स्टॉक असेपर्यंतच!

मोफत पुस्तकांची यादी

पुस्तकाचे नाव	लेखक	किंमत (रु.)
माझा गाव	रणजित देसाई	१५०
प्रतिक्षा	रणजित देसाई	८०
शेकरा	रणजित देसाई	६०
लक्ष्यवेध	रणजित देसाई	८०
मोरपंखी सावल्या	रणजित देसाई	६०
कातळ	रणजित देसाई	९०
प्रपात	रणजित देसाई	९०
संचित	रणजित देसाई	६०

गडकरी : व्यक्ती आणि वाङ्मय	वि. स. खांडेकर	२००
वामन मल्हार जोशी : व्यक्ती विचार	वि. स. खांडेकर	८०
आगरकर : व्यक्ती आणि विचार	वि. स. खांडेकर	८०
पाकळ्या	वि. स. खांडेकर	७०
दवबिंदू	वि. स. खांडेकर	६०
झीमझीम	वि. स. खांडेकर	५५
प्रीतीचा शोध	वि. स. खांडेकर	१५०
घरट्याबाहेर	वि. स. खांडेकर	८०
प्रसाद	वि. स. खांडेकर	१४०
भूमिकन्या	आनंद यादव	९०
झाडवाटा	आनंद यादव	९०
सैनिक हो, तुमच्यासाठी	आनंद यादव	२०
स्पर्शकमळे	आनंद यादव	१००
निसर्गपुत्र	अनु.निरंजन घाटे	८०
वेध पर्यावरणाचा	निरंजन घाटे	१५०
आरोग्य वेध	निरंजन घाटे	४५
शरीर वेध	निरंजन घाटे	४५
ज्ञानदीप	निरंजन घाटे	७०
आत्मवेध (विज्ञान)	निरंजन घाटे	१२०
खेळ आणि विज्ञान	निरंजन घाटे	४०
तंत्रज्ञानाचे विश्व		
माहिती प्रसार साधने,		
दळणवळण/वाहतूक	निरंजन घाटे	२०
संगणक, यंत्रमानव	निरंजन घाटे	२०
मानवी युद्धसाधने, लेझर्स	निरंजन घाटे	२०
एक एक पाऊल	अनु. भारती पांडे	८०
एडविना आणि नेहरू : कॅथरन क्लेमंट	वि. स. वाळिंबे	२५
कथा ही दिवावादळाची	वि. स. वाळिंबे	१००
जयहिंद आझाद हिंद	वि. स. वाळिंबे	१००
आज इथे : उद्या तिथे	वि. स. वाळिंबे	४५
फेरा (तसलिमा नासरिन)	अनु. मृणालिनी गडकरी	७०
निर्वाचित कलाम (तसलिमा नसरिन)	अनु. मृणालिनी गडकरी	१५०
आंधळ्याचे डोळे : नॉर्मन कुझिन्स	अनु. शान्ता शेळके	१५०
पावसाआधीचा पाऊस	शान्ता शेळके	९०
निमित्तानिमित्ताने: राजीव गांधी	अनु. शान्ता शेळके	७०
संस्मरणे	शान्ता शेळके	८०

रंगरेषा	शान्ता शेळके	८०
परिशोध : एस. एल. भैरप्पा	अनु. उमा कुलकर्णी	१००
चिदंबर रहस्य : के.पी. पूर्णचंद्र तेजस्वी	अनु. उमा कुलकर्णी	१२५
मायामृग : के.पी.पूर्णचंद्र तेजस्वी	अनु. उमा कुलकर्णी	१००
तंतू : एस. एल. भैरप्पा	अनु. उमा कुलकर्णी	४५०
नियती	माधवी देसाई	६०
शुक्रचांदणी	माधवी देसाई	१००
अणसार : वर्षा अडालजा	अनु. अजनी नरवणे	१८०
सागरतीरी : ध्रुव भट	अनु. अजनी नरवणे	८०
वडवाई	अजनी नरवणे	२००
गहाण पडलेली टेकडी : मारिया श्रेस	अनु.अजनी नरवणे	१२०
आजचा मेनू	रिमल चंगेडे	११०
खाना-खजाना	अंजनी नरवणे	१००
ड्रिंक्स व कॉकटेल्स	डॉ. जयंत नरवणे	१२५
द लास्ट डॉन : मारिओ पुझो	अनु. अनिल काळे	३५०
डॉ.झिवागो : बोरिस पास्तरनाक	अनु. आशा कर्दळे	२५०
द सिस्टरहुड : कॉलिन फोर्बस्	अनु. अंजनी नरवणे	२५०
३००१ द फायनल ओडिसी : आर्थर सी. क्लार्क	अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर	१६०
साक्षी : सरला बार्नबस	अनु. स. वा. मुळे	१९०
डिस्क्लोजर : मायकेल क्रायटन	अनु. माधव कर्वे	२२०
द टर्मिनल मॅन : मायकेल क्रायटन	अनु. अरुण मांडे	१२०
काँगो : मायकेल क्रायटन	अनु. अरुण मांडे	१६०
इलाटाज् डायरी : इलाटा फिलीपोविक	अनु. ज्ञानदा नाईक	८०
एकदाच अशी रात्र येते : रॉजर डॉनलॉन	अनु. रॉय किणीकर	७०
अ टेल ऑफ टू सिटीज : चार्ल्स डिकन्स	अनु. विद्याधर पुंडलिक	२७०
कोमा : रॉबिन कुक	अनु. रवींद्र गुर्जर	९०
संस्कार : यू. आर. अनंतमूर्ती	अनु. रं. शा. लोकापूर/ वि. ग. कानिटकर	८०
मंदिरा : सुनील गंगोपाध्याय	अनु. तारा पंडित	१२५
सुंदरबनच्या जंगलात : शिवशंकर मित्र	अनु. तारा पंडित	६०
हितगुज : संपा. कॅरेन पेन	अनु. वृन्दा दाभोळकर	२००
टोकियोच्या नभांगणातील चमकत्या तारका (पाच आधुनिक तरुणी) : फिलिस् बर्नबॉम	अनु. सुधा नरवणे	१८०
मुंबई... मुंबई! : विक्रम चंद्र	अनु. नारायण आवटी	१५०
झुंज कॅन्सरशी!	अनु. द. कृ. गोसावी	६०

द्वंद्व : विजयदान देथा	अनु. वनिता सावंत	१५०
चिनी अक्षर साहित्य	अनु. रंगा मराठे	१००
शिदोरी	व. ह. पिटके	५०
सेंट्रल बस स्टेशन	वसंत फेणे	१००
दिग्विजय (नेपोलियन बोनापार्ट)	भा. द. खेर/राजेंद्र खेर	४००
रोदँ	शांताराम पारपिल्लेवार	२९०
संचित	मनोहर शहाणे	५०
चितेवरच्या कळ्या	वसंत गायकवाड	१३०
फॅक्टरी गेट	रंगा मराठे	१५०
मूल	संजोग वीरकर	९०
काशभट	मंगेश पदकी	७०
प्रवाहातील तारु	सु. वि. सुंठणकर	१२५
गाजव्यथा	एम्. डी. लहानकर	१००
इथे फुलांना मरण जन्मता	द.ता.भोसले	८०
शापित राजहंस	अनंत तिबीले	२५०
अंधाराचे वारसदार	दादासाहेब मोरे	१००
काट्यावरची पोटं	उत्तम बंडु तुपे	१००
मुक्तिशोध-यात्रा	डॉ. राजेंद्र प्रभुणे	१७०
दक्षिणरंग	मीना प्रभु	२५०
पैलू	विजय कुवळेकर	१४०
शेलका साज	शिवाजी सावंत	१२०
कांचनकण	शिवाजी सावंत	७०
मद्य नव्हे, हे मंतरलेले पाणी	संपा. अरुण शेवते	१२०
आठवणींचा मोहर	राजाभाऊ गवांदे	१६०
उद्याच्या सुंदर दिवसासाठी	नागनाथ कोत्तापल्ले	१००
अवती भवती	वसुधा पाटील	१२०
शोध सुखाचा	संजीवनी वाडेकर	८०
युगंधर श्रीकृष्ण : एक चिंतन	शिवाजी सावंत	६०
एकला चलो रे	दया पवार	५०
हिमकोंदणातील हिरा	सूर्यकांत कुलकर्णी	८०
आय्. सी. ८१४ अपहरणाचे १७३ तास	अनु. लीना सोहोनी	१२०
कारगिलनामा	अनु.नारायण आवटी	१६०
शिलंगणाचं सोनं	कुमार केतकर	२५०
नागरिक	अविनाश धर्माधिकारी	१५०
भारतीय राजकारणातील गुन्हेगारी व भ्रष्टाचार : निर्मल कुमार सिंग	अनु. माधव मोर्डेकर	२००

ख्यातनाम इतिहासकार : अरूण शौरी	अनु. सुधा नरवणे	१५०
बिग इगोज,स्मॉल मेन : राम जेठमलानी	अनु. माधव मोर्डेकर	८०
शतदा प्रेम करावे	अरुण दाते	१२५
व्यथित मनानं सांगावसं		
वाटतं की... : टी. एन. शेषन	अनु. भारती पांडे	१००
डायाना आणि चार्ल्स	मीना प्रभु	१३०
सेक्स, स्कॉच, अँड		
स्कॉलरशिप : खुशवंतसिंग	अनु. अनिल किणीकर	१२५
प्रवाहातील पक्षी	निलू गव्हाणकर	७५
मोरावळा	शिवाजी सावंत	६०
बोन्साय	आ. बा. पाटील	७५
अज्ञाताचे विज्ञान (विज्ञान)	सुरेशचंद्र नाडकर्णी	१३०
व्हर्च्युअल रिॲलिटी (विज्ञान)	डॉ. बाळ फोंडके	१५०
रिवणावायली मुंगी	राजन गवस	१३०
कावळे आणि माणसं	उत्तम कांबळे	१००
शिवार	विजय कुवळेकर	१००
झोका	अच्युत बर्वे	१००
उत्तरार्ध	विजया राजाध्यक्ष	१३०
मनस्विनी	द. ता. भोसले	१२०
खसखशीचा मळा	द. ता. भोसले	७५
मुळे आणि पाळे	वसंत नरहर फेणे	८०
कालिंदीच्या तीरावरती	य. दि. फडके	७५
शेष-अवशेष	अरविंद रे	१२५
इस्कोट	उत्तम बावस्कर	७०
लोलक	शैलजा डोंगरे	१००
गॉरगोनाईज	अनिल किणीकर	५०
पोस्ट-मार्टेम	प. बा. सामंत	१२५
नक्षत्रांच्या प्रकाशात	विजया जहागीरदार	१००
कातरवेळ	एम्. डी. लहानकर	७०
गुंता सोडविताना	अनुराधा गुरव	११०
वि.स. खांडेकरांची कविता	संपा. अविनाश आवलगावकर	१३०
विज्ञानातून लोकसंख्या शिक्षण	डी. एस्. इटोकर	६०
जिज्ञासेतून विज्ञान	कविता भालेराव	३५
पेशीबद्ध जीवन : एक निरंतर प्रवास		
डॉ. बाळ फोंडके	अनु. कविता भालेराव	५०
शास्त्र-गंमत जत्रेत चौकस चिंगी :		

कुलकर्णी/भागवत/गंभीर	अनु. मीना किणीकर	७०
विश्वातील सजीवसृष्टी	अनु. डॉ. बाळ फोंडके	६०
माहितीचे महामार्ग : के. डी. पावटे	अनु. वैशाली जोशी	७०
परिक्षानळीतील जंगले : मॅस्कारेन्हास	अनु. प्रमोद जोगळेकर	४५
नवचैतन्याचा झरा : डॉ. बाळ फोंडके	अनु. प्रमोद जोगळेकर	६५
नवी पिढी नवे राज्य	अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर	६०
नामशेष झालेले प्राणी	डॉ. किशोर पवार	५०
सागरातील नवलाई	डॉ. किशोर पवार	८०
शरीरातील विविध संस्था -		
फुप्फुसे, हृदय, मेंदू	वैशाली जोशी	२५
अंत:स्त्राव, गर्भाशय, जठर	वैशाली जोशा	२५
स्नायू, अस्थि	वैशाली जोशी	२५
सुखद मातृत्व	अनु.रत्नावली दातार	७०
तुम्ही अन् तुमची मुलं :		
पार्किन्सन/रुस्तुमजी/पावरी	अनु. अविनाश भोमे	६०
शर्यती स्पर्धा खेळ	आ. पां. खरात	१००
आपण आणि आपले आरोग्य :		
बी. एम्. हेगडे	अनु. प्रमोद जोगळेकर	७०
निवृत्त ज्येष्ठ नागरिकांसाठी उद्योग व्यवसाय	गंगाधर महाम्बरे	४०
व्यवस्थापनाची गीता : पार्किन्सन / रुस्तुमजी	अनु. मोहन भारद्वाज	४०
बुद्धिबळाचा ओनामा	ना. रा. वडनप	८०
काळ चालला पुढे	स. ध. झांबरे	४०
यशाचा कानमंत्र : अनंत पै	अनु. चारुलता पाटील	५०
करोडोंचे सामान्य ज्ञान	सुनीता दांडेकर	८०
कोटीमोलाची प्रश्नोत्तरे	उमा खरे	७०
अमृतधारा-संतकाव्यातील वेचे	डॉ. निर्मलकुमार फडकुले/ डॉ. द. ता. भोसले	७०
मराठी व्याकरण परिचय	राजशेखर हिरेमठ	८०
मराठी निबंध ज्योती	चंद्रहास जोशी	८०
मराठी नाटक : नव्या दिशा नवी वळणे	तारा भवाळकर	७०
मराठी ग्रामीण साहित्य परिसर आणि प्रवाह	गो. म. कुलकर्णी	४०
दलित साहित्य : प्रवाह आणि प्रतिक्रिया	गो. म. कुलकर्णी	१००
स्त्रीसुधारणा विषयक मराठी नाट्यलेखन	मृणालिनी शहा	२००
स्वामी : एक शोध	संपा.डॉ.मीरा घांडगे	१५०

बेस्ट सेलर लेखकांच्या दुनियेत

हॅराल्ड रॉबिन्स, फ्रेडरिक फोरसाइथ, मायकेल क्रायटन, मारिओ पुझो, आयर्विंग वॅलेस, जॉन ग्रिशॅम, स्टिफन किंग, जेम्स पॅटरसन ॲलिस्टेअर मॅकलीन, डेव्हिड बेल्डासी वगैरे बेस्ट सेलर लेखकांनी आजवर जगभरच्या वाचकवर्गाला वेड लावले आहे. कथाकथनाचे कौशल्य, विषयांचे वेगळेपण, भिन्नभिन्न व्यक्तिरेखांच्या परस्परसंबंधांतले नाट्य, नीतिमूल्यांबाबतचे मूलभूत प्रश्न, सत आणि असत यातील संघर्ष यांचे कमीअधिक पण व्यामिश्र चित्रण करण्याचे या सर्वांचे कौशल्य जगभरच्या वाचकांना खिळवून ठेवते... अशा काही बेस्ट सेलर लेखकांच्या दुनियेतला फेरफटका.

शंकर सारडा



इंग्रजी बेस्टसेलर्स मधील 'बेस्ट'

जॉन ग्रिशॅम

एका दशकात डझनावर बेस्ट सेलर्स

१९८९ मध्ये या साउथवेज (मिसिसिपी) येथील वकील आणि मिसिसिपीच्या विधान सभेचा सदस्य जॉन ग्रिशम याची ए टाइम टू किल ही कादंबरी प्रसिद्ध झाली. त्यावेळी तो पस्तिशीत होता. या पुस्तकावर वृत्तपत्रांतून कौतुकपर अभिप्राय आले परंतु त्याची विक्री मात्र बेताचीच झाली. त्यानंतरच्या त्याच्या दि फर्म या कादंबरीने मात्र पुस्तकरूपात येण्याआधीच खळबळ उडवली, आणि पॅरामाउंट पिक्चर्स या अमेरिकेतील अग्रगण्य चित्रपट निर्मिती संस्थेने या कादंबरीचे हक्क सहा लाख डॉलर्स देऊन खरेदी केले.

साहित्यक्षेत्रातील या यशाने जॉन ग्रिशमच्या आयुष्याची दिशाच बदलली. त्याने मिसिसिपीमधील ऑक्सफर्ड येथे एक प्रचंड शेत विकत घेतले. विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला आणि लेखनावरच पूर्ण लक्ष केंद्रित करण्याचे ठरवले, आणि विसाव्या शतकाच्या अंतिम दशकातील एक बेस्ट सेलर कादंबरीकार म्हणून आपले जे स्थान त्याने निर्माण केले, ते दरवर्षी किमान एक तरी कादंबरी प्रसिद्ध करून टिकवूनही धरले.

ए टाइम टू किल (१९८९)
दि फर्म (१९९१)
दि पेलिकन ब्रीफ (१९९२)
दि क्लाएंट (१९९३)
दि चेम्बर (१९९४)
दि रेनमेकर (१९९५)
दि रनआवे ज्युरी (१९९६)
दि पार्टनर (१९९७)
दि स्ट्रीट लॉयर (१९९८)
दि टेस्टॅमेंट (१९९९)
दि ब्रेदरेन (२०००)
दि पेन्टेड हाऊस (२०००)
स्किपिंग क्रिसमस (२००१)
दि समन्स (२००२)

त्याच्या दि फर्म, दि पोलिकन ब्रीफ, दि क्लाएंट, दि चेम्बर, दि रेनमेकर, ए टाइम टू

किल या कादंबऱ्यांवर चित्रपटही निघाले.

जॉन ग्रिशमची दि समन्स ही ताजी कादंबरी. दि पेंटेड हाऊसचा अपवाद वगळता त्याच्या सर्व कादंबऱ्या न्यायालय, खटले, वकील, युक्तिवाद, कायद्यातील पळवाटा यांच्याशी संबंधित आहेत. अरकान्सस राज्यातील १९५२ मधीन घटनांशी ती संबंधित आहे. दि जिंजब्रेड मॅन या त्याच्या कथेवरही चित्रपट निघाला, मिकी या चित्रपटाची पटकथा त्याने लिहिली आहे. ग्रिशमच्या कादंबऱ्या बेस्टसेलरच्या यादीत असूनही, समीक्षकांनी त्याची आवर्जून दखल घेतलेली आहे. त्याच्या बहुतेक पुस्तकांवर आणि त्यातील न्यायालयीन युक्तिवादावर तज्ज्ञांनी भरभरून लिहिले आहे. एका दशकात डझनावर बेस्टसेलर कादंबऱ्या देण्याची त्याची क्षमता हा प्रकाशन क्षेत्रात एक चमत्कार मानला जाते. त्याच्या कादंबऱ्यांवर ज्या तत्परतेने चित्रपट निघत राहिले, त्या तत्परतेचेही आश्चर्य वाटते. अन्य फार थोड्या कादंबरीकारांना असे भाग्य लाभलेले आहे.

लेखनावर भरपूर प्राप्ती असल्याने जॉन ग्रिशमला आपल्या या पैशांची गुंतवणूक अशी करायची हा प्रश्न सतत भेडसावत असतो. त्यासाठी तो चित्रपटनिर्मिती क्षेत्रातही उतरला आहे. ऑक्सफर्डहून निघणाऱ्या दि ऑक्सफर्ड अमेरिकन या मासिकालाही त्याने आर्थिक सहाय्य केले असून त्याला जीवदान दिले आहे. पन्नाशी गाठण्याच्या आतच जगभर बेस्टसेलर लेखक म्हणून एवढी कीर्ती मिळवणाऱ्या जॉन ग्रिशामचा कोणाला हेवा वाटला तर नवल नाही.

जॉन ग्रिशॅम मराठीत प्रथमच.....

लवकरच उपलब्ध.... द पेलिकन ब्रीफ

कायद्याचा अभ्यास करणारी एक सुंदर विद्यार्थिनी अमेरिकेतील काही गूढ खुनाच्या गुन्ह्याची संभाव्य उकल आपल्या शोध निबंधात करते आणि....
पुरावे नष्ट करणारी दुष्ट शक्ती आणि पुरावे गोळा करणारी सुष्ट शक्ती यांच्यातील घनघोर संग्राम...
द पेलिकन ब्रीफ



द पेलिकन ब्रीफ - जॉन ग्रिशॅम
अनु : - रवींद्र गुर्जर

किंमत - २७० रुपये.
पोस्टेज - २५ रु.

इंग्रजी बेस्टसेलर्स मधील 'बेस्ट'

ॲलिस्टेअर मॅक्लीन

सत् आणि असत् यांच्या संघर्षात नेहमी सत्याचाच विजय होणार

" मी फार जलद लिहितो. कुठलीही कादंबरी लिहायला घेतो तेव्हा ती पस्तीसचाळीस दिवसात लिहून पूर्ण करायची असे आधीच मनोमन पक्के करतो. कारण मला लिहिण्याचा कंटाळा आहे. लेखनात फार काळ गुंतून राहणे मला आवडत नाही. त्यामुळे हाती घेतलेले लेखन जितक्या लौकर पूर्ण करता येईल तितके बरे,अशी माझी इच्छा असते. एकदा लिहिलेले मी पुन्हापुन्हा वाचत बसत नाही त्याचप्रमाणे माझ्या पुस्तकांवरचे अभिप्रायही मी कधी बघत नाही. मी काही कादंबरीकार नाही. मी आहे कथानिवेदक. आपण जे लिहितो त्यात कलात्मकता किंवा रहस्य असावे असे मी मानत नाही."



हे उद्गार आहेत प्रसिद्ध बेस्टसेलर कादंबरीकार ॲलिस्टेअर मॅक्लीन याचे.

त्याच्या कादंबऱ्यांच्या तीन कोटीवर प्रती खपलेल्या आहेत आणि जगभरच्या अनेक भाषांतून त्यांचे अनुवाद झालेले आहेत. जगातील सर्वाधिक खपाच्या साहसकथा लेखकांमध्ये त्याचा समावेश होतो हे लक्षात घेतले तर मॅक्लीनचे हे उद्गार म्हणजे त्याच्या विनयशील स्वभावाचे द्योतक आहेत असे मानावे लागते.

ॲलिस्टेअर मॅक्लीनची पहिली कादंबरी एच.एम.एस. युलिसिस १९५५ मध्ये प्रसिद्ध झाली. आणि पहिल्या सहा महिन्यात तिच्या हार्डकव्हरमधल्या अडीच लाख प्रती खपल्या. बेस्ट सेलर्सच्या यादीत तिचे नाव सतत झळकत राहिले. त्यावेळी तो स्कॉटलंडमधील ग्लासगो या गावच्या शाळेत शिक्षकाचे काम करीत होता.

ग्लासगो हेरॉल्ड या वृत्तपत्राने लावलेल्या कथास्पर्धेत मॅक्लीनच्या कथेला पहिला पुरस्कार मिळालेला होता. वेस्ट हायलँडसमधील एका मच्छीमार कुटुंबाची ती कथा होती. वुइल्यम कॉलिन्स अँड सन्स या प्रकाशन संस्थेच्या

एका संपादकाच्या वाचनात ती कथा आली. त्याने मॅक्लीनला भेटायला बोलावले आणि तू कादंबरी का लिहित नाहीस असे विचारले.

शिक्षकी पेशा स्वीकारण्याआधी दुसऱ्या महायुद्धात मॅक्लीन हा रॉयल नेव्ही मध्ये टॉरपेडो मॅन म्हणून काही काळ सेवारत होता. ब्रिटिश, रशियन व मित्र राष्ट्रांच्या फौजांना रसद पुरवठा करणाऱ्या बोटींवर तो काम करीत होता. दोन वेळा नाझींच्या हल्ल्यात तो जखमी झाला; एकदा जपानी सैन्याच्या तावडीतही सापडला. जपानी सैनिकांनी त्याचा खूप छळ केला. त्याचे दात भूल न देता उपटून काढले. त्यामुळे जपानी लोकांबद्दलचा राग त्याच्या मनात सतत धगधगत राहिला. रणांगणावरील या अनुभवांनाच कादंबरीचे रूप द्यावे असे त्या प्रकाशन संस्थेच्या संपादकाने सुचवले. मॅक्लीनला ती कल्पना पसंत पडली आणि पुढच्या तीन महिन्यांत रात्रंदिवस खपून त्याने एच. एम. एस. युलिसिस ही कादंबरी लिहून प्रकाशकाच्या हाती दिली. उत्तर अटलांटिक महासागरात जर्मन पाणबुड्यांशी प्रतिकूल हवामानात लढणाऱ्या नौसैनिकांच्या तुकडीला अनेक जीवघेण्या व जीवावरच्या संकटांतून जावे लागते. एकीकडे पंचमहाभूतांशी आणि दुसरीकडे युद्धपिपासू क्रूर नृशंस पाशवी सत्ताधीशांच्या कटकारस्थानांशी सामना करताना हा सुष्ट व दुष्ट यांच्यातला सामना आहे अशाच उत्कट मनोधारणेतून मॅक्लीनने या कादंबरीतील कथानकाची गुंफण केली आहे. या कादंबरीतून युद्धाचे जे सर्वंकष उभे राहते ते युद्धाची भीषणता दाखवते तसेच लढाऊ शूर सानिकांच्या साहसाचे आणि मनोधैर्याचे भव्योदात्त दर्शनही घडवते. युद्धोत्तर काळात वाढलेल्या तरुण वाचकांना युद्ध कसे होते याची यथार्थ कल्पना देणारी ही साहसकथा अत्यंत प्रभावशाली वाटली.

या कादंबरीवर वृत्तपत्रांनी स्तुतिसुमनांचा वर्षाव केला. वाचकांनी ती डोक्यावर घेतली. पहिलीच कादंबरी असूनही मॅक्लीनने प्लॉट आणि आकृतिबंध यांच्यावर त्याचे प्रभुत्व स्पष्ट लक्षात येते. समुद्रावर चाललेल्या युद्धाचे इतके वास्तव आणि प्रत्ययकारक चित्रण याआधी कोणत्याही कादंबरीकाराने दाखवलेले नव्हते. कादंबरीचा बाज काहीसा भडक व मेलोड्रॅमॅटिक असूनही एक लक्षणीय कादंबरी म्हणून एच.एम.एस.युलिसिसने वाचकांना आकृष्ट केले.

पहिल्याच कादंबरीच्या या अनपेक्षित यशामुळे मॅक्लीनला लेखन हा पूर्णवेळ व्यवसाय म्हणून पत्करण्याचा धोका स्वीकारावासा वाटला. पुढच्या वीस वर्षात त्याने आणखी बऱ्याच कादंबऱ्या लिहिल्या. 'व्हेअर ईगल्स डेअर' वगैरे सोळा चित्रपटकथाही त्याने लिहिल्या. एक नायक, विशिष्ट व्यक्तींचा गट वा टोळी, प्रतिकूल वातावरण, पाताळमंत्री शत्रू, घरभेदी विश्वासघात करणारा सहकारी अशा ठराविक साच्यातील कथावस्तूच मॅकलीन हाताळतो; परंतु त्या प्रत्येक कादंबरीत तपशीलाचे वेगवेगळे नाट्यपूर्ण रंग तो भरतो. त्यामुळे वाचक त्यात गुरफटून जातो. कथानिवेदनाचे उत्कंठावर्धक तंत्र मॅक्लीनला उत्तम अवगत आहे; त्याचबरोबर चांगले आणि वाईट, सज्जन आणि दुर्जन, योग्य आणि अयोग्य यांच्यातील सीमारेषा तो घट्ट पकडून ठेवतो. त्यामुळे त्याचे कथानक अत्यंत वेगाने परंतु एका निश्चित दिशेने पुढे धनुष्यबाणासारखे दौडत राहते. वाचकांना त्यामुळे इकडेतिकडे बघायला अवसरच राहत नाही.

ॲलिस्टेअर मॅक्लीनने स्टुअर्ट या टोपण नावाने डार्क क्रूसेडर आणि सॅटन बग या दोन कादंबऱ्या लिहिल्या. त्याही बेस्ट सेलर ठरल्या. माझ्या नावानेच कादंबऱ्या खपतात असे नाही; त्या चांगल्या वाचनीय असतात म्हणून खपतात असा त्याचा आत्मविश्वास व अहंकार होता.

१९७७ मध्ये त्याने चित्रपटांसाठी एका चित्रपट कंपनीच्या आग्रहाने काही कथांच्या रूपरेखा तयार केल्या. त्या कथांवरून जॉन डेनिस या लेखकाने मॅकलीनच्या मृत्यूनंतर (१९८७) होस्टेज टॉवर आणि एअर फोर्स वन इज डाऊन या दोन कादंबऱ्या लिहून प्रसिद्ध केल्या. दुसऱ्या एका लेखकानेही त्या रूपरेखांवरून सहा कांदबऱ्या तयार केल्या. त्यांनाही वाचकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला.

जगात अनेक लोक दुष्टपणे वागतात ; त्या दुष्टपणाचे स्वरूप आपण जाणून घ्यायला हवे आणि त्या दुष्टपणाचे संभाव्य धोके लक्षात घेऊन त्याचा सर्व सामर्थ्यानिशी प्रतिकार करायला हवा असा संदेश त्याच्या सर्वच कादंबऱ्यांतून कळतनकळत तो देत असतो. त्याच्या कादंबऱ्यांमध्ये नैतिकतेची उच्चतर मूल्ये नेहमीच अंतिम विजय मिळवताना दिसतात.

टी बुक क्लब म्हणजे ग्रंथ प्रेमी वाचकांचे आकर्षण

जगप्रसिद्ध इंग्रजी कादंबऱ्यांचे सरस मराठी अनुवाद
आणि तेही निम्म्या किंमतीत !

आतापर्यंतच्या बुक क्लबमधील उपलब्ध पुस्तकांसाठी ५० रु. भरा आणि कोणतीही सहा किंवा सर्व पुस्तके एकाच वेळी निम्म्या किंमतीत मिळवा.
सहा पुस्तकांसाठी ५० रु. व सर्व पुस्तकांसाठी एकूण पोस्टेज १०० रु. फक्त!

पुस्तकाचे नाव	मूळ लेखक	अनुवाद	किंमत	सभासदांना
नॉट विदाऊट माय डॉटर	बेट्टी महमूदी	लीना सोहोनी	२००रु.	१००रु.
द टर्मिनल मॅन	मायकेल क्रायटन	अरुण मांडे	१२०रु.	६०रु.
डिस्क्लोजर	मायकेल क्रायटन	माधव कर्वे	२२०रु.	११०रु.
काँगो	मायकेल क्रायटन	अरुण मांडे	१६०रु.	८०रु.
ज्युरॅसिक पार्क	मायकेल क्रायटन	प्रमोद जोगळेकर	२५०रु.	१२५रु.
द लॉस्ट वर्ल्ड	मायकेल क्रायटन	प्रमोद जोगळेकर	२२०रु.	११०रु.
नॉट अ पेनी मोअर, नॉट अ पेनी लेस	जेफ्री आर्चर	अंजनी नरवणे	१२०रु.	६०रु.
टू कट् अ लाँग स्टोरी शॉर्ट	जेफ्री आर्चर	लीना सोहनी	१८०रु.	९०रु.
द फोर्थ के	मारिओ पुझो	वनिता सावंत	२००रु.	१००रु.
द लास्ट डॉन	मारिओ पुझो	अनिल काळे	३५०रु.	१७५रु.
द हॉट झोन	रिचर्ड प्रेस्टन	प्रमोद जोगळेकर	२००रु.	१००रु.
साक्षी	सरला बार्नबस	स. वा. मुळे	१९०रु.	९५रु.
हितगुज	कॅरन पेन	वृन्दा दाभोळकर	२००रु.	१००रु.
द फिस्ट ऑफ गॉड	फ्रेडरिक फोरसीथ	अनिल काळे	३००रु.	१५०रु.
क्रोमोझोम - ६	रॉबिन कुक	वैशाली जोशी	३५०रु.	१७५रु.
द मिरॅकल	आयर्विंग वॅलेस	जयवंत चुनेकर	३००रु	१५०रु.
डॉक्टर झिवागो	बोरिस पास्तरनाक	आशा कर्दळे	२५०रु.	१२५रु.
फिअर इज द की	ॲलिस्टर मॅक्लीन	अशोक पाध्ये	१६०रु.	८०रु.
द सिस्टरहुड	कॉलिन फोर्बस्	अंजनी नरवणे	२५०रु.	१२५रु.
कन्टेजन	डॉ. रॉबिन कुक	प्रमोद जोगळेकर	२४०रु.	१२०रु.
३००१द फायनल ओडिसी	आर्थर सी. क्लार्क	प्रमोद जोगळेकर	१६०रु.	८०रु.

इंग्रजी बेस्टसेलर्स मधील 'बेस्ट'

लिऑन युरिस

पत्रकारिता आणि कादंबरीलेखन यांचा बेस्ट सेलर संगम

लिऑन युरिस या लेखकाच्या बहुतेक कादंबऱ्या इतिहास आणि वर्तमानकाल यांचा व्यापक मेळ घालणाऱ्या, त्यांचा सलग प्रवाह दाखवणाऱ्या आहेत. एक्सोडस ही त्याची सगळ्यात जास्त गाजलेली कादंबरी इझ्राएल या राष्ट्राच्या स्थापनेची आणि अरब राष्ट्रांशी इझ्राएलने दिलेल्या संघर्षाची कहाणी सांगते; पण त्याचबरोबर ज्यू लोकांच्या तीन हजार वर्षांच्या इतिहासाचाही एक धावता पण प्रभावी घटनापट ती पेश करते. लिऑन युरिस हा युद्धपत्रकार म्हणून १९५६ मध्ये अरब-इझ्राएल युद्धविषयक बातम्या व वार्तापत्रे पाठवत होता. त्या काळात त्याने अरब-इझ्राएल यांच्यातील संघर्षाचा अत्यंत खोलात जाऊन अभ्यास केला. इतिहासाचा मागोवा घेतला आणि एक्सोडस या महाकादंबरीची रचना केली. (१९५८) इझ्राएल या राष्ट्राच्या स्थापनेची ही कादंबरीच्या रूपातली पेशकश युरोप-अमेरिकेतील वाचकांना भारावून टाकणारी ठरली. 'गॉन वुइथ दि वुइंड' या कादंबरीने मिळवलेल्या यशाची बरोबरी तिने केली; आणि ५० भाषांमध्ये अल्पावधीतच तिचे अनुवाद झाले.



या कादंबरीवर निघालेला चित्रपटही अत्यंत भव्य होता; आणि तोही प्रचंड यश मिळवणारा ठरला. ओटो प्रेमिंजर या दिग्दर्शकाने या चित्रपटाची पटकथा तयार करून घेताना अनेक बदल केले; हे पुस्तक अँटि-ब्रिटिश आणि अँटि-अरब आहे; ते प्रचारात्मक आहे आणि आपण आपला चित्रपट प्रचारकी होऊ न देता, जास्तीत जास्त वास्तव व्हावा म्हणून प्रत्यक्ष घटनास्थळी चित्रण करण्यावर भर दिला आहे असा ओटो प्रेमिंजरचा दावा होता. लिऑन युरिसने प्रेमिंजरने आपल्या कादंबरीचा सत्यानाश केला असा जाहीर आरोप केला; कारण मूळ कादंबरीतील अनेक ऐतिहासिक घटनांना चित्रपटात स्थान मिळालेले नव्हते. (घेटो वसाहतींचा आरंभ, रशियातील प्रोग्रोम्स, थिओडोर हर्झीच्या कल्पना, किबुत्झ हा सामूहिक कुटुंबजीवनाचा प्रयोग इ.)

त्याशिवाय अनेक तपशीलही दिग्दर्शकाने बदलले. उदाहरणार्थ, कादंबरीचा आरंभ होतो तो अमेरिकन पत्रकार मार्क पार्कर हा आपल्या परिचयाच्या किटी फ्रेमाँट या परिचारिकेला भेटायला सायप्रसला येतो. तिच्या पतीचे युद्धभूमीवर नुकतेच निधन झालेले असते. मार्क पार्करची व किटीची भेट होते तेव्हा ती एक्सोडस या बोटीतून तीनशे ज्यू युवकांबरोबर हैफाकडे निघालेली असते. पॅलेस्टाइनच्या ज्यू भूमिगत संघटनेचा तरुण नेता अेरी बेन कन्नान हा छळछावण्यातून सोडवण्यात आलेल्या तीनशे विस्थापित मुलांना घेऊन एक्सोडस या एका मोडकळीस आलेल्या जहाजातून हैफाकडे निघतो. त्यातच किटी असते. ब्रिटिश विनाशिका एक्सोडसच्या मार्गात सायप्रस येथे अडथळा आणते तेव्हा तिच्यावरील प्रवासी भूक हरताळ करतात. त्या बेटाचा कमांडर जनरल सुदरलँड याच्या आदेशाने एक्सोडसला हैफाकडे रवाना होण्याची परवानगी मिळते. या प्रवासात एरी बेन कन्नान आणि किटी एकमेकांच्या प्रेमात पडतात. एरीचा चुलता हा इरगुत या दहशतवादी संघटनेचा सदस्य असतो. एरीही त्या संघटनेत सामील होतो; आणि एकरच्या कारागृहात बंदिस्त असलेल्या ज्यू बंदिवानांची सुटका करण्यासाठी त्या कारागृहावर हे दहशतवादी हल्ला चढवतात. त्या प्रयत्नात एरी जखमी होतो आणि त्याचा चुलता मरण पावतो. राष्ट्रसंघात पॅलेस्टाइनच्या फाळणीचा ठराव मंजूर होतो आणि संघर्षाची ठिणगी पडते. तेव्हा किटी ही एरीच्या बरोबर राहते. सीरियावर केलेल्या हल्ल्यात किटीची मैत्रीण कारेन आणि एरीचा अरब मित्र ताहा यांचा बळी पडतो तेव्हा त्यांच्या कबरीचे दर्शन घेऊन एरी आपला संघर्ष चालू ठेवण्याच्या प्रतिज्ञेचा पुनरुच्चार करतो.

चित्रपटाचा आरंभ होतो तो यूरोपमधून पळ काढलेल्या तीस हजार ज्यू लोकांना सायप्रस बेटावर ब्रिटिशांनी रोखून धरले आहे, आणि पॅलेस्टाइनमध्ये त्यांना प्रवेश करण्याची परवानगी नाकारली आहे या प्रसंगाने.

चित्रपटातील अनेक प्रसंग त्या त्या प्रत्यक्ष स्थळावर जाऊन घेण्यात आले आहेत. एकरच्या किल्ल्यातील तुरुंग फोडण्याचे दृश्यही एकर या घटनास्थळीच चित्रित केले आहे.

इझ्राएल या राष्ट्राच्या निर्मितीची ही कहाणी सांगताना लिऑन युरिसने राष्ट्रवादी नेता तरुण एरी बेन कन्नान आणि अमेरिकन परिचारिका किटी यांच्यातील परस्पर अनुरागाची जोडही दिली आहे. त्यामुळे कादंबरीतील इतिहासनिवेदनालाही मानवी भावबंधांचे गहिरे रंग लाभलेले आहेत. इझ्राएल या देशाच्या निर्मितीमागचे आणि ज्यू लोकांना आपले हक्काचे स्थान मिळवण्यासाठी कराव्या लागलेल्या दीर्घकालीन दिव्याचे तपशील 'एक्सोडस'मुळे आपल्याला ज्ञान होतात आणि ज्यू लोकांच्या चिकाटीचे व चिवटपणाचे कौतुक वाटते. त्यांच्याबद्दलचा आदर दुणावतो. या राष्ट्राला स्थैर्य व स्वास्थ्य लाभावे असे वाटू लागते. या छोट्याशा राष्ट्राला चोहोबाजूंनी अरब शत्रूनी घेरलेले आहे; आणि तरीही सतत संघर्ष करीत इझ्राएल आपले अस्तित्व टिकवून आहे; इझ्राएलच्या नागरिकांचे मनोधैर्य आणि साहस अजोड आहे. लिऑन युरिसने ज्यू मानसिकतेचे आणि गुणविशेषांचे अत्यंत प्रभावी चित्रण केले आहे.

लिऑन युरिस हा पत्रकार आणि कादंबरीकार या दोन्ही भूमिकांचा समन्वय चपखलपणे साधतो. त्याच्या बहुतेक कादंबऱ्या या त्याच्या पत्रकारितेच्या निमित्ताने घडलेल्या देशोदेशींच्या भ्रमणावर आधारलेल्या आहेत. बुऊठल्याही देशात गेल्यावर तेथील वर्तमानकाळाचे अवलोकन करताना तो त्या

देशाच्या इतिहासाचेही वेगवेगळे प्रवाह जाणून घेतो; आणि या दोहोंची सांगड घालणाऱ्या कथावस्तूची उभारणी करतो.

लिऑन हा मेरीलँडमधील बाल्टिमोरचा रहिवाशी. त्याचे वडील हे पोलंडमधून अमेरिकेत स्थलांतरित झाले. स्टोअरकीपर म्हणून ते नोकरी करीत. लिऑनला अभ्यासात फारसा रस नव्हता. तो मॅट्रिकपर्यंतही पोचू शकला नाही. सतराव्या वर्षी तो अमेरिकेच्या नौदलात दाखल झाला आणि १९४२ ते १९४५ या काळात त्याने दक्षिण महासागरात ग्वाडल कॅनॉल, तरावा आणि न्यूझीलंड येथे काम केले. हिवतापाने बेजार झालेल्या लिऑनला उपचारासाठी आणि विश्रांतीसाठी सॅन फ्रॅन्सिस्कोला पाठवण्यात आले. तेथे नौदलातील सार्जंट बेटी बेक हिचा परिचय झाला; आणि १९४५ मध्ये त्या दोघांनी लग्न केले. युद्धानंतर लिऑनने पडेल ती कामे केली. सॅन फ्रॅन्सिस्कोतील एका वृत्तपत्रामध्ये लॉरी ड्रायव्हर म्हणून काही काळ काम केले. त्याला शालेय अभ्यासाचा तिटकारा होता; इंग्लिशमध्ये अनेकदा तो नापास झाला होता, पण लेखनाची मात्र त्याला आवड होती. त्याने काही गोष्टी लिहिल्या. पण त्या प्रसिद्ध होऊ शकल्या नाहीत. १९५० मध्ये त्याने फुटबॉलवर लिहिलेला एक लेख एस्क्वॉयर या मासिकात प्रसिद्ध झाला. त्यानंतर त्याचा उत्साह वाढला. नौदलातील आपल्या अनुभवांवर त्याने एक कादंबरी लिहायचे ठरवले. 'बॅटल क्राय' ही त्याची कादंबरी अनेक प्रकाशकांकडून धक्के खाऊन परत आली. परंतु अखेरीस ती १९५३ मध्ये प्रसिद्ध झाली; आणि तिचे चांगले स्वागत झाले. नौदलातील स्वत:च्या अनुभवावर आधारित असल्याने तिच्यातील वास्तवता आणि तपशीलांतील नेमकेपणा यांचा सर्वांनीच गौरवाने निर्देश केला. या कादंबरीचे हक्क हॉलीवूडने चित्रपटासाठी विकत घेतले; त्यामुळे लिऑनला आर्थिक स्थैर्यही लाभले आणि त्याने पूर्णवेळ लेखन करण्याचे ठरवले. पटकथाकार म्हणून हॉलीवूडमध्ये त्याला पाचारण करण्यात आले. 'गनफाइट ॲट दि ओके कोरल' ही स्वतंत्र पटकथा त्याने लिहिली. (१९५७).

त्याआधी दि अँग्री हिल्स ही त्याची कादंबरी १९५५ मध्ये बाजारात आली. पॅलेस्टाइनमधील ज्युइश ब्रिगेडने ग्रीसमध्ये ब्रिटिश सैन्याशी जी झुंज दिली, तिची रोमहर्षक कहाणी या कादंबरीत त्याने सांगितली होती. त्याचे स्वत:चे चुलते त्या झुंजीमध्ये सामील झालेले होते आणि त्या चुलत्यांनी सांगितलेल्या गोष्टींचा वापर लिऑनने या कादंबरीत करून घेतलेला होता, या कादंबरीवर १९५९ मध्ये चित्रपट निघाला.

'एक्सोडस' वरील चित्रपट १९६० मध्ये प्रदर्शित झाला. लिऑन युरिसने ज्यूंच्या दृष्टिकोनातून मांडलेली कहाणी चित्रपटात अमेरिकन दृष्टिकोनातून मांडण्यात आली होती; अरब किंवा ब्रिटिश यांच्या विरोधी सूर त्यात टाळला होता; आणि प्रचारकीपणापासून तो अलिप्त ठेवण्यात आला होता. आपल्या कादंबरीची ही मोडतोड लिऑनला पसंत नव्हती; त्याने दिग्दर्शकावर तोफा डागल्या. परंतु चित्रपट जगभर चांगला चालला. त्याने भरपूर कमाई केली. पुन्हा पॅलेस्टाइनचा दौरा करून लिऑनने एक्सोडस रिव्हिजिटेड हे पुस्तक लिहिले. १९५९ मध्ये इझ्राएलवरील डॉक्युमेंटरीचे ही त्याने स्क्रिप्ट लिहिले.

'मिला १८' ही त्याची कादंबरी पोलंडच्या पार्श्वभूमीवरील असून वॉर्सातील एका वसाहतीने नाझी सैनिकांविरुद्ध १९४३ साली केलेल्या उठावाची हकीकत तिच्यात आली आहे. त्यासाठी लिऑनने वॉर्सातील मेमोरियल आर्कहाइव्हजमधील कागदपत्रांचा अभ्यास केला आणि त्या उठावात सहभागी असलेल्या लोकांच्या मुलाखती घेतल्या. ही कादंबरी १९६१ मध्ये प्रसिद्ध झाली.

'टोपाझ' ही कादंबरी १९६७ मध्ये प्रसिद्ध झाली. ती कादंबरी खरे म्हणजे हेरकथाच आहे;आणि तिचे लेखन एका फ्रेंच राजनीतिज्ञाच्या आग्रहामुळे त्याने केले. द्‌गॉलच्या परदेशी धोरणावर नाराज असलेल्या या राजनीतिज्ञाने फ्रान्सच्या गुप्तहेर विभागाची माहिती देणारी काही कागदपत्रे लिऑन युरिसच्या हवाली केली आणि त्यावर काहीतरी लिहा असे सुचवले. 'टोपाझ' मुळे फ्रान्स सरकार अस्वस्थ झाले. हिचकॉकने त्यावर चित्रपट काढयाचे ठरवले. तेव्हा फ्रान्सचे सांस्कृतिक खात्याचे मंत्री आन्द्रे मालरॉ यांनी त्याच्या चित्रीकरणाला बंदी घातली. त्यामुळे या चित्रपटाचा शेवट बदलणे भाग पडले.

लिऑन युरिसने डब्लिनमध्ये काही काळ घालवला आणि आयर्लंडच्या स्वातंत्र्य मोहिमेचा अभ्यास केला. आयर्लंड, ए टेरीबल ब्युटी हा फोटो-एसे त्याने प्रसिद्ध केला. (१९७५) त्याचबरोबर तीन आयरिश कुटुंबांची कहाणी सांगणारी ट्रिनिटी ही कादंबरीही त्याने लिहिली. १८४० ते १९१६ या काळातील लार्किंग या एका उत्तर आयरिश शेतकरी कुटुंबातील घटना मालिका सांगणारी ही कादंबरी आहे. जोडीला स्कॉटलंडमधून आलेले एक कुटुंब आणि ब्रिटीश ॲरिस्टोक्रॅटिक कुटुंब आणून या तीन कुटुंबातील ताणतणावांच्या पार्श्वभूमीवर आयरिश स्वतंत्रता आंदोलनाचे प्रमुख टप्पे उलगडून दाखवले आहेत. कॅथॅलिक तरुण आणि प्रॉटेस्टंट प्रेयसी यांचे या कादंबरीतील प्रेम तेथील धार्मिक व आर्थिक दुराव्याने सफल होणे दुष्कर होते; हे मुख्य सूत्र आहे.

पॅलेस्टाइनच्या पार्श्वभूमीवर 'दि हाज' ही आणखी एक कादंबरी लिऑन युरिसने लिहिली. पॅलेस्टाइनमधील अरबांच्या अवस्थेचे १९१४ ते १९५६ (पहिले महायुद्ध ते सुवेझ कालवा लढा) या काळातील चित्रण 'द हाज' मध्ये आले आहे. लिऑन युरिसने हे चित्रण अरबांच्या दृष्टिकोनातून, सहानुभूतीने केले आहे. पण तरीही काही कडव्या अतिरेकी अरब संघटनांनी लिऑनला ठार करण्याची धमकी दिली होती.

१९५६ मधील सिनाई मोहिमेच्या वेळी लिऑन मध्यपूर्वेत होता. त्या मोहिमेवर आधारित बरीचशी आत्मचरित्रात्मक अशी 'मिटला पास' ही कादंबरी १९८८ साली त्याने प्रसिद्ध केली. दुसऱ्या महायुद्धावरील एका गाजलेल्या कादंबरीचा लेखक गिडॉन झाडोक हा या कादंबरीचा नायक आहे; तो इझ्राएलला आपल्या पुस्तकासाठी तपशील मिळवण्यासाठी जातो. तेथे नताशा सोलोमन ही होलोकास्ट मधून वाचलेली तरुण स्त्री त्याला भेटते. तिचे त्याला आकर्षण वाटते. आपल्या लेखनाच्या उमेदवारीच्या काळात भक्कम साथ देणारी आपली पत्नी आणि नताशा ही नवी प्रेयसी- या दोहोंच्या मध्ये त्याचे मन गोता खाऊ लागते. तो इझ्राएलच्या सैन्यात दाखल होतो. पॅराशूटमधून त्याला मिटला पास वर उतरवण्यात येते. शत्रूच्या पिछाडीच्या भागात उतरलेल्या नायकाला शत्रूला कोंडीत पकडून शरण आणण्याची कामगिरी बजावावी लागते.

लिऑनचा जन्म १९२४ सालचा. आज तो ऐंशीच्या उंबरठ्यावर उभा आहे. तरीही लेखन चालू आहे. पंचाहत्तरीच्या वेळी त्याने 'ए गॉड इन ऱ्युन्स' (अवशेषांमधला देव) ही कादंबरी प्रसिद्ध केली. इ.स.२००८ मधील अमेरिकन अध्यक्षीय निवडणुकीच्या वेळी काय होईल याचे एक कल्पनारम्य कथानक त्याने या कादंबरीत उभे केले आहे.

इंग्रजी बेस्टसेलर्स मधील 'बेस्ट'

डेव्हिड बेल्डासी

अमेरिकेतील सत्ताधीश आणि माफिया टोळ्या यांचे नवे रूप दाखवणारा कादंबरीकार

डेव्हिड बेल्डासी याचा जन्म १९६० मध्ये व्हर्जिनियामध्ये झाला आणि आजही तो तेथेच राहतो. व्हर्जिनिया कॉमनवेल्थ युनिव्हर्सिटीची राज्यशास्त्राची पदवी मिळाल्यावर त्याने वकिलीची परीक्षा दिली. नऊ वर्षे वकिली केली. त्याला लेखनाची आवड होती. वृत्तपत्रे, मासिके यात तो बरेच लेखन करी. पुढे कादंबरी लेखनाकडे तो वळला आणि बेस्टसेलर ठरला.

ॲबसोल्युट पॉवर, टोटल कंट्रोल, दि विनर, दि सिम्पल ट्रुथ, सेव्हिंग फेथ, वुइश यू वेल, आणि लास्ट मॅन स्टँडिंग या सात कादंबऱ्या त्याच्या नावावर आहेत.

त्याशिवाय हॉलंडने त्याची इसवी सन २००० मध्ये ऑफिस अवर्स ही कादंबरी 'थरारकथा महोत्सवात गौरविली होती. ती डच भाषेत आहे. ॲबसोल्युट पॉवर या पहिल्याच कादंबरीने त्याला बेस्ट सेलर लेखक म्हणून मान्यता मिळाली. त्यामुळे त्याने गेल्या पंधरा वर्षात सात कादंबऱ्या लिहून नाव मिळवले. त्याच्या कादंबऱ्यांची ३९ भाषांमध्ये भाषांतरे झाली असून इंग्रजीत त्या सात कादंबऱ्यांनी ३ कोटी प्रतींवर खप गाठला आहे. पीपल मॅगोझिनने 'पेज टर्नर ऑफ दि वीक' म्हणून ॲबसोल्युट पॉवर या पहिल्याच कादंबरीबद्दल १९९७ मध्ये त्याचा सन्मान केला. इंग्लंडमधील डब्ल्यू एच स्मिथ थंपिंग गुड रीड ॲवार्ड त्याला प्रदान करण्यात आले. इटालीतील एका वाङ्मयीन पुरस्कारासाठीही त्याची निवड झाली. त्या कादंबरीवर एक भव्य चित्रपटही निघाला. क्लिंट ईस्टवूड आणि जेने हॅकमन यांच्या त्या प्रमुख भूमिका होत्या.

उत्तर व्हर्जिनियाच्या निसर्गरम्य पर्यटन स्थळी दाट झाडीत लपलेल्या एका प्रशस्त बंगल्यात सुरक्षा व्यवस्था कडक होती आणि छुपे कॅमेरे जागोजाग बसवलेले होते. अनधिकृत प्रवेश करणे अशक्यप्राय व्हावे असा बंदोबस्त करण्यात आला होता. एफ बी आय या अमेरिकन गुप्तहेर यंत्रणेचे ते एक केंद्र असल्याची माहिती गावात फारशी कोणालाच नव्हती.

एके दिवशी तेथे फेथ लॉकहार्ट या तरुणीला एफबीआय अधिकाऱ्यांनी चौकशीसाठी पाचारण केले. अमेरिकन सरकारच्या धोरणात आपल्या इच्छेप्रमाणे बदल घडवू आणू शकणाऱ्या एका सामर्थ्यशाली व्यक्तीबरोबर तिने काही काळ काम केले होते; आणि त्या व्यक्तीच्या सामर्थ्यामुळे ज्यांचे हितसंबंध दुखावले गेले अशा काही त्याच्या विरोधकांनी त्याला संपवण्याचा घाट घातला होता. या शत्रूंचा बंदोबस्त करण्यासाठी फेथ लॉकहार्टने एफबीआयशी संपर्क साधून मी काही महत्त्वाची माहिती देऊ इच्छिते असे सूचित केले होते. त्यामुळेच तिला गुप्तपणे एफबीआयशी बोलणे सुलभ व्हावे म्हणून या निर्जन दाट वनराईतील बंगल्यात तिने यावे असे सुचविण्यात आले होते.

फेथ लॉकहार्टने आपल्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तेथील ली ॲडॅम्स या एका खाजगी गुप्तहेरांशी संपर्क साधून, या बंगल्यावर ये असा निरोप दिला. तिने त्याला पाहिलेलेही नसते. त्यांची जुनी ओळखही नसते. परंतु त्याच्यावर विश्वास ठेवण्यावाचून तिला गत्यंतर नसते. कारण अमेरिकन शासनयंत्रणेतील काही प्रभावशाली उच्चपदस्थांचे माफिया टोळ्यांशी लागेबांधे असतात; ते उघड करून ती धोका पत्करणार असते. अशावेळी कोणातरी जाणकाराचे सहकार्य हवे म्हणून ली ॲडॅम्सची मदत ती घेत असते.

त्या बंगल्यावर फेथ लॉकहार्ट प्रवेश करते; परंतु त्याच वेळी मारेकऱ्यांचा हल्ला होतो आणि त्यात फेथच्या ऐवजी दुसरीच तरुणी गोळी लागून ठार होते.

फेथ आणि ली ॲडॅम्स तेथून सुटका करून घेतात; त्यामुळे एफबीआय आणि मारेकरी या दोघांनाही फेथला शोधून काढण्यासाठी बरेच सव्यापसव्य करावे लागते. वॉशिंग्टनमधील सत्ताधाऱ्यांचा उन्मत्तपणा, भ्रष्टाचार आणि सर्वदूर पोचलेले भयभीतीचे वातावरण यातून फेथला आधी अवगत असलेल्या आणखी काही रहस्यांचे ज्ञान होते. फेथचा एकूण राज्यव्यवस्थेवरचा आणि शासनाच्या शहाणपणावरचा, कायद्याच्या व नियमांच्या नावावर चालणाऱ्या नानाविध प्रकारांवरचा विश्वासच उडून जातो. सत्ताधीशांपैकी काही घटक हे स्वत:च्या हितसंबंधांची जोपासना करण्यासाठीच कायदेमंडळाला हवे तसे वाकवतात किंवा न्यायदान व्यवस्थेलाही आपल्या मर्जीप्रमाणे झुकायला भाग पाडतात. फेथ लॉकहार्टच्या मनात या सर्वांबद्दलच संशय व संभ्रम निर्माण होतो आणि तिचा स्वत:वरचाही विश्वास डळमळीत होऊ लागतो. तिची चांगुलपणावरची श्रद्धा तावून सुलाखून निघते आणि ही कादंबरी वाचून संपवताना वाचकालाही आपल्या स्वत:च्या चांगुलपणाची महती व महत्ता नव्याने भरभक्कम झाल्याची अनुभूती येते.

'दि विनर' ही कादंबरी लॉटरी व्यवसायाच्या पार्श्वभूमीवर आधारलेली आहे. विशिष्ट प्रकारे लॉटरीतील विजेत्या नंबराचे फिक्सिंग करता येते आणि कोट्यवधी डॉलर्स जिंकता येतात. हे डेव्हिड बेन्डासीने अत्यंत तपशीलवार उत्कंठावर्धक कथावस्तूद्वारे दाखवले आहे.

'दि सिम्पल ट्रुथ' या कादंबरीच्या कथानकामध्ये एक प्रत्यक्ष घडलेल्या घटनेचा वापर करण्यात आला आहे. १९९९ मधील आपली आवडती कादंबरी म्हणून राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांनी या कादंबरीची निवड केली होती.

'वुइश यू वेल' या कादंबरीत डेव्हिड बेन्डासीने आपल्या मामाच्या कुटुंबाची कहाणी सांगितली आहे. त्यासाठी त्याने आपल्या आईने माहेरी घालवलेल्या पहिल्या सतरा वर्षांची

अत्यंत तपशीलवार माहिती मिळवली. आणि आपल्या आजोळचे घर व कौटुंबिक वातावरण यांना रोमांचकारक कथानकाचे कोंदण दिले. अमेरिकेत वाचन संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी 'ऑल अमेरिका रीड्स्' ही मोहिम चालवण्यात आली होती; त्या मोहिमेत 'वुइश यू वेल' या कादंबरीला मानाचे स्थान मिळाले.

लास्ट मॅन स्टँडिंग ही मानसशास्त्रीय थरारकथा नवसहस्त्रकाच्या पहिल्या वर्षात प्रसिद्ध झाली. एफबीआयच्या होस्टेज रेस्क्यू टीमचा - ओलीस ठेवलेल्या वा अपहरण केलेल्या व्यक्तींची सुटका करण्यासाठी कार्यरत असणाऱ्या विभागाचा - एक सदस्य वेब लंडन या नायकाच्या मनोविश्वातील आंदोलने रेखाटून अनेक रहस्यमय घटनांचा उलगडा करण्याचे काम - हे त्याच्या स्वत:च्या आंतरिक विश्वालाही हादरा देणारे आणि सुप्त भयभीत गंडांना जागृत करणारे ठरते.

डेव्हिड बेन्डासीने पॅरामाउंट टेलिव्हिजनसाठी रहस्यपूर्ण मालिकाही लिहिल्या आहेत; आणि त्याच्या वाचकवर्गात अमेरिकेतील राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश , बिल क्लिंटनपासून सर्व थरातील लोकांचा समावेश आहे. दि गॉडफादर प्रमाणे माफियांची एक वेगळीच जीवनशैली व कार्यशैली रंगवून त्याने अमेरिकेतील नव्या गुन्हेगारीचे व अंडरवर्ल्डचे दर्शन घडवले आहे.

सेव्हिंग फेथ... टी बुक क्लब११ मधून लवकरच उपलब्ध! सभासदांना निम्म्या किंमतीत!

सेव्हिंग फेथ - अनु : माधव कर्वे

'ती खुर्चीत कोसळलीच. 'तू बोलतोयस त्यात तथ्य आहे, आता सगळं तर्कशुद्ध वाटतंय.' ह्या सगळ्याचा अर्थ उलगडून तिच्या डोळ्यात भीती साकळली. 'म्हणजे तुला म्हणायचंय...'

'म्हणजे मला म्हणायचंय की तुझ्या जिवावर दुसरं कोणीतरी उठलय.'

'कोण? कोण?' ती जवळजवळ ओरडलीच.

'मला... ते माहिती नाही, सांगता नाही येणार आत्ता.' ली म्हणाला.

'उद्या, उद्यापासून एक आठवड्यानं मी जिवंत असेन असं वाटतं तुला?'

'ती शाश्वती कोणालाच नसते. आपण 'एफबीआय'कडे केव्हाही जाऊ शकतो आणि आता बहुधा जायलाही हवं.'

'मला ते शक्य नाही. एवढ्यात तू मला जे सांगितलंस त्यानंतर तर नाहीच.'

तो उभा राहिला, त्याची पकड तिच्या खांद्यावर. 'तू हे काय बोलतीयस?'

ती त्याच्यापासून बाजूला झाली. 'एफबीआय' मला डॅनीला गुंतवू देणार नाहीत. एकतर तो तरी तुरुंगात जाईल किंवा मी तरी. मला मारण्याच्या प्रयत्नामागे तो आहे हे माझ्या मनात आलं तेव्हाच मी त्याच्याकडे जाऊन शंकानिरसन करून घ्यायला हवं होतं.ण आता ते करणं मला शक्य नाही. मी त्याच्याबरोबर तुरुंगात जाऊ इच्छित नाही.'

सेव्हिंग फेथ या पुस्तकातून

इंग्रजी बेस्टसेलर्स मधील 'बेस्ट'

जेम्स पॅटरसन

वकिली कौशल्य दाखवणाऱ्या हेरकथांची धमाल

जेम्स पॅटरसनची दि टॉमस बॅरीमन नंबर ही कादंबरी १९७६ साली लिटल ब्राउन या प्रकाशन संस्थेने प्रसिद्ध केली. त्यावेळी त्याचे वय २७ वर्षे होते आणि सर्वोत्तम पहिल्या रहस्यकथेचे एडगर ॲवार्ड त्याने पटकावले. त्या पहिल्याच रहस्यकथेने जेम्सचे नाव बेस्टसेलर लेखकांच्या यादीत स्थानापन्न झाले आणि त्यानंतर त्याच्या रहस्यपूर्ण कथांचे लेखन प्रकाशन सातत्याने व वेगाने सुरू राहिले.

न्यूयॉर्कजवळच्या न्यू बर्गमध्ये जेम्सचे बालपण गेले. इंग्लिशमध्ये त्याने एम. ए. केले. इंग्रजीवर प्रभुत्व असल्याने त्याने जे. वॉल्टर थॉम्पसन कंपनीत जाहिरातींचा मजकूर कॉपी लिहिण्याचे कामही केले. १९८१ पासून कॉपीरायटर म्हणून काम करता करता अत्यंत अल्प वयात क्रिएटिव्ह डायरेक्टर व चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर म्हणून बढत्या मिळवून कंपनीत नवा इतिहास निर्माण केला. त्याने तयार केलेल्या अनेक जाहिरात मोहिमांना पुरस्कार मिळाले. कोडॅक, बर्गर किंग, टॉयज् आर अस, बेल ॲटलांटिक, ब्रिस्टॉल मायर्स वगैरे बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी त्याने जाहिरातींच्या मालिका तयार केल्या. 'दि डे अमेरिका टोल्ड द ट्रुथ' हे एक स्फोटक पुस्तकही त्याने आपला सहकारी पीटर किन याच्या मदतीने प्रसिद्ध केले. 'दि थॉमस बॅरीमन नंबर' ही त्याची पहिली रहस्यकथा लिहून झाल्यावर बऱ्याच प्रकाशकांकडे ती पाठवली. स्वत: कॉपीरायटर म्हणून उच्चपदी असूनही त्याला नकारघंटा ऐकाव्या लागल्या. परंतु ती कादंबरी बेस्ट सेलर ठरल्यावर मात्र त्याने आपले लक्ष कादंबऱ्यांच्या लेखनावर केंद्रित केले.



डिटेक्टिव्ह व मानसशास्त्रज्ञ ॲलेक्स क्रॉस ही व्यक्तिरेखा निर्माण करून त्याने अनेक रहस्यपूर्ण कादंबऱ्या लिहिल्या. अलॉंग केम ए स्पायडर, किस द गर्ल्स, जॅक अँड जिल,

कॅट अँड माऊस, पॉप गोज् द वीझल, रोझेस आर रेड अँड व्हायोलेटस आर ब्ल्यू अशा सात कादंबऱ्या ॲलेक्स क्रॉस च्या बुद्धिचातुर्याने व गुन्हेगारांच्या मानसिकतेची गुंतागुंत उलगडून दाखवणाऱ्या कौशल्याने वाचकांना खिळवून ठेवणाऱ्या ठरल्या आहेत. त्याशिवाय 'वुमेन्स मर्डर क्लब' नावाची एक रहस्यकथा मालिका सुरू करून त्याने दोन कादंबऱ्या पूर्ण केल्या आहेत. फर्स्ट टू डाय आणि सेकंड चान्स ही त्यांची नावे आहेत. सुझानेज् डायरी फॉर निकोलस, फ्रेडल अँड ऑल, व्हेन द वुईट ब्लोज, हाइड अँड लीक या त्याच्या इतर कादंबऱ्या. १९९७ मध्ये 'किस दि गर्ल्स' या कादंबरीवर चित्रपट निघाला. तो बॉक्स ऑफिस हिट ठरला. मॉर्गन फ्रीमन या नटाने त्यात ॲलेक्स क्रॉसची गुप्तहेराची भूमिका रंगवली. त्यामुळे इतर कादंबऱ्यांनाही चित्रपटासाठी मागणी आहे.

'व्हायोलेटस् आर ब्ल्यू' मध्ये व्हॅम्पायर या रक्तशोषक माहिलांच्या मागावर डिटेक्टिव्ह ॲलेक्स क्रॉसला पाठवण्यात आले आहे. व्हॅम्पायर म्हणून वावरणाऱ्या काही महिलांना भेटून जेम्स पॅटरसननं त्यांच्या कार्यपद्धतीची माहिती मिळवली. त्यांच्यासाठी 'फणा' बनवणाऱ्या कारागिरालाही गाठले. लॉस एंजेलिसमध्ये व्हॅम्पायर्सचा एक क्लब आहे, त्यातील एका बैठकीतही त्याने भाग घेतला. त्यासाठी त्याने कॉंटॅक्ट लेन्स लावून आपले डोळे लाल दिसतील याची काळजी घेतली. दुष्ट, खल प्रवृत्तीची खलनायक माणसे रंगविण्यात जेम्स पॅटरसन पटाईत आहे. (जाहिरातक्षेत्रात अशी अनेक माणसे मला भेटली असे तो मिस्किलपणे म्हणतो.) 'व्हायोलेटस आर ब्ल्यू' मधील घटना सॅन फ्रॅन्सिस्को, लास बेगास, वॉशिंग्टन डीली, न्यू ऑर्लियन्स वगैरे ठिकाणी घडतात. व्हॅम्पायर्सचे छुपे जाळे हे सर्वदूर पसरलेले आहे. या सर्व शहरांमध्ये व्हॅम्पायर्स गुप्तपणे आपली कटकारस्थाने करीत असतात, आणि नवनव्या तरुणींना आपल्या पंथाची दीक्षा घेत असतात असे त्याचे म्हणणे आहे. व्हॅम्पायर्सच्या ज्या फँटसी रंगवण्यात येतात त्या सगळ्या कपोलकल्पित असतात असे नाही असे तो बजावतो.

जेम्स पॅटरसनच्या कादंबऱ्यांकडे हॉलिवुडमधील अनेक निर्मात्यांचे लक्ष आहे. एका तरुण वकिलाच्या जीवनावरील एक रहस्यपूर्ण कथानक एका चित्रपटासाठी त्याने तयार केले आहे ते पाहून हे कथानक जॉन ग्रिशम आणि जेम्स पॅटरसन या दोहोंचा संगम घडविणारे आहे असे उद्गार काहीजणांनी काढले. जॉन ग्रिशम हा बेस्टसेलर लेखक कोर्टामधील खटले रंगवण्यासाठी मशहूर आहे.

जाहिरातीसाठी मजकूर लिहिताना आपले जग एका अर्थाने मर्यादित होते. परंतु जाहिरातीतील नवसृजनशीलता या विषयावर एकदा बोलण्याचे आमंत्रण त्याला मिळाले, तेव्हा हेमिंग्वे, सेझान वगैरेंची काही पुस्तके त्याने वाचली. त्यावेळी पॅटरसनला जाणवले की आपल्या सर्जनशीलतेला फारच मर्यादा आहेत. या जगात संपूर्ण नवे असे काही असत नाही. आहेत त्या गोष्टींची सांधेजोड करूनच बरेचसे 'नवे' निर्माण होते. आपण आपल्या आकलनाच्या कक्षा वाढवायला हव्यात. आजवर ज्या क्षेत्रांकडे लक्ष दिले नाही अशा क्षेत्रांकडे लक्ष दिले पाहिजे. त्यामुळे तो वेगवेगळ्या विषयांमध्ये रस घेऊ लागला. त्या विषयांमधील अनेक कल्पना त्याने जाहिरातीत वापरल्या. त्यामुळे जाहिरातींची परिणामकारकता व प्रभाव यात वाढ झाली. ''तीच गोष्ट मला माझ्या कादंबऱ्यांच्या लेखनातही उपयुक्त ठरली. माझी कथानके कमालीची वेगवान असतात. त्यात सातत्याने काही ना काही घडत असते. वाचक

त्यात गुंतून पडतो. पुढे वाचत राहतो. पुस्तके ही काहीशी व्यसनासारखी असतात. एकदा चटक लागली की आवरणे अवघड होते. कोण कुठल्या कारणाने वाचनाकडे वळतो हे सांगणे अवघड असले तरी वाचकांच्या वाढत्या प्रतिसादामुळे आपल्या कादंबऱ्यातील पात्रेही अधिक प्रभावी होतात.'' असे तो म्हणतो.

ॲलेक्सच्या घरातील मुले, त्याची आजी यांना त्रास होईल असे काही दाखवू नका म्हणून अनेक वाचक पत्रावर पत्रे लेखक जेम्स पॅटरसनला पाठवतात. ही पत्रे खूप सकारात्मक व उत्तेजन देणारी असतात. त्यामुळे पॅटरसनलाही लिहिण्याची सारखी ऊर्जा मिळत राहते. त्याच्या रहस्यकथांचा वाचकवर्ग देशोदेशी वाढत आहे.

विज्ञानावरील संग्राह्य पुस्तके

जिज्ञासापूर्ती **निरंजन घाटे**



अनेक प्रकारच्या चित्रविचित्र वैज्ञानिक माहितीचं आणि भौगोलिक प्रश्नांच्या उत्तरांचं भांडार !

किंमत : १५०रु. पोस्टेज : २०रु.

बोध पर्यावरणाचा **निरंजन घाटे**

पर्यावरणाची सांगोपांग माहिती देणारा, अद्ययावत संशोधन-निष्कर्षांवर आधारलेला नवा ग्रंथ.

किंमत : १५०रु. पोस्टेज : २०रु.

वाचनातून विज्ञान **डी. एस. इटोकर**

कोणतीही घटना कशी घडली यामागची शास्त्रीय जिज्ञासा काही अंशी शमवणारे नवे पुस्तक.

किंमत : १००रु. पोस्टेज : २५रु.

विज्ञानाचे शतक **निरंजन घाटे**

अणुविज्ञान, वैद्यकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, संगणक, यंत्रमानव या व अशा अनेक दिशांनी या शतकात विज्ञानाची क्षितिजे विस्तारत गेली आहेत. त्या बहुरंगी विज्ञानाची या शतकातील चित्तवेधक वाटचाल साकार करणारा मराठीतील महत्त्वपूर्ण ग्रंथ.

किंमत : २००रु. पोस्टेज : २०रु.

इंग्रजी बेस्टसेलर्स मधील 'बेस्ट'

स्टिफन किंग

भयकथांचा सम्राट

भयकथांचा सम्राट हा किताब कोणाला द्यायचा झाला तर त्यासाठी सर्वात प्रथम डोळ्यापुढे एकच नाव येईल आणि ते म्हणजे स्टिफन किंग याचे ! पन्नासावर पुस्तके त्याच्या नावावर आहेत ; आणि ती खपाच्या दृष्टीने निरनिराळे विक्रम करून गाजलेली आहेत. दि ग्रीन माईल (५३६ पृष्ठे), बॅग ऑफ बोन्स (७३२ पृष्ठे), सालेम्स् लॉट (६३० पृष्ठे), हार्अस इन अटलांटिस (५२२ पृष्ठे), ड्रीमकॅचर्स (८२२ पृष्ठे), दि गर्ल हू लव्हड् टॉम गॉर्डन (२६४ पृष्ठे), कॅरी (२५३ पृष्ठे) वगैरे त्याच्या पुस्तकांतून भयावह घटनांच्या ज्या मालिका



पेश केल्या जातात, त्या अक्षरश: अंगावर काटे आणतात. त्याच्या कादंबऱ्यांवर निघालेले चित्रपट बघताना क्षणोक्षणी आश्चर्याचे धक्के बसत राहतात. त्याच्या अफलातून कल्पनाशक्तीने आणि भयाचे एकाहून एक भयानक प्रसंग रंगवण्याच्या त्याच्या कौशल्याने आपले वास्तवाचे अवघे भान दोलायमान होत संभ्रमात गोते खात राहते. 'स्टॉर्म ऑफ दि सेंच्युरी' ही स्वतंत्र पटकथा त्याने टेलिव्हिजनसाठी लिहिली; तीही प्रेक्षकांना थरारून टाकणारी ठरली.

कॅट्स आय, क्रीपशो, सिल्व्हर बुलेट, मॅक्झिमम, ओव्हरड्राइव्ह, गोल्डन इयर्स, स्लीप वॉकर्स, दि स्टँड वगैरे पटकथा त्याने लिहिल्या. दि ग्रीन माइल, दि डार्क टॉवर यासारख्या त्याच्या भयकथा या सॅटरडे इव्हिनिंग पोस्ट मध्ये क्रमश: प्रसिद्ध झाल्या. चार्लस डिकन्स हा त्याचा आदर्श आहे; डिकन्सच्या कादंबऱ्याही क्रमश: प्रसिद्ध होत. एकच एक लांबलचक प्रदीर्घ कादंबरी लिहिण्यापेक्षा ती पाचसात स्वतंत्र पण सलग कथावस्तूच्या रूपान पेश करणे ही सीरियल थ्रिलरची कल्पना वाचकांच्या दृष्टीने सोयीची आहे, असे त्याला जाणवले. प्रकाशकांनीही त्या कल्पनेला पाठिंबा दिला. शंभरदीडशे पृष्ठांत एकावर एक आश्चर्याचे धक्के देणाऱ्या घटनांची मालिका द्रुतगतीने

वाचकांपुढे ठेवून त्यांना संमोहित करून टाकण्याच्या खेळीत स्टिफन किंग तरबेज आहे. वाचकांना घाबरवून टाकण्यात त्याला गंमत वाटते; आणि तसे कथानक मनासारखे जमले की त्याला तो दिवस कारणी लागला असे वाटते. वाचकांमध्ये भावनांचा कल्लोळ माजवणे हे कादंबरीकारांचे काम आहे; त्या भावना मग आनंददायक असोत, दु:खकारक असोत किंवा तणाव निर्माण करणाऱ्या असोत; लेखकाच्या कल्पनाशक्तीने तिसऱ्या डोळ्याला आकृष्ट करील असे सामर्थ्यशाली नाट्यपूर्ण प्रसंग निर्माण करायला हवेत; भयकथालेखकाचे किंवा फँटसी निर्मात्याचे ते आद्यकर्तव्यच आहे असे स्टिफन किंग मानतो. ''वाचकाला खूप घाबरवून टाकायचे; पण पुस्तकाचे पुढचे पान उलटण्याएवढे सतर्कही ठेवायचे ही किमया मी साधू पाहतो.. काहीतरी दैवी, चमत्कारिक सिद्धी प्राप्त असलेल्या व्यक्तिरेखा निर्माण करायला मला आवडते; त्या सिद्धीमुळे त्या व्यक्तीला जसे काही फायदे मिळवता येतात तसेच काही तोटेही सहन करावे लागतात ; क्वचित् त्या सिद्धीच त्या व्यक्तीच्या विनाशाला कारणीभूत ठरतात. त्या सिद्धींमुळे समाजातील काही घटकांनाही धक्का बसतो. मात्र भयापेक्षा मला फँटसीमध्ये जास्त रस वाटतो,''असे स्टिफन किंग म्हणतो.

कॅरी या कादंबरीने स्टिफन किंगला लेखक म्हणून स्थैर्य दिले (१९७३) ती डबल डे या प्रकाशन संस्थेने स्वीकारली; त्यावेळी ताशी १ डॉलर ६० सेंटवर एका इंडस्ट्रियल लॉंड्रीमध्ये काम करीत होता. डबलडेने या कादंबरीच्या पेपरबॅकचे हक्क विकून लक्षावधी डॉलर्स मिळवले तेव्हा स्टिफन किंगचे भाग्य खरे पालटले, आणि ते सुपरसॉनिक वेगाने धावू लागले. कॅरीवर चित्रपट निघाला. तो गाजला. 'सालेम्स लॉट' ने कॅरीच्या या अभूतपूर्व यशाचा पुढचा टप्पा गाठला. त्यावरच्या चित्रपटाच्या हक्काने त्याला लक्षावधी डॉलर्स मिळाले. त्याच्या श्रीमंतीने त्याचे सगळे मित्र चक्रावून गेले आणि त्याच्यापासून काहीसे दूर राहू लागले. कर, गुंतवणुकी, नवे घर, शेअर्स, पुस्तकांचे हक्क - यावर चर्चा झडू लागल्या.

हे आर्थिक स्थैर्य आणि स्वास्थ्य त्याला सुखद वाटले. परंतु त्याचबरोबर आपल्या लेखनावर अनेकांचे आर्थिक स्थैर्य व स्वास्थ्य अवलंबून आहे हेही त्याच्या लक्षात आले; आणि एक पुस्तक संपले की दुसरे, दुसरे संपले की तिसरे - ही शर्यत सुरू झाली. आर्थिक सुबत्ता ही आपल्या अपेक्षांना सतत वाढत्या उंचीवर नेते राहते; परंतु आपले पाय जमिनीवर घट्ट रोवून, ठेवणेच शहाणपणाचे असते. यश डोक्यात जाऊन भरकटणे इष्ट नसते. यश पचवून आपले लेखनकार्य निष्ठेने व पूर्ण ताकदीने करीत राहणे हेच सुज्ञपणाचे असते याचा विसर स्टिफन किंग स्वत:ला पडू देत नाही. मात्र त्याने इतकी वर्षे सातत्याने लेखन करून, पन्नासावर पुस्तके लिहून आता लेखन संन्यास घेण्याचे नुकतेच जाहीर केले आहे.

नव्या लेखकांना तुम्ही काय सल्ला द्याल - असा प्रश्न त्याला एकदा कोणीतरी विचारला; तेव्हा त्याने दिलेले उत्तर मार्मिक व मर्मग्राही आहे. ''यश मिळवू इच्छिणाऱ्या प्रत्येक नव्या लेखकाने त्या त्या वेळच्या लोकप्रिय कृतींचे अनुकरण करण्याचे शक्य तो टाळून, आपल्याला स्वत:चे वेगळे काही तरी जे सांगायचे आहे तेच सांगायची चिकाटी दाखवली पाहिजे. लेखन ही एक संवाद साधण्याची प्रक्रिया आहे हे अर्थातच लक्षात ठेवायला हवे. त्या दृष्टीने एक चांगला कथाकथनकार, कथानिवेदक म्हणून आपली क्षमता सतत वाढवत राहिले पाहिजे.

मेन राज्यातील बांगोर येथे तो राहतो. त्याची पत्नी तबिया ही देखील कादंबरीकार

म्हणून स्वत:ची वेगळी गुद्रा जपत असते. स्टिफन किंगच्या अनेक कथांची ती पहिली वाचक असते; आणि आपले निर्भिड मन ती सांगत असते. तिच्या मनाबद्दल त्याला आदर असतो. स्टिफन किंगला तीन मुले आहेत. कोट्यावधी डॉलर्स उत्पनन असणाऱ्या स्टिफन किंगची राहणी साधी आहे, घर प्रशस्त आहे पण त्यात अंगावर येणारा भपकेबाजपणाचा दर्प नाही. लेखन हे तेथले यज्ञकर्म म्हणून मानले जाते; आणि ते संपूर्ण श्रद्धेने नित्य आचरिले जाते.

स्टिफन किंगची रायडिंग दि बुलेट ही कादंबरी मार्च २००० मध्ये फक्त इंटरनेटवर उपलब्ध करून देण्यात आली; ती छापील पुस्तकाच्या स्वरूपात प्रसिद्ध होणार नाही असे जाहीर करण्यात आले. सीमन अँड शूस्टर्सच्या वेबसाइटवर अडीच डॉलर्स क्रेडिट कार्डद्वारे भरून ती वाचायला मिरवता येईल अशी योजना आखण्यात आली आणि या फक्त ६६ पृष्ठांच्या कादंबरीसाठी पहिल्याच दिवशी चार लाख ग्राहक वाचकांनी नावे नोंदवली - हा एक अचाट विक्रमच झाला. स्टिफन किंगच्या भयकथांचे लोकांना किती आकर्षण आहे - याचे हे बोलके उदाहरणच होय.

स्टिफन किंगच्या भयकथांच्या मध्यवर्ती कल्पनाच विलक्षण व चित्तथरारक असतात.

'दि ग्रीन माइल' म्हणजे फाशीची शिक्षा सुनावलेल्या आणि इलेक्ट्रिक चेअरची, प्रत्यक्ष मृत्यूच्या क्षणाची वाट पाहत असणाऱ्या खुनी गुन्हेगारांचा प्रतीक्षा कक्ष. हे असे शिक्षा झालेले कैदी कोल्ड माउंटन पेनिटेंटियरी या कारागृहाच्या ई ब्लॉक मध्ये ठेवण्यात येतात. त्या कारागृहाचा गार्ड पॉल एजकोम्ब याने गुन्हेगारांचे अनेक नमुने पाहिलेले आहेत. परंतु जॉन कॉफी हा त्या सर्वांपेक्षा वेगला माणूस आहे हे त्याला जाणवले. जॉन हा निग्रो -- दोन मुलींची हत्या केल्याचा आरोप त्याच्यावर असतो. परंतु एजकोम्बला पुढे कॉफीबद्दल तो निर्दोष आहे हे त्याला कळते त्यामुळे तो मुळापासून हादरतो, आणि आजवर प्रमाण व आदर्श मानलेल्या आपल्या सगळ्या श्रद्धाच जमीनदोस्त होताहेत असे त्याला वाटते. जॉन कॉफीच्या अंगी अशी काही सिद्धी असते की तो असाध्य व्याधी केवळ स्पर्शाने बऱ्या करतो. तो संत आहे की सैतान - असा प्रश्न पॉल एजकोम्बला पडतो. जॉन कॉफी बरोबरच एडवर्ड डेलाक्रॉइक्स आणि वुइल्यम 'विली दि किड' व्हार्टन हे दोन गुन्हेगारही फाशीची शिक्षा झाल्याने त्या कारावासात आलेले असतात. त्या तिघात आणि तुरुंगप्रमुख पॉल एजकोम्ब यांच्यात परस्पर आकर्षण सौहार्दाचे, मानवतेचे भावबंध निर्माण होतात. त्याचवेळी त्या भागात काही भयंकर घटना घडू लागतात आणि पॉल एजकोम्ब जॉन कॉफीच्या मदतीने त्या संकटाशी सामना करण्याचा घाट घालतो. त्या प्रयत्नात तुरुंगप्रमुख म्हणून त्याच्या कामाचाही कस लागतो. त्याच्या विरोधी भूमिका त्याचे वरिष्ठ घेतात. तुरुंगातून कॉफीला काही काळ बाहेर आणून पॉल त्याच्या हस्त सिद्धीचा वापर करून घेतो. एका मृत्युपंथावर असलेल्या स्त्रीला तो जीवदान देतो ; आणि तिच्या मेंदूतील गाठीचे तुकडे तो पर्सी वेटमोअरच्या डिशमध्ये टाकून त्याला घाबरवून सोडतो.जॉन कॉफीची केस पुन्हा चालवावी असे पॉलला वाटते; परंतु जॉन हा निग्रो; त्याचा या अलाबामा भागात कैवार घेणे कठिण. त्यामुळे पॉलची भावना शेवटी जी व्यक्त होते ती काहीशी आत्म-उद्विग्नतेची आहे. त्या सर्वसाक्षी ईश्वराने जॉन कॉफीला बलीवेदीवर चढवले; जॉन कॉफीने आपल्या रासवट पद्धतीने, आंधळ्याप्रमाणे चाचपडत खूप काही चांगले करण्याचा प्रयत्न केला. त्याचाच बळी दिला जावा हे काही चांगले नाही. पण देव असे घडू देतो आणि

असे रोज रोज घडत असते; हेही आपण बघतो. आपण म्हणतो, ''हे मला उमगत नाही''. आणि देव म्हणतो, ''मला त्याची पर्वा नाही.''

...पत्नीच्या अकस्मात निधनाने उद्ध्वस्त झालेला कादंबरीकार माइक नूनान त्या घटनेनंतर चार वर्षे काहीही लिहून शकत नाही; उलट रात्रीबेरात्री त्याला भयंकर स्वप्ने पडत राहतात. तो आपला सरोवराकाठच्या निवासस्थानी परत येतो तेव्हा आपले आवडते गाव एका सामर्थ्यशाली लक्षाधीशाच्या कबजात गेलेले त्याला दिसते. मॅटी या तरुण विधवेच्याजवळ राहणाऱ्या कायरा या आपल्या तीन वर्षे वयाच्या नातीला आपल्या ताब्यात घेऊन तिची संपत्ती हस्तगत करण्याचा कट तो धनिक मक्स डिव्होर रचतो तेव्हा त्या संघर्षात कादंबरीकार माइकही सामील होतो. त्याचे प्रेम मॅटी व कामरा यांच्यावर जडते. भुताने झपाटलेल्या सारा लॉफ्स या परिसराचे रहस्य उलगडण्याचे कामही मग त्याच ओघात त्याजकडून पार पडते ; अशी मध्यवर्ती कल्पना बॅग ऑफ बोन्समध्ये वापरली आहे.

'कॅरी'ने अमेरिकेतील कादंबरी वाङ्मयात एक वेगळा टप्पा गाठला गेला असे मानले जाते. हायस्कूलमध्ये शिकणारी मुलगी कॅरी व्हाइट हिच्या अंगी दूरवरचे दृश्य बघण्याची सिद्धी आहे. ती त्या सिद्धीचा वापर करून भयाचे व दहशतीचे एक सूडचक्र गतिमान करते; आणि त्यामुळे क्षणोक्षणी वाचक संभ्रमातच्या लाटांवर हिंदकळत राहतो.

नऊ वर्षाची त्रिशा मॅकफरलँड ही मुलगी मेन-न्यू हॅम्पशायर दरम्यानच्या एका सहा मैलाच्या भटकंतीवर निघाली आहे. तिचा मोठा भाऊ पेट आणि तिची नुकताच घटस्फोट घेतलेली आई यांच्यात चाललेल्या बाचाबाचीमुळे आपण कुठून त्यांच्याबरोबर आलो असा वैताग तिला येतो आणि ती त्यांना सोडून स्वत:च एकटी भटकत राहते. त्यांना गाठ-- ती एक शॉर्टकट शोधते; पण त्यामुळे त्यांची -- होण्याऐवजी ती आणखीनच घनदाट जंगलात सापडते. तशातच काळोख होतो. आणि तिला भयंकर भीती वाटू लागते. काही विचित्र गोष्टी घडताना दिसतात .... पण आपल्या स्वत:च्या आत्मबलावर आणि धैर्यावर त्या सर्व भयंकर दिव्यातून ती सहीसलामत सुटते. अशी कल्पना 'दि गर्ल हू लव्ह्ड् टॉम गोर्डन' या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे.

ड्रीमकॅचर या कादंबरीतील बीव्ह,हेन्री, पेटे आणि जॉनसी ही चार मुले डेरी या नावाच्या भुताने पछाडलेल्या गावात काही चमत्कारिक घटना अनुभवतात आणि त्या घटनांना धैर्याने तोंड देऊन बाहेर पडतात. मात्र त्या घटनांमुळे त्यांच्या वृत्तीत व वर्तनात आमूलाग्र बदल होते; अनेक गोष्टींचे प्रथमच त्यांना ज्ञान होते. या घटनाक्रमाला पंचवीस वर्षे झाल्यावर ते चौघे त्याच परिसरात पुन्हा शिकारीसाठी एकत्र येतात आणि त्यांना एक अनोळखी माणूस भेटून काहीतरी चमत्कृतिपूर्ण गोष्टी सांगतो. अन्यग्रहावरून आलेल्या एका चमत्कारिक प्राण्याशी त्यांची गाठ पडते आणि त्यातून प्रचंड गोंधळ माजतो.

...अशा रूपरेखांमधून अर्थातच स्टिफन किंगच्या हॉरर-ट्रिक्सची पुरेशी कल्पना येणे अवघड.पानापानावर तो काहीतरी नवी अनपेक्षित चाल दाखवतो, आणि आपल्याला विचार करायलाही अवसर न देता, नवीन काहीतरी पुढे ठेवतो... आपण एकापाठोपाठ एक धक्के खात राहतो.

स्टिफन किंगचे कथाकथनाचे कौशल्य आपल्याला भारून टाकते.

लेखक प्रांतोप्रांतीचे

भारतातील साहित्यक्षेत्रामध्ये पूर्वी भाषाभाषांमधील जी कुंपणे होती ती पार करणे फार अवघड असे. आपल्या शेजारच्या राज्यातील अग्रगण्य लेखकांचीही फारशी माहिती एकमेकांना नसे. त्यामुळे त्यांचे साहित्यही अपरिचित राही. त्यामानाने इंग्रजीतील जगभरचे लेखक हे जवळचे ठरत...

आता ही परिस्थिती बदलत आहे.

मराठी, हिंदी, बंगाली, कानडी, गुजराती, तेलगू, पंजाबी, उर्दू, उडिया इ. भाषांमधील नामवंत लेखकांचे साहित्य एकमेकांच्या भाषांत जाऊ लागले आहे. त्यामुळे भाषाभाषांमधील अंतर कमी होत आहे. एकात्म भारतीय साहित्याची संकल्पना आकार घेत आहे.

मेहता पब्लिशिंग हाऊसने इतर भारतीय भाषांतील उत्तमोत्तम कलाकृती मराठीत आणण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक चालवला आहे. अशा काही परभाषक लेखकांची व त्यांच्या साहित्याची ओळख करून देणारे लेख

यशस्वी भारतीय लेखक

कमलेश्वर



कमलेश्वर की कलमेश्वर ?

डॉ. पद्माकर जोशी

आधुनिक हिन्दी कथा-साहित्यातील प्रतिभावंत भाषाप्रभू कमलेश्वर ! हिन्दी कथेला नवा आकार, नवा घाट व नवी दिशा देणारा व सामाजिक बांधिलकी अभिमानाने मिरवणारा हा दूरदृष्टीचा कथा-साहित्याचा कोलंबस.

जन्म ०१ जानेवारी १९३२ रोजी मैनपूरी - उत्तर प्रदेशातील एक स्थान आणि आलाहाबाद विश्व विद्यालयाचे हिन्दी साहित्याचे एम. ए.

पण एवढ्याच पोकळ चौकटीत कमलेश्वरसारखे प्रतिभावंत भाषा प्रभू बंदिस्त राहू शकतात का ? राहू तरी शकतील का ?

हिन्दी साहित्याच्या सर्व क्षेत्रात ते वावरले व प्रत्येक शाखेत आपल्या नवनवोन्मेष शालिनी प्रतिभेचा ठसा उमटवला आणि म्हणूनच कमलेश्वर ही एक चिरंतन, चिरस्थायी नाममुद्राच झाली आहे.

कादंबरीच्या क्षेत्रात मळलेली वाट न चोखाळता स्वत:ची अशी वगळी वाट त्यांनी निर्माण केली. लघुकादंबरी सुप्रतिष्ठित केली. तिला साहित्यविश्वात प्रतिष्ठा मिळवून दिली. एक सडक सतावन तिलीया, लौटे हुआ मुसाफिर, समुद्र मे खोया हुआ आदमी,अतीत, काली आंधी, सुबह-दोपहर-शाम, रेगिस्तान, डाक बंगला, कितने पाकिस्तान !

या कादंबऱ्यातील 'कितने पाकिस्तान' कादंबरीव्यतिरिक्त इतर सर्व कादंबऱ्या लहान आहेत. लघु कादंबऱ्या असल्या तरी त्या केवळ आकाराने लहान आहेत. पण त्या दीर्घकथा नाहीत. त्या सर्व कादंबऱ्यांचा पट विशाल आहे. आशय कमालीचा ठसठशीत आणि भरीव आहे. कुठेही विस्कळीतपणा नाही. अतिशय बांधीव आणि रेखीव अशी प्रत्येक

कादंबरी लक्षवेधक आहे. कादंबरीच्या विषयाच्या आवश्यकतेनुसारच त्या त्या कादंबरीचा घाट आणि पट आहे.

कादंबरीच्या विश्वात लीलया संचार आणि नवनव्या उभारीने भराऱ्या घेताघेता ते लघुकथा क्षेत्रात चिरंतन पण वेगळी नाममुद्रा ठसठशीतपणे उमटवतात. इतकी की त्यांच्या नामोल्लेखाशिवाय, या क्षेत्रातले कार्यकर्तृत्व मान्य केल्याशिवाय हिन्दी आधुनिक कथेचा इतिहास आकार घेऊच शकत नाही.

लघुकथा क्षेत्रातदेखील कथा वैपुल्याबरोबरच अतुल्य कथा हे त्यांचं आगळं-वेगळं कर्तृत्व आहे.

राजा निरबंसिया, कस्बे का आदमी, खोई हुई दिशाएँ, बयान, जॉर्ज पंचम का नाक, मास का दरिया, इतने अच्छे दिन, कोहरा, मेरी प्रिय कहानियाँ, कथा-प्रस्थान, दस प्रातिनिधि कहानियाँ, भारतीय कथांचा शिखर-कथाकोश दहा भागात.

नयी कहानी की भूमिका, मेरा पन्ना हे समीक्षा ग्रंथ.

चारुलता, अधूरी आवाज, कमलेश्वर के बाल नाटक. ही नाटक क्षेत्रातील भरारी व भरीव कामगिरी.

अगदी वेगळ्या वळणाची प्रवास वर्णन - काश्मीर, रात के बाद, देश-देशांतर बंगला देश और आंधी की डायरी ! 'अपनी निगाहें हे संस्मरणात्मक पुस्तक.'

याशिवाय वेळोवेळीच्या मुलाखती आहेतच- मेरे साक्षात्कार कमलेश्वर !

मेरा हमदम : मेरा दोस्त, समांतर - है संपादन. अगदी अलीकडेच प्रकाशित झालेलं पुस्तक 'तुम्हारा कमलेश्वर' पत्नीला लिहिलेल्या पत्रांचं संकलन.

याशिवाय जी मैने जिया, यादों के चिराग, जलती हुई नदी हे त्रिखंडात्मक आत्मकथन.

हे तर केवळ साहित्यविश्वातील कार्यकर्तृत्व.



डॉ. पद्माकर जोशी

साहित्येतर प्रांतात देखील साहित्याप्रमाणेच अजोड कामगिरी थक्क करणारी आहे.

चित्रपट- पटकथा - दूरदर्शन मालिका तर केवळ अविस्मरणीयच !

चंद्रकांता, दर्पण, उसके बाद, फिर भी, वेताल पचीसी, युग, विराट, हिदोस्ताँ हमारा, अमानुष, सारा आकाश, मि. नटवरलाल, दि बर्निंग ट्रेन, राम-बलराम, मौसम, पति-पत्नी और वह, ही नामावली थक्क करणारीच म्हणावी लागेल.

भारतीय दूरदर्शनचे पहिले पटकथा लेखक व भारतीय दूरदर्शनचे ऑडिशनल डायरेक्टर १९८०-८२ या कालखंडात.

इतकेच नव्हे भारतीय दूरदर्शन हे नाव देखील त्यांचीच देणगी !

दूरदर्शनच्या स्वत:च्या पदाला इंग्रजी शब्दाने मिरवण्यात धन्यता न मानता अतिरिक्त महासंचालक हे नाव धारण करण्यात धन्यता मानली. पत्रकारितेच्या क्षेत्रातदेखील अशीच कामगिरी ! नई कहानियाँ, सारिका, गंगा, कथा-यात्रा (मासिक), इंगित, श्री वर्षा (साप्ताहिक) दैनिक जागरण (वर्तमानपत्र)इ. चे संपादन. सध्या 'दैनिक भास्कर' (राजस्थान) चे मुख्य संपादक.

वाचिक कार्यक्रमात सामान्य माणसाच्या सुख-दु:खांवर आधारित कार्यक्रम 'परिक्रमा'

सतत सात वर्षे प्रत्येक आठवड्याला नियमितपणे प्रसारित होत असे. युनेस्कोच्या १० सर्वश्रेष्ठ कार्यक्रमामध्ये उल्लेखनीय कार्यक्रम म्हणून गौरव, रचित कार्यक्रमात भारतीय कथांवर आधारित पाहिली साहित्यिक मालिका,'रेतपर लिखे नाम', 'बिखरे पन्ने', 'विराट' इ. अत्यंत यशस्वी व लोकप्रिय मालिकांचे लेखन.

राष्ट्रीय आणि महत्त्वाच्या घटना व्यक्ती यांच्याशी संबंधित रनिंग कॉमेंट्री. पं. नेहरू, लाल बहादूर शास्त्री, इंदिरा गांधी, राजीव गांधी आणि मदर टेरेसा यांच्या अखेरच्या प्रवासावर प्रत्यक्ष प्रसारणाचे प्रमुख कॉमेंटेटर.

एक माणूस इतके प्रचंड काम करू शकतो ? या माणसाची अचाट कार्यक्षमता पाहून आपण थक्क होतो. माणसाच्या कार्याच्या झगमटाने डोळे दिपतात. त्यांचा हा असाच प्रवास आजही सुरूच आहे. त्यांच्या दोन नवीन संकल्पित कादंबऱ्यांची वाच्यता मी करीत नाही. परंतु त्यातील एका कादंबरीचा विषय सर्वार्थाने नावीन्यपूर्ण व जिव्हाळ्याचा आहे. दुसऱ्या कादंबरीचा विषय ज्वलंत आणि दाहक आहे.

हिन्दी कथेला नवी दिशा, नवा घाट व नवा पट देण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. त्यांच्या कथा काळाच्या चक्रावर फिरत असतात. आपल्या कथा - स्रोताची ओळख आणि आपल्या परिवेशात जगण्याचा त्यांना अनावर मोह होत असतो.

अनुभवाच्या क्षेत्राची प्रामाणिक आणि विश्वसनीय ओळख, अनुभवांचे कालसंगत संदर्भ आणि अनुभवांच्या अर्थाप्रत पोचण्याचा प्रामाणिक प्रयत्न ही त्यांच्या कथांचं वैशिष्ट्य आहे. 'राजा निरबंसिया', 'खोई हुई दिशाएँ' 'मांस का दरिया, आसक्ति' वगैरे कथा अनुभवांच्या आधारावर म्हणूनच अर्थपूर्ण आहेत. त्यांच्या सर्व कथांचं केन्द्रीय कथ्य मनुष्यच आहे. हा माणूसच आपले संघर्ष, द्वन्द्व स्वत:च सहन करीत असतो आणि हताश निराश होत होत पुन्हा नव्या उमेदीने खंबीरपणे उभा राहत असतो. कमलेश्वर यांच्यात नवा जीवन-बोध, जीवनाची नवी जाणीव, नवी संवेदना, नवीन कथ्य आणि नवीन कथाशिल्प प्रकर्षानं जाणवतं. आधुनिक कथेविषयी चर्चा करताना कमलेश्वरना नजरेआड करणं केवळ अशक्यच नाही तर अन्याय्य आहे.

लेखकाच्या दृष्टीने व हिंदी कथेच्या दृष्टीने तुम्ही कथा लेखक का झालात, या प्रश्नाचे उत्तर देताना ते म्हणतात **'कथालेखन हा माझा व्यवसाय नसून विश्वास आहे. श्रद्धा आहे... अस्तित्वाच संकट एक कारकून किंवा दुकानदार बनून देखील सहन करता आलं असतं. त्यांच्याशी संघर्ष करता आला असता, परंतु मी लेखक एवढ्यासाठी आहे की ते संकट सहन करीत असताना त्याच बरोबर ते संकट परतवून देखील लावता येतं,** माझ्या दृष्टीने कथा-लेखन यातना नसून यातनामय आहे. कारण तीच स्थिती मला कथा-लेखन करायला उद्युक्त करते. प्रेरणा देत असते. माझं स्वत:चं संकट इतरांच्या संकटांशी नातं जुळवत आणि ते माझ्या मनाला असह्य होत असतं. माझी स्वत:ची करुणा इतरांच्या संवेदनाशी नात जुळवून अनात्म होते. अधिक व्यापक विशाल होते. ते म्हणतात. कथा मला इतरांशी जोडते. इतरांशी नवं नातं जुळवते. किंबहुना अस म्हणेन की अनेकांशी नातं जुळवण्याचे सांस्कारिक स्थितीच कथेला जन्म देते. माझं जीवन इतिहाससापेक्ष आहे. त्यात सर्व अन्तर्द्वंद्वाचे साक्षीदार आहे. व्यक्ती आणि त्याची सामाजिकता दोन्होंचा असो. या प्रतिभावन्ताच्या प्रतिभेची भरारी आणि झेप पाहिल्यावर 'तू शाही है, परवाज़ है, काम तेरे सामने आसमाँ और भी है । ' असंच म्हणावंसं वाटतं.

यशस्वी भारतीय लेखक

रवीन्द्रनाथ टागोर



सृजनशील आनंद यात्रिकाची विविध रूपे

डॉ. सौ. मृणालिनी प्र. गडकरी

विश्वकवी रवीन्द्रनाथ टागोर (१८६१ - १९४१) ह्यांना आपण ओळखतो ते आशियातील पहिले नोबेल पारितोषिक विजेते म्हणून. त्यांच्या 'गीतांजली' ह्या काव्यसंग्रहाला १९१३ साली साहित्याचे नोबेल पारितोषिक मिळाले. रवीन्द्रनाथ स्वत:ही स्वत:ला कवी म्हणवून घेत असले तरी त्यांनी साहित्यातील प्रत्येक क्षेत्रावर आपला वेगळा ठसा उमटवला आहे. काव्य, नाटक, कथा, कादंबरी, बालवाङ्मय, निबंध, प्रबंध अशा सर्व साहित्यप्रकारांत त्यांची लेखणी लीलया चालली.

घरची भाषा म्हणून बंगाली, वाडवडिलांकडून वारसा म्हणून आलेली संस्कृत, मुस्लिमांना सहकार्य करताना शिकावी लागलेली पर्शियन आणि उद्योगधंद्यात इंग्रजांशी संपर्क ठेवण्यास लागणारी इंग्रजी अशा चार भाषांचा चांगला परिचय टागोर घराण्याला होता. हिंदू, मोगल व इंग्रज ह्या तीन संस्कृतीतील चांगले ते निवडून टागोरांनी आपली अशी सुंदर संस्कृती निर्माण केली होती. अशा सुसंस्कृत घरात महर्षी देवेन्द्रनाथ व शारदादेवी ह्यांच्या पोटी रवीन्द्रनाथांचा जन्म झाला. ह्या मातापित्याचे रवीन्द्रनाथ हे चौदावे अपत्य होते. प्रतिभा आणि संवेदनशीलता ह्यांची दैवदत्त देणगी त्यांना लाभली होती.

रवींद्रनाथांना अगदी बालपणापासूनच कविता लिहिण्याची आवड होती. त्यांनी वयाच्या नवव्या वर्षी खोलीच्या खिडकीतून दिसणाऱ्या प्रचंड वडाच्या झाडाला उद्देशून पहिली कविता लिहिली. हे लेखन आयुष्याच्या अंतापर्यंत चालूच होते. रवीन्द्रनाथांनी जवळ जवळ दीड हजार कविता आणि तेवढीच गीते लिहिली. त्यांच्या कविता साठहून अधिक संग्रहात समाविष्ट करण्यात आल्या आहेत.त्यांनी लिहिलेली गीते आजही बंगालमध्ये आयुष्यातील सुखदु:खाच्या प्रसंगात आवर्जून म्हटली जातात. 'रक्तकरबी', 'डाकघर' नाटके, 'श्यामा', 'कालमृगया' इ. नृत्यनाटिका, 'वाल्मीकी प्रतिभा' गीतिनाट्ये, 'नौका डुबी', 'घरे बाहिरे', 'गोरा' इ. कादंबऱ्या , 'अतिथी', 'काबुलीवाला', 'पोष्टमास्तर', 'समाप्ती' इ. कथा, 'सहज पाठ','शिशु' 'शिशु भोलानाथ' इ. बालसाहित्य, निबंध, प्रबंध असे विविध साहित्यप्रकार त्यांच्या लेखणीतून नुसतेच उतरले नाहीत तर अजरामर झाले.

रवीन्द्रनाथांनी लिहिलेल्या प्रमुख साहित्यप्रकाराची ठळक वैशिष्ट्ये येथे मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

रवीन्द्रनाथांनी वयाच्या चौदाव्या वर्षी लिहिलेल्या 'बनफूल' ह्या दीर्घकाव्यात 'निसर्ग आणि मानव ह्यांच्यात अंतर पडल्यास मानवतेचा अंत होतो', हे दाखवून आपल्या द्रष्टेपणाची साक्ष पटवली आहे. बंगालमधील वैष्णवांच्या रचनांनी त्यांनी भारावून टाकले होते. वयाच्या पंधराव्या वर्षी ह्या रचनांच्या धर्तीवर त्यांनी ज्या रचना केल्या त्या 'भानुसिंह ठाकुरेर पदावली' ह्या नावाने प्रसिद्ध झाल्या. त्यात त्यांनी जन्म-मृत्यूबद्दल विचार मांडले आहेत. ते त्यांच्या प्रतिभा संपन्नतेची आणि प्रगल्भ बुद्धिमत्तेची साक्ष देतात. रवीन्द्रनाथ आत्यंतिक निसर्गप्रेमी होते. त्यांच्या मते निसर्ग व मानव एकमेकांवर अवलंबून आहेत. मानव निसर्गावर फक्त त्याच्या जैविक गरजा भागवण्यासाठीच अवलंबून नाही तर निसर्गातील नियमांना मानवच अर्थ लावतो. निसर्ग निर्जीव नाही. तोही माणसाप्रमाणेच चैतन्यमय आहे. मानवाचे जीवन आणि निसर्ग ह्यातून सळसळणारे चैतन्य एकच आहे. ते सुंदर आणि आनंददायी आहे. ह्या चैतन्यालाच

डॉ. सौ. मृणालिनी प्र. गडकरी

रवीन्द्रनाथ 'जीवनदेवता' (जीवनदेव) म्हणतात. ज्या प्रभूला आपण पाहू इच्छितो, भेटू इच्छितो, त्याच्यापासूनच हे चैतन्य येते आणि सर्वांनाच गतिमान बनवते. ह्या चैतन्याने सर्वांना एकत्र बांधले आहे. ह्या 'भावा'लाच त्यांनी 'सर्वानुभूती' म्हटले आहे. ही कल्पना त्यांच्या काव्यात विविध रूपांत येतेच व इतरही साहित्यात ती दिसते. त्यांची कविता जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारी आहे. प्रेम, वात्सल्य, स्त्री व तिच्यातील माधुर्य, अध्यात्म, ईश्वरभक्ती, राष्ट्रभक्ती, सामाजिकता, मानवतावाद असे विविध विषय त्यांच्या काव्यात येतात. विषय कोणताही असो, रवीन्द्रनाथांचा दृष्टिकोन वेगळा असतो, वैशिष्ट्यपूर्ण असतो.

रवीन्द्रनाथांनीच बंगाली लघुकथेची सुरवात केली असे म्हणता येईल. निसर्गाचे भाव ते जसे टिपत तसाच माणसांच्या सुखदु:खाचा ठाव घेत. त्यांच्या कथेतून त्या काळचे समाजदर्शन घडतेच. पण ती कथा अधिक खोल जाऊन माणसाच्या मनाचाही वेध घेते. 'काबुलीवाल्या'त बापाचे हृदय कळते तर 'पोष्टमास्तर' मध्ये स्त्रीचे हृदय समजणे किती अवघड आहे हे लक्षात येते. 'समाप्ती' मध्ये एका अवखळ बालिकेचे समंजस युवतीत झालेले

रूपांतर आपल्याला वेडावून टाकते. निसर्गाच्या वृत्ती आणि माणसांच्या भावना ह्यांच्यातील गूढ गंभीरता रवीन्द्रनाथांना स्पष्टपणे आकळत असल्याने त्यांच्या कथेतील पात्रे आणि निसर्ग दोन्हीही जिवंत वाटते. त्यांची कथा ही इथल्या मातीतून जन्मली आहे. ती एखाद्या नाजुक, सुंदर फुलाप्रमाणे सहजपणे फुलत जाते.

रवीन्द्रनाथांनी कादंबरी लेखनाला सुरवात करण्यापूर्वी बंकिमचंद्रांनी तिला प्रतिष्ठा मिळवून दिली होती. रवीन्द्रनाथांनी कादंबरीला आणखी पुढे नेले. कादंबरीतील कथानकात बाह्य घटनांवर जोर देण्याऐवजी कादंबरीतील पात्रांच्या मानसिक क्रियाप्रतिक्रियांच्या संघर्षातून त्यांनी कथानक पुढे सरकवले. हे अभिनव होते. त्यामुळेच त्यांच्या 'नौका डुबी' आणि 'चोखेर बाली' ह्या कादंबऱ्यांना बंगाली साहित्यात एक वेगळे आणि आगळे स्थान मिळाले. 'नष्ट नीड' ही लघुकादंबरी. तिच्यात गूढ, सूक्ष्म मानसिक आंदोलने यशस्वीपणे रेखाटली आहेत. 'गोरा'त मात्र समाजसंक्रमणाचा आलेख रेखाटला आहे. ह्यातील व्यक्तिरेखा प्रतीकात्मक असूनही रवीन्द्रनाथांच्या प्रतिभास्पर्शाने चैतन्यमय झाल्या आहेत. 'घरे बाहिरे'ही स्वदेशी-चळवळीची चिकित्सा करणारी कादंबरी. ह्या कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे ती प्रमुख पात्रांच्या आत्मनिवेदनातून साकारली आहे. कथा-कादंबरी-लेखनात रवीन्द्रनाथांनी नवेनवे प्रयोग केले. 'त्यांचे प्रयोग यशस्वी झाले'असेच म्हणावे लागते.

रवीन्द्रनाथांनी नाटकात जे प्रयोग केले ती एक आनंदाची सर्जनक्रीडा होती, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. नाटक, एकांकिका, संगीतिका, नृत्यनाट्य, गीतनाट्य, प्रहसन असे निरनिराळे प्रकार त्यांनी हाताळले. त्यांची नाटके काव्यात्म आहेतच, पण तत्त्वचिंतनात्मकही आहेत. नाट्याचा त्याचा परिवेश वेगवेगळा असला तरी त्यांचे ध्येय ऐहिकातून अलौकिक आनंद मिळवणे हेच असते. 'जीबनदेवता' ह्या कल्पनेचा आविष्कार झाल्यापासून हा ध्यास वाढलेला दिसतो. ह्यासाठी 'शरदोत्सव', 'अचलायतन', 'डाकघर', 'चित्रांगदा', 'चांडालिका', 'श्यामा' ह्या त्यांच्या नाट्यकृती पाहण्यासारख्या आहेत. भौतिक व बौद्धिक विकासाबरोबर माणसाने माणुसकीला पारखे होणे त्यांना पसंत नाही. माणसाच्या जीवनाशी जुळलेला निसर्गाचा धागा तुटल्यास ते त्यांना सहन होत नाही. 'डाकघर' व 'फाल्गुनी'तील प्रतीकात्मता आपल्याला अचंबित करते. 'प्रकृतिर प्रतिशोध', 'राजा ओ राणी', 'चित्रा' ह्यांतील संवाद लक्षात राहण्यासारखे आहेत. 'वाल्मीकी प्रतिभा' ह्या गीतनाट्यात वाल्मीकीच्या कथेला एक अनोखी कलाटणी दिली आहे. ह्यात भारतीय आणि पाश्चात्त्य संगीताचा सुरेख मेळ साधला आहे. रवीन्द्रनाथ जसे गंभीर तत्त्वचिंतक होते तसेच खळखळून हसणारे आणि हसवणारेही होते, हे 'वैकुंठाची पोथी','चिरकुमार सभा','स्वर्गीय प्रहसन' वगैरे प्रहसनांवरून सिद्ध होते. मनुष्य स्वभावातील व्यंग्य हेरून त्यांनी उपहास साधला आहे. त्यांची नाटके ही वाचण्यापेक्षा पाहणे जास्त आनंद देणारे आहे. ह्या नाट्यकृतींतून जीवनाचे हीण गाळून विशुद्ध लावण्यदर्शन ते घडवतात.

नोबेल पारितोषिक मिळवणारा हा महाकवी, शेवटपर्यंत, शांतिनिकेतनमध्ये बालवर्गाला शिकवत होता. - आणि तेही संपूर्ण तयारी करून, प्राध्यापकांप्रमाणे टिपणे काढून. ह्यावरूनच त्यांच्या जीवनात बालकांना किती महत्त्वाचे स्थान होते, ते लक्षात येते. ह्यामुळेच त्यांनी लिहिलेले बालसाहित्यही विलक्षण सुंदर आहे.

त्यांच्या मते आपण नेहमी जाणीवपूर्वक लेखन करतो. म्हणूनच विशिष्ट गोष्टीवर लक्ष केंद्रित करून बाकी गोष्टींकडे दुर्लक्ष करतो. पण हे चूक आहे. ह्यामुळे गवसते त्याच्या कितीतरी पट हरवते. लहान मुलांचे सर्व जगच निराळे असते. तेथे आपले नियम उपयोगी पडत नाहीत. किंबहुना तेथे नियमांचे बंधन नसतेच. तेथे असते कल्पनेची भरारी. इच्छा, आनंद, ,कल्पकता ह्यांना तेथे मुक्तद्वार असते. लय, ताल ह्यांचीच फक्त आवश्यकता असते. तेथे हवी असते स्वाभाविक सहजता. पण ही गोष्ट वाटते तितकी सोपी नाही. रवीन्द्रनाथांना हे साधले ह्याचे कारण ह्या लेखनामागेही त्यांचे तत्त्वचिंतन होते, बालमानसाचे त्यांना उत्तम ज्ञान होते. 'सहज पाठा'सारखी क्रमिक पुस्तके, 'शिशु', 'शिशु भोलानाथ' सारखे काव्यसंग्रह ह्या साठी मुळातूनच वाचायला पाहिजेत. मुलांना काय आवडते, त्यांना काय द्यायला पाहिजे ह्यांची उत्तम जाण त्यांच्यापाशी असल्याने त्यांनी मुलांसाठी लिहिलेले साहित्य अत्यंत श्रेष्ठ ठरते.

काव्य, कादंबरी, नाटके, कथा ह्या व्यतिरिक्त रवीन्द्रनाथांनी निबंध, प्रबंध, पत्रे वगैरे लेखन खूपच केले आहे. त्यांची व्याख्याने, संभाषणे, त्यांनी केलेल्या वेगवेगळ्या विषयांवरील चर्चा ह्यांचे संग्रहही उपलब्ध आहेत. ह्या साहित्यात त्यांनी भारताच्या सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक व साहित्यिक प्रश्नांचा अत्यंत सखोलपणे विचार केलेला दिसतो. कोणत्याही प्रश्नावर विचार करत असताना त्यांचे 'सुंदर-सत्य-शिवा'चे भान सुटत नाही. मानवताधर्माचा विसर पडत नाही आणि विश्वात्मकतेकडे जाण्याची त्यांची ओढ स्पष्ट दिसून येते. ह्या साहित्यातूनही त्यांच्या द्रष्टेपणाचे दर्शन घडते. "Personality", 'Creative Unity', 'Nationalism', 'Sadhana', 'Religion Of Man' ही पुस्तके ह्याची द्योतक आहेत. ते स्वभावत:च तत्त्वदर्शी व तत्त्वस्पर्शी असल्याने त्यांच्या साहित्यात मौलिकता आणि आशयघनता दिसते. म्हणूनच हे साहित्य अखंड स्मरणात राहते.

रवीन्द्रनाथ महान साहित्यिक ठरले. सर्व जगानेच त्यांना आपले मानले. असे का झाले ? ह्याचे कारण रवीन्द्रनाथांच्या साहित्यात पूर्णत्वाकडे जाण्याची , शांती मिळवण्याची आणि त्यातूनच अपूर्व आनंद निर्माण करण्याची क्षमता आहे. भारतीयत्त्वाचे हे प्रमुख लक्षण त्यांच्या साहित्यात प्रकर्षाने प्रकट होते. त्यांच्या मते मनुष्यलोक हा स्वर्ग आणि पृथ्वी ह्यांनी बनलेला आहे. म्हणूनच ते माणसाच्या अपूर्णतेचे वर्णन करत नाहीत, त्याच्या स्वर्ग मिळवण्यासाठी चाललेल्या ध्यासाची कल्पना त्यांना मान्य नाही. त्यांना वर्णायचा आहे तो माणसातील 'सत्' चा अंश.

त्यांच्या साहित्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विकास निसर्ग - प्रभू - मानवता असा त्याचा प्रवास असल्याचे दिसते. देव किंवा प्रभू भेटल्यावर ते मानवतेकडे वळल्यामुळेच 'विश्वमानव'ठरतात. असे होण्याचे कारण म्हणजे रवीन्द्रनाथांचे व्यक्तिमत्त्व. एका रवीन्द्रनाथांमध्ये अनेक रवीन्द्रनाथ वास करतात. कवी, कथाकार, कादंबरीकार, नाटककार, संगीतकार, चित्रकार, नट, गायक, उत्तम शिक्षक, तत्त्वचिंतक, क्रांतिकारक प्रयोग करणारे शिक्षणतज्ञ, समाजसुधारक, वैद्य, शेतीसुधारक, ग्रामसुधारक अशी ह्या आनंदयात्रीची विविध रूपे होती. तेव्हा अशा व्यक्तीने लिहिलेले साहित्य अनन्यसाधारण झाले नाही तरच नवल !

यशस्वी भारतीय लेखक

डॉ. प्रतिभा राय

ओरिसातील बदलत्या जीवनमूल्यांचा मागोवा घेणारी समर्थ लेखिका

डॉ. वासुदेव जोगळेकर
राधा जोगळेकर

'आख्यायिका' मधे वास करून आपला साहित्यसुगंध चहुकडे पसरवणाऱ्या नामवंत लेखिका डॉ. प्रतिभा राय, यांनी ओडिया साहित्याबरोबरच, भारतीय साहित्यातही आपला विशेष ठसा उमटवला आहे. 'याज्ञसेनी' कादंबरीसाठी १९९१ चा मूर्ति पुरस्कार त्यांना मिळाला आहे आणि हा पुरस्कार मिळवणाऱ्या त्या पहिल्या उडिया लेखिका आहेत. गेली तीस वर्षे त्या साहित्यसाधना करत आहेत.

त्यांचा जन्म कटक जिल्ह्यातील अळाबोळ ह्या खेडेगावी २१ जानेवारी १९४४ रोजी झाला. त्यांचे बालपण आणि शालेय शिक्षण बालीकुदा येथे झाले. त्यांचे वडील श्री. परशुराम दास पेशाने शिक्षक होते. बालीकुदा हायस्कूलचे हेडमास्तर होते. आईची शिस्त, वडिलांचे संस्कार, घर आणि आजुबाजूंच्या सांस्कृतिक वातावरणाचा प्रभाव त्यांच्यावर होता. त्यांच्यात असलेलं कवियत्रीमन त्यांना स्वस्थ बसून देत नव्हतं. पाचव्या इयत्तेत असतानाच त्यांची पहिली कविता 'सकाळ हेला' (सकाळ झाली) 'मीना बाजार' पत्रिकेत छापून आली. ती कविता आप्तेष्टांना दाखवून त्यांचे वडील आनंदाने म्हणाले, ''माझी झुनू आज कवयित्री झाली.'' ह्या वाक्याचा ठसा त्यांच्या मनात खोलवर उमटला पुढच्या प्रदीर्घ साहित्य वाटचालीसाठी ते वाक्य म्हणजे त्यांच्या साहित्यप्रेरणेसाठीचा प्रथम शंखनाद होता.

प्रतिभाने डॉक्टर व्हावे अशी त्यांच्या वडिलांची फार इच्छा होती. त्यांनी मेडिकल कॉलेजमधे प्रवेशही घेतला होता. पण तिथून नाव काढून 'बॉटनी' विषय घेऊन त्यांनी बीएस्सी. केले. शिक्षणशास्त्र हा विषय घेऊन त्यांनी

एम. एड. केले व शैक्षणिक मानसशास्त्र घेऊन डॉक्टरेट केले. सध्या त्या ओरिसाच्या लोकसेवा आयोगाच्या सदस्य म्हणून काम करत आहेत.

कॉलेजमधे शिकत असताना त्यांनी आपली पहिली लघुकथा 'नष्ट छंद' लिहिली. शिकवत असताना आपली पहिली कादंबरी 'वर्षा वसंत वैशाख'त्यांनी १९७४ साली लिहिली. इथूनच खऱ्या अर्थाने त्यांच्या साहित्यप्रवासाची सुरवात झाली, पहिल्याच कादंबरीने त्यांनी ओडिया वाचकांची मनं जिंकली.

ओरिसाच्या लेखकांची मुख्य अडचण म्हणजे, त्यांना आपलं साहित्य प्रकाशित करण्यासाठी प्रकाशकांची हांजी हांजी करावी लागते आणि मोबदल्याची शक्यता नसते. डॉ. रायही त्याला अपवाद नव्हत्या. त्यांचे पती श्री. अक्षय राय हे इंजिनीयर आहेत, त्यांच्या प्रोत्साहनामुळे 'आद्या प्रकाशनी' चा जन्म झाला. स्वत:च्या प्रकाशनामार्फत त्यांनी अनेक लघुकथासंग्रह, कादंबऱ्या, प्रवासवर्णनं वाचकांपर्यंत पोचवली. वाचकांनीही त्याला भरपूर प्रतिसाद दिला आणि वेगवेगळ्या पुरस्कारांनी त्यांना अलंकृत केले.

केवळ ओरिसातच नव्हे तर भारतभर एक नामवंत लेखिका म्हणून त्यांना सन्मान मिळाला. एकूण २० कादंबऱ्या, २२ लघुकथासंग्रह, प्रवास वर्णनं, बालसाहित्य व त्यांनी स्वत: इतर भाषांमधून ओडियात अनुवादित केलेले साहित्य. त्यांनी ओडिया साहित्य समृद्ध केले आहे. त्याचं साहित्य अनेक भारतीय भाषांमध्ये (मराठीसह 'पूजाघर' कथासंग्रह) अनुवादित होऊन लोकांपर्यंत पोचलं आहे. इंग्रजीमधेही त्यांच्या कथा-कादंबऱ्यांचा अनुवाद झालेला आहे. टेलिव्हिजन माध्यमातून 'याज्ञसेनी' त्यांच्या कथेवर निर्माण झालेल्या 'मोक्ष' चित्रपटास ' राष्ट्रीय पुरस्कार' मिळाला आहे.

वेळोवेळी मिळालेल्या पुरस्कारांच्या संदर्भात डॉ. राय म्हणतात, ''लेखकाची स्वत:ची अनुभूती



डॉ. वासुदेव जोगळेकर

आणि आसपासच्या परिसराचं अनुभवकथन म्हणजे साहित्य होय. कुठलाही पुरस्कार म्हणजे लेखकासाठी स्वीकृती असते आणि ही स्वीकृती त्याला आत्मपरीक्षण करून अधिकाधिक चांगल्या साहित्य निर्मितीसाठी प्रेरित करते.''

दैनंदिन जीवनातल्या घटनांमुळे मनात उठणारा विद्रोह, आपल्या साहित्यामधून व्यक्त करून, सामाजिक परिवर्तनाचा प्रयत्न त्यांनी 'शीलापद्म' 'याज्ञसेनी' पर्यंतच्या लेखनात केला. 'वर्षा वसंत वैशाख' ते 'महामोह' पर्यंतचा प्रवास हा - ओरिसातील ग्रामीण जीवन व परंपरेला धरून ठेवणाऱ्या साध्याभोळ्या ग्रामीण पात्रांपासून तो पौराणिक काळातील द्रौपदी व त्याही आधीच्या वैदिक काळातल्या आहिल्येपर्यंतचा आहे. सगळ्याच व्यक्तिरेखा सजीव झालेल्या दिसतात. माणसाच्या सामाजिक, मानसिक अडचणीचं प्रातिनिधिक स्वरूप त्यांच्या कथांमधे सापडतं. त्यांच्या लघुकथा जास्त प्रत्ययकारी असतात. वैदिक, सामाजिक, पौराणिक कादंबऱ्या लिहित असताना इतिहास आणि दंतकथांचाही वापर त्यांनी केला. त्याचा प्रत्यय 'शीलापद्म' मधे येतो. स्वतंत्रता संग्राम व दासीप्रथेवरचा अनुभव 'उत्तरमार्ग' मधे येतो. परंपरागत रूढींमुळे समाजात स्त्रियांचंच कसं शोषण होतं हे 'उत्तरमार्ग' मधे वाचायला

राधा जोगळेकर

मिळते. 'आदिभूमी' कादंबरी ओडिया साहित्यात एक मोलाचा टप्पा मानली जाते. 'भगबाँर देस' (भगवंताचा देश) हा लघुकथासंग्रह बंडा आदिवासी जीवनावर आधारित आहे.

अनुभवाच्या शिदोरीतून त्यांनी स्वत:ची एक शैली निर्माण केली आहे.

त्यांच्या कथांमधे वापरलेल्या ग्रामीण भाषेबाबत त्या म्हणाल्या, 'जेव्हा मी खेड्यात होते तेव्हा शहर मला खुणावत होतं आणि आता जेव्हा शहरात रहात आहे तर माझं खेड मला बोलावतं आहे. ते गाव सतत बरोबर आहेच. वाढत्या वयाबरोबर गावाबद्दलंच आकर्षणही वाढत आहे.''

समाजातील स्त्रीचे स्थान, तिची अगतिकता, वेगवेगळ्या कारणांनी होणारी तिची लाचारी, तसेच विविध नातेसंबंध यांचा शोध त्यांनी घेतलेला दिसतो. नवरा म्हणून, मुलगा म्हणून स्त्रीवर असलेले पुरुषांचे वर्चस्व, स्त्री शरीराची होणारी विटंबना आणि स्त्री म्हणजे एक उपभोग्य वस्तू ही भावना यांचे भेदक विश्लेषणही असते. मुलगी म्हणजे मातीची बाहुली. हुंड्यापायी त्रास सहन करणारी पण हे सर्व अडथळे पार करून, पुढे जाऊन, समाजात स्वत:चे स्थान ती कसे निर्माण करते हे त्यात दाखवतात.

असे असूनही त्या स्वत:ला फेमिनिस्ट (स्त्रीमुक्तिवादी) मानत नाहीत. 'याज्ञसेनी' ला मिळालेल्या मूर्ति पुरस्कार वितरण समारंभात त्यांनी स्त्री-पुरुष समानतेचा आवर्जून उल्लेख केला होता. **''मी मानवतावादी आहे. समाजाच्या निरोगी कार्यप्रणालीसाठी म्हणून स्त्री आणि पुरुष अशी निर्मिती झाली. स्त्रीला जन्मत:च मिळालेल्या गुणांची जोपासना होणे आवश्यक आहे, पण एक मानव म्हणून वा माणूस म्हणून स्त्री आणि पुरुष दोघेही समान आहेत.''**

डॉ. प्रतिभा राय यांच्या कथा-कादंबऱ्यामधे शहरी जीवनातील गुंतागुंत, सुशिक्षित समाजामधील विकृत पारिवारिक जीवनशैली, शारीरिक आसक्ती, विकृत भोगलालसा, अंतर्द्वंद्व आणि जगण्याबद्दलची आगतिकता इ. दिसतात. स्वत:ला आधुनिक म्हणवून घेणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या मानसिक स्तराचे विश्लेषण करून, ते वाचकांपर्यंत त्या पोचवतात. आधुनिक माणसाचं विकलांग व्यक्तिमत्त्व,अंतर्मनातील संघर्षमय भावना, विकृत मानसिकता, संस्कारहीनता इत्यादी प्रकारच्या घडवणाऱ्या पाश्चिमात्य संस्कारांपेक्षा आपला आध्यात्मिक संस्कार किती महत्त्वाचा हे त्या दाखवतात. म्हणूनच सुखदु:खाच्या समान पातळीवरून त्या माणसाकडे बघतात. माणूस हा समाजातील प्रमुख घटक, समाजासाठी माणूस नाही.

गुरुदेव रवींद्रनाथांच्या शब्दात सांगायचे तर-

मरीते द्वे चाइना आमी सुंदर भुवने
मानुसर माझे आमी बंचीबार चाइ

सुंदर अस हे जग सोडून मरायची माझी इच्छा नाही तर माणसांच्या मेळाव्यात राहूनच जगायची माझी इच्छा आहे.

डॉ. वासुदेव जोगळेकर
राधा जोगळेकर

डॉ.प्रतिभा राय यांना मिळालेले पुरस्कार

१. ओरिसा साहित्य ॲकॅडमी पुरस्कार 'शीलापद्म' साठी १९८५
२. सारडा पुरस्कार 'याज्ञसेनी' साठी १९९०
३. मूर्ती पुरस्कार 'याज्ञसेनी' साठी १९९१
४. विषुव पुरस्कार १९९५
५. राष्ट्रीय पुरस्कार १९९६ 'मोक्ष' (उत्कृट कथा)
६. राष्ट्रीय एकता पुरस्कार १९९९
७. केंद्र साहित्य ॲकॅडमी 'उल्लंघन' साठी २०००
८. राजीव गांधी सद्भावना पुरस्कार २००२

भारतीय भाषांतील उत्तम कथा-कादंबऱ्याचे दर्जेदार अनुवाद

पूजाघर

मूळ लेखिका - प्रतिभा राय
अनु : डॉ. वासुदेव/राधा जोगळेकर
किंमत - ८० रु. पोस्टेज : २०रु.

रावीपार

मूळ लेखक : गुलजार
अनु : विजय पाडळकर/मोहन वेल्हाळ
किंमत - १५० रु. पोस्टेज : २०रु.

छंछ

मूळ लेखक : विजयदान देथा
अनु : वनिता सावंत
किंमत - १५० रु. पोस्टेज : २०रु.

महाश्वेता

मूळ लेखक : सुधा मूर्ती
अनु : उमा कुलकर्णी
किंमत - १२० रु. पोस्टेज : २०रु.

यशस्वी भारतीय लेखक

डॉ. एस. एल. भैरप्पा



भैरप्पा आणि त्यांच्या कादंबऱ्यांचे अनुवाद

सौ. उमा वि. कुलकर्णी

अनुवाद करायला सुरुवात करून दोन - तीन वर्षे झाली होती. दोनेक अनुवाद हातावेगळे झाले होते. अनुवाद करताना अपूर्व आनंद मिळे. आणखी अनुवाद करण्याचा उत्साह वाढे. त्यामुळे भेटेल त्या कन्नड वाचकाबरोबर कन्नडमधील इतर लेखकांविषयी आणि कादंबऱ्यांविषयी बोलणं आणि अधिक चौकशी करणं हा माझा आवडता उद्योग होऊन बसला होता. अशा वेळी भैरप्पांचं नाव निघणं अपरिहार्य होतं. श्री.सुहास देशपांडे या नातेवाईकानं 'वंशवृक्ष' चं नाव सुचवलं. त्या नंतर मी सौ. सुधा मूर्तींशीही बोलले. या दोघांपैकी कुणीतरी आपल्याकडची कन्नड कादंबरीही आम्हाला दिली आणि त्यानंतर भैरप्पांच्या कादंबऱ्यांच्या अनुवादाचं पर्व सुरू झालं.

'वंशवृक्ष' आणि 'पर्व' चे अनुवाद मी जितक्या झपाटून केले, तितक्याच उत्स्फूर्तपणे ते वाचकांनी वाचले. त्याप्रमाणे त्यांनी भरभरून अभिप्रायही पाठवले. ही झाली पुढची गोष्ट.

माझा 'वंशवृक्ष' चा अनुवाद पूर्ण झाला, त्यावेळी भैरप्पा पुण्याला आले होते. माझा उत्साह इतका होता की मी त्यातल्या अगदी नगण्य बारीकसारीक मुद्यांवर त्यांच्याशी वाद घालायची. हे दृश्य पाहून हे आणि पुंडे सर स्वत:ची करमणूक करून घ्यायचे ! विशेष म्हणजे नंतर त्यांनी 'पर्व' पाठवली आणि 'दाटु' च्या अनुवादासाठी केंद्र साहित्य अकादमीला माझं नाव सुचवलं !

एक दिवस असा आला की भैरप्पांच्या या मोठमोठ्या आणि महत्वाच्या तीन कादंबऱ्यांच्या हस्तलिखिताचे गठ्ठे तयार होते. पण त्यातली एकही प्रकाशित झाली नव्हती ! त्यानंतर मात्र एक-एक करून त्या प्रकाशित झाल्या. माझ्या अपेक्षेप्रमाणे त्यांना मराठी वाचकांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. आजही अधूनमधून या कादंबऱ्या वाचून वाचकांची कानाकोपऱ्यातून पत्रं येतात आणि मनाला समाधान देऊन जातात.

त्यानंतरही भैरप्पांच्या कादंबऱ्यांचे अनुवाद करण्याचा माझा उत्साह कायम राहिला. एकीकडे पूर्णचंद्र तेजस्वी, कारंत, गिरीश कार्नाड, वैदेही, अनंतमूर्ती, शांतीनाथ देसाई अशा अनेक लेखकांचं साहित्य अनुवादित करत राहिले तरी भैरप्पांच्या 'काठ', 'परिशोध' या कांदबऱ्या अनुवादित करत राहिले.

'तंतू' ही भैरप्पांची सद्य:स्थितीवर भाष्य करणारी बृहद् कादंबरी ! सुमारे साडेआठशे ते नऊशे पानी. ती कन्नडमध्ये लिहून होताच मराठी आणि हिंदी प्रकाशकांनी ती तिन्ही भाषांमध्ये एकाच वेळी प्रकाशित करण्याची तयारी दर्शवली होती. काही तांत्रिक कारणामुळे ते शक्य झाले नाही. पण लवकरच मराठी अनुवाद मोठ्या रुबाबदार स्वरूपात प्रकाशित झाला. याही कादंबरीचं वाचकांनी मोठ्या उत्साहानं स्वागत केलं.

भैरप्पांच्या कादंबऱ्या अनुवादित करणं हा माझ्या दृष्टीनं अत्यंत आनंदाचा अनुभव होता. त्यातही 'वंशवृक्ष' आणि 'पर्व'.

कारतांच्या कादंबऱ्यांचे अनुवाद करताना मूळ लेखकाचं दडपण मनावर असे. पण या अनुवादाच्या वेळेपर्यंत ते दडपण दूर झालं होतं हेही त्या आनंदामागील अेक कारण असू शकेल.

भैरप्पांच्या कादंबऱ्यांनी मराठीपुरती आणखीही अेक महत्त्वाची गोष्ट केली आहे. भैरप्पांच्या एका कादंबरीचा अनुवाद वाचला की हे वाचक कन्नडमधील इतर कादंबऱ्यांकडेही वळतात. मग अेका पाठोपाठ एक सगळ्याच कन्नड कादंबऱ्यांकडेही वळतात. मग एकापाठोपाठ एक सगळ्याच कन्नड कादंबऱ्यांचे अनुवाद वाचून मोकळे होतात. कन्नड भाषेला

सौ. उमा वि. कुलकर्णी

मिळालेल्या सात ज्ञानपीठ पुरस्कारांमुळे मराठी वाचकांच्या मनात कन्नडविषयी दबदबा निर्माण झाला असला तरी भैरप्पांच्या कादंबऱ्या वाचून त्यांच्या मनात कन्नड साहित्याविषयी ममत्व निर्माण झालंय असा अनुभव येतो.

'वंशवृक्ष' च्या निमित्तानं भैरप्पांशी पत्रव्यवहार सुरू झाला. त्यांची पत्रं अत्यंत त्रोटक असतात. एखाद्या कार्डावर कामाची दोन - तीन, फार फार तर पाच-सहा वाक्ये - एवढंच. पण लवकरच त्यांच्याशी प्रत्यक्ष भेट झाली. एक कादंबरी लिहून संपल्यावर ते त्यांच्या पद्धतीप्रमाणे प्रवासाला बाहेर पडले आणि पुण्याला आले. ('वंशवृक्ष' विषयीची चर्चा त्यावेळी झाली). यांनी लगोलग रजा टाकली आणि ते दोघंही सवाई गंधर्व संगीत महोत्सवाला जाऊ लागले.

या नंतर त्यांच्या भेटी होत राहिल्या. कधी पुण्यात, कधी मैसूरला, कधी मुंबईला - एकदा तर चक्क केदारनाथाच्या पायवाटेवर ! (एकंदरच प्रवासाची आवड असलेल्या भैरप्पांचा हिमालय हा वीक-पॉईंट आहे.)

एका मैसूरच्या मुक्कामात भैरप्पांच्या पत्नी अेस.बी.सरस्वती यांच्याशी भैरप्पांच्या अनुपस्थितीत मनमोकळ्या गप्पा मारायची संधी मिळाली. भैरप्पांचा स्वभाव काहीसा अबोल

आणि गंभीर असल्याबद्दल त्यांनीही दुजोरा दिला. याच वेळी त्यांचे जुने अल्बम पाहिले, त्यांच्या दोन्ही मुलांचे फोटो पाहिले. (आता त्या मुलांचे विवाह होऊन भैरप्पांना तीन नातीही आहेत.)

त्या वेळी महाराष्ट्रात मोठमोठ्या लेखकांच्या बायकांची आत्मचरित्रे गाजत होती. त्या पार्श्वभूमीवर मी सरस्वतींना सूचक प्रश्न विचारले तेव्हा त्यांनी ठणकावून सांगितलं, 'त्यांनी माझ्यासाठी भक्कम घर बांधून दिलंय, दोन मुलं दिली आहेत, काय वाटेल ते करायला माझी मी स्वतंत्र आहे. आणखी कशाची अपेक्षा करू त्यांच्याकडून ?' खरोखरच त्यांनी काही काळ घरच्या गॅरेजमध्ये पेनच्या रीफिलचा छोटा कारखाना चालवून पाहिला, समाज-कार्य म्हणून गरीबांची लग्नं लावून देण्यास त्या हातभार लावत असतात. सुरुवातीला त्या भैरप्पांच्या कादंबऱ्यांची हस्तलिखिते टाईप करून द्यायच्या. 'पर्व' नंतरच्या एक-दोन कादंबऱ्या त्यांना आवडल्या नाहीत. त्यांनी टाईप करायला नकार दिला.

पाच-सहा वर्षांपूर्वी भैरप्पांचं 'भित्ती' नावाचं आत्मचरित्र प्रकाशित झालं, त्यात त्यापैकी काहीही दिलेलं नाही. पत्नी आणि मुलांचा उल्लेखही कुठल्या ना कुठल्या वेगळ्या संदर्भात येतो तेवढाच !

या आत्मचरित्रात भैरप्पांनी कुठल्याही 'फॉर्म'ची मदत न घेता सरळपणे आपली जीवनकथा सांगितली आहे. जीवनातल्या आणि त्यावरील प्रतिक्रिया त्या त्या काळाप्रमाणेच दिल्या आहेत. आज त्यावर मल्लीनाथी केलेली नाही. गरीब कुटुंबाची पार्श्वभूमी, बेजबाबदार वडील आणि असंस्कृत आजी, कष्टाळू आई, गावात वरचेवर येणारा आणि घरातील एकेक माणसं मारणारा प्लेग, शिक्षणाची आस, त्यासाठी घेतलेले कष्ट याचा तपशील सांगता सांगता तारुण्यात पदार्पण करणारा भैरप्पा आपल्यासमोर उभा राहतो. तत्त्वज्ञान, मानसशास्त्र आणि समाजशास्त्रासारखे विषय निवडून आर्थिक संपन्नतेचा मार्ग स्वत:च्या हातानं बंद करून त्यांनी लेखनाचा मार्ग निवडला. हा त्यांचा मार्गही 'एकला चलो रे' पद्धतीचा होता. साहित्यिकांच्या कुठल्याही कळपात शिरायचं नाकारल्यामुळे त्यांना या वाटचालीत भले बुरे अनुभव आले.

वर म्हटल्याप्रमाणे यात कुटुंबियांचे उल्लेख अत्यंत मोजके असले तरी आपल्या जीवनावर बारीकसारीक परिणाम घडवणाऱ्या व्यक्तींविषयी भैरप्पा भरभरून लिहितात. मग ते त्यांचे प्रकाशक गोविंदराय असोत वा बडोद्याचे डॉ. अ.ग.जावडेकर आणि त्यांच्या पत्नी असोत.

हे आत्मचरित्र वाचताना काही ठिकाणी मराठी वाचकांनाही त्यांच्या 'परिशोध' आणि 'गृहभंग' या कादंबऱ्यांची आठवण झाल्याशिवाय राहाणार नाही. अर्थात आत्मचरित्रात त्यांनी फक्त उल्लेख करून तपशील द्यायचं टाळण्याचं औचित्य दाखवलं आहे. भैरप्पांचा धाकटा भाऊ ते १३-१४ वर्षाचे असताना वारला. त्यावेळची परिस्थिती अशी होती की ११-१२ वर्षाच्या धाकट्या भावाचं आखडलेलं प्रेत खांद्यावर टाकून त्यांना स्मशानापर्यंत जावं लागलं. 'पर्व' मधील भीम घटोत्कचाचं प्रेत खांद्यावर टाकून रणभूमीवर फिरतो, त्यावेळचा प्रसंग इथं आठवल्याशिवाय राहात नाही. जीवनातील प्रसंगांना 'रस' पातळीवर नेऊन कलात्मक कसं बनवता येईल याचा वस्तूपाठच इथं मिळतो ! (याच कारणासाठी प्रसिद्ध कन्नड समीक्षक डॉ. हा. मा. नायक यांनी भैरप्पांना बजावलं होतं, 'तुम्ही अजूनही लिहिते लेखक आहात. एवढ्यात आत्मचरित्र लिहू नका. जो अेखाद्या

कादंबरीसाठी प्रेरणा देऊ शकेल तो विषय आत्मचरित्रात एखाद-दुसऱ्या परिच्छेदामध्ये संपून जातो !)

या आत्मचरित्राचा अनुवाद करताना एका सृजनात्मक लेखन करणाऱ्या लेखकाचा जीवनपट अगदी जवळून पाहिल्याचा अनुभव आला.

बहुतेक वेळा आत्मचरित्र लिहून झाल्यानंतर सृजनशील लेखकाचं लेखन मंदावलेलं दिसतं. पण भैरप्पांच्या त्यानंतर दोन कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. 'सार्थ' आणि 'मंद्र'.

'सार्थ' या कादंबरीची कथा इसवी सनाच्या आठव्या शतकात घडते. वातावरण - निर्मितीसाठी त्यांनी आपल्या पद्धतीनं भरपूर कष्ट घेतले आहेत. 'सार्थ' म्हणजे व्यापारी तांडा. नागभट्ट नावाचा तरुण राजाच्या आज्ञेनुसार आपल्या तरुण पत्नीला गावी ठेवून एका सार्थाबरोबर प्रवासासाठी बाहेर पडतो. प्रवासात असताना त्याला आपली राजा आणि पत्नीकडून फसवणूक झाल्याचं समजतं. त्याच्या मनाची तगमग होते, अनेक प्रश्न पडतात. त्याची उत्तरं शोधताना त्या काळातील अस्वस्थ भारताचं दर्शन घडतं. देशभर चाललेला विविध धर्म-पंथांचा गोंधळ सामोरा येतो. त्याच्या काही शंकांचं निरसन होतं. त्याच्या वैविध्यपूर्ण जीवनात एक स्त्री येते. त्या निमित्तानं स्त्री-पुरुष नात्याचाही त्याच्या मनात नव्यानं अर्थ उमजू लागतो. जो नागभट्ट पत्नीनं प्रतारणा केली म्हणून मन:स्ताप करून घेत असतो, तोच अखेर अशारीर प्रेमाच्या पातळीवर पोहोचतो. अेका अर्थी त्याचा प्रवास पूर्ण होतो.

अशा प्रकारच्या कथानकाचं चित्रण करताना देशभर अनेक ठिकाणी चाललेलं चैत्य आणि देवळांचं बांधकाम, नालंदा विद्यापीठ, मथुरा - पाटलीपुत्र - मूलस्थान यासारखी ऐतिहासिक गावे असा प्रचंड तपशील भैरप्पा आपल्या पद्धतीनं पुरवत असतात. त्यात आद्यशंकराचार्य, मंडनमिश्र, त्यांच्या पत्नी भारती देवी, मंडनमिश्रांचे गुरू कुमारिल भट्ट ही ऐतिहासिक पात्रे ही भेटतात - पण तीही कथानकाच्या ओघात. 'शंकर विजय' हा या कादंबरीचा विषय नाही. अशा या वेगळ्या विषयावरच्या कादंबरीचा अनुवाद करताना दिवस कसे गेले ते समजलं नाही.

'मंद्र' ही भैरप्पांची दोनतीन महिन्यांपूर्वी प्रकाशित झालेली कादंबरी. हिंदुस्थानी संगीत क्षेत्रात दिगंत कीर्ती मिळवलेल्या कलावंताच्या अंतर्मनाचा वेध घेणारी ही कादंबरी. संगीत कलेचं मर्म उकलून सांगताना लेखक या क्षेत्रात चालणाऱ्या अनेक भल्याबुऱ्या गोष्टींचाही वेध घेतो. हिंदुस्थानी संगीत हा भैरप्पांचा वीक पॉईंट आहे. अशाच अेका मेहफिलीत रंगमंचावर गायक स्वरांचा स्वर्ग उभा करत होता आणि शेजारचा स्नेही भैरप्पांच्या कानात कुजबुजला, 'आपल्याला असे स्वर्गीय क्षण देणाऱ्या कलाकारांचं खाजगी जीवन असं का असावं ?' हा प्रश्नच या कादंबरीच्या निर्मितीला कारणीभूत झाला.

कन्नडमध्ये कादंबरी प्रकाशित झाली तेव्हा भैरप्पा दक्षिण अमेरिकेच्या प्रवासासाठी गेले होते. ते येण्याआधी पहिली आवृत्ती संपली देखील !

अर्थातच याही कादंबरीच्या अनुवादाला सुरुवात करत आहेच !



‘वेगळ्या वाटां’ शी बातचीत

मानवाचे जीवन कालव्ययाने नव्हे तर अनुभवाने समृद्ध होत असते. जीवनाच्या वेगवेगळ्या वाटा शोधून त्यावरून स्वतंत्र वाटचाल करणारे, नवे काहीतरी निर्माण करणारे असे भाग्यवान वाटसरू आपल्याला आदर्श घालून देत असतात. अशा काही ‘वेगळ्या वाटां’ शी आम्ही बातचीत केली आहे. त्यावरून वाचकांना या वाटांची वेगळी वळणे नक्कीच जाणवतील.

बातचीत

डॉ. सुधा मूर्ती

कोल्हापूर मुक्कामातील संस्मरणीय सुवर्ण क्षण

सुप्रिया वकील

‘थॉट लीडर्स’ या श्रीनिवास पंडित यांच्या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद मी केला होता. त्या पुस्तकात ‘नारायण मूर्ती’ हे प्रकरण होतं. ‘इंन्फोसिस टेक्नॉलॉजिज’ या जागतिक स्तरावर नाव असणाऱ्या प्रमुख भारतीय सॉफ्टवेअर कंपनीचे संस्थापक - अध्यक्ष नारायण मूर्ती यांचा करियर आलेख वाचताना मी अक्षरश: थक्क झाले. मनामध्ये अत्यंत सुस्पष्ट कल्पना घेऊन मार्गक्रमण करणाऱ्या नारायण मूर्तींचं भव्यदिव्य स्वप्न, एक कम्युनिस्ट विचारसरणीकडं झुकलेला विद्यार्थी ते आजचं यशस्वी, प्रगल्भ, ‘थॉट लीडर’ बनलेलं झळाळतं व्यक्तिमत्त्व हा त्यांचा प्रवास मी अचंबित होऊन वाचत होते. आज ‘लीजंड’ बनलेल्या, संपत्तीनिर्मितीच्या ध्यासानं भारलेल्या या व्यक्तिमत्त्वाच्या आयुष्यात पत्नीची - सौ. सुधा मूर्ती (माहेरच्या सुधा कुलकर्णी) यांची- साथ किती मोलाची ठरली, याचे उल्लेख त्या प्रकरणात होते. तिथंच माझी सुधा मूर्तींशी पहिली अप्रत्यक्ष ओळख झाली. नारायण मूर्तींच्या त्या बौद्धिक सहचरी कशा आहेत त्याची ओळख झाली. आपल्या जवळ साठवलेली १०,००० रुपयांची पुंजी नवऱ्याच्या ‘साहसी’ व्यवसायासाठी देऊ करणाऱ्या, पुढं कंपनीच्या कर्मचाऱ्यांचे पगार द्यायला पैसे नव्हते अशा काळात आपले दागिने विकून ते पैसे नवऱ्याकडं पगारासाठी सुपूर्द करणाऱ्या... अशा विविध रूपांत सुधाताईंचं व्यक्तिमत्त्व माझ्या मनात घर करून राहिलं होतं.

त्याच दरम्यान, अनिलभाई मेहतांनी सुधा मूर्ती २९ सप्टेंबरला कोल्हापूरला येणार आहेत अशी आनंदवार्ता दिली. ‘महाश्वेते’ या त्यांच्या कन्नड कादंबरीची सौ. उमा कुलकर्णी यांनी मराठी अनुवाद केला आहे. त्याचा प्रकाशन समारंभ कोल्हापूरात करायचं ठरलं. सुधाताईंनी त्या कार्यक्रमाला यायचं कबूल केलं होतं. कार्यक्रम देखणा आणि नेटका करायचा या मेहतांच्या परंपरेला अनुसरूनच या कार्यक्रमाची तयारी सुरू होती.

जगभरातल्या श्रीमंतांच्या यादीत समावेश असलेल्या, अत्यंत झळाळती शैक्षणिक पार्श्वभूमी

लाभलेल्या, 'इन्फोसिस' च्या उभारणीत महत्त्वाचा वाटा असणाऱ्या , संवेदनशील लेखकमन लाभलेल्या, त्यावेळी तांत्रिक विषयांवरचं लेखनही समर्थपणे करणाऱ्या आणि सर्वात लक्षवेधी म्हणजे 'इन्फोसिस फाऊंडेशन' च्या चेअरपर्सन या नात्यानं समाजातील दीन-दलित, उपेक्षित, अनाथांच्या जीवनात कोट्यवधी रुपयांच्या आर्थिक मदतीच्या रूपानं आशेचा किरण जागवणाऱ्या सुधा मूर्तींच्या हस्ते या मराठी अनुवादाचं प्रकाशन करायचं ठरलं. सुधाताईंच्या विस्तृत अनुभवांचा पट इतका अफाट आहे की, एखाद्या भाषणातून तो नीटसा उलगडणं अवघडच. त्यामुळं अनिलभाईंनी एक उत्तम कल्पना काढली. सुधाताईंशी अनौपचारिक गप्पांची मैफल जमवूया. समोरच्या माणसाशी पटकन् सूर जुळवून त्याला बोलतं करण्यात वाकबगार असलेले सुप्रसिद्ध मुलाखतकार सुधीर गाडगीळ यांना या मैफलीसाठी आमंत्रित करण्यात आलं.

२९ सप्टेंबरला दुपारी सुधाताई कोल्हापूरात आल्या. तेव्हापासून ते रात्री त्या 'सह्याद्री' नं पुण्याला रवाना होईपर्यंत काही तास त्यांच्या सहवासात राहण्याचा योग अर्थातच मेहतांमुळं आला आणि सुधाताईंच्या व्यक्तिमत्त्वाचे एकेक पैलू जवळून पाहताना माझी अक्षरश: 'तेथे कर माझे जुळती' अशी अवस्था झाली.

कसलाही आव न आणणारं, अतिशय मनमोकळं, खुलं, प्रांजळ, साधं व्यक्तिमत्त्व असलेल्या सुधाताईंच्या कुशाग्र बुद्धिमत्तेची, विनोदबुद्धीची, तीव्र स्मरणशक्तीची, सजग मनाची, त्यांच्या संवेदनशीलतेची प्रचीती त्यांच्या सहवासातल्या प्रत्येक क्षणी येत होती.

त्यांचा बालपणातला काही काळ कोल्हापूर आणि कुरुंदवाड या परिसरात गेला. त्यांचे वडील कोल्हापूरातल्या सुप्रसिद्ध सीपीआरमध्ये डॉक्टर होते. त्यामुळं सुधाताईंना कोल्हापूराविषयी खास जिव्हाळा आणि जवळीक आहे. इथलं वास्तव्य त्यांच्या स्मरणात आजही आहे. इथं आल्याआल्या त्यांनी श्रीमहालक्ष्मीचं दर्शन घ्यायची इच्छा व्यक्त केली. त्यांच्या आईंनी बरोबर नारळ, खण असं ओटीचं साहित्य दिलं होतं आणि देवीसाठी साडी तिथंच घे, म्हणून सांगितलं होतं. सुधाताईंनी चौकशी केली, ''मी लहान असताना मला आईनं लहान साडी आणली होती, तसली इथं मिळेल ना, मला एक देवीला नेसवायची आहे आणि दोन बरोबर न्यायच्या आहेत, घरच्या देवीसाठी''. सुधाताई बालपणीच्या आठवणींत रमल्या होत्या.

महालक्ष्मीच्या मंदिरात जाणं ही करवीरवासियांच्या दृष्टीनं नित्याचीच गोष्ट आणि मंदिराच्या परिसरात काहीबाही - म्हणजे टिकल्या, गजरे, सेफ्टीपिनांपासून चिंचा-आवळ्यांपर्यंत खरेदी करणंही अंगवळणी पडलेलं. घरी कुणी पाहुणे आले की, हे कार्यक्रम हमखास होतातच, पण या इतक्या मोठ्या विदूषीबरोबर अशी संधी मिळेल याची मी कधी कल्पनासुद्धा केली नव्हती. श्रीमहालक्ष्मी मंदिरात देवीपुढं श्रद्धेनं नतमस्तक झालेल्या सुधाताईंचं एक आगळंच रूप मला पाहायला मिळालं. पुजाऱ्यांनी प्रसाद दिला. त्याबरोबर कमळाची वेणीही दिली. आमच्याबरोबर देवीच्या दर्शनाला काही कानडी भाषिक स्त्रियाही होत्या. सुधाताईंना त्यांचं बोलणं समजलं. त्या बायका त्या वेणीबद्दल बोलत होत्या. त्या वेणीत श्रद्धेच्या जोडीनं सौंदर्य पाहणाऱ्या सुधाताईंनी त्या वेणीतलं एक कमलपुष्प प्रसाद म्हणून जवळ ठेवलं आणि ती वेणी त्या बायकांना दिली. त्या बायकांनी त्या वेणीतलं एकेक कमळ डोळ्याला लावून प्रसाद म्हणून घेतलं. त्या बायकांच्या चेहऱ्यावरचं समाधान अवर्णनीय होतं. सुधाताईंच्या दातृत्त्वाची ती लहानशी चुणूक त्यांचं व्यक्तिमत्त्व माझ्या मनात आणखी उजळवून गेली. तंत्रज्ञानात उत्तुंग कामगिरी करणाऱ्या,

लेखनाच्या क्षेत्रात नाव कमावणाऱ्या, इन्फोसिस फाऊंडेशन द्वारा सामाजिक ऋणाची उतराई होणाऱ्या सुधाताई चंद्रकोरीच्या आकाराच्या कुंकवाच्या टिकल्यांचे प्रकार रसिकतेनं पाहात होत्या.

अमूक एक गोष्टी आपल्यासाठी नाहीत (किंवा आपण 'असल्या'साठी नाही) अशा धारणेत, आत्मसंतुष्ट असणारी माणसं नेहमीच पाहायला मिळतात, त्या पार्श्वभूमीवर सुधाताईंचं हे वेगळेपण मला फार जाणवलं. कोल्हापूरची कुस्ती परंपरा, इथली ऐतिहासिक शिल्पं अशा अनेक विषयांवर बोलणं झालं. बोलण्याचे संदर्भ कुठून कुठे पोचत होते, पण त्यातून त्यांचे सुस्पष्ट, प्रगल्भ, नेमके आणि ठाम विचार व्यक्त होते.

कोल्हापूरात त्यांना भेटायला उत्सुक असलेल्या माणसांची रीघ लागली होती. कुणाची मदतीची विनंती, कुणी मित्र, कुणी नातेवाईक, कुणी सहाध्यायी....सुधाताई त्यातल्या प्रत्येकाशी आवर्जून बोलत होत्या. त्यांच्या स्मृतींतले एकेक संदर्भ ऐकून आश्चर्य वाटत होतं. या स्थानावर असलेल्या सुधाताई, अनुभवांचा इतका विस्तीर्ण कॅनव्हास असणाऱ्या सुधाताई नात्यांतले किंवा मित्रपरिवारातले, संदर्भ अगदी तत्परतेनं सांगत होत्या.

प्रकाशन सोहळ्याला प्रारंभ झाला. पुणे, इचलकरंजी, सांगली, निपाणी, कोरेगाव, बेळगाव, कुरुंदवाड अशा ठिकाणांहून साहित्यरसिक खास आवर्जून या कार्यक्रमासाठी आले होते. प्रत्येकालाच उत्सुकता होती- सुधाताईंचा संवाद ऐकण्याची. जवळपास बत्तीस छापील पानांचा बायोडेटा असलेल्या सुधाताईंची ओळख तरी काय काय म्हणून करून द्यायची ? कन्नड साहित्यात विशेषत: कादंबरी या साहित्यप्रकारात स्वत:ची खास ओळख निर्माण करणाऱ्या लेखिका, आंतरराष्ट्रीय पुरस्कारांपासून अनेक सन्मान लाभलेल्या कॉम्प्युटर सायन्सच्या इंजिनिअर, 'डॉलर बहू' या सुप्रसिद्ध टीव्ही सिरीयलच्या लेखिका...त्यांची ओळख तरी किती विविध पदरी आहे !

मुलाखतीला प्रत्यक्ष प्रारंभ झाला आणि उपस्थित रसिक अगदी तन्मय होऊन गेले. सुधीर गाडगीळ यांनी विचारलेल्या प्रश्नांना अगदी सहजपणे, प्रांजळ उत्तरं देत, मुलाखत उत्तरोत्तर रंगत गेली आणि त्या संवादातून प्रकटली एक कणखर स्त्री, एक तळमळीची सामाजिक जाणीव लाभलेली स्त्री, लेखिका, मुलांच्या जडणघडणीबाबत जागरुक असणारी माता, नारायण मूर्तींच्या सोबत सदैव सावलीसारखी राहणारी पत्नी, 'इन्फोसिस' चं भव्यदिव्य स्वप्न आकाराला आणण्यात वाटा उचलणारी इंजिनिअर...

मुलाखतीला प्रारंभ करताना सुधीर गाडगीळ यांनी एक लेखनाविषयी प्रश्न केला, ''तुम्ही कथा-कादंबऱ्या अशा प्रकारचं लेखन करता आणि त्याचवेळी टेक्निकल विषयांवरचं लेखनही करता, मग त्यासाठी मनात काही दोन वेगळे विभाग असतात का ?''

या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी सांगितलं की, असे दोन विभाग असतातच. मात्र यापैकी एका प्रकारचं लेखन करताना दुसऱ्या प्रकाराचा विचार मनात अजिबात नसतो. शिवाय त्या असंही म्हणाल्या की, टेक्निकल लेखन भावनिक लेखनापेक्षा बरंच सोपं वाटतं. सुधाताईंनी कथा, कादंबऱ्या, व्यक्तिचित्रणात्मक लेखन, प्रवासवर्णनं असं विविध प्रकारचं लेखन केलं आहे, त्याचबरोबर मान्यवर इंग्रजी नियतकालिकांतून त्यांचं स्तंभलेखनही प्रसिद्ध झालंय, होतंय. या लेखनाला वाचकांची विशेष पसंती लाभल्याचं त्यांनी सांगितलं. कन्नड भाषेतल्या

साहित्याचा वाचकवर्ग काहीसा मर्यादित राहतो, पण त्यांच्या इंग्रजीतून उतरलेल्या स्तंभलेखनाचा वाचकवर्ग मात्र खूप मोठा आहे. त्या संदर्भात त्यांनी एक किस्सा सांगितला. त्यांचे दोन लेख वाचून अब्दुल कलाम यांनी त्यांना फोन करून लेख आवडल्याचा अभिप्राय दिला होता. अब्दुल कलाम यांनी त्यांना असंही सांगितलं की, मी तुमचे हे लेख माझ्या काही मित्रांना आवर्जून वाचायला सांगितले आहेत.

सुधाताईंना पाच-सहा भाषा अवगत आहेत. मग लिहिताना तुम्ही कोणत्या भाषेत लिहायचं ते आधी ठरवता का ? या प्रश्नावर त्या म्हणाल्या की, ज्या भाषेत मनात विचार येतात, त्याच भाषेत मी तो विचार कागदावर उतरवते. त्यांच्या इंग्रजी स्तंभलेखनाचं भाषांतर कन्नडमध्ये दुसऱ्या अनुवादकानं केलं आहे, असंही घडतं असं त्या म्हणाल्या.

त्यांच्या पुस्तकांनी खपांचे विक्रम केलेत. त्यांच्या कादंबऱ्या सात-आठ भाषांत अनुवादित झाल्या आहेत. त्यातली 'डॉलर बहू' ही कादंबरी विशेष परिचित आहे. 'भूवैकुंठ' मानल्या जाणाऱ्या अमेरिकेला स्वत:चे असे फायदे आहेत. तशीच कुरूप-काळी बाजूही आहे. इथून अमेरिकेत गेलेली माणसं सहसा ही काळी बाजू प्रकट न करता अमेरिकेचं चांगलं रूप, आपलं वैभव याचंच प्रदर्शन करतात. या कथाबीजावरुन सुधाताईंनी 'डॉलर बहू' लिहिली. 'डॉलर बहू' विषयी उपस्थितांमध्ये औत्सुक्य होतं. सुधाताईंनी त्याविषयी बोलताना त्यामागची कल्पना, त्याचवेळी भारतातलं आणि तिथलं वातावरण यांची सुंदर तुलना केली. पोथ्या-पुराणं ऐकायच्या निमित्तानं देवळात जमणाऱ्या आमच्याकडच्या बायका 'आमची सून अगदी वाईट' असं सर्वसाधारण विधान नेहमी करतात आणि सुना 'आमची सासू सगळ्यात वाईट' असं , पण त्यामुळं भावनिक आऊटलेट, काही देवाणघेवाण होते आणि आपल्याला मानसोपचारतज्ज्ञाची गरज लागत नाही असं मिष्किल शैलीत सांगताना त्यांनी एका बोचऱ्या प्रश्नावर नेमकं बोट ठेवलं.

मुलाखतीच्या मर्यादित वेळात त्यांना भरभरून ऐकणं ही प्रत्येक उपस्थित व्यक्तीची इच्छा होती, पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पदर इतके विविधांगी आहेत आणि अनुभवसंचित इतकं समृद्ध आहे की या मुलाखतीत 'घेता किती घेशील दो कराने' अशी अवस्था होती.

त्यांनी उस्फूर्त मनमोकळेपणे दिलेली उत्तरं शब्दांत बांधताना त्यातला भाव, त्यातली उत्कटता मला अगदी तशशीच टिपता येणार नाही याची मला पूर्ण जाणीव आहे.

पुण्यात चित्तरंजन वाटिकेत भेटण्याचे सोनेरी दिवस नारायण मूर्ती आणि सुधाताईंनी अनुभवले, त्यावेळी सुधाताई टेल्कोत डेव्हलपमेंट इंजिनिअर म्हणून काम करत होत्या. भव्यदिव्य स्वप्नं पाहाणाऱ्या मूर्तींशी त्यांचा प्रेमविवाह झाला. त्या दरम्यान मूर्ती नोकरी सोडून उद्योजक बनण्याच्या मार्गावर होते. सुधाताईंनी साठवलेल्या दहा हजार रुपयांच्या पुंजीवर 'इन्फोसिस' ची स्थापना त्यांच्या पुण्यातल्या घरी झाली.त्यानंतर अवघ्या वीस वर्षांच्या कालावधीत 'केवळ अद्भूत' वाटावं असं झगमगतं यश लाभलं आणि नारायण मूर्तींचं हे स्वप्न भारताला सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग क्षेत्रात जगाच्या नकाशावर मानाच्या स्थानावर घेऊन गेलं. दरम्यानच्या काळात, 'इन्फोसिस' मध्ये नारायण मूर्ती किंवा सुधा मूर्ती या दोघांपैकी एकानंच राहायचं, म्हणजे पर्यायानं सुधा मूर्तींनी कंपनीतून बाजूला व्हायचं असा निर्णय घ्यावा लागला. आपल्या अंगणात लावलेल्या 'इन्फोसिस' च्या रोपट्याचा 'वेलू गगनावरी' गेल्यानंतर आता

आपल्या अपत्यासारखी वाढवलेली कंपनी सोडताना जड जाणं स्वाभाविकच आहे. त्याबद्दल सुधाताई म्हणाल्या की, ''मी यावर तीन दिवस विचार करत होते. आपण कंपनीतून बाहेर पडायचं, या निर्णयाप्रत यायला मला तीन दिवस लागले, बट इट टूक मेनी इयर्स टू अन्डरस्टॅन्ड धिस''.

नारायण मूर्तींनी 'बिझनेस' करायचा ठरवल्यानंतर सुधाताईंचा त्यांना पूर्ण पाठिंबा होता, खरं तर त्यांच्या प्रत्येकच उपक्रमात सुधाताईंची साथ असते. त्याबद्दल बोलताना त्या म्हणाल्या, मी कुलकर्ण्यांच्या घरातली, आमचे नातेवाईक म्हणजे एकतर शिक्षक,नाहीतर पोस्टात किंवा बँकेत क्लार्क, शिवाय बिझनेस म्हणजे नुकसान, हे गणित डोक्यात पक्कं, त्यामुळं नारायण मूर्ती बिझनेस करतायत हे समजल्यावर सुधाताईंच्या आजी म्हणाल्या, 'आता तुझी तू व्यवस्था करून घे बाई !'' पण सुधाताईंचा नारायण मूर्तींवर संपूर्ण विश्वास होता. त्यासंदर्भात त्यांनी एक उपमा दिली आणि त्यांचं बोलून होतं न होतं, तितक्यात शाहू स्मारक भवन उत्स्फूर्त टाळ्यांच्या कडकडाटानं निनादून गेलं. त्या म्हणाल्या, सर्कशीत झोपाळे असतात. एका झोपाळ्यावरचा माणूस दुसऱ्या झोपाळ्यावर उडी घेतो. तशीच नारायणमूर्ती 'जॉब' ते 'आंत्रप्रेन्युअरशिप' अशी उडी घेणार होते. मी त्यांना म्हटलं, या साहसात समजा उडी चुकली, तर मी सदैव 'नेट' बनून उभी आहे.''

अशी समर्थ साथच अशा भव्यदिव्य स्वप्नांना आकार देऊ शकते ! पण, 'इन्फोसिस' सुरू करताना तुम्हाला या उत्तुंग यशाची अपेक्षा किंवा कल्पना होती का ? या प्रश्नावर मात्र त्यांनी अगदी मनापासून सांगितलं की, ''अजिबात नव्हती''.

सुधीर गाडगीळ यांनी विचारलेले प्रश्न आणि सुधाताईंनी त्याला दिलेली उत्तरं यांची ही झलक -

सुधामूर्ती : सर्वप्रथम कोल्हापूरच्या रसिकांना माझा नमस्कार ! माझं मराठी तुमच्याइतकं चांगलं नाही. पुण्यात असताना माझ्या मैत्रिणी म्हणायच्या की, तुझं मराठी कोल्हापूरी...पैलवानी मराठी आहे. पन्नासएक वर्षांपूर्वी माझे वडील इथं डॉक्टर होते. मी पहिलं अक्षर लिहिलं...मराठीत, इथं शिशूविहारमध्ये. त्यामुळे मला कोल्हापूर आणि कुरुंदवाड...इथं माझं काही काळ वास्तव्य होतं...हे दोन्ही भाग खूप जवळचे वाटतात. कृष्णाला जशा दोन माता लाभल्या, देवकी आणि यशोदा...तसंच मलाही कन्नड आणि मराठी या दोन मातृभाषा लाभल्या आहेत. ...आय ॲम डॉटर ऑफ बोथ द कल्चर्स.

- तुम्ही खूप प्रवास करता, खेड्यापाड्यात अगदी तळागाळातल्या लोकांत मिसळता, अशावेळी तुम्ही तिथली भाषा शिकायचा प्रयत्न करता का ?

- सुधा मूर्ती : मला तेलगू, कानडी, हिंदी, मराठी, इंग्रजी आणि उर्दू या भाषा येतात. समाजाचा अविभाज्य भाग बनायचा म्हटलं तर त्या - त्या संस्कृतीची ओळख व्हायला पाहिजे, संस्कृतीची ओळख घडायची तर तिथली भाषा यायला पाहिजे. संस्कृती आणि भाषा या गोष्टी हातात हात घालून चालतात. त्या त्या ठिकाणच्या संस्कृतीशी आणि भाषेशी तुम्ही समरस झालात तरच तुम्ही तिथल्या लोकांच्या अंत:करणात स्थान मिळवता, नाहीतर तुम्ही सदैव उपरे, 'बाहेरचे' होऊन राहता.

- **तळागाळातल्या लोकांसाठी कार्य करताना तुम्ही खूप दुर्गम खेडोपाडी जाऊन त्या लोकांत मिसळता, अशावेळी तुम्ही राहता कुठे ? खाता काय ? जगभरातल्या श्रीमंतांच्या यादीतल्या तुम्ही, त्यांच्यात कशा मिसळता ?**

- सुधा मूर्ती : हे श्रीमंत वगैरे सगळं पेपरमध्ये छापून येतं. तुम्ही सगळे ते खरं समजता. मला पाहून तसं वाटतही नाही आणि आपण श्रीमंत आहोत असं मला वाटत नाही. मी आणि आमचा ड्रायव्हर बाहेर शॉपिंगला गेलो तर दुकानदार म्हणतो की, मॅडम स्कूल टीचर आहेत, तू 'इन्फोसिस' चा मोठा ड्रायव्हर आहेस. मी खेडेगावात जाते. आदिवासी, हरिजन लोकांच्या वस्तीत जाते. तिथं मी ते लोक जे खातात, तेच खाते. तुम्ही आपलं वेगळेपण दाखवलंत तर ते लोक तुमच्यापुढं मन मोकळं करत नाहीत. त्यांचं अंतरंग जाणून घेण्यासाठी त्यांच्यातलंच एक होऊन राहणं आवश्यक असतं. तिथं जे काही मिळेल ते मी खाते. माझी अट फक्त एवढीच असते, मी शाकाहारी आहे. मी त्यांना सांगते. मला फक्त भात करून द्या. मला तिथं एक वेळ जेवण मिळतं, तेवढं जेवण आणि दोन - तीन बाटल्या पिण्याचं पाणी, एवढं मला पुरेसं असतं. सर्वसाधारण मी शाळामास्तरांच्या घरी राहते, नॉर्मली त्यांपैकी ९० टक्के लोक सरळ असतात असा माझा अनुभव आहे.

- **समाजासाठी काही करण्याची उर्मी कशातून आली ?**

- सुधा मूर्ती : एवढ्या श्रीमंतीची मी कधीच अपेक्षा केली नव्हती. परमेश्वरानं माझ्या पदरात भरभरून दिलंय. आता मला स्वत:साठी काहीही नको असं वाटतं. आता आपण लोकांसाठी काहीतरी करावं अशी इच्छा आहे. नाव, कीर्ती या गोष्टीही नकोशा वाटतात. माझी मुलगी - अक्षता पंधरा वर्षांची असताना एका अंध शाळेत स्वयंसेवक म्हणून जायची. त्यावेळी तिनं एकदा मला सांगितलं की, आमच्या इथल्या एका अंध मुलाला पुढं शिक्षण घ्यायचंय, त्याला तू मदत कर. मी त्यावेळी माझ्या व्यापात होते. मी तिला म्हणाले की, तू त्याला स्पॉन्सर कर हवं तर. त्यानंतर ती मला म्हणाली, अम्मा, आत्ता तू ४५ वर्षांची आहेस, आयुष्यात तुला काय मिळवायचं आहे ? आणि तुला स्वत:ला करता येत नाही तर तू ते दुसऱ्याला का सुचवते आहेस ? तिच्या या बोलण्यानं मला अंतर्मुख केलं आणि समाजासाठी काही करण्याच्या जाणीवेनं उचल खाल्ली.

- **बाजारहाट करताना तुम्ही घासाघीस करता का ? एके ठिकाणी तुम्ही असं म्हटलं आहे की, दहा रुपये खर्च करताना मी दोनदा विचार करते. पण काही उच्चभ्रू माणसं याला मध्यमवर्गीय विचारसरणी म्हणून हेटाळतात, तुम्हाला याबद्दल काय वाटतं?**

- सुधा मूर्ती : लोक काय, काहीही बोलतात. उद्या आमची 'इन्फोसिस' फारशी चांगली नाही चालली तर, हीच माणसं ती बाई तशीच होती असंही म्हणतील. परंतु मला असं वाटतं की पैसा ही मोठी शक्ती आहे. त्याचा उपयोग तुम्ही कसा करून घेता त्यावर अवलंबून असतं... पैसा चाकूसारखा असतो... त्याचा उपयोग फळं-भाज्या चिरायलाही होतो आणि गळा

कापायलाही. पैशाचंही तसंच आहे. त्याचा विधायक उपयोग करून घेता यायला हवा. पैसा सत्कारणीच लागायला हवा. एखाद्या गोष्टीसाठी दहा रुपयांऐवजी शंभर रुपये खर्च करणं हा पैशाचा अपव्यय आहे. आज तेच शंभर रूपये जर एखाद्या हमालाला दिले तर त्याची दिवसाची कमाई होते. लोक म्हणतील, मध्यमवर्गीय आहेत म्हणून अशा वागल्या. म्हणू देत, आपण वाईट काही केलं नाही, काळे धंदे केले नाहीत, दारू प्यायलो नाही... मग कुणी मध्यमवर्गीय म्हटलं तर खुशाल म्हणावं, मी तर ती कॉम्प्लिमेन्टच समजते.

- **पैशाकडं पाहण्याची तुमची ही दृष्टी मुलांमध्ये रूजवण्यात तुम्ही यशस्वी झालात का ?**

- सुधा मूर्ती : मला आयुष्यात अभ्यासात पहिलं येणं कधीच अवघड वाटलं नाही. मुलींना जात्याच वाचनाची गोडी असते आणि आम्हाला मुलांसारख्या 'एक्स्ट्रॉ करिक्युलर ॲक्टिव्हिटीजही' नसतात, त्यामुळं मला पहिलं येणं कधीच कठीण वाटायचं नाही. नारायण मूर्तींनी कामाला सुरूवात केली त्यावेळी आमच्याकडं पैसे नव्हते. मी नोकरी करून घर चालवलं, मला तेही मुष्किल वाटलं नाही. कुलकर्ण्यांच्या घरातली मी, पै पै चा हिशोब ठेवणारी...मला एरवी कुठलीच गोष्ट मुष्किल वाटली नाही, पण आज प्रसारमाध्यमं आमच्या श्रीमंतीबद्दल इतकं लिहित असतात, अशावेळी मुलांना आपल्याला अमूक परवडत नाही हे पटवून देणं अशक्य असतं. पैसे जवळ नसतीलच तर आपल्याला अमूक एक परवडत नाही असं सांगणं फार सोपं असतं. पण, आमच्या मुलांना मी जर असं सांगितलं तर, मी खोटं बोलतीय हे त्यांना कळणार नाही का ? मी मुलांना सांगते की, जीवनात असं यश, अशी लक्ष्मी कधीच राहात नाही, लक्ष्मी चंचल आहे. तुम्ही तुमच्या पायावर मोठं व्हायचंय. आई, वडिलांचा मोठेपणा तुम्हाला काय कामाचा ? तुम्ही स्वत: मोठं व्हायला पाहिजे. यश, पैसा, कीर्ती यापलीकडंही एक जग आहे आणि त्या जगातल्या लोकांपुढं अनंत समस्या आहेत. आपण त्यांना मदत करायची ही जाणीव मी दोन्ही मुलांमध्ये रुजवण्यात बरीच यशस्वी झाले असं मला वाटतं. माझ्या मुलानं माझ्या वाढदिवशी ई-मेल पाठवली होती, त्यात त्यानं लिहिलं होतं. -----१३ डिसेंबरला दिल्लीत संसदेवर झालेल्या हल्ल्याचे पडसाद जगभर उमटले. या हल्ल्यात १३ जण शहीद झाले. त्यानंतर माझ्या अमेरिकेत शिकणाऱ्या मुलानं मला ई-मेलवरून कळवलं होतं की, माझ्यावतीनं या शहीद व्यक्तींच्या विधवांना प्रत्येकी एक लाख रुपये सहाय्य पाठव. या मुलांचं पितृछत्र हरपलंय, त्यांना गरज आहे. या प्रसंगानंतर मला असं वाटलं की, रोहन तू पहिला आला नाहीस, वडिलांइतका मोठा झाला नाहीस, आईचे लेखकगुण उचलले नाहीस तरी चालेल. माणूस म्हणून तू चांगला घडला आहेस, याचा मला आनंद आहे.

ज्या काळात मुली फारशा इंजिनिअरिंगकडं वळत नव्हत्या अशा काळात त्यांचा इंजिनिअरिंगला जाण्याचा निर्णय, त्यावर घरच्यांची प्रतिक्रिया, पुढं टेल्कोत डेव्हलपमेंट इंजिनिअर म्हणून काम करताना आलेले अनुभव, लेखनप्रवास. 'इन्फोसिस' चा जन्म आणि भरारी, अशा अनेक विषयांवरून मुलाखतीचा प्रवास सुरू होता... श्रोते मंत्रमुग्ध होऊन ऐकत होते. अखेर वेळेचं भान राखून कार्यक्रमाची अखेर करावी लागली, पण आख्खा हॉल भारावलेल्या अवस्थेतच होता.

कार्यक्रमानंतर या लाडक्या लेखिकेची स्वाक्षरी घेण्यासाठी चाहत्यांची झुंबड उडाली. सुधाताईही न कंटाळता प्रत्येकाला स्वाक्षरी देत होत्या. चाहत्यांची गर्दी ओसरल्यावर आम्ही तिथून बाहेर पडलो. बाहेरच्या बाजूला एक छोटा मुलगा लॉटरीची तिकिटं विकत होता. बाहेर पडणाऱ्या प्रत्येकाला तो तिकीट विकत घेण्याचं आर्जव करत होता. तो मुलगा सुधाताईंजवळ आला. सुधाताईंनी त्याची चौकशी केली. शाळेत शिकणारं, परिस्थितीमुळं लॉटरीची तिकिटं विकून चार पैसे मिळवणारं ते अल्लड वयाचं पोर... सुधाताईंनी त्या मुलाला पोटाशी धरलं, त्याच्या हातात शंभराची नोट ठेवली आणि त्या म्हणाल्या, ''जा आता, घरी जाऊन अभ्यास कर. आज आता तिकिटं विकण्यात वेळ घालवू नकोस''.

'बोले तैसा चाले' चं जितं-जागतं उदाहरण माझ्या डोळ्यानं मी पाहिलं. मला सुधाताईंची स्वाक्षरी घ्यायची गरजच वाटली नाही, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची मुद्रा माझ्या मनावर अगदी ठसठशीत कोरली गेलीय, कायमची !

उत्तुंग यशामागचा प्रचंड एकटेपणा

नारायण मूर्तींसारख्या यशस्वी माणसाची पत्नी होणं हा अनुभव कसा आहे ? या प्रश्नावर सुधाताईंनी दिलेलं उत्तर उपस्थितांच्या काळजाला स्पर्शून गेलं.

त्या म्हणाल्या, ''अशा यशस्वी, जगद्विख्यात लिजंड आणि प्रचंड बिझी माणसाची पत्नी होणं सोपं नसतं. प्रत्येक यशाची किंमत चुकती करावीच लागते. त्याप्रमाणं इतर सर्वसामान्य कुटुंबात दिसतं तसं चित्र आमच्या संसारात दिसत नाही. नवरा संध्याकाळी घरी आला, मला फिरायला घेऊन गेला, असं शक्य नसतं. आख्ख्या सप्टेंबर महिन्यात आमची फक्त तीनदा भेट झालीय आणि तीसुद्धा विमानतळांवर. ते एका ठिकाणाहून येऊन दुसरीकडं निघाले होते. तसंच माझंही आणखी वेगळ्याच ठिकाणी जायचं ठरलं होतं. त्यांचं पत्नीपद सांभाळताना मला प्रचंड एकटेपणा जाणवतो, अगदी एकाकीपण... पण ही या उत्तुंग यशाची किंमत आहे आणि ती मला चुकवायलाच हवी, हे मी समजून घ्यायलाच हवं''. अशा एकटेपणात मला लेखनाची सोबत होते - ही गोष्टही त्यांनी आवर्जून सांगितली.

मोडलेले लग्न कादंबरी वाचून पुन्हा जुळले

'महाश्वेता' या कादंबरीच्या आठ आवृत्त्या निघाल्या असून, या कादंबरीचं हिंदी, तामिळ, तेलगू आणि आता मराठीही भाषांतर झालंय. 'स्टार टीव्ही' वर सर्वाधिक खपाच्या पुस्तकांच्या यादीत हे पुस्तक निवडलं गेलंय. गरीब शाळामास्तरची अतिशय रूपवान मुलगी एका राजबिंड्या, श्रीमंत, घरंदाज डॉक्टरच्या मनात भरते. सर्वांचा विरोध पत्करून तो तिच्याशी लग्न करतो. स्वप्न तर नाही ना, असे वाटणारे नव्या नवलाईचे दिवस संपतात न संपतात तोच तिच्या अंगावर कोडाचा पांढरा डाग उठतो.... आणि क्षणात स्वप्न कठोर वास्तवात बदलतं. तिला घरातून बाहेर हाकललं जातं...पण संकटाला समर्थपणे तोंड देत ती मुलगी आपलं आयुष्य पुन्हा सावरते...अशी मध्यवर्ती कल्पना असलेल्या या कादंबरीतल्यासारखं उदाहरण वास्तव्यात घडल्याचा एक किस्सा सुधाताईंनी सांगितला. लग्न ठरल्यानंतर एका मुलीला कोड उठलं. तिच्या होणाऱ्या नवऱ्यानं लग्नाला नकार दिला. काही दिवसांनी त्याचा वाचनात 'महाश्वेता' आलं आणि अशा मुलीचा काहीही दोष नसताना तिच्यावर ओढवलेल्या या प्रसंगातलं कारुण्य जाणून त्यानं त्याच मुलीशी लग्न करायची तयारी दर्शवली. त्या लग्नाला सुधाताईंना आवर्जून आमंत्रण होतं. हा किस्सा सांगून त्या म्हणाल्या की, ''आपल्या लेखनानं जर कुणाच्या आयुष्यात, विचारांत परिवर्तन घडवलं, तर ते फार मोठं साध्य आहे असं मला वाटतं''.

बसून गंजण्यापेक्षा झिजून फाटणं केव्हाही चांगलं !

कुठल्याशा खेड्यात, एखाद्या मागास भागात अतिशय कष्टात आयुष्य काढणारी माणसं कधीकधी कुठल्याही पुस्तकात न आढळणारं तत्त्वज्ञान शिकवून जातात याविषयी सांगून सुधाताई म्हणाल्या की, या माणसांना मी गुरू समजते. अशा 'गुरूं' ची त्यांनी दोन उदाहरणं सांगितली. त्या म्हणाल्या, एके ठिकाणी समुद्रकिनाऱ्यावर मला एक आठ-नऊ वर्षांचा मुलगा खेकडे पकडताना दिसला. त्याच्याकडं चौकशी केल्यावर समजलं की, दिवसाकाठी त्याला पाच एक रुपये मिळतात. सुधाताई त्याला म्हणाल्या की, किती कष्ट उपसतोस दिवसभर ! त्यावर तो मुलगा म्हणाला, ''बसून गंजण्यापेक्षा झिजून फाटणं केव्हाही चांगलं !''

ओरिसात दुर्गम भागात त्यांना १०४ वर्षांचा एक वृद्ध आदिवासी भेटला. जगातले सगळे 'प्रॉब्लेम्स' जिथं जातीनं हजर आहेत अशा मागास भागातला, अजून ईस्ट इंडिया कंपनीचंच वर्चस्व आहे अशा समजूतीत असणाऱ्या त्या माणसानं सुधाताईंना सांगितलं, ''असल्या कागदाच्या तुकड्याचं (पैशाची) आम्हाला कधी मोठेपण वाटलंच नाही. इथं नदी वाहते. ती आपल्या मर्जीनं नाही. झाडं फुलतात, ती आपली परवानगी घेत नाहीत, पाऊस पडताना तुमची परवानगी मागत नाही... इथं कोण आपण...तरी जमिनीच्या तुकड्यासाठी, नदीच्या पाण्यासाठी माणसं झगडत असतात !''

बातचीत

निरंजन घाटे

विज्ञान हा विषय कधीच कालबाह्य होणार नाही.

शब्दांकन : सुनीता दांडेकर

काही माणसं अशी असतात; त्यांच्याशी झालेल्या साध्या संवादातूनही जाताजाता अनेक गोष्टी कळतात. त्यांच्या बहुश्रुततेची झलक दिसते. बोलण्यातली सहजता, विनोदबुद्धी त्यानी समोरच्या व्यक्तीला प्रसन्नतेचा अनुभव येतो. विज्ञानलेखक निरंजन घाटे यांच्याशी बातचीत करताना असाच अनुभव येतो.

विविध विषयांवरील वाचन, मनन, प्रत्येक घटना कशी घडली याबद्दलची जिज्ञासा व निरंतर अभ्यास हे घाटे यांचे वैशिष्ट्य. मेहता पब्लिशिंग हाऊसशी त्यांचे ऋणानुबंध जुळले आणि घाटे हे आमचेच लेखक झाले.

आज विज्ञानकथा लेखक म्हणून निरंजन घाटे यांना जे अढळ स्थान आहे या स्थानापर्यंतचा त्यांचा प्रवास कसा झाला याबाबत त्यांच्याशी केलेल्या अनौपचारिक गप्पा.

- लहानपणच्या काही खास गोष्टी, वाचनाची आवड केव्हापासून लागली, याबाबत काही सांगा.

- आमच्या लहानपणी 'खास' असं काय घडणार ? चळवळ्या, धडपड्या स्वभाव असल्यानं अभ्यास करत नाही म्हणून शाळेत आणि घरी मार खाणे हाच महत्त्वाचा कार्यक्रम. सगळे खेळ खेळणे आणि वाचणे या खास आवडी. वयाच्या तिसऱ्या वर्षापासून मी वाचत आहे. वयाच्या तिसऱ्या वर्षी रस्त्यावरच्या पाट्या मोठ्यानं वाचण्यात मला फार आनंद वाटायचा. तेव्हा मी गुजराती, इंग्रजी आणि मराठी पाट्या वाचू शकत असे. पुढे 'किताबमिनार' लायब्ररी उघडायच्या आधी त्याच्या पायरीवर मी ठाण मांडून बसलेला असे. लायब्ररीतून पुस्तक घ्यायचं व वाचत वाचतच घराकडे निघायचं. वाचत वाचत चालण्यानं मी अनेकदा गाड्यांना,

माणसांना धडकलो आहे. माझ्या आईला, स्वत:ला वाचनाची अतोनात आवड होती. 'पोरंग दरवर्षी पास होतंय, खेळतंय, वाचतंय !' यावर ती पूर्ण समाधानी होती. माझी आई शेवटी डोळ्यांनी अंधुकसं दिसत असेपर्यंत वाचत होती. जेव्हा डोळ्यांनी अजिबात दिसेनासं झालं तेव्हाच तिचं वाचण थांबलं. त्यावेळी. भा. रा. भागवत, ना. धों. ताम्हनकर, बाबुराव अनीळकर यांची पुस्तके माझ्या खास आवडीची होती. माझ्या मोठ्या काकांनी मानगुट धरून तर्खडकर भाषांतरमाला पाठ करून घेतल्या. त्यांच्यामुळं माझे इंग्लिश चांगलं झालं आणि त्यामुळं मी नववीदहावीतच इंग्रजी पुस्तकं वाचू लागलो. इंग्रजी पुस्तकातील जॉन स्टाईनबेक, पी. जी. वुडहाऊस, आयझॅक, ऑसिमोब, आर्थर क्लार्क, रौबर्ट सिलवर्सबर्ग, बॉब शॉ, रे-ब्रॅडबरी इत्यादी पुस्तके मी वाचली. अनेक पुस्तके इंग्रज अमेरिकन रहस्यकथा लेखकांची पुस्तके, शिकार कथा, रहस्यकथा, भारताविषयी पाश्चात्यांनी लिहिलेली पुस्तके, जेम्स हॅडली चेजची पुस्तके, आफ्रिकेवरील पुस्तके, भौगोलिक साहसकथांची पुस्तके, हिचकॉकचे कथासंग्रह. धनंजय गोळे नावाचा माझा एक मित्र होता. त्याच्या वडिलांनी मला नेहमी मुलांसारखं वागवल आणि माझ्यासाठी पुस्तकंही आणून दिली. वाचन नाहीतर मी अस्वस्थ होत असे. माझा मामा एक महान संस्कृत तज्ज्ञ होता. त्यानं संस्कृत आणि मराठीतून सुमारे सव्वाशे पुस्तकं लिहिली. मामाच्यचा विद्वत्तेचं मला फार आकर्षण वाटे. आपणही त्याच्यासारखं खूप शिकावं, पुस्तकं लिहावी या महत्त्वाकांक्षेनं मनात मूळ धरलं होतं.

- लेखनाला सुरुवात केशी झाली ?

- माझा एक मित्र 'तरुण भारत'मध्ये खेळांवर नियमितपणे लिहित असे. तो कधीकधी मला एखाद्या खेळावर लिहायचा आग्रह करे आणि मला लिहायला लावे. त्या बदल्यात त्याला मिळणाऱ्या मानधनातला काही वाटाही मला देई. त्या मित्रासाठी मी अधूनमधून खेळावर लिहू लागलो. त्याचवेळी 'कोयना भूकंप' घडला. मी भूशास्त्र विषयाचा पदवीधर असल्याने मी उत्स्फूर्तपणे भूकंपाची शास्त्रीय चिकित्सा करणारा लेख लिहिला. तो पुण्याच्या व लगोलग नागपूरच्याही तरुण भारत मध्ये प्रसिद्ध झाला. पण या माझ्या नावाने स्वतंत्रपणे लिहिलेल्या लेखाचे मानधन मात्र मला मिळाले नाही !

त्यावेळी आमचा मित्रांचा ग्रुप होता तो अतिशय चांगला होता. तेव्हा क्रिकेट खेळण्यासाठी आम्ही एकत्र येत असू. खेळ संपल्यावर गप्पा मारताना मी अनेक विषयांमधील बऱ्याच गोष्टी बोलत असे. मी बऱ्याच कल्पना मित्रांना सांगायचो. तशाच इतरत्रही सांगायचो. माझ्याच एका कल्पनेवरील नाटक नि एकांकिका पाहून माझा मित्र विजय खवळला. माझे मित्र मला नेहमी सांगत असतं. जे बोलतो ते लिहित जा. माझं हस्ताक्षर अत्यंत खराब होतं त्यामुळं मी म्हणत असे, 'मी लिहिलेलं कोण वाचणार ? आणि छापणार तरी कसे ?' यावर माझा जिवलग मित्र विजय पेंडसे याने उपाय शोधून काढला. त्यांच अक्षर मोत्यासारखं होतं. मी लिहिलेलं तो त्याच्या सुंदर अक्षरात नकलून काढत असे. त्यानंतर मात्र मी उत्साहानं लिहू लागलो.

- सुरुवातीला कशा प्रकारचं लेखन केलं ?

- तेव्हा मी सामाजिक कथा, विनोदी साहित्य, रहस्यकथा लिहित असे. या कथा

मनोहर, किर्लोस्कर, प्रपंच या मासिकातून प्रसिद्ध होत असतं. या कथा तेव्हा खूप लोकप्रियही झाल्या होत्या. 'एका दर्जेदार सामाजिक कथालेखकाचा उदय' अशा स्वरूपाचे कौतुकही खूप झाले होते. आजच्या काही आघाडीच्या लेखकांनी मला त्याकाळी 'आम्ही तुमच्या स्टाईलचे अनुकरण करतो' असे स्वत:हून भेटून सांगितले होते. वाचकांचा प्रतिसादही या कथांना प्रचंड होता.

- विज्ञानकथा लेखनाकडे कसे वळलात ?

- त्यावेळी मी वेगवेगळ्या विषयावर लिहित असे. सत्यवान टण्णूंच्या 'वटवट'मधील ऐंशी टक्के लेखन माझं असे. तसंच विज्ञानकथाही लिहित होतो. त्याकाळी विज्ञानकथेला प्रतिष्ठा नव्हती. वास्तविक खरी विज्ञानकथा म्हणजे काय हेच कोणाला माहीत नव्हते. एखाद्या संशोधनाचा वृत्तांत संवाद रूपात लिहिला तर त्यालाही विज्ञानकथा म्हटले जायचे. विज्ञानकथा म्हणजे वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा भविष्यात माणसाच्या सामाजिक, भावनिक जीवनावर बरावाईट कोणता परिणाम होईल याचं चित्रण करणारी कथा. माझ्या विज्ञानकथा वाचून अ. मा. लेले म्हणाले, 'तू प्रथम छोट्या छोट्या हलक्या फुलक्या कथा लिही नंतर अवघड कथा लिही' त्याप्रमाणे लिहू लागलो.

आणीबाणीमध्ये 'सेन्सॉरशिप' असायची. वृत्तपत्रांच्या संपादकांना प्रुफ घेऊन विश्रामबाग वाड्यात जावे लागायचे. संपादकांना असे लक्षात आले की 'विज्ञान' या शब्दाला पोलिस अधिकारी बिचकतात. 'विज्ञानावरचा लेख आहे. छापा !' असं म्हणत. त्यामुळं माझ्याकडं विज्ञान लेखांची मागणी वाढली. आणीबाणीतील या परिस्थितीमुळे मी विज्ञानवरील अधिकाधिक लेखन करू लागलो.

- विज्ञान लेखन सुरू केल्यावर खास प्रयत्न काय केले ?

- माझ्या पूर्वीच्या लेखनाची शैली वेगळी होती. एखादी कल्पना स्फुरली तर त्यावर कथा लिहिणे सोपे असते परंतु स्फुरलेल्या कथेमध्ये विज्ञान बसवायचे ही कठीण गोष्ट आहे. शिवाय 'विज्ञान म्हणजे आपल्याला न समजणारा विषय' असा समज सर्वसाधारण वाचकांचा तेव्हा होता. हा समज नाहीसा करण्यासाठी विज्ञान अतिशय सोप्या भाषेत सांगणे आवश्यक होते. यासाठी माझी पूर्वीची लेखनाची शैली बदलून मी अत्यंत प्रयत्नपूर्वक व कष्टपूर्वक नवीन शैली निर्माण केली. त्याकाळी पूर्णत: भारतीय विज्ञानकथा कमी लिहिली जात असे. परकीय विज्ञान कथांचे अनुवाद अधिक होत असत. विज्ञानकथा आणि तीही संपूर्ण भारतीय मातीतील अशी निर्मिती करण्याचा मी निश्चय केला व त्यानुसार अनेक वर्षे अशा कथा लिहित आलो. बऱ्याच कथांचे अनुवादही केले. मुंबईत विज्ञानकथेवरच चर्चासत्र आयोजित केले. महात्मा फुले वस्तु संग्रहालयातर्फे विज्ञान लेखक मेळावे भरवले.

मी जेव्हा इतर विषयांवर लिहित असे तेव्हा मला काही पत्रे अशी आली की बाकी विषयांवर लिहिणारे खूप आहेत. विज्ञानावर लिहिणारे कोणी नाही. तुम्ही फक्त विज्ञानावरच लिहा.

- विज्ञान हा प्रचंड विस्ताराचा विषय आहे. यातील कोणत्या विशिष्ट विषयाचे आकर्षण होत ?

- नाही. असे काही सांगता येणार नाही. ज्याबाबत काही नवीन घडते त्याबाबत माहिती मिळवायची हे माझं सूत्र आहे. वैज्ञानिक संशोधनावर प्रसिद्ध होणारी जर्नल्स, विविध वृत्तपत्रातून येणाऱ्या विज्ञान विषयक बातम्या याचं संकलन करण्याचा मला लहानपणापासूनच छंद आहे. यातून नवे विषय कळतात. नव्या विषयाबद्दलची जिज्ञासा स्वस्थ बसू देत नाही. मग त्याबद्दल मिळेल ती माहिती मिळवण्याचा ध्यास लागतो. जी जी माहिती आपण मिळवली ती सर्वांना सांगावी या भूमिकेतून विज्ञानविषयक सदर लेखने सुरू झाली. आज माझे वेगवेगळ्या विषयांवर वेगवेगळ्या वृत्तपत्रांत स्तंभलेखन सुरू आहे. या लेखनाचीच मग पुस्तके निघतात. विज्ञान हा विषय कधीच कालबाह्य ठरणारा नसल्याने त्याचे स्वरूप नेहमीच ताजे असते त्यात आवश्यक ती नवीन भर टाकणे हेही असतेच.

- वाचकांचा प्रतिसाद कसा असतो ? वाचकांची विशेषत: विद्यार्थ्यांची जी पत्रे येतात त्यात प्रामुख्याने कोणते प्रश्न असतात ?

- वाचकांचा प्रतिसाद नेहमीच उदंड असतो. कोकणपट्टी भागात माझा फार मोठा वाचक वर्ग आहे असे जाणवते प्रत्येक पुस्तकावर आवर्जून नियमित मत कळवणारेही अनेक वाचक, फॅन्स आहेत.

पत्रातून प्रश्न अनेक प्रकारचे विचारले जातात. विद्यार्थ्यांच्या पत्रात त्यांनी शालेय पुस्तकाबाहेरचे, तीव्र जिज्ञासेपोटी प्रश्न विचारलेले असतात त्यांना मी आवर्जून, उत्तरे लिहितो. मार्गदर्शनही करतो. परंतु सहज थोड्याशा वाचनाने ज्याची उत्तरे सापडतील अशा प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांनीच शोधावीत असे सुचवितो.

- आयुष्यात सदैव लक्षात राहतील असे प्रसंग कोणते आहेत ?

- असे अनेक प्रसंग रोज घडत असतात. रस्त्यानं जातानाही आजूबाजूला अनेक कारुण्यपूर्ण घटना घडत असतात. एक प्रसंग सांगतो एकदा बेवारशी कुत्र्यांना पकडणारी महानगरपालिकेची गाडी रस्त्यावर उभी होती. एक कुत्र्याच्या पिलाला पालिकेच्या कर्मचाऱ्याने पकडले व गाडीत टाकले. तो रस्ता झाडणारी पालिकेचीच झाडूवाली म्हणाली, 'ते पिलू मी पाळले आहे. त्याला सोडा.' कर्मचाऱ्याने नकार दिला व मला तशी ऑर्डर आहे असे म्हणाला. त्या झाडूवाल्याबाईने तत्काळ आपले लहानगे मूल त्या गाडीत टाकले व म्हटले, 'तुम्हाला त्या कुत्र्याच्या पिलाला न्यायचे असेल तर माझ्या मुलालाही घेऊन जा.' बघता बघता गाडीभोवती गर्दी जमली. त्या कर्मचाऱ्याला ते पिल्लू परत द्यावे लागले. एका सामान्य झाडूवालीच्या मनातील उत्कट प्राणीप्रेम पाहून मी भारावून गेलो.

- नवीन लेखन विषयांबाबत काही सांगू शकाल ?

- नवीन अनेक विषयांवरील पुस्तकाचे काम चाले आहे.

नवे शतक - एकविसावे शतक लिहिल्यानंतर १९९७ ते २००२ मध्ये विज्ञानतंत्रज्ञान क्षेत्रात जी प्रगती झाली त्या सगळ्याची मुळे दुसऱ्या महायुद्धासाठी झालेल्या संशोधनात आहेत. युद्धाचा आढावा घेता घेता ही प्रगती कशी झाली याची मनोरंजक माहिती देणाऱ्या पुस्तकाचे लेखन चालू आहे.

आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान - महान शोध लावले असा दावा लोक करतात. ७००० वर्षापूर्वीपासूनच्या काळात माणसाने विज्ञान तंत्रज्ञान वापरून खरोखर काय केले व ज्याचे पुरावे उपलब्ध आहेत अशा गोष्टींची शास्त्रीय मनोरंजक माहिती या पुस्तकात आहे.

विज्ञान चित्रपट - काही गाजलेल्या विज्ञान चित्रपटांची ओळख करून देणाऱ्या पुस्तकाचे काम चालू आहे. हे पुस्तक मेहतांकडून प्रकाशित होत आहे.

फारफार वर्षापूर्वी - पुरातत्त्व आणि पुरातत्त्वीय माहितीचा मागोवा घेत आदिमानवापासून आजिमितीस मानवाची प्रगती कशी झाली आणि त्याचे शास्त्रीय पुरावे कसे मिळवले जातात. याची माहिती देणारे पुस्तकही लिहून तयार आहे.

विज्ञानाच्या प्रगतीमुळे माणसाचे सामाजिक, आर्थिक, भावनिक भवितव्य काय असेल या विषयावर अभ्यास करून पुस्तक लिहिण्याचा मानस आहे. अनेक विषय मनात घोळत आहेत. प्रत्येकावर जमेल तसे व जमेल तितक्या वेगाने लेखन करण्याचा प्रयत्न करणार आहे.

आपल्या सर्व पुस्तकांचे वाचक उत्सुकतेने स्वागतच करतील अशी खात्री वाटते.

नवी स्पर्धा

१

२

३

सोबत दिलेली मुखपृष्ठे कोणत्या पुस्तकाची आहेत ते ओळखा व बक्षीस मिळवा.☐

बक्षीस जिंकण्यासाठी मेहता मराठी ग्रंथ जगतचे सभासद असणे आवश्यक.

उत्तरे पाठवण्याची मुदत १५ डिसेंबर २००२

आमचा पत्ता :

मेहता मराठी ग्रंथ जगत,
१२१६, सदाशिव पेठ,
पुणे ३०.

४



५

६



बातचीत

अतुल शिधये

फॅशन, ग्लॅमर, मॉडेलिंग, ॲडव्हरटायझिंग या क्षेत्रात जाऊ इच्छिणाऱ्यांसाठी फोटोग्राफी महत्त्वपूर्ण

शब्दांकन : सुनीता दांडेकर

आज वृत्तपत्रात, मासिकांमध्ये आपल्याला वेगवेगळ्या क्षेत्राबद्दल, त्यातील अनुभवांबद्दल वाचायला मिळते. आज वेगवेगळी अनंत क्षेत्रे उदयास आली आहेत. या क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्तींचे अनुभवही नाविन्यपूर्ण असतात. कित्येकदा सर्वांना माहित असलेल्या क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभवही वेगळ्या धर्तीचे असतात, चित्रपट क्षेत्रही असेच एक झगमगते क्षेत्र. यातील कलाकारांचे, तंत्रज्ञाचे, चित्रपट निर्मितीसाठी लागणाऱ्या अनेक प्रकारच्या सेवांचे प्रचंड कष्ट सर्वसामान्यांना जाणवत नाहीत. या क्षेत्रातील गुन्हेगारी क्षेत्राच्या हस्तक्षेपाबद्दलच आज अधिक चर्चा होताना दिसते. आणि तरीही सर्वसामान्यांचे या क्षेत्राबद्दलचे आकर्षण वाढलेलेच जाणवते. नवनवीन क्षेत्रातील नवनवीन अनुभव आमच्या वाचकांना सादर करण्यात आम्हाला आनंद वाटतो. यासाठीच साहित्यक्षेत्रापासून अलग असलेल्या तरीही साहित्यिक योगदानाशिवाय निर्मितीच शक्य नसलेल्या चित्रपट क्षेत्रातील एका कलाकाराशी आम्ही केलेली ही बातचीत. हा कलाकार कोणी अभिनेता नाही तर चित्रपट निर्मितीचे अविभाज्य अंग असलेल्या मेकअप व फोटोग्राफी यामधील आजचा आघाडीचा मराठी कलाकार आहे.

- प्रथम आपण निवडलेल्या क्षेत्राबद्दल, त्याच्या स्वरूपाबद्दल सांगा

- मी अभिनव कला महाविद्यालयातून पदवी घेतली तेव्हा फोटोग्राफी हा माझा स्पेशल विषय होता. यातही माणसांच्या चेहऱ्याच्या फोटोत मला विशेष रस वाटत असे. शिक्षण घेतानाच आपण नाट्य-चित्रपटाच्या क्षेत्रात काही करावे अशी तीव्र इच्छा व्हायची. पण मला स्टेजवर उभे राहून काही करण्याचे धाडस नव्हते. त्यामुळे या क्षेत्रातील टेक्नीकल गोष्टीत

शिरावे असे ठरवले. यातूनच मी प्रोफेशनल मेकअपचे शिक्षण घेतले. व विक्रम गायकवाड या सुप्रसिद्ध मेकअप आर्टिस्टकडे असिस्टंट मेकअप म्हणून कामाला सुरवात केली.

या क्षेत्रात कॅमेरा इतकंच मेकअपलाही महत्त्व आहे.आंतरराष्ट्रीय किर्ती संपादन केलेल्या व्यक्तींचा अपवाद वगळता मेकअपमन हा काही प्रतिष्ठेचा मानला जात नाही. त्यातही असिस्टंट मेकअपमनला तर स्वत:ची कोणतीच ओळख असत नाही. अनेक अपमानास्पद अनुभव हे काम करताना मला आले. बोलवतानाही 'ए मेकअप' असेच बोलवले जाते. त्यावेळी मी ज्यांचा मेकअप करीत असे त्यांच्याशी त्यांच्या कामाबद्दल, भूमिकेबद्दल बोलत असे. अश्विनी भावे,निशिगंधा वाड यासारख्या अभिनेत्रींशी त्यामुळे माझी चांगली ओळख झाली. त्यावेळी मी अनेक नाटके, चित्रपट सतत बघत असे. काही नाटके व चित्रपट तर मी अनेकवेळा पाहिले आहेत. प्रत्येकवेळी त्या नाटकातल्या कोणत्या गोष्टीसाठी पुन्हा पाहायचे हे मी ठरवलेले असे. असा मी या सर्व गोष्टींचा नेहमी अभ्यास केला. पुस्तकांचेही वाचन असल्याने या क्षेत्रात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीबद्दल मी बोलू शकत असे. मेकअप करताना मी त्या त्या नटाशी त्याच्या कामाबद्दल बोलत असल्याने त्यांच्या मनात माझ्याबद्दल एक सॉफ्टकॉर्नर तयार झाला. व मला 'ए मेकअप' अशी हाक न येता 'अतुल' नावानंच बोलावलं जावू लागल. या प्राथमिक पायरीवर मी ३ वर्षे काम केले-

- या क्षेत्रात तुमचा पहिला अनुभव कसा होता ?

- मी सर्व प्रथम काम केले ते 'मायेची सावली' या चित्रपटासाठी. यापूर्वी अनियमित वेळापत्रकाची मला अजिबात सवय नव्हती. या चित्रपटात अश्विनी भावे यांचे एक लावणी नृत्य आहे. त्या सेटवर मेकअपचे काम मी करत असे. स्वत: अश्विनी भावे सकाळी ठिक १० वाजता कॉस्च्युम, मेकअप सह सेटवर हजर असे. सुबल सरकार नृत्याचा एकएक तुकडा तिला शिकवत ती त्याची रिहर्सल करे व लगेच शुटींग अशा तऱ्हेने काम चालू होते. सकाळी १० ते रात्री ३ पर्यंत हे काम चालले होते. तरीही अश्विनी भावे कॅमेऱ्यासमोर आल्यावर सकाळी १० वाजता जेवढी फ्रेश दिसे तितकीच रात्री ३ वाजताही दिसे. यावरून मला या क्षेत्रातल्या कष्टांची सातत्य, न थकता, न कंटाळता, उत्साहाने काम करण्याची, आवश्यक स्टॅमिनाची कल्पना आली.

- हे काम करताना तुम्हाला वेगवेगळ्या व्यक्तींचे वेगळे अनुभव आले असतील त्यातून काही शिकायला मिळाले का ?

- खूपच ! या क्षेत्रात मला अनेक माणसे भेटली. अनेकांकडून मला खूप काही शिकण्यासारखे मिळाले. माझ्या एकूण वाटचालीवर मोठा प्रभाव पडलेल्या मला घडवणाऱ्या व्यक्ती म्हणजे शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे व श्रेष्ठ दिग्दर्शक श्याम बेनेगल. बाबासाहेब पुरंदऱ्यांच्या 'जाणता राजा' साठी मी काम करत होतो. या प्रयोगात ३०० कलाकार होते. व ३०० कलाकारांना मेकअप करणारे आम्ही फक्त ६ जण होतो ! या युनिट बरोबर काम करताना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, पत्र्याच्या शेडखाली, असह्य उकाडा, धूर, धुरळा अशा

स्थितीत, कमीतकमी वेळात सर्वोत्तम काम कस करावं हे मला 'शिकायला मिळाले. घरातल्या वडिलधाऱ्या माणसाची असावी अशी आदरयुक्त वडिलधारी शिस्त बाबासाहेबांनी सर्वांना लावलेली होती. या प्रयोगात अनेकजणं वेगवेगळे रोल करत. काहीजण प्रथम मुसलमान तर नंतर ब्राह्मण पुन्हा मावळा अशा तऱ्हेचेही रोल करत असे. त्याचा प्रथम रोल झाल्यावर तो धावत मेकअपरूम मध्ये येई. व दुसऱ्या रोलचा मेकअप करून घेई या मेकअप मध्ये खूप प्रकार होते. प्रत्येक रोलनुसार गंध, गोंदण, टिळे, टिकल्या वेगवेगळ्या असत. मावळ्याचं गंध, अष्टप्रधान मंडळातल्या व्यक्तीचं गंध, ब्राह्मणाच गंध हे वेगवेगळ असे. प्रत्येक गंधाला सामाजिक स्तर होता. अर्थ होता. स्वत: बाबासाहेब मेकअपरूमच्या बाहेर जातीनं हजर असत. व प्रत्येकाचा मेकअप जातीनं बारकाईनं पाहात असत. शाम बेनेगल साहेबांबरोबर मी दोन सेटवर काम केले. कामातील उच्च कोटीची अचूकता व वेळेच्या बाबतीतील काटेकोरपणा हे मी या सेटवर शिकलो. त्यांच्या सेटवर स्पॉटबॉयपासून स्वत: बेनेगल सर्वांना एकच जेवण असे. 'सरदारी बेगम' या चित्रपटासाठी बेनेगल साहेबांबरोबर मी काम करत होतो. आजकाल शूटींगच्या वेळी संवाद लिहिले व कलाकारांना दिले जातात. परंतू बेनेगल साहेबांच्या सेटवर असे घडत नाही. शूटींगच्या आधी १५ दिवस प्रत्येकाकडे कथानक, संवाद, कॉश्च्युम डिझायनरकडे त्याच्या कामाची प्रत्येक बारकाव्यासह माहिती, मेकअपमनकडेही संपूर्ण माहिती दिलेली असे.

एकदा अमरिशपुरी यांच्या एका संवादाचं शूटींग चालू होतं - त्या संवादातला एक शब्द पुरीसाहेब विसरले होते. तो शब्द नगण्य होता, पण समोर स्क्रीप्ट नसूनही श्यामजींना ते लगेच समजले ''आप एक शब्द ले नही रहे है ।'' अमरिशपुरींनी दोन मिनिटे डोळे मिटून पुन्हा संवाद मनातल्या मनात आठवले व तो शॉट ओके केला. नंतर जेवायला बसले असता चेष्टेत श्यामजी म्हणाले, 'अमरिशजी आपने ये दोन मिनिट वेस्ट कर दिये ।'' यावर अमरिशपुरीही शांतपणे म्हणाले, ''येस, आय मीन इट, सॉरी फॉर दॅट '' या प्रसंगात दोन मोठ्या व्यक्तींमधले मोठे कोण असा संभ्रम मला पडला.

- काम करताना काही थरारक अनुभव ?

- हो, असे बरेच अनुभव आहेत. त्यातला एक थरारक अनुभव 'जाणता राजा' च्या सेटवर आलेला आहे. गोरेगावला प्रयोगाच्या उद्घाटन समारंभासाठी बाळासाहेब ठाकरे येणार होते. प्रयोगाला फक्त अर्धातास राहिला होता. आणि प्रयोगातला एक हत्ती अचानक पिसाळला. सोंड रंगवणाऱ्या माणसाला त्यानं पायाखाली चिरडलं. त्यावेळी आमची अभूतपूर्व धांदल उडाली. स्टेजच्या मागे फक्त एक पत्राची शेड आमच्यासाठी उभारलेली होती. त्यात पळावे की स्टेजवर असा संभ्रम पडला. हत्तीच्या एका धडकेनंच ती शेड कोसळली असती हत्तीला बाहेर जावू दिले तर गावाची बाजारपेठ लागूनच होतो. म्हणजे खूपच नुकसान आणि घबराट उडाली असती त्यावेळी आमच्यातल्याच काही बहाद्दर व्यक्तींनी मशाली, भाले यांच्या सहाय्यानं त्या हत्तीला मागे मागे नेत एका दगडी भिंतीच्या कोपऱ्यात नेऊन उभे केले. व ते सर्व त्याच्यापुढे उभे राहिले. स्टेजवर कार्यक्रम सुरू झालेला. संपूर्ण प्रयोग पार पडे पर्यंत त्या हत्तीला असे चेंबून ठेवले होते. हा अनुभव थरारकच होता. असे इतरही अनेक अनुभव आहेत

ते सर्वच सांगणे वेळेअभावी शक्य नाही.

- कधी कसोटीचे, अडचणीचे प्रसंग ओढवले का ?

- असे खूप प्रसंग नाहीत. पण एक प्रसंगी मात्र हद्दच झाली.. माझे बॉस विक्रम गायकवाड कामासाठी मुंबईला गेले. जाताना मेकअपचे संपूर्ण कीट ही घेऊन गेले. अशावेळी मला मेकअपसाठी बोलावल गेलं कोणतीच पुरेशी साधनं नसताना मला स्मिता तळवलकर, नीना कुलकर्णी, उदय लागू, शरद तळवलकर, सनील बर्वे, या सारख्या दिग्गज कलाकारांचा मेकअप करायची वेळ आली. तेव्हा मात्र माझ्या तोंडचे पाणी पळाले. त्या सर्व कलाकारांनी मला खूप सांभाळून घेतले...

- पोर्ट फोलिओ बनवून देण्याच्या व्यवसायाकडे तुम्ही कसे वळलात ?

- सध्या मी फॅशन ग्लॅमर, मॉडेलिंग, ॲडव्हर्टायझिंग फोटोग्राफी करत आहे. म्हणजे ज्या व्यक्तींना मॉडेलिंग क्षेत्रात यावयाचे आहे अशांचा मेकअप फोटो सेशन करून उत्कृष्ट पोर्टफोलिओ बनवून देणे, टीव्ही कमर्शिअल्स, डॉक्युमेटरीज, एज्युकेशनल कॉर्पोरेट फिल्मस, स्टील ॲडव्हर्टायझिंग अशी कामे मी करत आहे. फक्त मेकअपमन राहायचे नाही हे मी प्रथमच ठरवले होते. मी स्वतंत्र मेकअप आर्टीस्ट म्हणून काम सुरू केले तेव्हा फेमिना, ग्लॅडरॅग्ज, एल या मासिकांच्या दर्जाचा मेकअप फोटोसेशन पुण्यात करून देणारे कोणीही नव्हते. प्रत्येकवेळी त्यासाठी मुंबईवरून आर्टीस्ट जाणले जात. म्हणून मी हे क्षेत्र निवडले. त्यावेळी आजचे आघाडीचे कलाकार, शर्वरी जेमिनिस, समीर धर्माधिकारी, यातिन कार्येकर, राहूल अवस्थी, राधिका हर्षे, सोनाली खरे, सुनील बर्वे यांना माझ्याकडे फोटोसेशन करून घेण्याबद्दल विनंती केली ती त्यांनी कोणताही मोबदला न घेता आनंदाने मान्य केली. यामुळे मला मार्केट मिळायला खूप हातभार लागला. त्यानंतर आसावरी जोशी, उमेष कामत, अमिता खोपकर, मधुरा देव, अंकुष चौधरी, श्रीकांत मोघे या सारख्या कलाकारांनीही फोटोसेशन पोर्टफोलिओ माझ्याकडून करून घेतले व माझ्या या नवीन क्षेत्रातील गाडी वेगान सुरळीत धावू लागली.

- तुम्हाला स्वत:ला मराठी असण्याचा अभिमान आहे व मराठी कलाक्षेत्रातच तुमची कारकीर्द बहरत आहे त्यामुळे 'मराठी' साठी काही करण्याचा विचार केला आहे का ?

- नक्कीच ! माझ्यासमोर उत्कृष्ट मराठी कलाकारांची एक मोठी टीम उभी आहे. 'मराठी' म्हणजे काय - छे असा व्यावसायिकांचा एक सूर असतो.म्हणून मी माझ्या खर्चानं 'ही आहे मराठी टॅलंट' हे दाखवून देणारं मराठी कलाकारांचं एक उत्कृष्ठ कॅलेंडर तयार करण्याच्या प्रयत्नात आहे. अर्थातच हे खूप खर्चिक काम आहे यात सर्व नवे जुने मराठी कलाकार एकत्र यावेत ही माझी इच्छा आहे. यासाठी आर्थिक पाठबळ देणाऱ्या व्यक्तींचाही मी शोध घेत आहे. पाहू या मला मराठी व्यावसायिक, मराठी कलाकार किती साथ देतात की मराठी वैशिष्ट्याप्रमाणे पाय ओढतात - ते !

अतुल शिधये, सुपर्णा अपार्टमेंटस् ,प्लॉट नं. २, तुळशीबागवाले कॉलनी, सहकारनगर, पुणे-९, फोन- ४२२८२२३

दिवा दिवाळी वार्षिकांक समिती

मुंबई संपर्क : द्वारा : श्री.विजय पाध्ये, बी.वाय.पी. २८ जावळे भुवन भवानीशंकर रोड, दादर, मुंबई - ४०० ०२८ दूरध्वनी : ४२२ ०४ ४५

पुणे संपर्क : द्वारा : श्री. चंद्रकांत शेवाळे, ग्रहांकित पुणे - २ दूरध्वनी : ४४५१५९९

दिवाळी अंकाच्या प्रदर्शनांना अवश्य भेट द्या -

'दिवा' तर्फे अभिनव वाचक स्पर्धा ! - रोख बक्षिसे

'' मी वाचलेला दहा सर्वांगसुंदर दिवाळी अंक २००२''

दिवाळी वार्षिकांक समिती म्हणजे 'दिवा' तर्फे २००२ च्या दिवाळी अंकांच्या वाचकांसाठी अभिनव 'वाचक स्पर्धा' जाहीर करण्यात आली आहे. **''मी वाचलेले सर्वांगसुंदर दिवाळी अंक २००२''** असं या स्पर्धेचं शीर्षक आहे. मराठी भाषाप्रेमी कोणीही वाचक या स्पर्धेत भाग घेऊ शकतो. स्पर्धकाने ५०० शब्दात अंकाचे वर्णन करावे त्याचबरोबर आपण वाचलेल्या किमान दहापैकी किंवा अधिक दिवाळी अंकातील आपणांस आवडलेली उत्कृष्ट कथा / कविता / कादंबरी / ललित व वैचारिक लेख / व्यंगचित्र / उत्कृष्ट परिसंवाद व अंतर्गत सजावट व मुखपृष्ठ याचाही उल्लेख करावा. त्याचबरोबर आपण वाचलेल्या इतर दिवाळी अंकांची नावेही त्यात नमूद करावीत. आपले टपाल दि.१५ जानेवारी २००३ पर्यंत 'दिवा' च्या मुंबई पत्त्यावर टपालाने आपल्या संपुर्ण नाव - पत्ता व दूरध्वनी क्रमांकासह पाठवावे. फेब्रुवारी २००३ च्या अखेरपर्यंत पारितोषिक वितरण समारंभ होईल. विजेत्यांना रीतसर निमंत्रण पाठविले जाईल. प्रथम पुरस्कार रु.३०००/- द्वितीय पुरस्कार रु २०००/- तृतीय पुरस्कार रु.१०००/- बाल मैफलच्यावतीने मुलांच्या बाल दिवाळी अंक वाचकांसाठी रु.१०००/- चा विशेष पुरस्कार. यात बाल वाचकही सहभागी होऊ शकतात.

या व्यतिरिक्त सर्वोत्कृष्ट दिवाळी अंकासाठी बी.वाय्. पाध्ये पुरस्कृत रु.१०००/- चा विशेष पुरस्कार, ज्योतिष विषयक सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक वाचकांसाठी ग्रहांकितचा विशेष पुरस्कार रु.१०००/- आयडियल पुस्तक त्रिवेणीचा सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक विशेष पुरस्कार रु.१०००/- असे एकूण १००००/- रुपयांचे पुरस्कार देण्यात येणार आहेत.

सर्वोत्कृष्ट दोन दिवाळी अंक १.----------

२.----------

सर्वोत्कृष्ट ज्योतिष विषयक दिवाळी अंक ----------

(या स्पर्धेसाठी कोणत्याही प्रकारची प्रवेश फी नाही.)

लेख स्पर्धा

'माझ्या आयुष्यावर परिणाम करणारे पुस्तक' या विषयावरील लेखांची दिवाळी अंकासाठी आम्ही खास स्पर्धा जाहीर केली होती. या स्पर्धेला खूपच चांगला प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेतून ग्रंथांचे महत्त्व व मानवी जीवन घडवण्याची उच्च क्षमता अगदी सहजपणे प्रतीत झाली. काही विशिष्ट पुस्तके विशिष्ट टप्प्यावर वाचनात आली की त्यांचा आपल्या आयुष्यावर मोठा परिणाम होतो आणि आपल्याला नवी दिशा मिळते, असे या स्पर्धेत भाग घेणाऱ्या अनेक वाचकांनी कळवले आहे.

आज पुस्तकांबद्दल, वाचनाबद्दल बरीच निराशाजनक वक्तव्ये ऐकायला मिळतात. या स्पर्धेतून ही सर्व निराशा साफ धुवून जाते.

यातील यशस्वी पहिल्या तीन लेखांच्या बरोबरच काही अन्य लेखही येथे देत आहोत. सर्व यशस्वी स्पर्धकांचे हार्दिक अभिनंदन !

माझ्या आयुष्यावर परिणाम करणारे पुस्तक

प्रथम क्रमांक

'चीपर बाय द डझन' ने आयुष्याला कलाटणी

डॉ. शिरीन वळवडे

अलीकडे एक खूपच सुंदर पुस्तक वाचण्यात आले. 'चीपर बाय द डझन'. फ्रँक गिलबर्ट या गृहस्थावर त्यांच्या एका मुलाने व मुलीने मिळून लिहिलेले हे चरित्रवजा पुस्तक मनोवेधक व मनोरंजक आहे.

सात मुले व सहा मुली असलेल्या या पुस्तकातल्या डॅडींनी वेगवेगळ्या समित्या स्थापन केल्या. काही मुले खरेदी समितीत तर काही वीजपाणी इत्यादी कुणी वाया तर घालवत नाही याकडे लक्ष ठेवणाऱ्या समितीत होती. ठरल्याप्रमाणे कामे पार पाडली जातात की नाही हे पाहण्याचे काम करणारीही एक समिती होती. मुलांच्या समितीतर्फे दंडही वसूल केला जाई. एकमेकांवर लक्ष ठेवल्यामुळे कामे शिस्तीत होत. मी हे तंत्र वापरले आणि आयुष्याला कलाटणीच मिळाली.

एकदा दिल्लीहून नागपूरला एकटीनेच जायची वेळ आली. मोजून फक्त पाच दिवस मी घराबाहेर राहणार होते. माझी मुलगी व पती या दोघांना घर सांभाळायचे होते, म्हणजेच माझ्या वाटणीची कामेही करायची होती.

बाहेरगावी जाण्यापूर्वी मी दोघांनाही 'चीपर बाय दी डझन' या पुस्तकाद्दल सांगून मी नसताना त्यांनी काय काय कामे करायची ते सांगितले. मुख्य म्हणजे मुलीने स्वयंपाकपाणी करायचे होते, मोलकरणीकडून नीट लक्ष ठेवून कामे करवून घ्यायची होती आणि आपल्या वडिलांच्या निष्काळजीपणाकडे लक्ष ठेवायचे होते, बूस्टर पंप सुरू करून त्यांनी वरच्या टाकीत पाणी चढवायचे होते व बाहेरची कामे करायची होती.

पुस्तकातली पेनल्टीची 'दंडवसुली' कशी वापरायची ते दोघांनाही सांगितले. एकमेकांच्या चुकांबद्दल दंड वसुली करायची पद्धत मुलीला फारच आवडली.

''दंडाचे पैसे हातात घेऊ नकोस पण लिहून ठेवत जा. बघू या तुझी किती कमाई होते ते. त्या पैशाचं तुला हवं ते घेऊन देईन मी. तुझ्या स्वत:च्या कमाईचं असेल ते.'' मी सुचवलं.

मी नागपूरला सुखरूप पोचले म्हणून दिल्लीला फोन केला तर तेवढं एकून चटकन मुलीनं पहिली चुगली केली. ''मम्मी, पपांनी पातेलं पाण्यानं भरून गॅसवर ठेवलं आणि ते झोपून गेले.''

मी काळजीनं विचारलं,

''उकळतं पाणी पडून गॅस विझला का ? पूर्ण पाणी आटलं का ? पातेलं जळलं का ?''

''नाही गं, पाणी उकळून उकळून थोडं कमी झालं. मी उठल्यावर गॅस बंद केला.''

''बरं झालं. शंभर रुपये दंड वसूल कर पपाकडून हे बघ, रोज रात्री मला फोन करीत जा आणि आजकी ताजा खबर ऐकवित जा. किती दंडवसुली होते तेही कळव.''

''बर.'' मुलगी हसू लागली.

दुसऱ्या दिवशी फोन आला, ''पपांनी बूस्टर पंप सुरू करून वरच्या टाकीत पाणी चढवलंच

नाही वरची टाकी पूर्ण मोकळी झाली. शंभर रुपये दंड लावला.''

''व्हेरी गुड. जरा तीन चार गोष्टींकडे तू लक्ष ठेव हं. पपांनी समोरचं दार लावलं की नाही ? गॅस बंद केला की नाही ? पाणी चढवायचा बूस्टर पंप बंद केला की नाही ? गिझर, पंखे, लाईटस् उगीचच सुरू तर ठेवले नाही ? किती दंड होतो, लिहून ठेवत जा.''

''हो हो.'' मुलगी आनंदाने हसू लागली. घर मॅनेज करण्यात तिला खूप आनंद वाटू लागला. विशेषत: वडिलांना दंड लावण्यात.

तिसऱ्या दिवशी फोन. ''आज पपांनी पहाटे पाच वाजताच उठून पाणी भरून टाकलं. पण गिझर उगीचच सुरू ठेवला. दंड लावला.''

''तुला काही दंड लावला नाही का पपानं?''

''एकदा लावला. भाजी जळली. फेकून द्यावी लागली.''

चौथ्या दिवशी फोन आला,''आई, मला अगदी कंटाळा आलाय. मी खूपच बोअर होतेय.''

'का गं? माझी सगळी कामं तू करतेस न ? कामातच तर तुझा वेळ जात असणार ना ? डस्टिंग वगैरे केलंस ना ?''

''अं हं, मला कंटाळा येतो.''

''कंटाळा तर मलाही येतो, पण मी करतेच ना ! त्यावेळी विचार करीत असते, 'काय काय कसं कसं लिहायचं त्याचा. तूही विचार करीत जा, तुझं प्रोजेक्टवर्क कसं करायचं त्याचा. असं केलं म्हणजे काम करताना कंटाळा येत नाही, अगं त्या पुस्तकातली मुलं कशी चटाचट सारं करायची , ते मी तुला सांगितलं होतं ना ? बघ हं. नीट डस्टिंग कर. नाहीतर तुला फाइन लागेल.''

पाचव्या दिवशी फोन आला. सगळंच ''आलबेल''. इतकं सोपं होतं यांना शिस्त लावणं ! मी उगीचच एकटी धडपडत होते.

मुलीला सातशे रुपये कमाई झाली होती. 'रिचर टू बी ॲट होम' हा धडा तिला या पुस्तकानंच तर शिकवला होता.

डॉ. शिरीन वळवडे
२ - वसन्त एन्क्लेव्ह,
नवी दिल्ली - ११० ०५७.

द्वितीय क्रमांक

शिक्षकी पेशात आनंद निर्माण करणारे पुस्तक

अ. ना. पिंगळे

गेली ३३ वर्षे मी माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील तांत्रिक शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहे. पहिली २० वर्षे असिस्टंट लेक्चरर, लेक्चरर् वगैरे पदांवर काम केल्यावर गेली १३ वर्षे तांत्रिक विभाग प्रमुख म्हणून कार्य करीत आहे. इंजिनिअरिंग डिप्लोमाचे शिक्षण पूर्ण केल्यावर प्रथम तीन वर्षे पुणे शहरातील प्रथितयश कारखान्यांत शिफ्ट इंजिनिअर म्हणून काम केले. पण त्या कामात मानसिक समाधान - आनंद न मिळाल्याने व स्वत:चा पिंड लक्षात घेऊन ज्या कामात माझे मन रमेल असे अध्यापन क्षेत्र मी आपणहून निवडले.

पहिली काही वर्षे नातलगांमध्ये,

मित्रपरिवारात थोडी कुचेष्टा झाली, पण तिच्याकडे कानाडोळा केला. सर्वसाधारण शिक्षणक्षेत्रातील शिक्षकांना त्यांच्या विषयाच्या पदवी शिक्षणाबरोबर शिक्षणशास्त्राची पदवी आवश्यक असते. आणि आम्हा तंत्र शिक्षकांना अवघ्या तीन वर्षाच्या डिप्लोमानंतर लगेच त्यांच्या बरोबरीने काम करण्याची संधी प्राप्त होते त्यामुळे त्यांच्या समवेत काम करताना त्यांच्याकडून थोडा मत्सर, द्वेष सहन करावा लागला. त्यामुळे सुरवातीस बरीच वर्षे मन आतून उदासीन होते.

मनाची ही उदासीनता वाचनातून नाहीशी करण्याचा प्रयत्न करीत होतो. आणि १९९२-९३ च्या सुमारास एक दिवस प्रा.दौलतभाई देसाई यांचे 'अध्यापनातील आनंद तंत्र व मंत्र' हे पुस्तक वाचनात आले. ८० पृष्ठांच्या या छोट्या पुस्तकाने किमया केली. मनातील मरगळ अेकदम नाहीशी झाली.

शैक्षणिक कार्यक्षेत्र तर मी स्वत:हूनच निवडले होते. आणि त्यात सर्वोत्कृष्ट होण्याची मनापासून इच्छा होती. पण त्यासाठी योग्य मार्गदर्शन मिळू शकले नाही. ते मार्गदर्शन मला या पुस्तकाच्या वाचनातून मिळाले. आपला व्यवसाय त्या पुस्तकातील शब्दांतच म्हणायचे झाले तर ''एक जीवनदायी व जीवनदानी व्यवसाय आहे''. हे मनोमन पटले आणि त्यासाठी आपण स्वत: सतत चैतन्यपूर्ण असलेच पाहिजे हे ही जाणले. आणि त्यामुळेच सुट्टीतपण शाळेतच मन रमू लागले.

समाजात आजदेखील तसे शिक्षकाचे स्थान गौणच आहे. त्यामुळे पूर्वी आपण अमुक एका शाळेत शिक्षक आहे हे सांगताना मला कमीपणा वाटत होता. पण या पुस्तकाच्या वाचनातून कळले की शिक्षक या नात्याने सर्वपल्ली डॉ. राधाकृष्णन, सॉक्रेटिस, श्रीमद् शंकराचार्य, भगवान बुद्ध, भगवान महावीर या लोकोत्तर महामानवांशी आपले बंधुत्वाचे नाते आहे. या उज्वल परंपरेचे आपण वारस आहोत आणि त्यामुळे मी एक शिक्षक आहे हे सांगताना आज मला अभिमान वाटतो.

विद्यार्थ्यांशी जवळीक सांधून त्यांच्या समस्यांचे निराकारण करताना त्याच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न केल्यावर विद्यार्थी असे का वागतात हे समजले. त्यांना अधिकाधिक चांगले घडविण्यासाठी त्यांचेवर अधिक संस्कार घडविणे गरजेचे ठरले. आमचे अभ्यासक्रम हे स्वयं. उद्योगाच्या उद्दिष्टाने सुरू झाले असल्याने त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात उद्योजकतेला अग्रस्थान आहे. त्यासाठी एम.सी.ई.डी., डेव्हलपमेंट एज्युकेशन सोसायटी वगैरे संस्थांशी संपर्क साधून त्यांच्या विविध कार्यक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकासासाठी विशेष प्रयत्न केले गेले. यातून विद्यार्थ्यांच्या पालकांशी पण संपर्क वाढला. विद्यार्थी, पालक माझ्याशी अधिक आदराने व आपुलकीने वागू लागले. त्यामुळे कामाला हुरूप आला. कार्याला अधिक गती आली. योग्य दिशा लाभली. आमच्या संस्थेतून अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी स्वत:चा छोटा व्यवसाय सुरू करून अभ्यासक्रमाचे उद्दिष्ट पूर्ण केले.

याचाच अप्रत्यक्ष परिणाम म्हणजे माझ्या हातून घडलेल्या या कामाची नोंद भारतीय जैन युवक संघटना, मणिभाई देसाई प्रतिष्ठान, व उच्च व तंत्र शिक्षण खाते यांनी घेऊन 'उत्कृष्ट शिक्षक' म्हणून गौरव केला. या यशाचे श्रेय या पुस्तकाला आहे. पुस्तकातील मार्गदर्शनानेच सर्वोत्कृष्ट शिक्षक होण्याचे स्वप्न साकार झाले. जीवनातील मरगळ नाहीशी झाली कार्याला एक निश्चित दिशा मिळाली. निवृत्तीच्या उंबरठ्यावर उभा असताना कामाचे आज मला समाधान लाभले.

अध्यापनातील आनंद-तंत्र व मंत्र ले. प्रा. दौलतभाई देसाई, अनुवाद - डॉ. वसंत नामपुरे -या पुस्तकाच्या वाचनातून मिळालेले यश कृतज्ञतापूर्वक नमूद करावेसे वाटते.

अ.ना.पिंगळे
आर.सी.एम् . गुजराथी हायस्कूल,
टेक्निकल,
पुणे - ४११ ००२.

तृतीय क्रमांक

'तराळ अंतराळ' ने मला माणुसकीचे धडे दिले

अनिता दाते

वाचन माणसाला समृद्ध करत असते. वाचनानं आपलं वागणं, इतकंच काय चालणं-बोलणं ही बदलतं यांचा मला खरोखरच प्रत्यय आला.

एका खेडेगावात माझा जन्म झाला. आपण ब्राम्हण आणि बाकीचे इतरेजन अशी भावना मनात होती. शांळेत आणि नंतर शहरामध्ये कॉलेज शिक्षणासाठी गेल्यावर जातीची उतरंड लक्षात येऊ लागली. इतर वाचनाबरोबर दलितांची आत्मचरित्रे वाचनात आली. आणि त्या चरित्रांनी मला अगदी झपाटून टाकले. लक्ष्मण माने, लक्ष्मण गायकवाड, हिरा बनसोडे, दया पवार यांची आत्मकथने, माझ्या टिपिकल मध्यमवर्गीय चौकटीच्या खूप पलिकडची वाटू लागली. जातीचे गोडवे गाऊन माणसे किती निष्ठुर वागतात हे वाचून मी हादरलेच.

शंकरराव खरातांचे 'तराळ अंतराळ' वाचून मी खूप अस्वस्थ झाले. त्यातील प्रांजळपणा भावला, थयथयाट न करता, कडवटपणा वा राग न करता केलेले आत्मकथन खूप काही सांगून गेले. त्याचवेळी मी ठरविले की योगायोगाने मिळालेल्या जातीचे मोठपण मिरवायचे नाही. लेखकाला जसे अनुभव आले तसे अनुभव इतरांना आपल्या हातून येता कामा नयेत. 'तराळ अंतराळ' मुळे मी त्या त्या व्यक्तींशी माणुसकीने वागू शकलो.

एका लहान गावात मी छोटेसे औषधालय चालविते. त्याला लागूनच पोस्ट ऑफीस आहे. माथाडी लोकांची पोस्टात नेहमी ये-जा असते. अगदी सुरुवातीला मला ही मंडळी जरा बिचकून असत. त्यातील एका धीट कामगाराने माझ्याकडून पाकिटावर पत्ता लिहून घेतला. हळूहळू हे प्रमाण वाढून ही मंडळी मनीऑर्डरचा फॉर्म भरून घेणे, पत्र लिहून घेणे, आलेली पत्र वाचून घेणे. अशा कामांसाठी विश्वासाने माझ्याकडे येऊ लागली. मलाही यात आनंद वाटू लागला. 'तराळअंतराळ' मधे एक पत्र वाचून दाखविण्याच्या मोबदल्यात ढीगभर लाकडे फोडून घेण्याची घटना आली आहे. आपल्या हातून असे घडता कामा नये ह्या जाणीवेतूनच हे काम झाले.

आमच्या नारळ-सुपारीच्या बागेसाठी दोन मजूर कायम असतात. घरात कोणताही पदार्थ केला की त्यांना देण्याची आमची पद्धत आहे. 'तराळ अंतराळ'मधील घमेल्यात ताक-रताळी खाण्याच्या प्रसंगावरून मी सावध झाले असा अपमानास्पद प्रकार

आपल्या हातून घडता कामा नये ह्या जाणिवेतून ह्या कष्टकऱ्यांना कोणताही पदार्थ व्यवस्थित ताटात वाढूनच मी देते. त्यांच्या चेहऱ्यावरची कृतज्ञता वाचून मलाही आनंद होतो.

चोरालाही अस्पृश्याकडची भाकरी चालत नाही ह्या घटनेवरून मी बरेच काही शिकले. आपल्या संबंधात येणाऱ्या व्यक्तींना मी 'जात' विचारत नाही. आमच्या बागेच्या निमित्ताने अेक कंत्राटदार कामासाठी, भर दुपारी आला. भर दुपारची, रणरणत्या उन्हाची वेळ लक्षात घेऊन मी त्यांना फ्रीजमधील थंडगार पाणी प्यायला दिले.

कामाची बोलणी करून तो गृहस्थ गेला आणि दुसऱ्या दिवसापासून आपली टीम घेऊन कामाला आला. नेहमीच्या पद्धतीप्रमाणे माझी मुले त्यांना काका म्हणू लागली. 'मी तुमचा काका नाही, मामा आहे' असे तो मुलांना म्हणू लागला. यासंबधी त्याला विचारले असता तो म्हणाला, 'काल मी ज्या कपड्यात आलो होतो त्या अवतारात मला कोणी पाणीही दिले नसते. इथे तर मला थंडगार पाणी मिळाले. अशी तहान भागविणारी स्त्री माझी धर्माची बहीणच नाही का ? म्हणून मी मुलांचा मामा आहे.'

'तराळ अंतराळ' मुळेच माझ्या हातून अशा तऱ्हेचे माणुसकीचे वर्तन घडते. विशेष म्हणजे ह्या गोष्टी माझ्या हातून सहजतेने घडतात. मीच असे वागत असल्याने माझी मुलेही सहृदयतेने वागतात. समाज-सुधारणा करण्याचा माझा आवाका नाही. पण आमच्या स्वत:पुरती जात व श्रेष्ठकनिष्ठपणाची भावना आम्ही घालवू शकलो हेही नसे थोडके.

दलित चरित्रे वाचून मी अंतर्मुख होत होते, दु:खी होत होतेच. पण 'तराळ अंतराळ' ने माझ्या वर्तनात बदल घडविण्याचे कार्य केले.

अनिता दाते,सावली'बंगला,मु.पो.थळ
ता.अलिबाग,जि.रायगड ४०२ २०७.

स्वत:ला बदलणे जमले की जगण्यात आनंद वाटतो

सौ.उषा शरद साठे

मी गृहिणी आहे. संसार करतांना लहानमोठे प्रश्न यायचे. त्यांतून मार्ग सापडत नसे. कधीकधी फार निराश वाटायचं. रडू यायचं. असंच कधीतरी मन खूप निराश असतांना 'हसत जगावं' हे हॉ.रमा मराठे यांचं पुस्तक हाती आलं.

हे पुस्तक वाचल्यावर मला वाटलं की आपल्या बऱ्याच समस्यांना यात उत्तरं आहेत. या पुस्तकाने माझ्या विचार करण्यात फरक पडला. प्रत्येक गोष्टीचा सकारात्मक विचार मी करू लागले. उदा. पहाटे फिरायला जाणं. पूर्वी ते मी अगदी टाळत असे. एक-दोन दिवस जाऊन आले. शांत प्रसन्न सकाळ, पाखरांची किलबिल, आभाळांतील ढग, तारे, उगवतीचा प्रकाश हे सर्व मला रोज साद घालू लागले.

माझा दृष्टिकोन बदलला. दुसरी व्यक्ती कधी वर्मी लागणारं बोलली की मी खूप अस्वस्थ व्हायचे. पण पुस्तकात सांगितल्याप्रमाणे जगात वावरायचं म्हणजे सज्जन-दुर्जन, अहंकारी-मनमोकळी, सुष्ट-दुष्ट माणसं भेटणारच. सर्वांशी गाठ पडणारच. कोणी अपमानास्पद बोललं तर त्याचा तो स्वभाव आहे म्हणून दुर्लक्ष करायचं. माणसं अशी असतात किंवा असतातच हे डॉ.

मराठे यांनी बर्फाच्या उदाहरणाने छान पटवलंय्. बर्फाचा थंडपणा त्रासदायक होत असेल तर बर्फ टाळावा. बर्फाकडून उबदारपणाची अपेक्षा करू नये. फार तर एखाद्या पेयात घालून बर्फाचा उपयोग करून घ्यावा. तसंच दुर्जन, अहंकारी व्यक्तीच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करावे. त्याच्याकडून चांगल्या बोलांची अपेक्षा करायची नाही. त्या व्यक्तीच्या बोलण्याचा त्रास करून घ्यायचा नाही हे मी शिकले.

या पुस्तकाच्या रूपाने हाती परिसच आला. मला प्रश्न पडे की माणसं अशी मत्सरग्रस्त, दुष्ट का असतात ? अशी तिरकस का वागतात? पण आता कळले की या प्रश्नाला उत्तर नाही. त्यांना बदलणं आपल्या हाती नाही. म्हणून स्वत:ला बदलणं सर्वात उत्तम, हे मी शिकले.

'हिशेब प्रत्येक क्षणाचा' या प्रकरणानंही मला नवी दिशा दिली. एखाद्याला कठीण प्रसंगात मदत केली तर आपण अपेक्षा करतो की आपल्यालाही त्यानं तशीच परतफेड करावी. पण ही अपेक्षा चूक असते हे या प्रकरणावरून लक्षात आले. प्रत्येक क्षण आपल्याला काहीतरी देत असतो. दाता असण्यातील आत्मगौरव, अभिमान, कर्तव्यपूर्ती, आनंद या त्या त्या क्षणाशी मिळणाऱ्या गोष्टी असतात. आपण फसवले गेलो असं म्हणून या आनंदाचा अवमान होतो.

आपली मन:शांती घालवणारे अनेक प्रसंग येतात. या पुस्तकामुळे त्यांतून शहाणपणानं बाहेर येणं शिकले. लहान-सहान दुखणी, जवळ असलेल्या शाळेतील गोंगाट गडबड, पाणी-टंचाई, मोलकरणीची रजा यांनी मला फार त्रास व्हायचा. पण आता लक्षात येते की साठीच्या या वयात दुखणी थोडाफार त्रास देणारच. घराजवळ शाळा आहे म्हणजे मुलांचा आरडाओरडा आलाच, मोलकरीण पण माणूसच आहे हे उमगलं. आणि या अडचणींचा स्वीकार करायची मी मनाची तयारी केली.

मी स्वत:ला खूप बदललं. सकारात्मक विचार करू लागले व जग किती सुंदर आहे, नवीन उगवलेला दिवस किती प्रसन्न आहे असं वाटू लागलं. पहाटे गरज झाल्यावर झाली कामाची कटकट सुरू म्हणून न वैतागता एक एक कामं करून घर स्वच्छ आवरूया असं वाटायला लागलं. घर स्वच्छ ठेवल्यामुळे काम करायला अधिक उत्साह आला. विरंगुळ्याविषयी पण पुस्तकांत छान सुचवलंय्. मला संगीताची आवड होती ती मी पूर्ण विसरून गेले होते. काही शास्त्रीय संगीताच्या कॅसेटस् आणून ऐकू लागले. संगीतानं मन इतकं आनंदी होतं व ताण-तणाव नाहीसे होतात. एखादे वेळी तर आनंदानं डोळ्यात अश्रू येतात व असं वाटतं की मी तृप्त आहे. मला आता आणखी काही नको.

तर अशा तऱ्हेने चांगल्या-वाईट दोन्ही गोष्टींचा स्वीकार करून, भल्या-बुऱ्या सगळ्या माणसांच्यात राहून मी स्वत: बदलून आनंदी राहायला शिकले. हंसत जगावं व जीवन हा एक छान खेळ आहे त्याचा आनंद घ्यावा हे मी शिकले.

आत्तापर्यंत अनेक पुस्तकांनी मनावर चांगला परिणाम घडवला आहे. पण डॉ. रमा मराठे यांच्या 'हसत जगावं' या पुस्तकानं माझी संपूर्ण जीवन-शैलीच बदलली !

सौ. उषा शरद साठे
२/९ दीपज्योती,
राजाजी पथ, ४थी गल्ली,
डोंबिवली (पूर्व) ४२१ २०१.

दासबोध, भगवद्गीता, ज्ञानेश्वरी हे ग्रंथ संजीवनीसारखे आहेत

सौ.अपर्णा भाटवडेकर

'ग्रंथ आपले गुरू, ग्रंथ आपले खरे मित्र, वाचाल तर वाचाल' ही वाक्ये पूर्वी मी पाठ केली होती. पण माझ्या जीवनात ही वाक्ये खरीच ठरली.

सर्वसाधारणपणे व्यक्तीच्या वाचनाच्या विकासाचा क्रम मी माझ्या मते ठरविला आहे तो असा.

लहानपणी परीकथा, प्राण्यांच्या कथा, बोधप्रद कथा, उपदेशाच्या कथा माणूस वाचतो.

तारुण्यात प्रेम कथा, शृंगार कथा, साहस कथा, शोधांच्या कथा. वेगवेगळ्या माहितीची पुस्तके इत्यादी वाचायला आवडते. ही आवड साधारणपणे ४० वयापर्यंत टिकते. नंतर थोडे दिवस चरित्रे, आत्मचरित्रे वाचावीशी वाटतात. हळूहळू काही शारीरिक दुखणी, आजार झाल्यास आरोग्यविषयक माहिती वाचायला लोकांना आवडते. कारण जोपर्यंत कोणतीहि गोष्ट स्वत:पर्यंत येत नाही तोपर्यंत माणूस अलिप्त व निष्काळजी असतो. दुसऱ्याला एखादे दुखणे किंवा आजार झाला कीं उपदेशाचे डोस पाजून मोकळा होतो. पण तेच स्वत:ला झाले की दुसऱ्यांचां उपदेश अजिबात ऐकावासा, वाटत नाही. काही दुखणी, उपचारांनाही दाद देत नाहीत. अशा वेळेस माणूस आध्यात्मिक वाचनाकडे वळतो. आध्यात्मिक वाचन साठीच्या सुमारास सुरू होते.

अध्यात्म म्हणजे देवपूजा, उपासतापास, व्रतवैकल्ये, नव्हे. हे सर्व वरवरचे उपचार आहेत.

अध्यात्म म्हणजे आत्म्याचा विकास. मनाचा विकास.

दुसरे मूल अपंग झाल्यामुळे बसून बसून काय करायचं म्हणून वाचनाचे वेड लागले. चरित्रे आत्मचरित्रे वाचली; एका मैत्रिणीकडून दासबोधाच्या पत्रद्वारा अभ्यासक्रमाची माहिती मिळाली. तो अभ्यासक्रम पूर्ण करूनही मनाचे समाधान होईना. म्हणून दासबोधचा ८ वर्षांचा सखोल अभ्यासक्रमही पूर्ण केला. त्यानिमित्ताने शिवथर घळीवर दोन दिवस राहिले. अपूर्व मन:शांतीचा अनुभव मिळाला. आध्यात्मिक शिबिरात शरीरातील सेरेटोनिन या रसायनाचे प्रमाण कमी होऊन ताणतणावही कमी होतो. मन प्रसन्न होते.

दासबोधाच्या अभ्यासाने माझ्यात झालेला दुसरा बदल म्हणजे आता मला प्रत्येक व्यक्तीला समजून घ्यावेसे वाटते. खरोखरीच त्या व्यक्तीची काय अडचण आहे हे तिच्या मनात शिरून कळून घ्यावेसे वाटते.

तिसरा बदल म्हणजे 'दुसऱ्याच्या दु:खे दु:खवावे । दुसऱ्याच्या सुखे सुखी राहावे हा ही फार मोठा बदल माझ्यात झाला. पूर्वी दुसऱ्यांचे चांगले बघून मत्सर वाटायचा हल्ली आतां तसा मत्सर वाटत नाही. उलट त्यांच्या सुखात सहभागी झाले कीं तेही आपल्या सुखात सहभागी होतात.

'ठकासी व्हावे महाठक' हा एक चौथा बदल झाला आहे. पूर्वी जशास तसे वागताना एक भीती वाटायची. आता ती भीती नाहीशी झालीय् .

हे ठळक बदल होत. आणि छोटे छोटेही खूप बदल झाले आहेत. भगवद्गीता, दासबोध, ज्ञानेश्वरी हे ग्रंथ संजीवनीसारखे आहेत. संत हे उत्तम मानसोपचारतज्ज्ञच होते. असे मला वाटते.

सौ.अपर्णा भाटवडेकर
कनिका अ/१३, एन.डी.भूत्ता स्कूल जवळ,
अंधेरी (पूर्व) मुंबई - ४०० ०६९.

मला आवडलेले पुस्तक 'डायरी ऑफ ॲन फ्रॅंक'

कोणाचीही डायरी वाचणे हा सभ्य संकेत नाही. काही थोर व्यक्तींच्या डायऱ्या आपल्याला त्यांच्या मृत्युनंतर पुस्तकरूपाने वाचायला मिळतात. त्यांच्या वाचनाने तत्कालीन सामाजिक-राजकीय-आर्थिक परिस्थिती कशी होती. त्या व्यक्तीचे कार्य कशाप्रकारे चालू होते हे कळते. मी पुस्तकरूपात वाचलेली डायरी 'ॲन फ्रॅंक' या सामन्य कुटुंबातील मुलीची आहे. मग त्या डायरीला पुस्तकरूप व प्रसिद्धी मिळण्याचे भाग्य कसे लाभले ? तर असे झाले,

दुसरे महायुद्ध सुरू होते तेव्हाची ही गोष्ट. १९४२ सालातील तो काळ 'ज्यू' लोकांना फार वाईट होता. जर्मन हे ज्यू द्वेष्टे म्हणून प्रसिद्ध होते. येशू ख्रिस्ताला सुळावर चढवणारे ज्यूच होते. तसेच पहिल्या महायुद्धात जर्मनीला पराभव पत्करावा लागला. त्याला कारण ज्यू लोकच, या भावनेमुळे जर्मन ज्यूंचा नेहमी तिरस्कार करीत. या महायुद्धाच्या काळात ज्यूवरील दडपण खूप वाढले. त्यांच्यावर कडक निर्बंध घातले गेले. उदा. ज्यूंनी आपल्या कापड्यांवर पिवळ्या ताऱ्यांचा बिल्ला लावायचा. दुचाक्या परत करायच्या सार्वजनिक बसमधून हिंडायचे नाही. स्वत:च्या मोटारी वापरायच्या नाहीत. खरेदी दुपारी ३ ते ५ या वेळातच करायची. ठराविक सलूनमध्ये केस कापून घ्यायचे. रात्री ८ ते सकाळी ६ या वेळात बाहेर पडायचे नाही. करमणुकीसाठी थिएटर वर्ज्य. खेळ-पोहणे यावर बंदी. ठराविक शाळांमध्येच शिक्षण घ्यायचे. ख्रिश्चन लोकांच्या घरी जायचे नाही. युद्धाच्या तीव्रतेबरोबर ज्यूंची छळछावण्यात रवानगी होऊ लागली. यावर उपाय म्हणून ज्यू लपून-छपून थोडक्यात म्हणजे भूमिगत होऊन राहू लागले.

ॲनचे वडील, आई, बहिणी मार्गारिट व स्वत: ॲन हे आणखी कुटुंब - श्री व सौ व्हॅनडॅन, त्यांचा मुलगा पीटर तसेच आणखी एक गृहस्थ श्री डसेल असे आठ जण हॉलंडमधील एका जुन्या ऑफिसच्या 'सिक्रेट ॲनेक्स' च्या बिल्डींगमधील तळघरात राहू लागले. हे सर्वजण सुमारे २ वर्षे बंदिवासात राहिले.

सर्वसामान्य आयुष्य जगताना अचानक अज्ञातवासात जाऊन रहावे लागणे ही केवढी धक्कादायक घटना आहे. जर्मन लोकांना, पोलिसांना पत्ता लागू न देता शक्य तेवढे सामान्य हलवणे, खाद्यपदार्थांचा साठा करणे किती अवघड झाले असेल ! रोजचे जीवनच बदलून गेले या सर्वांचे. ॲनचे वय तर अवघे तेरा वर्षांचे होते. शाळा, अभ्यास, मित्र-मैत्रिणी सगळे काही सोडून बंदिवासात आल्यावर काय करायचे ? हा मोठा प्रश्नच होता.

युद्धसमाप्तीनंतर डच ज्यू जनतेला जो छळ सोसावा लागला त्याचा वृत्तांत एकत्रित करून जनतेला उपलब्ध करून दिला जाईल (पत्रे, रोजनिश्या वगैरे) असे डच शासनसंस्थेतल्या लंडन येथे राजकीय आश्रय घेतलेल्या एका सभासदाने जाहीर केले होते. या भाषणाने प्रभावित होऊन ॲन फ्रॅंकने रोजनिशी लिहायचे ठरवले. डायरी लेखनाचा हा काळ होता १२ जून १९४२ ते १ ऑगस्ट १९४४. या रोजनिशीलाच तिने आपली मैत्रीण मानले. तिचे नाव 'किटी' ठेवले व तिला आपल्या मनातील सर्व सुखदु:खे, गुपिते, भावभावना मुक्तपणे सांगू लागली.

वेगवेगळ्या स्वभावाच्या, सवयींच्या व्यक्तींनी असे २ वर्षे एकत्र राहणे; मुख्य म्हणजे आपल्या हालचालींचा आवाज होणार नाही याची काळजी घेणे, मिळेल ते अन्न पदार्थ खाणे अशा तऱ्हेने कठीण परिस्थितीशी मुकाबला करणे अवघड होते. तरीही भरपूर वाचन करणे, काही लेखन करणे, नविन भाषा शिकणे असे उपक्रम चालू होते. एकमेकांचे वाढदिवस साजरे केलेजात. घरातील बायकांना अन्नपदार्थ पुरवणे, टिकवणे ही कामे न कंटाळता करावी लागत. वयात येणाऱ्या ॲनचा या वातावरणात भावनिक कोंडमारा होत होता. पीटरच्या रूपाने तिला एक चांगला मित्र मिळाला व वातावरणात सुसह्य झाले.

या अज्ञातवासात राहणाऱ्या मंडळींना बाहेरचे काही लोक त्यांच्या परीने होईल ती मदत करण्याचा प्रयत्न करीत. पण त्यांनाही ही मदत करताना पोलिसांना सुगावा लागणार नाही याच सतत खबरदारी घ्यावी लागे. मदत म्हणजे या लोकांना लागणारे सामान वर्तमानपत्रे, पुस्तके, औषधे इ. आणून देणे. जर्मन लोकांच्या अत्याचाराविरुद्ध आवाज उठवणारे, भूमिगतांना मदत करणारे अनेक लोक होते. राऊल वॉलेनबर्ग हा स्वीडनमधील एक मुत्सद्दीही यात होता. तो अमेरिकेचा तिसरा सन्माननीय नागरिक झाला.

असे हे पुस्तक वाचतांना आपण त्यात गुंतून जातो. ॲनने नुसतेच घरगुती वर्णन नाही तर सामाजिक, राजकीय परिस्थिती बद्दल काही वेळा लिहिले आहे. या कुटुंबाविषयी आपल्याला आत्मीयता वाटू लागते, त्यांच्या अडचणी आपल्याच वाटू लागतात. पुस्तक वाचून मला बरेच काही शिकता आले. हॅम्लेटने म्हटल्याप्रमाणे "[ग्हो' हे वाक्य ॲनच्या कुटुंबियांप्रमाणे आपणही अंमलात आणले तर येईल तया परिस्थितीला हसतमुखाने तोंड देता येईल. संकटांनी डगमगून जायचे नाही, हेही दिवस जातील अशी आशा बाळगायची. आपली नित्यकर्मे निष्ठेने करायची. श्रद्धा व चिकाटी यावर अढळ विश्वास ठेवायचा. विनोदबुद्धी जागृत ठेवली व प्रत्येक गोष्टीची चांगलीच बाजू विचारात घेतली तर आपण निराशावादावर मात करू शकतो. साध्या-साध्या गोष्टी मनाविरुद्ध झाल्या तर आपण सहन करू शकत नाही. इथे तर २ वर्षे अनेक लोक कसे राहिले असतील ? हे वाचून डोळे उघडतात. आपण तर कुठल्याही परिस्थितीला धैर्याने तोंड द्यायचेच पण जी कोणी माणसे संकटात असतील, ज्यांना मदतीची गरज असेल त्यांना होईल ती मदत करणे हे आपले कर्तव्य आहे, असे मला या पुस्तकाच्या वाचनाने प्रकर्षाने जाणवले. हा माझ्यातला सकारात्मक बदल होय. समाजसेवा म्हणून जे जमेल ते करायचे मी ठरवले आहे. वाचन हे नुसते करमणुक म्हणून काही प्रमाणात केले तरी ज्यापासून आपल्याला काहीतरी चांगले शिकता येईल असेच वाचन असावे. याचे उत्तम उदाहरण ही रोजनिशी आहे.

४ ऑगस्ट १९४४ ला पोलिसांनी गुप्तनिवासावर छापा घालून सगळ्यांना पकडले, वेगवेगळ्या ठिकाणी हलवले. १९४५ फेब्रुवारी अखेर किंवा मार्चच्या पहिल्या आठवड्यात ॲन टॉयफॉईडच्या साथीत बळी पडली. ॲनचे वडील हे एकटेच वाचले. महायुद्ध संपल्यावर ॲनची ही रोजनिशी प्रसिद्ध त्यांनी केली. ती जपून ठेवण्याचे काम गुप्तनिवासावरील ऑफिसमध्ये काम करणाऱ्या दोघींनी केले होते.

ॲमस्टरडॅमहून ५ जुलै २००२ रोजी प्रसिद्ध झालेल्या एका बातमीनुसार फ्रॅंक कुटुंबीय व त्यांचे सोबती यांच्या लपून रहाण्याच्या जागेबद्दल पोलिसांना कोणी बातमी दिली याबाबत पुन्हा शोध घेण्याचे काम चालू आहे.

रामाला सेतू बांधायला एक छोटी खार मदत करू पहात होती तशी संकटांना चिकाटीने तोंड द्यायला शिकवणारी ही ॲन ! तिच्या स्मृतीला विनम्र अभिवादन ! **एक वाचक**

सावरकरांच्या क्षकिरणांनी विज्ञाननिष्ठा अंगी बाणली

रवींद्र शंकर लांजेकर

जरा 'गोत्र' जमायचा अवकाश, ग्रंथ जीवलग 'मित्र' बनतात.

राज-दरबारात वा स्मशानात, संघर्षात असा वा संपर्कात.

ते अंतरंगात रंग भरतात.., वर्तनालाही ढंग आणतात.

औपचारिक शिक्षण घेत असताना आपल्या मनाचा ग्रंथही रचला जात असतो. त्या ग्रंथात सतत भर पडतच असते. दिवस जातात तसे ग्रंथ वाचनाचे क्षेत्रही विस्तारते,

ग्रंथवाचनाने संवेदनशीलता आणि लालसा वाढली. अमुक एका ग्रंथामुळे आपण आमूलाग्र बदललो असे नाही. तरीही तीव्रतम बदल घडवणाऱ्या, २/३ पुस्तकांचा उल्लेख करणे आवश्यक अटळ आहे.

'क्ष- किरणे' हे सावरकरांचे पुस्तक १९३० साली किर्लोस्कवाडीहून प्रकाशित झाले. शं. वा. किर्लोस्कर त्यांच्या प्रस्तावनेतं म्हणतात -''काल्पनिक देव आणि त्यांच्या प्रसादानें प्राप्त होणारा आभासमय मोक्ष बुद्धीला मान्य होत नाही. जे प्रत्यक्ष पहातां व अनुभविता येते तेवढेंच काय ते खरें व उपासना करणें हितप्रद. अचूक व निश्चित फलदायी विज्ञान म्हणजेच आमचा परमेश्वर ! हे नव्या युगाचें धर्मसूत्र आहे, असलें पाहिजे. बहुतेकांची विचार व उच्चार शक्ती जुन्या संस्कारांच्या दडपणानें चेपलेली असते. हे दडपण झाडून टाकून बुद्धीला दिसेल आणि पटेल ते सत्य जगापुढे ठेवण्याचे कार्य बॅ. वि.दा.सावरकर यांनी चालविले आहे !'' या विचारांचाप मागोवा घेत समग्र सावरकर वाचले. ज्ञानाला जोडून विज्ञानवादी साक्षात्कारांचा छंद जडला. विज्ञानवादी समाज सुधारक भेटले. केशवसुतांच्या 'देव दानवां नरे निर्मिले' या ओळींचा अर्थ विस्तारला. एक तर्क-संगती, एक जीवनविचार, मिळाला.

त्यांच्या 'मनुस्मृती'वरल्या लेखांशी साम्य सांगून जीवनाला ठोस बैठक देणारे आणखी एक पुस्तक 'मनुस्मृतीच्या समर्थकांची संस्कृती' लेखक डॉ. आ.ह.साळुंखे यांचे वाचले आणि - काल्पनिक देव, मानवनिर्मित देव, ग्रंथप्रामाण्य अनुभवलें. ते पुन: एकदा 'विद्रोही तुकाराम' या पुस्तकांतून संशयाचे जाळे विस्कटले-विचक्षणेचे 'क्ष किरण' मिळाले. विवेकवादाला बळ आले. आता साठीनंतर पुन: वाचनाला व लिखाणाला उधाण आलें.

ग्रंथ जीवनाचा आधारू...
जीवना नेती 'पैल-तिरू
ग्रंथ हेची 'कल्प'तरू...
ग्रंथ तेची संत...
ग्रंथाची संगत धरू ॥

रवींद्र शंकर लांजेकर
२१९/६-अ, गणेशनगर,एरंडवणें,
'अभिषेक' समोर, पुणे - ४११ ००४.
फोन - ५४२२३११

◆ नोव्हेंबर २००२
◆ वर्ष दुसरे
◆ अंक अकरा

मेहता मराठी ग्रंथजगत

— अनुक्रमणिका —

संपादकीय - २

नाते सौदार्हाचे, साहित्याचे
डॉ. आनंद यादव ६
द. ता. भोसले १३
कांचन काशिनाथ घाणेकर १८
सुमेध वडावाला (रिसबूड) २९
चंद्रकांत बांदिवडेकर ३७
डॉ. राजेंद्र प्रभुणे ४३
प्रभाकर पेंढारकर ४९
डॉ. सुवर्णा दिवेकर ५४
डॉ. अनुराधा औरंगाबादकर ५९
भा. द. खेर ६४
डॉ. सुनीती देशपांडे ६८

इंग्रजी बेस्टसेलर्समधील बेस्ट
जॉन ग्रिशॅम ७९
ॲलिस्टर मॅक्लीन ८१
लिऑन युरिस ८४
डेव्हिड बेल्डासी ८८
जेम्स पॅटरसन ९१
स्टिफन किंग ९४

लेखक प्रान्तोप्रान्तीचे
कमलेश्वर - पद्माकर जोशी ९९
रवींद्रनाथ टागोर - मृणालिनी गडकरी १०२
प्रतिभा राय - डॉ वासुदेव/राधा जोगळेकर १०६
एस. एल. भैरप्पा - डॉ. उमा कुलकर्णी ११०

'वेगळ्या वाटां'शी बातचीत
सुधा मूर्ती- शब्दांकन सुप्रिया वकील ११५
निरंजन घाटे - शब्दांकन सुनीता दांडेकर १२४
अतुल शिधये - शब्दांकन सुनीता दांडेकर १२९

लेख स्पर्धा १३४
स्पर्धा निकाल ६३
नवी स्पर्धा ६७,१२८

संपादक सुनील मेहता
कार्यकारी संपादक शंकर सारडा
संपादन सहाय्य सुनीता दांडेकर
अंकाची किंमत २५ रु.
वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.
प्रसिद्धी दरमहा १५ तारखेस

✠ मांडणी-अक्षरजुळणी : *मेहता पब्लिशिंग हाऊस*

✠ संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१२१६ सदाशिव पेठ,धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०.
फोन : ४४७६९२४ फॅक्स : ०२०-४४७५४६२
Email - mehpubl@vsnl.com

वार्षिक वर्गणी ८० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.
३ व पाच वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

मानसिक ताणतणावापासून मुक्ती मिळवून जीवन आनंदी व निरोगी होण्यासाठी मार्गदर्शक पुस्तके

हसत जगावं, स्वभावाला औषध आहे, निरामय यशासाठी ध्यान, मनावर विजय, चिंतामुक्त जीवन

आतापर्यंतच्या बुक क्लबमधील उपलब्ध पुस्तकांसाठी ४० रु. भरा आणि कोणतीही सहा किंवा सर्व पुस्तके एकाच वेळी निम्म्या किंमतीत मिळवा. सहा पुस्तकांसाठी ५०रु. व सर्व पुस्तकांसाठी एकूण पोस्टेज १००रु. फक्त!

अधिक माहितीसाठी आजच संपर्क साधा.

मेहता पब्लिशिंग हाऊस

१२१६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

वर्गणीचे नूतनीकरण करा!

मेहता मराठी ग्रंथजगत

अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

भेट !

भेट फक्त प्रती शिल्लक असेपर्यंतच !

३ व ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास आकर्षक भेट!

एक वर्षाची वर्गणी **८०रु.**,
तीन वर्षांची २००रु. आणि
पाच वर्षांची ३००रु.

३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
'आज इथे उद्या तिथे-वि. स. वाळिंबे
हे ४५रु.चे पुस्तक भेट!पोस्टेज २०रु.
५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
'इलाटाज् डायरी -अनु. ज्ञानदा नाईक'
हे ८० रु.चे पुस्तक भेट!पोस्टेज २०रु.

वर्गणी पाठवण्याचा पत्ता :

मेहता मराठी ग्रंथजगत,
मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव पेठ,
पुणे - ४११०३०. फोन - ४४७६९२४

सभासदांना आमच्या सर्व पुस्तकांवर २५ % सवलत!